नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी
१९८४

जा, फे/मा, मे, जु, ऑग - ५ अंक



अनुक्रमणिका

अनुक्रमणिका


महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत   विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक : माणिक गोडघाटे
सहसंपादक : जयंत देवघर

वर्ष २९ वे : डिसेंबर ७३, जानेवारी १९७४ : अंक ८–९ : मार्गशीर्ष–पौष : शिशिर : शक १८९५

अनुक्रमणिका



पुस्तके रेणू : कुंदा पारसनीस ७९०, **अमेयची तीन प्रकाशने :** हरिहर चंद्रशेखर घोंगे ७९२. **१. वारा वाजे रुणझुणा,** २. **उत्तररात्र** : शकुंतला जोग ७९७.

चित्रे **मुखपृष्ठावरील छायाचित्र** : जयंत हरकरे. **फुटाळा तलाव** : जलचित्र : भांजीभाई पाटणकर. **रेखाटणे** : मुरली लाहोटी. वसंत आबाजी डहाके ७६७. **अक्षरे** : ग्रेस. गणेश नायडू.

*** प्रयोगाच्या परवानगीसाठी** सी /३२, गजानन को. ऑप्. सोसायटी, दिलीप गुप्ते मार्ग, माहीम, मुंबई—१६.

संघवार्ता. या अंकाची किंमत : दीड रुपया.

मुद्रक पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर—१२.
प्रकाशक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर—१२.



—भांजीभाई पाटणकर

नागपूर येथील फटाळा तलाव

बोरिस पास्तरनाक : २

अशोक दामोदर रानडे

वाङ्मयीन कृती समजायला लेखकाचे चरित्र समजावे लागते असे मुळीच नाही. चरित्राधारित समीक्षेचे एक पर्व होते. पण ते पर्व म्हणजे एक प्रतिक्रिया होती. आविष्कारापेक्षा आच्छादन म्हणून शब्द अधिक वापरले जातात अशी शंका घेणारे मनोविज्ञान फोफावले. त्याचा परिणाम व व्यक्तिगत सुखदुःखांची सावली आपल्या साहित्यात दिसणे हे पाप समजणाऱ्या युगाची प्रतिक्रिया म्हणून चरित्राधारी समीक्षा उसळी खाऊन वर आली होती. चरित्र व साहित्यकृती यांचा संबंध कसा असतो यासंबंधीची आपली जाणीव आता अधिक सूक्ष्म आणि गुंतागुंतीची झाली आहे. लेखकाच्या चरित्रात्मक व्यक्तिमत्त्वापेक्षा त्याच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाबद्दल आपण बोलू लागलो आहोत. लेखक–चरित्र व त्याची कृती यात कारण–कार्य भाव वा जनक–जन्य भाव आपण शोधत नाही. वाङ्मयीन कृती अनेक घटकांच्या अस्तित्वाने शक्य होते. या घटकांपैकी काहींच्या विश्लेषणाची पूर्व तयारी म्हणून काही वेळा लेखक–चरित्राचा उपयोग होऊ शकतो, असे सावध विधान आता आपल्याला अधिक वाजवी वाटते. मग पास्तरनाकचे चरित्र का पहावयाचे? पास्तरनाक सारख्या आत्मचरित्रात्मक कादंबरीकाराच्या बाबतीत त्याचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्याचा उपयोग त्याच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाच्या अभ्यासासाठी होण्याचा संभव अधिकच दाट असण्याची शक्यता आहे. कादंबरी आणि लेखकाचे चरित्र यांतील संबंधांबाबत ज्या आंतरिक समांतरतेच्या तत्वाचा आधी उल्लेख केला होता त्याचीही आठवण या संदर्भात उपयुक्त ठरेल. पास्तरनाकचे जीवन आणि युरी झिवागोचे जीवन यामधील सादृश्य विलक्षण वाटण्याइतके व्यापक (म्हणजे तपशिलापासून तत्वापर्यंत आवाका असणारे) आहे.

१८९० च्या फेब्रुवारी महिन्यात मॉस्कोमध्ये बोरिस पास्तरनाकचा जन्म झाला. त्याचा पिता, लिओनिड ओसिपोविच पास्तरनाक याने डॉक्टरकीचे शिक्षण पुरे केले होते. पण पेशा मात्र चित्रकाराचा स्वीकारला होता. बोरिसची आई रोझालिआ कॉफमन ही चांगले पिआनोवादन करीत असे. कलासक्त व ज्यू मातापिता असणे याचा परिणाम बोरिसवर झालाच नाही असे कसे म्हणावे? १८९२ मध्ये लिओनिडला टॉलस्टॉयच्या 'वॉर अन्ड पीस' या कादंबरीच्या खास आवृत्तीसाठी चित्रे काढण्यासाठी बोलाविण्यात आले. पुढे सुमारे वीस वर्षे टॉलस्टॉयचा पास्तरनाक कुटुंबाशी घनिष्ठ संबंध राहिला. इतका की 'रिसरेक्शन' या आपल्या कादंबरीसाठी लिओनिडने एकट्यानेच चित्रे काढावीत असे टॉलस्टॉयच्या मनाने घेतले व त्यासाठी पास्तरनाक कुटुंबच टॉलस्टॉयच्या 'यास्नाया पल्याना' (मुक्तांगण) या इस्टेटीवर जाऊन राहिले होते. संगीत, चित्रकला, साहित्य यांचा दरवळ घरात असलेल्या पास्तरनाकचे बालपण, संस्काराची बाजू लक्षात घेता, अतिशय समृद्ध होते असे म्हणावयास हरकत नाही.

पास्तरनाकच्या आयुष्यातील पुढील महत्त्वाची घटना १९०३ मध्ये घडली. शाळकरी बोरिस आपल्या वडिलांनी भाड्याने घेतलेल्या बंगल्यावर उन्हाळ्याची सुटी घालवीत होता. शेजारच्या घरातून त्याने पिआनोचे दाणेदार स्वर ओघळताना ऐकले. स्क्रिआबिन हा प्रसिद्ध रचनाकार आपल्या एका सिंफनीची रचना करीत होता. दररोज सकाळी बोरिस संगीताने न्हाऊन निघत होता. 'ही रचना म्हणजे तोफांच्या सरबत्तीने कोसळणाऱ्या पण पुन्हा राखेतून वर येणाऱ्या शहरासारखी होती.' बोरिसने निर्णय घेतला की आपण संगीतकार व्हायचे. स्क्रिआबिनच्या पावलावर पाऊल

टाकून, बोरिसला संगीतालेख भराभर वाचण्याची कला अवगत नव्हती. पिआनोवादनाचे कार्यक्रम तो यशस्वीपणे करू शकला नसता पण संगीतरचना करणे त्याला जमत असे. पुढील सहा वर्षे त्याचे संगीत शिक्षण खास देखरेखीखाली चालू राहिले. आपण संगीतकार व्हायचे नाही हाही निर्णय बोरिसने मोठ्या विचित्र तऱ्हेने पण स्क्रिआबिनमुळेच घेतला! ती सारीच हकीकत वेधक आणि योगायोगांना असाधारण महत्त्व देण्याच्या बोरिसच्या मनोवृत्तीवर व वैशिष्ट्यांवर प्रकाश पाडणारी आहे.

आपली एक रचना बोरिस स्क्रिआबिनला दाखवायला घेऊन गेला होता. बोरिसने ती पिआनोवर वाजविली. एकदर ती रचना बरी आहे असे दर्शवून स्क्रिआबिनने त्यातला काही भाग स्वत: वाजवून पाहण्यास सुरवात केली. पण अगदी चुकीच्या पट्टीमध्ये! आता या तऱ्हेच्या चुकीनंतर दोन तऱ्हेच्या प्रतिक्रिया स्क्रिआबिनकडून शक्य होत्या. एक तर आपली चूक सरळपणे सुधारून घ्यावयाची. नाहीतर 'नेमकी पट्टी समजणे रचनाकाराला आवश्यकच असते असे नाही... मोठमोठ्या रचनाकारांना पट्टी समजत नसे' इ. मखलाशी करावयाची. बोरिसने मनाशी ठरविले की स्क्रिआबिनने पहिला मार्ग स्वीकारला तर आपले संगीतशिक्षण चालू ठेवायचे, नाही तर संगीताला-रामराम! दुर्दैवाने स्क्रिआबिनने दुसरा मार्ग स्वीकारला आणि संगीतकार होण्याचे ध्येय पास्तरनाकने सोडून दिले. आता आपल्या कमकुवतपणामुळेही बोरिसला आपण संगीतकार होणे शक्य नाही हे जाणवू लागले असेल. आणि स्क्रिआबिनचे त्याने निमित्त केले असेल हीही गोष्ट शक्य आहे! पण तरीही योगायोग वा कार्यकारणभाव न लागणाऱ्या घटना, यांना आपल्या जीवनातील निर्णायक क्षणी महत्त्व देण्याचे हे पास्तरनाकी धोरण ठळकपणे डोळ्यात भरल्याखेरीज राहात नाही. या सुमारास बोरिस मॉस्को विद्यापीठाचा विद्यार्थी झाला होता. स्क्रिआबिनमुळे त्याने संगीत सोडले पण त्याच्याच सांगण्यावरून बोरिसने कायदा सोडून तत्त्वज्ञान हा विषय अभ्यासासाठी निवडला. यापुढील आयुष्यात बोरिसने संगीतावर प्रेम केले पण अभ्यासाचा विषय म्हणून त्याकडे पाहिले नाही.

रशियात धूमधडाक्याने पहिले रक्तरंजित पाऊल टाकणाऱ्या विसाव्या शतकाने बोरिसच्या मनात काहीच खळबळ माजविली नाही असे नाही. १९०५ च्या जानेवारीला फादर गॅपॉनने दोन लाखांच्या मिरवणुकीला झारला विनवणीपत्र देण्यासाठी सेंट पीटर्सबर्गच्या राजवाड्यावर नेले. कोसॅक्सनी जमावावर घोडे चालवून गोळीबार केला व तरवारही चालविली. निळेभोर आकाश, रस्त्यावर पांढरे शुभ्र बर्फ, काळे झगे पेहेरलेला, फादर गॅपॉन, रंगीबेरंगी पताका आणि राजकुटुंबाची लोकांनी मिरविलेली चित्रे. गोळीबाराचा धूर विरळ झाला तेव्हा झारच्या हिवाळी राजवाड्यासमोर १५० व्यक्तींची प्रेते विखुरलेली आणि तीनशे व्यक्ती घायाळ झालेल्या! हाच तो रक्तरंजित रविवार...मग त्याच वर्षीचा डिसेंबर महिना. पुन्हा एक क्रांतीचा प्रयत्न. प्रयत्न मोजक्या व्यक्तींचा—मॉस्को-कझान, मॉस्को-ब्रेस्ट रेल्वे मार्गावरील कामगारांचा कसोशीचा पाठिंबा असलेला. क्रांतिकारक पाठीशी नसलेली ही क्रांती निर्घृणपणे दडपली गेली. या दोन्हींचा बोरिसच्या मनावर खोल ठसा उमटला. डॉ. झिवागो या कादंबरीची सुरवातीची प्रकरणे, '१९०५ चे वर्ष' ही त्याची कविता, या सर्वांत त्याची साक्ष पटेल. बारा वर्षांनंतरची ऑक्टोबर १९१७ ची क्रांती हीच खरी रशियन क्रांती असे मत डॉ. झिवागो या कादंबरीत व्यक्त झाले आहे, पण तरीही क्रांतीची पास्तरनाकची आवृत्ती तीन्ही क्रांत्या मिळून तयार होते. कवी म्हणून या तऱ्हेचे टलिस्कोपिंग त्याने करणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. डॉयशर सारखा रशिया-तज्ज्ञ पास्तरनाकचे क्रांती-कॅलेंडर चुकीचे आहे, त्याने ऑक्टोबर क्रांतीचे समर्थन करताना तिला १९०५ च्या मध्यमवर्गीय क्रांतीची लक्षणे चिकटविली आहेत असा आक्षेप घेतो. पण डॉ. झिवागो ही उत्कृष्ट पण दिशा चुकलेली राजकीय कादंबरी आहे असे डॉयशरचे गृहित तत्त्व असल्याने तो या निष्कर्षाला पोचू शकतो. तीन्ही क्रांत्यांचा अर्थ लावून मग जी एक क्रांती पास्तरनाकला खास 'रशियन' वाटली तिची निर्मिती पास्तरनाकने केली. वृत्तांतकथन नव्हे हे त्याने सोयीस्कारपणे डोळ्याआड केले आहे. कादंबरी राजकीय नाही तर 'निर्मिती' विषयी आहे. इतकीच त्याच्या आक्षेपाची कारण-मीमांसा. असो.

बोरिसने मॉस्को विद्यापीठात तत्त्वज्ञान हा विषय घेऊन अभ्यासास सुरुवात केली. आणि पुन्हा एकदा योगायोगाने आपली भूमिका बजावली. आपल्या

वडिलांचे पुस्तकांचे कपाट लावीत असता बोरिसच्या हातात एक जर्मन कवितांचे पुस्तक आले. त्याने ते वाचून काढले. मग त्याच लेखकाची इतर सारी पुस्तके त्याने झपाटल्यासारखी वाचून संपविली. त्याने निर्णय घेतला आपण कवी व्हायचे. ज्याच्या कवितांनी त्याच्या मनावर इतका प्रभाव पाडला त्या कवीचे नाव रिल्के. आयुष्याच्या वाटचालीची दिशा योगायोगाने ठरविण्याचे पास्तरनाकच्या आयुष्यातील आणखी एक उदाहरण ! सतरा वर्षांचा संवेदनक्षम बोरिस–त्यात आणि त्या वेळचे मॉस्को. सरंजामशाहीचा दिवा मालविण्यापूर्वी मोठा होत होता. रासपुतीनचा प्रभाव वाढता होता. दिआगिलेवची सांस्कृतिक क्रांती जोरात होती. निजिन्स्की, पावलोवा, कर्साविना सारे भर तेजाने तळपत होते... एका संध्याकाळी रेस्टोरांमध्ये बसलेला असताना बोरिसने आपल्या मित्रांकडून मारबर्ग या जर्मनीतील प्रख्यात तत्त्वज्ञान पीठाचे आणि तिथल्या महर्षीचे, कोहेनचे, असे वर्णन ऐकले की त्याला तत्त्वज्ञानी अस्वस्थताच आली. 'पंढरीला गेल्याशिवाय वारकरी तसे मारबर्गला गेल्याशिवाय तत्त्वज्ञानाचा अभ्यासक !' एक कल्पना न करता येणारी गोष्ट. म्हणून मग मारबर्ग. तिथेही कोहेनचे लक्ष वेधून घेतले बोरिसने. खास विद्यार्थ्यांवर होणारी खास मेहेरबानी कोहेन यांनी बोरिसवरही केली. बोरिसला एका संध्याकाळी कोहेन यांच्या घरी जेवणाचे आमंत्रण आले ! पण पुन्हा एक योगायोग ! बोरिसच्या लांबच्या नात्यातल्या दोन तरुणी जर्मनीत आल्या होत्या. त्यांना जर्मनीत हिंडविण्याचे काम बोरिसला अधिक आकर्षक वाटले. कारण त्यातल्या एकीच्या प्रेमात तो अडकला होता ! मग सहवास, घाईने लग्नाची मागणी, नकार, वैराग्य या साऱ्या भोवऱ्यातून बोरिस गरगरला बाहेर पडला तेव्हा तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचे कवाडही त्याने आपण होऊन बंद केले होते.

मारबर्गनंतर आईने त्याला बक्षिसादाखल दिलेल्या रकमेतून त्याने इटाली.इ. देशांची सफर केली. अशी सफर झाल्याशिवाय मुलाचे शिक्षण पुरे होत नाही अशी धारणा पाश्चात्य देशांत १८–१९ व्या शतकापर्यंत होती. अशीच धारणा पास्तरनाक कुटुंबाचीही असावी हे लक्षणीय आहे. पास्तरनाकचा एक विशेष असा सांगण्यात येतो की रशियाविषयी आपुलकी बाळगूनही पाश्चात्य देशांत घडणाऱ्या गोष्टींविषयी, तिथल्या बौद्धिक चळवळीविषयी त्याचा ठरीव व कडवा, अनुकूल किंवा प्रतिकूल दृष्टिकोण नव्हता. पीटरने रशियाला एका हुकुमनाम्याने सुधारून टाकण्याची प्रतिज्ञा खाऊन रशियाचा मोहरा मुद्दाम पाश्चात्यांकडे वळविल्याने रशियन तेवढे व तेच चांगले असे आग्रहाने प्रतिपादन करणारा एक पंथही तयार झाला होता. अशा परिस्थितीत पाश्चात्याभिमुख असणे हे पुश्किननंतर पास्तरनाकला जमले. त्याच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचे एक अंगच या विधानात निर्देशित होते असे म्हटले पाहिजे. बोरिस पास्तरनाकने जर्मन व इंग्रजी वाङ्मयाची भाषांतरे मोठ्या प्रमाणावर करणे हीही गोष्ट या संदर्भात अर्थपूर्ण आहे. तो एके ठिकाणी म्हणतो "Italy crystalized for me all that we breathe from our cradle (though unconsciously)." हेही पश्चिमाभिमुखतेचेच एक गमक.

मारबर्ग–इटाली पर्वानंतर रशियात परतलेल्या बोरिसने कवी म्हणून जगण्याचा निश्चय केला होता. पण हे कसे जमवायचे याविषयी त्याच्या मनात काहीच योजना नव्हती. मधल्या काळात त्याने काही अर्धा कच्च्या कविताही लिहिल्या होत्या. पण त्यांत उमेदवारीपेक्षा दुसरे काही फारसे नव्हते. आई–वडिलांवर अवलंबून रहाणेही आता त्याला शक्य नव्हते. पदवीधर बोरिस म्हणून शिकवण्या करू लागला. आयुष्यातील या अवस्थेचे चित्रण 'द लास्ट समर' या त्याच्या दीर्घकथेत आढळते. १९१४ मध्ये रशियातील लियुआनिआ या प्रांतातील बालट्रुशाइटिस या धनवंत कवीच्या मुलाला शिकविण्यासाठी तो ओका नदीकाठच्या बालट्रुशाइटिसच्या इस्टेटीवर राहिला होता. तिथली हवाच मुळी काव्य व काव्यचर्चा यांनी धुंदारलेली. बालमाँ हा प्रख्यात प्रतीकवादी कवीही जवळच राहत होता. 'A twin in the cloud' या संग्रहातल्या कविता पास्तरनाकने मारियालासौ. बालट्रुशाइटिसला या वास्तव्यात वाचून दाखवल्या तेव्हा ती म्हणाली, 'या कविता प्रसिद्ध केल्याचा तुला पुढे पश्चात्ताप होईल.' काळ मजेत चालला होता एक पाय काहीसा आखूड असल्याने बोरिसला १९१४ च्या युद्धात भाग घेण्याबाबत अपात्र ठरविण्यात आल्याने तो उरल पर्वतश्रेणीतल्या कारखान्यात नोकरी करू लागला. त्याच कालखंडात त्याने आपल्या

गद्य लेखनासही सुरुवात केली होती. अशा तऱ्हेने १९१४ मध्ये ब्येली, मायाकोवस्की, ब्लोक, इझेनिन, आख्मातोवा यासारख्यांनी उजळलेल्या वाङ्‌मयीन क्षितिजावर बोरिसचा ताराही लुकलुकू लागला होता. (मायाकोव्स्कीबरोबर पास्तरनाकची याच वर्षी पहिली ओळख झाली) उरल विभागातून बोरिस परत आला तो फेब्रुवारी १९१७ च्या क्रांतीच्या सुमारास. एव्हापर्यंत त्याचे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले होते. पण काव्यावर उपजीविका होणे कठीणच! त्यात आणि पास्तरनाकच्या काव्याची प्रकृती 'खासगी'! १९२२ साली लग्न झाल्यावर व त्या पूर्वीही, नोकरी हा एकच मार्ग त्याला परिणामी मोकळा होता. १९२८ ते ३२ च्या सुमारास रशियात लेखकांची संघटन स्थापन करण्यात आली होती. पण हे लेखक श्रमजीवी. या परिस्थितीत पास्तरनाकच्या काव्याची चाहा होत असली तरी त्याला भाव नव्हता.

तेव्हाची परिस्थिती अशी होती की जिथे घोषणा—काव्यालाच उत्तेजन होते. कवीने राष्ट्राची सुःख-दुखे गर्जून सांगितलीच पाहिजेत असा आग्रह होता. नाहीतर त्याने गप्प बसावे असेही सुचविले जात होते. इतकेच नव्हे तर असे आपणहून गप्प न बसणाऱ्या कवींना गप्प केलेही जात असे.

युग मायाकोव्हस्कीचे होते. काव्याची तुतारी फुंकण्याचे. काव्याला रणशिंग बनविण्याचे. त्याच्या गर्जनांमध्ये दुसऱ्या कोणत्याच कवितेचे सूर ऐकू येत नाहीत–ऐकू येणे योग्य नव्हे असे गर्वाने सांगण्याचे. यादवी युद्धाच्या काळात मायाकोव्स्कीला कोणीतरी नेक्रासोव्च्या काव्याविषयी तुमचे मत काय असे विचारले. त्याने उत्तर दिले 'मला माहीत नाही... यादवी युद्ध संपल्यावर मी या प्रश्नाचा विचार करीन.' तांबे यांच्या काव्याविषयी असाच प्रश्न विचारल्यावर सुर्व्यांनी वरील प्रकारचे उत्तर दिल्यास आपल्याला जे जाणवेल तेच मायाकोवस्कीच्या उत्तरामुळे रशियन साहित्याच्या अभ्यासकास वाटेल. अर्थात् मायाकोव्स्की हा मोठा कवी होता. आणि पास्तरनाकचे व त्याचे संबंधही परस्पर आदराचे होते. १९२० नंतर त्यांच्यात दुरावा निर्माण झाला. पण अंतर ठेऊन जिव्हाळा वाटणे ही क्रिया चालूच राहिली. युगाचा प्रवक्ता होण्यापेक्षा पास्तरनाकला युगाचा कलावंत—साक्षी होणे अधिक सहज व श्रेष्ठ वाटत होते. मायकोव्स्की आणि पास्तरनाक हे सोविएट साहित्यांतर्गत काव्याचे दोन ध्रुव होते. खुद्द मायाकोव्स्की पास्तरनाकला 'कवींचा कवी' म्हणे. १९३० मध्ये मायाकोव्स्कीने आत्महत्या केली तेव्हा पास्तरनाकला आश्चर्य वाटले नाही पण खंत वाटली. डॉ. झिवागोच्या मृत्यूनंतरचे साधेपणे भकास पण तरीही मन हेलावणारे वर्णन आपले बरेचसे रंग मायकोव्स्कीच्या मृत्यूच्या घटनेतून उचलते. त्याच्या मृत्यूनंतर पास्तरनाक म्हणाला 'Mayakovsky was being forcibly propagated, like potatoes in the reign of Catherine the Great. That was his Second death. For that he was not responsible.'

हुकुमाप्रमाणे, सरकारी अधिकाऱ्यांची मुंबई नाचेल त्याप्रमाणे कविता न लिहिता आपलेच गाणे गात राहाण्याचे 'मूक धैर्य' पास्तरनाकमध्ये होते. 'माझी भगिनी, जीवन' (१९२२) या आपल्या काव्यसंग्रहात तो एके ठिकाणी म्हणतो—

'गळ्याभोवती एक मफलर गुंडाळून,
हाताच्या पंजाची स्वतःसाठी करून ढाल,
मी अंगणावरून ओरडेन, 'माझ्या मित्रांनो
कोणत्या प्रवर्तनयुगाचे उत्सव मांडले आहेत
तुम्ही ?
माझ्या दारासमोरील वाट कोणी मोकळी केली,
—बर्फ आणि सर्दपणाने बुजविले खिंडार,
मी लॉर्ड बायरनबरोबर पाईप ओढताना,
आणि एडगर ॲलन पोसह मद्य झोकताना!'

१९२० नंतरचा कालखंड काव्याच्या दृष्टीने 'अंधःकार युग' ठरण्याचे आणखी एक कारण होते. ब्लोक, गुमिल्येव, इझेनिन, मायाकोवस्की, ब्येली, मांदेलस्तोय, त्स्येतायेवा इतके कवी या कालखंडात निधन पावले. त्यांपैकी काहींचे शिरकाणही झाले. काव्याच्या प्रांतात स्मशानशांतता पसरली. फक्त आख्मातोवा आणि पास्तरनाक राहिले—दोघांनाही सोशिकपणे आयुष्य कंठणे भाग होते. याही परिस्थितीत पास्तरनाकने धीरगंभीर भूमिका सोडली नव्हती. स्टॅलिन-युगात सर्व लेखक स्टॅलीनला घाबरून चळचळा कापत असताना घडलेला एक प्रसंग या संदर्भात बोलका आहे. स्टॅलिनची पहिली पत्नी संशयास्पद परिस्थितीत १९३२ मध्ये निधन पावली. नेहमीच्या

सोविएट प्रथेला बाजूला सारून सार्वजनिक दुःखप्रदर्शन करण्याची सोविएट जनतेत अहमहमिका लागली. लेखकांनीही एकमुखाने सांत्वनपर पत्र लिहावे अशी अधिकाऱ्यांची 'अपेक्षा' होती. पत्र लिहिले गेले. पास्तरनाकने सही केली पण पुस्ती जोडली, 'On the eve of Nodiezda Stalin's death I was thinking, as an artist, continuously about Stalin for the first time. In the morning I read the news. I was shaken as if I had been on the spot and lived through and seen everything.' यात स्टॅलिनची स्तुती नाही ही गोष्ट उघडच आहे. १९३० मध्ये आपल्या नोहौस नावाच्या जर्मन मित्राच्या पत्नीचे पास्तरनाकने (तिच्या संमतीने) हरण केले. मॉस्को–परिसरात त्याला काही काळ अर्थातच थारा राहिला नाही. आणि आपला जॉर्जिअन कविमित्र पाओलो याशिवली याच्या पाहुणचाराचा त्याला आश्रय घ्यावा लागला. याशविली आणि ताविझ या दोन जॉर्जिअन कवींच्या द्वारे जॉर्जिअन कवितेचा झालेला परिचय ही पास्तरनाकला स्वतःला अतिशय महत्त्वाची घटना वाटली. तसे पाहता १९३२ ते १९४३ या कालखंडात पास्तरनाकचे लेखन भाषांतरापुरते मर्यादित होते "जॉर्जिअन लिरिक्स्" आणि "जॉर्जिअन पोएटस्" हे पास्तरनाकचे दोन संग्रह भाषांतरयुगाची अपत्ये होत. याशिवाय हॅम्लेट, रोमिओ आणि ज्युलिएट, अॅन्थनी अँड क्लिओपाट्रा, ऑथेल्लो, किंग हेन्री द फोर्थ (भाग १, २) किंग लिअर आणि मॅक्बेथ या शेक्सपीअरच्या कृतींची आणि गोएथे, शिलर, क्राईस्ट इ. जर्मन कवींच्या कृतींची त्याची भाषांतरेही प्रसिद्ध आहेत.

या साऱ्या कालखंडात पास्तरनाकची आणि सरकारचीही परिस्थिती चमत्कारिक होती. पास्तरनाकविषयी सरकारला व अधिकाऱ्यांना भीती वाटत होती. त्याला हात लावण्याचे धैर्य दाखविणे त्यांना शक्य नव्हते. त्याच्या प्रतिभेने प्रभावित झालेला वर्ग मोठा होता. आणि पास्तरनाकच्या मूक धैर्यामुळे विरोधकांपैकी बऱ्याच जणांना त्याच्याविषयी सुप्त आदर होता. त्याच्या देशप्रेमाविषयी शंका घ्यायलाही जागा नव्हती. पण त्याची अलिप्तता डोळ्यांत खुपत होती. त्याची सारी जीवनसरणी व विचारसरणी म्हणजे अधिकृत फतव्यांनी आखून दिलेल्या आदर्शाचा मूर्तिमंत अपमान होता. वेळोवेळी सरकारी शिष्टमंडळे आणि परिषदा यांत भाग घेतला. त्यांत आपल्यांवर होणाऱ्या हल्ल्यांना पास्तरनाकने उत्तरे मात्र अशी दिली की त्यामुळे विरोधक गोंधळले आणि अस्वस्थ झाले. उदाहरणार्थ, श्रमजीवी लेखक संघ परिषदेत १९३१ मध्ये तो म्हणाला.

"They are always shouting at the poets, Do this! Do that! .... The times exist for man not man for the times."

लिऱ्येरातुर्नाया गझ्येताची यावरील टीप बोलकी आहे. आशय असा की दुसऱ्या कोणी असे म्हटले असते तर लोकांनी त्याची हुर्यवडी केली असती. पास्तरनाकला मात्र टाळ्या मिळाल्या.

१९३४ च्या लेखकपरिषदेत तर व्यक्तिशः त्याच्या भूमिकेवरच वाद माजला. सुर्कोव्हने त्याच्या अलिप्तपणावर टीका केली. तो म्हणाला :

".... The immense talent of Boris Pasternak will never fully reveal itself unless he has attached himself fully to the gigantic, powerful and shining forces liberated by the Revolution....."

पास्तरनाकचे उत्तर सूक्ष्म उपरोधाने धारदार झालेले होते. पण त्यातही व्यक्तिमत्त्व–स्वातंत्र्याचा पुरस्कार त्याने निःसंदिग्धपणे केला होता.

"The party tells us to remain close to the masses. As for myself, I have never acquired the right to speak in the language of the party. I would say only this—never surrender your personality, and this is a statement which the party can never reject. The People and the State surround us with their warm affection, and so there is always the danger that we shall be transformed into high literary functionaries. Therefore, let us keep our distance, but gently, so that we may remain faithful to the springs of poetry . . . ."

याही भाषणाला टाळ्या जरूर मिळाल्या. पण आपल्या विरुद्ध असा एक प्रवाह साऱ्या वातावरणात आहे आणि तो कोणत्या क्षणी कसे वळण घेईल ते सांगता येत नाही असा ताण पास्तरनाकच्या मनावर

सारखाच राहिला. त्याला निद्रानाशाचा विकार जडला आणि कोणत्याही क्षणी आपला 'नव्हंस ब्रेकडाऊन' होईल अशी भीतीही सारखी वाटत राहिली. अशा अवस्थेतच तो फॅसिस्टविरोधी लेखक परिषदेसाठी १९३५ मध्ये पॅरिसला गेला होता. कॉम्युनिस्टांनी प्रचार-सभेसारखा या परिषदेचा उपयोग करून घेतला. या पार्श्वभूमीवर 'आजच्या काळातील सर्वोत्तम कवी' अशी आंद्रे मालरोने ओळख करून दिल्यावर पास्तरनाकने जे भाषण केले त्याचा पुरा वृत्तांत उपलब्ध नसला तरी गूढवादाचा त्यातला सूर स्पष्ट आहे आणि तो कॉम्युनिस्ट राज्यकर्त्यांना बोचकच होता.

"There will always be poetry in the grass and it will be always necessary to bend down and be received: and surely grass is altogether too simple to be discussed in the assemblies."

१९३६ च्या परिषदेतले त्याचे भाषण अधिक लढाऊ आणि स्पष्ट आहे. हा कालखंड स्टॅलिनप्रणीत शुद्धीकरणाचा म्हणजे अनियंत्रित शिरकाणाचा होता हे लक्षात घेता अधिक . लढवय्येपणाचा सूर पास्तर-नाकलाही लावावासा वाटणे हे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. याश्विली आणि ताबिझ या पास्तरनाकच्या ज़िवलग जार्जियन कविमित्रांचा याच कालात बळी पडला. अशा परिस्थितीत पास्तरनाकची चढी पट्टी म्हणजे त्याच्या धैर्याचेच एक गमक ठरते.

"They speak of poetry as of some continually functioning machine with an output directly proportional to the work put in ...Some speakers here very confidently divided poems into good and bad, as if the latter were correct or faulty machine parts....Our salvation will not come from increased application. Art is unthinkable without risk and self-sacrifice. Freedom and imaginative daring must be achievd in practice. Here we must expect the unexpected. Do not wait for directives on that road."

या भाषणाला मधेमधे बरेच अडथळे आणले गेले आणि मग पास्तरनाकाने जोरात बजावले, "Do not yell at me. But it you must yell, at least do not do that in union."

आपल्या तत्त्वांना चिकटून राहाण्याची किंमत आत्माहुतीने या दिवसात द्यायला लागत होती.. अशा एका प्रसंगाची आठवण पास्तरनाकने पुढे एका मुलाखतीत सांगितली—

"On one occasion they came to me with something they wanted me to sign. It was to the effect that I approved of the party's execution of the generals. In a sense this was a proof of their confidence in me, they did not go to those who were on the list for liquidation. My wife was pregnant. She cried and begged me to sign, but I could not. That day I examined the pros and cons of my own survival. I was convinced that I would be arrested—my turn had now come! I was prepared for it. I abhorred all this blood. I could not stand things any longer. But nothing happened. It was, I was told later, my colleagues who saved me indirectly. No one dared to report to the hierarchy that I had not signed."

जीवनमरणाची शाश्वती नसलेल्या परिस्थितीत पास्तरनाक कलावंत म्हणून साक्षी राहण्याच्या, पापणी जागी ठेवण्याच्या आपल्या प्रतिज्ञेला जागत होता. कला हीच त्याची शक्ती होती. नीना ताविझला लिहि-लेल्या एका पत्रात कला हीच आपल्या आयुष्याची नियंत्रक शक्ती असल्याने आपण सर्व काही स्वीकारू शकतो असे तो लिहितो.

"My oldest passion is art (or what I seem to think is art). I and the circumstances of my life are ruled by it as unambiguously and firmly and with as much clarity as people were once upon a time ruled by religious convictions. This clarity of direction and aim makes everything easy for me. I am always ready for anything and I shall say thank you for everything to fate and heaven." अशा रीतीने भाषांतरे करत, स्तब्धता पाळत पास्तरनाकचे, सत्याग्रही बाण्याचे दिवस चालले होते. लढाईची तो तयारी करत होता.

पु गवाणी

१९५३ साली स्टॅलिन निधन पावला. १९४५ पासून पास्तरनाक डॉ. झिवागोचे लेखन करीत होता. टॉलस्टॉयप्रमाणेच त्यालाही संपूर्ण कृतीच्या पुनर्लेखनाचा कंटाळा नव्हता. १ ५४ मध्ये त्याच्या कादंबरीच्या प्रसिद्धीविषयी एक टिप्पण 'ज्नाम्या' या वाङ्मयीन नियतकालिकात प्रसिद्ध झाले. आणि डॉ. झिवागोतल्या काही कविताही. कादंबरी १९५२ च्या आसपास पुरी झाली असावी. कारण शिकोवानिस' या आपल्या जॉर्जिअन मित्राला तो बावन्नच्या उन्हाळचात लिहितो.

" Of those who read my novel the majority are dissatisfied. They say it is a failure and that they expected more from me, that it is colourless, that it is not worthy of me, but, acknowledging all this, I just grin as though this abuse and condemnation were praise."

पण ही नापसंती वेगळचा तऱ्हेची असणार. आजपर्यंत पास्तरनाकने जे लिहिले त्यापेक्षा डॉ. झिवागो ही कृती पार वेगळी. त्याला सामोरी जाणारी मनोवृत्ती निराळी हवी. त्याला आकळणाऱ्या रसिकाला पास्तरनाकच्या कवितेकडे पाहताना जे दृष्टिकोण ठेवावयाचे त्यापेक्षा वेगळचाची जरूरी भासणार. तेव्हा आपल्या कादंबरीचे रसिकांकडून एकदम स्वागत होईल व व्हावे अशी पास्तरनाकची अपेक्षाही नव्हती. आपण जे या कादंबरीत केले आहे त्यात आपले सर्वस्व आहे अशी एक सुखद तृप्ती त्याला आळसावंत होती. त्याने म्हणूनच १९५६ मध्ये आपल्या हस्तलिखिताची पाठवणी 'नोव्ही मिर' या नियतकालिकाकडे केली व एक प्रत 'फेल्त्रिनेली' या इटालिअन प्रकाशकाकडे मिलान येथे रवाना केली. 'नोव्ही मिर'ने पास्तरनाकचे छायाचित्र छापून, 'लवकरच प्रसिद्ध होणार' अशी त्याच्या आगामी कादंबरीची जाहिरातही दिली. त्याचा वर्षाच्या सप्टेंबर महिन्यात 'नोव्ही मिर'च्या संपादकमंडळाने हस्तलिखित सामार परत केले व त्याबरोबर तीस पानी पत्रही पाठविले ! त्यात कादंबरी व पास्तरनाक दोन्हींवर हल्ले होते. त्यातल्या महत्त्वाच्या भागातील एक उतारा असा: " We find your novel profoundly unjust, and lacking in historical objectivity in its portrayal of the revolution, the civil war and the years following the revolutions. We regard it as a profoundly anti-democratic work, and without benefit to the people. We come to these conclusions in the light of your position, as a man attempting to prove that the October Revolution far from possessing a great significance for mankind, brought only hardship and evil into the world."

तरीही परिस्थिती फारशी चिंताजनक नव्हती. झेलिन्स्की या आपल्या मित्राशी सल्लामसलत करून, कादंबरीत काही फेरबदल व काटछाट करून, दुसऱ्या प्रकाशकातर्फे कादंबरी प्रकाशित करावयाची असे पास्तरनाकने ठरविले. फेल्ट्रिनेलीनेही कादंबरीचे प्रकाशन (इटालीत) सहा महिने लांबणीवर टाकावे असे पास्तरनाकने त्याला लिहिले. परंतु हिवाळचात पास्तरनाक बराच आजारी पडला. काटछाटीचे काम झेलिन्स्कीकडे सोपविले. पण ते पुरे व्हायच्या आधीच, १९५७ मध्ये एस्प्रेसो या इटालिअन मासिकात डॉ. झिवागोमधील क्रांतिविरोधी मजकुराचे उतारे प्रसिद्ध होऊ लागले आणि रशियातील राज्यकर्त्या वर्गात खळबळ माजली.

इथून पुढे सुरू झालेल्या अधिकृत हालचालीत लेखकसंघटनेचा अलेक्झी सुर्कोव्ह हा (सामान्य कविता लिहिणारा) सचिव पुढाकार घेत होता. प्रथमतः त्याने काही मध्यस्थांकरवी पास्तरनाकला हस्तलिखित परत मागविण्याची तार ठोकण्यास सुचविले. पास्तरनाकने तसे केले. पण त्याचा काही उपयोग नव्हता. कारण सर्व तऱ्हेने कॉपीराइटचे हक्क फेल्ट्रिनेलीकडे होते व त्याने इतर पाश्चात्य देशांतही या कादंबरीच्या भाषांतरासंबंधी करारमदार केले होते. मग मॉस्कोच्या आज्ञेनुसार इटालिअन कॉम्युनिस्ट पार्टीनेही कादंबरीचे प्रकाशन होऊ नये म्हणून फेल्ट्रिनेलीवर दडपण आणण्यास सुरवात केली. इतकेच नव्हे तर सुर्कोव्हने काही तरी निमित्ताने इटालीला भेट दिली व फेल्ट्रिनेलीला साम–दाम–दंड–भेद इ. उपायांनी हाताळून कादंबरी प्रकाशित होऊ न देण्याची खटपट केली. पास्तरनाकला कादंबरी प्रकाशित झाल्यास शारीरिक इजा पोचेल असल्या धमक्यांची सूचना देण्यासही त्याने मागेपुढे पाहिले नाही. फेल्ट्रिनेली बधणे अशक्यच होते. कादंबरीची इटालिअन भाषेतली आवृत्ती नोव्हेंबर १९५७ मध्ये प्रसिद्ध झाली ! सुर्कोव्हने रशियात

आकाशपाताळ एक करण्यास सुरवात केली. वादळाचे केंद्रबिंदू आपण बनलो आहोत याची पास्तरनाकला जाणीव झाली. पण या तऱ्हेचे सौभाग्य त्याच्या वाट्याला नेहमीच आले होते! तो शांतपणे आपल्या पुढच्या लिखाणाचे बेत करीत राहिला. खंगत जाणाऱ्या तब्येतीतून जेवढे जमेल तेवढे. १९५८ च्या शेवटी शेवटी इंग्लंड-अमेरिकेत कादंबरी प्रसिद्ध झाली आणि त्यावर स्तुतीचा वर्षाव झाला. तेवीस ऑक्टोबर एकोणीसशे अठ्ठावनला त्याला वाङ्मयाचे नोबेल पारितोषिक देण्यात आल्याची तार आली. त्याने उत्तर पाठविले Infinitely grateful. Touched. Proud. Astounded. Confused.

यानंतर रशियन वाङ्मयीन हवालदार व राज्यकर्ते यांनी जे केले त्याला रशियातच तुलना असावी. क्रोधाने आंधळ्या झालेल्या राज्यकर्त्यांनी 'कळपांतले काळे मेंढरू', 'डुक्कर', 'सर्प' यासारख्या शेलक्या शिव्या पास्तरनाकला बहाल केल्या. त्याने नोबेल पारितोषिक नाकारावे म्हणून दडपणे आणण्यात येऊ लागली. ऑक्टोबर २८ ला त्याचे लेखकसंघटनेचे सदस्यत्व रद्द करण्यात आले! सुर्कोव्हने तर नोबेल पारितोषिक समितीलाही कळविले की पास्तरनाकला पारितोषिक दिल्यास ते सोविएट सरकारला मान्य नसलेले कृत्य समजण्यात येईल! पास्तरनाक 'देशद्रोही' 'विश्वासघातकी' ठरला. तशी असंख्य पत्रे येऊ लागली. 'प्रावदा' इ. मध्ये ती छापली जाऊ लागली. त्याने रशिया सोडून चालते व्हावे अशाही मागण्या केल्या जाऊ लागल्या!

पास्तरनाक हा कॉम्युनिस्ट पद्धतीचा आंतरराष्ट्रीय नव्हता, तो रशियन पद्धतीचा राष्ट्रवादी होता. त्याला रशिया सोडून जाण्याची कल्पनाच सहन होणे शक्य नव्हते. त्याने पारितोषिक नाकारले, 'पारितोषिकाला, मी राहतो त्या समाजात, जो अर्थ प्राप्त झाला आहे तो लक्षात घेऊन' आपण पारितोषिक नाकारत आहो असे त्याने लिहिले. पापमार्जनाचे कॉम्युनिस्ट विधी आता सुरू झाले! त्याने क्रुश्चोव्हलाही एक विनवणीपत्र लिहिले.

'माननीय निकिता सर्गेविच्

'मी रशिया सोडून गेल्यास त्यास सरकारचा कोणताही आक्षेप नसेल असे मला कळविण्यात आले आहे. असे करणे मला अशक्य आहे.

'जन्म, जीवन आणि कार्य यामुळे मी रशियाशी बांधला गेलो आहे. मायदेशापासून दूर जाणे वा परदेशात राहाणे याची मला कल्पनाच करवत नाही. माझ्या काहीही चुका असल्या तरी पाश्चात्य देशांत माझ्या नावाभोवती जी राजकीय वादळे घोंघावत आहेत त्यांचे स्वप्नही मला पडले नव्हते. म्हणूनच स्वखुषीने पारितोषिक नाकारीत असल्याचे मी समितीला कळविले आहे.

'माझ्या देशाच्या सीमा पार करणे म्हणजे माझा मृत्यूच ठरेल. म्हणून अशी कठोर उपाययोजना माझ्याविरुद्ध न करण्याची मी विनंती करीत आहे. मी छातीवर हात ठेवून, शपथपूर्वक असे म्हणू शकतो की सोविएट साहित्याची मी थोडीफार सेवा केली आहे व भविष्यातही थोडीफार करू शकेन.'

बोरिस पास्तरनाक

कॉम्युनिस्ट पापमार्जन विधीत येवढ्याने भागत नाही! प्रावदामध्ये पास्तरनाकने एक पत्र लिहिले. आपल्या कादंबरीने आपण व जनता यांत अंतराय उत्पन्न केल्याबद्दल क्षमायाचना केली. आपल्याला हे पत्र लिहिण्यास कोणी भाग पाडले नसल्याचा, वगैरेही उल्लेख रीतिरिवाजानुसार त्यात होताच! थोडक्यात सांगावयाचे तर त्याला वाळीत टाकले गेले. त्याच्या निंदानालस्तीचे सत्र सर्व प्रकारे चालू ठेवण्यात आले. त्याच्या कृतींचा खप होऊ नये अशी शासकीय खटपट होत राहिली. त्याच्या लेखकमित्रांनी वा परकीय मित्रांनी त्याची गाठभेट घेऊ नये अशीही व्यवस्था करण्यात शासन यत्नशील राहिले! त्याची प्रकृती ढासळली, उत्साह मावळला. आपला मृत्यू जवळ आला याची त्याला जाणीव झाली. १९५९ मध्ये तो जॉर्जियामध्ये सपत्नीक जाऊन आला. विश्रांतीसाठी मॉस्कोच्या वातावरणातला विखार त्याला असहनीय झाला असावा. जॉर्जिअन मित्राला लिहिलेल्या आपल्या शेवटच्या पत्रात तो लिहितो :

"Every where in the world one has to pay for the right to live on one's own naked spiritual reserves."

त्याला वारंवार मूर्च्छा येऊ लागल्या. वैद्यकीय मदत तो स्वीकारत नव्हता. पण १९६० मध्ये मे महिन्यात त्याला आलेली मूर्च्छा गंभीर स्वरूपाची होती. डॉक्टरांनी हृदयविकाराचे निदान केले. ते चूक

होते. त्याच्या फुप्फुसांत, आतड्यात कर्करोगाने ठाण मांडले होते. तो पोखरला गेला होता. ३१ मे १९६० ला त्याचे निधन झाले.

× × ×

दोन जूनला अंत्यविधी झाला. सरकारी वा लेखक–संघटनेचे कोणी हजर नव्हते. विद्यार्थी आणि शेतकरी होते. पास्तरनाकच्याच पिआनोवर रिख्टरने बेथोवेन आणि शोपँचे संगीत वाजविले. घरातून अंत्य-दर्शन घेऊन आलेली माणसे पाईन वृक्षांखाली पुन्हा उभी रहात. दुपारच्या उन्हाला अंगावर घेत. स्तब्धपणे. शवपेटिका विद्यार्थ्यांनी आपल्या खांद्यावरून नेली. कोणताही धर्मगुरू उपस्थित नव्हता. पौटोवस्की शुकोवस्की सारखे वृद्ध लेखक होते–शासनाच्या पंजाच्या भीतीपलीकडे गेलेले. कावेरिन हा लघुकथा-लेखक आणि आस्मॉस हा तत्वज्ञही होता. त्याने व इतर काहींनी भाषणे केली. एक कामगार ओरडला, 'त्याने लिहिले ते पुस्तक चांगले आहे. आम्हाला ते वाचून देत नाहीत हे दुर्दैव आहे.' दुसरा एक विद्यार्थी पुढे आला व म्हणाला. 'कवीच्या कबरीवर फक्त कवितेत बोलावे' आणि त्याने डॉ. झिवागो या कादंबरीतील कविता पाठ म्हटल्या.

जीवन संपूर्णपणे स्वीकारावे. दुष्ट शक्ती जीवनाचाच भाग असतात म्हणून त्यांचाही स्वीकार करावा. त्यांच्याविरुद्ध उभे रहावे पण हिंसेच्या तात्पुरत्या उपायाच्या आधाराने नव्हे असे पास्तरनाकचे जीवन-सूत्र होते. टॉलस्टॉयचा सूर त्याने पुन्हा लावला होता. टॉलस्टॉयप्रमाणेच मानवतावादी असलेला पास्तरनाक मानवतेपर्यंत रशियन माणसातर्फेच पोचता येईल अशी श्रद्धा बाळगून होता. म्हणून त्याला देशांतर करणे अशक्य होते. रशिया ही अमर्त, मानसिक अवस्था नव्हे. रशिया म्हणजे विस्तीर्ण भूमी, गवताळ कुरणे, शुभ्र बर्फाने दरवर्षी गोठणारे आणि पुन्हा नव्या जोमाने फिरू लागणारे ऋतुचक्र आणि सरळ, मनस्वी, ओबडधोबड, तत्वज्ञानी लोक. पास्तरनाक या सर्वांशी आंतरिक बंधनांनी तारा जुळविलेला कवी.

□ □

वर्गणीदारांसाठी

ज्यांची वर्गणी संपली आहे अशा वर्गणीदारांनाही 'युगवाणी' चा अंक आम्ही पाठविलेला आहे.
कृपया पुढील वर्षाची वर्गणी त्यांनी त्वरित पाठवन 'युगवाणी'वरचा लोभ कायम ठेवावा ही विनंती.

एकटी शांताराम पारपिल्लेवार

विजूताईंना अचानक झोपेतून जाग आली. तरी त्या डोळे मिटून निमूट पडून राहिल्यात—झोपेची आराधना करीत. पण काही केल्या झोप येईना. मग त्यांनी मनातल्या मनात पाढे मोजायला सुरवात केली. थेट शंभरपर्यंत येवून पोचल्यात. त्यानंही काम भागलं नाही. मनातच राम राम म्हणायला लागल्यात. पण झोप जशी रुसली होती. त्या पलंगावरच उठून बसल्यात. बाजूला छोटी मिनी झोपली होती. अगदी उताणी. झोपेतही तिनं हाताचा अंगठा तोंडात धरला होता. मेली, एव्हढी मोठ्ठी झाली पण अजून बोट चोखतेय ? पण त्या तिच्या हसऱ्या चेहऱ्यात हरवल्यात...नको होती न आपल्याला ही ? म्हणून की काय नेहमी हासत राहते मेली ? जणु उपहास करते ? मारा झोडा, हसून टाळून देऱ्ये. एकच वाईट सवय. आंगठा चोखायची. ते बंद व्हावं म्हणून आपण काय नाही केलं ?' पण तिचं आंगठा चोखण बंद झालं नाहीच. तहान नव्हती तरी त्यांनी टीपॉयवर ठेवल्या तांब्यातलं पाणी पेल्यात ओतलं व गटगट प्याल्यात. मोठ्या काळजीनं रिकामा पेला त्यांनी तांब्यावर ठेवला. मागे एकदा रात्रीचा धक्का लागून पेला कलंडला होता. मधल्या हॉलमधूनच नाना, त्यांचे सासरे, गरजले होते, '—कोण आहे ?' वय झालंय् पण आवाज कसा दमदार आहे, नाही ? सावध मांजरासारखी झोप आहे त्यांची. जणू झोपत नाहीतच. नुसताच पहारा देत आहेत. रात्रीचा...दिवसाचा. सगळं कसं चिडीचूप. दिवसा कुठं जायचं म्हटलं तर 'कशाला ?' म्हणतील. जाणं तरी कुठं ? दिवसभर घरातल्या घरात बसून कंटाळा यायचा. एखाद्या संध्याकाळी मिसेस् दयालकडे किंवा मिसेस तांवेकडे जायचं म्हटलं तरी विचारायचीच भीती. 'काय रोजरोज भेटायचं त्यांना ?' परतताना बोलायला विसरायचे नाहीत 'बराच वेळ लागला ?'

किती वाजले ह्याचा अंदाज त्यांना येईना. झिरो पॉवरचा बल्ब लागलां होता. पण भिंतीवर घड्याळ उंचावर होतं. स्पष्ट दिसेना. उजेड सगळा गढूळ होता. त्यांना वाटलं उठावं, ट्यूब लावावी. पण बटन ऑन करायचं म्हटलं की खटकन् आवाज व्हायचा. अन् आवाजानंच म्हातारा खोकलायला लागायचा. नकोच ते—म्हणून त्यांनी भिंतीजवळ जाऊन पाहिलं डोळे फाडून, तेव्हा कुठं घड्याळातला काटा दिसला. म्हणजे सव्वा दोन झालेत तर ? अन् हे अजून...?

त्यांची नजर बाजूच्यांच पलंगावर गेली. बिट्टू एकटाच झोपला होता आणि बिट्टूचे पपा आलेच नव्हते. झोपताना त्यानं आग्रहच केला होता, 'नाही. मी पपाजवळच झोपणार !' पपा आलेच नाहीत. शेवटी एकटाच झोपला. झोपायच्या आधी बिट्टून कपडेही बदलले नाहीत. सायंकाळी मिसेस् दयालकडे त्या मुलाला घेऊन गेल्यात तेव्हाचाच ड्रेस याच्या अंगावर होता. त्याच्या बुशशर्टवरील क्रायलीन्चा पेंट केलेला ससा पाहून मिसेस् दयालना वाटलं होतं त्याचं बुशशर्ट रेडीमेड घेतलं असावं. विजूताईंनी मोठ्या अभिमानानं सांगितलं होतं, 'नाही हो ऽ मी घरीच शिवते मुलांचे कपडे. रंगवते पण मीच' पण त्यांना खरंच वाटलं नव्हतं. बायाबाया आपापसात नेहमीच कुजबुजत—ह्यांची मुलं नेहमीच कशी टिनोपालमध्ये धुतल्यासारखी वाटतात !

पण नाही ! बिट्टू एवढ्यात फारच हट्टी झालाय्. काही एक ऐकेना. येता येऊन आधाशासारखा जेवला काय न् कपड्यासहितच झोपला पण. बापही असाच हट्टी त्याचा. सगळे बापाचे गुण घेऊन आलाय्.

—बापाचे गुण.

त्या एकदमच चरकल्या. नाही...नाही..बिट्टू, त्याच्यासारखं, बेटा मुळीच व्हायचं नाही. पण बिट्टू तर आतापासूनच त्यांचा स्टेथोस्कोप कानाला लावायचा. पोट तपासायचा. इंजेक्शन बोटानंच मिनीच्या दंडात द्यायचा. मेला, डाक्टरच व्हायचा... हो...ते चालेल एक वेळ. पेशा बापाचा घेतला तरी हरकत नाही. पण...

त्या मिनीजवळ येऊन परत लवंडल्या.

तेवढ्यात बाहेर खटकन् आवाज झाला. रात्रीचा थोडासाही आवाज किती मोठ्ठा वाटतो, नाही ? कधी कधी तर स्वतःचा श्वासदेखील जाणवतो. बाहेर कंपाउंडचं दार उघडलं गेलं होतं.

—आलेत वाटतं ?

त्यांनी झोपेचं सोंग घेतलं. नाना आधीच खोकायला लागलेत. विजूताईंना वाटलं, ते येतील. उठवतील. लाडे लाडे म्हणतील...डा...र...लिं...ग ! —मग आपण भांडू. मनातलं सारं सारं आज ओकून टाकायचं. 'रोज त्या जेवून झोपायच्या. डॉक्टरांनी, बिट्टूच्या पपांनी, त्यांना बजावून ठेवलं होतं—मला वेळ व्हायचा. तू जेवून घेत जा. अन् मी उपाशी थोडाच राहतो तिथं...पण आज त्या उपाशी झोपल्यात. त्यामुळंही कदाचित त्यांना झोप आली नसेल. त्यांना जेवायला वाढताना आज सारं सारं स्पष्ट, सलीच भीती न ठेवता बोलायचं विजूताईंनी ठरवलं—एकाट, दूर क्वार्टर. ना शेजार. ना पाजार. दोन शब्द कुणाशी बोलावं म्हटलं तर फर्लांगभर चालत जायचं. त्यात पुन: 'कुठं चाललात' 'कधी येणार' ह्या चवकशा. कुणी भेटीसाठी आलं तर 'कशाला आलात ?' असा प्रश्न खूप सहन केलं आजवर. आता आपण चूप राहणार नाही. आपल्याही आवडीनिवडी आहेत. आपल्यालाही मन आहे. दोन पोरांचं करता करता न म्हाताऱ्याची मर्जी सांभाळता सांभाळता मलाही कंटाळा येतो. तुमचं बरं आहे—क्लब आहे, मित्र आहेत, पत्ते आहेत. रात्ररात्रभर तुम्ही क्लबमध्ये पत्त्यात हरवले असता आणि मी...मी...एकटी...अगदी एकटी.

एकदा असंच डॉक्टर ऐकेनात, तेव्हा त्या नानांना म्हणाल्यात, उद्देश होता,—नानांनी लेकाला समजावावं, तर तेच गरजलेत,—'पुरुषांनी काय घरकोंबडा होऊन राहावं ? सोसायटी, एन्टरटेनमेंट नको का ?' चूक केली आणि ह्यांना सांगितलं, असं विजूताईंना वाटलं. म्हातारी ह्यांच्या जाचापाईच मेली असावी. जिभेला हाड नाही.

बंगल्याचं पुढचं दार हलकेच ठोठावलं होतं. नानांनी खडया आवाजात विचारलं, 'कोण ?'

'मी आहे, नाना !

'आलो...आलो...'

नंतर स्विच ऑन केल्याचा आवाज, त्यामागून दाराची कडी काढल्याचा. पुन: दार बंद झाल्याचा आवाज आला. बेडरूमचं दार नुसतंच लोटलेलं होतं. पडद्याच्या घंटया किनकिनल्या. ट्यूब लावली गेली. त्यांनी कोट उतरवला, पँट काढली, शर्ट काढला, नाईट-गाऊन घातला व बाथरूममध्ये गेलेत.

विजूताई सारं मनात टिपित होत्या. बाथरूमचं दार उघडल्याचा आवाज झाला. ट्यूब विझली. त्या निमूट पडून होत्या. किती कठीण होत होतं सोंग आणणं. एवढ्यात नाकाजवळ त्यांना एकदमच दारूचा उग्र दर्प जाणवला. त्यांचे श्वासही जाणवलेत. वाटलं, हातानं ते हलकेच दंडाला स्पर्श करतील. उठवतील. त्या अपेक्षेत राहिल्या. डॉक्टरांनी चादर विजूताईंच्या अंगावर टाकली व आपल्या बेडवर जाऊन कलंडलेत. पुन: कसलाच आवाज आला नाही. त्या निमूट पडूनच राहिल्यात. पण कां तर, त्यांना फारच अपमानित झाल्यासारखं वाटलं—अलीकडे डॉक्टर रात्ररात्रभर बाहेर असतात. पत्ते कुटतात...पितात...मी काही एक म्हणत नाही पण एवढ्यात कां तर माझ्याकडे त्यांचं दुर्लक्षच होतंय. माझ्यात त्यांना आताशी रस वाटत नाही. कां ? माझ्यात असा काय फरक पडला ? महिनामहिना निघून जातो. कोरडा. ते मला जवळही करीत नाहीत. पूर्वी तर असं होत नसे. रोजच ते 'त्या'साठी आग्रह धरायचे. मी 'नाही, थकलेय्' म्हटलं की रुसायचे, फुगायचे आणि एकदा त्यांच्या स्वाधीन झालं म्हणजे...नुसत्या आठवणीनंच त्यांच्या रोमारोमात रक्त धावायला लागलं. पण क्षणानंतरच सगळा रक्ताचा प्रवाह जणु शून्य झाला. डॉक्टरांचं घोरणं त्या स्तब्ध शांत खोलीत मोठ्यानं जाणवायला लागलं.

त्या पुन: स्वतःतच हरवल्या...मी किती किती काळजी घेतली. बिट्टू झाल्यानंतर शरीर सुटायला

अनुक्रमणिका

लागलं होतं. आपण प्रयत्नांची पराकाष्ठा केली. फॉर्म बिघडू दिला नाही. नंतर आपल्याला मूल नकोच होतं. पण मिनटली एकदम् बदमाश. चार महिनेपर्यंत पोटात होती हे कळलेही नाही फसवलं तिनं आपल्याला. नको होती ती. पण जमेना. उशीर झाला होता. नियतीच्या मनात तेच होतं. आपण नुसतं पाहात राहिलो. तीही मेली अशी की हासत राहते. पण...पण...ह्या शरीरावर आपण नियंत्रणच ठेवलं. अजूनही मुलं पाहिली की आपण आई आहोत हे लोकांच्या ध्यानात येतं. एरव्ही कुणीही वळून पाहावं एव्हढं सौष्ठव कायम आहे.. त्यांचंच मन अशी चिरफाड करीत राहिलं. प्रश्न विचारीत राहिलं. उत्तरं देत राहिलं.

आणि अंगावरची चादर त्यांनी चटकन् दूर फेकली कुठून अवसान आलं, कळेना. त्या उठल्या. दाराला कडी लावली. बिट्टूला त्यांच्या पलंगावरून दो हातावर उचललं, मिनीच्या शेजारी टाकलं. डॉक्टर अजून घोरतच होते. मग त्यांनी स्वतःच्या अंगावरच एक एक वस्त्र काढायला सुरवात केली. कितीदा डॉक्टरांनी तो आग्रह धरला होता. पण त्यांनी ते टाळलं होतं. आणि आज त्याच उद्युक्त झाल्यात. कुठं मुलं पाहतील ही शंका आली. तसा त्यांनी झिरो पॉवरचा दिवा पण मालवून टाकला. त्या खोलीतल्या अंधारात त्या अगदी निर्वसन झाल्यात. नग्न. एक आग पेटून उठली होती. शरीराचा दाह वाढत होता आणि त्या डाक्टरांना कडकडून बिलगल्या तरी डॉक्टर झोपेतच होते. त्यांनी त्यांना दो हातानं गदगद् हलवलं. एक समुद्राची लाट उठली होती. त्यांनी त्यांचे हात हातात घेतले. तरी...एकदाचे डॉक्टर उठलेत. मस्त आवाज...अं झोप ग ! झोपू दे मला.

मग त्यांना चीड आली. वाटलं. फाडफाड डॉक्टरांच्या गालावर थापडा माराव्यात. पण नाही. ह्राही त्यांचा पवित्र उगाच गेला. त्यांनी हिम्मत हारली नाही. पुटपुटल्या अगदी कानाशी,–'बघा तर अगदी तुमच्या मनासारखं करत्येय् आज.'

डॉक्टर नशेतच धुंद होते. उग्र दर्प विजूताईच्या नाकात भिनला. त्या तेही विसरल्या. त्या वेगळ्याच आवर्तात होत्या. आनंदात होत्या.

आणि बराच प्रयत्न केल्यानंतरही जेव्हा डॉक्टर निष्प्राण झाल्यागत कलंडलेत तेव्हा त्या शॉक लागल्या-गत दूर झाल्यात चिडल्यात. हा देहधर्माचा अपमान होता. डॉक्टरांनी जेव्हाही मागितलं, तेव्हा त्यांनी नाही म्हटलं नव्हतं. आज त्यांनी मागितलं डॉक्टर निष्क्रिय राहिलेत. सारा प्रयास फुकट गेला. ते काहीच करू शकले नव्हते नुसते झोपलेत.

विजूताईंनी निमूट कपडे घातलेत. एक थुंकी ओठापर्यंत आली होती. ती गिटकायची नव्हती. खिडकीशी जावून त्यांनी थुंकून दिली. बिट्टूला परत डॉक्टरांच्या शेजारी टाकलं. झिरो पॉवरचा बल्ब परत ऑन केला. आणि परत मिनीच्या शेजारी झोपल्यात. मिनीला कुशीत घेऊन.

एक हुंदका गळ्यातच अडकला. डॉक्टरांच्या घोरण्याचा आवाज खोलीभर पसरून राहिला.

आणि एक शंका चाटून गेली,–कुठे 'हे'ही हे बाहेरच करून येतात की काय... ?

त्यांची उशी आसवांनी चिंब झाली. बराच वेळ झोप लागेना. मग केव्हा एकदा झोप लागली ते कळलेच नाही.

□ □

बुडिया । प्रभाकर धोटे

' राजपुत्राने तक्षकाचा नाश केला. राजकन्येची सुटका केली. आणि त्या भुयारी किल्ल्यातून ते बाहेर पडले. राजपुत्र फारच शूर होता. इतके श्रम करूनही तो थकला नव्हता. '—

बाबीला वाटलं. त्याचे केस सारखे करावे. त्याचा एखादा पापी घ्यावा. एखादं काम ऐकल्यावर आफिकेतलाँ काका नाही का पापी घ्यायचा. किती गोड वाटायचं. बाबीनं सुटकेचा निश्वास टाकला.

' राजपुत्र घोड्याजवळ आला. घोडा शांतपणे चरत होता. त्याच्या पाठीवर थाप मारली. राजकन्येला म्हणाला, ' चलावं महाराज. दिवस बुडायच्या आता आपल्या राज्यात जाऊ. '

' राजकन्या त्याच्या खांद्यावर मान टाकून स्फुंदुन रडत होती. ' एवढा शूर राजपुत्र पण तोही हतबल झाल्यासारखा दिसला. बाबीला तिचा राग आला. एवढी जीवाची बाजी लाऊन तिची सुटका केली आणि ही वेडी तर रडत बसली. ती असती तर–खचितच अशी वागली नसती. राजपुत्राला बिलगून बसली असती. आणि वायूच्या वेगाने पळणाऱ्या घोड्याची गंमत बघितली असती. राजकन्या व्हायला अगदीच नालायक आहे.

राजपुत्र म्हणाला ' काय झालं रडायला ?'

' भूक लागलीय. कित्येक दिवस झाले पोटात अन्नाचा कण देखील नाही. ' राजकन्या उत्तरली.

राजपुत्र हताशपणे इकडे तिकडे पाहू लागला. बाबीच्या पोटात देखील कावळे ओरडत होते.

बाबीनं पुस्तकाकडे पाहिलं. थोडंस उरलं होतं. म्हणजे दुसरं पुस्तक शोधायाला हवं. दिवस जाणार कसा ? कुंदेला मागू. तशी ती शिष्ट आहे. कुठली कुठली घाण पुस्तकं वाचते. मोठी झाली म्हणून काय झालं ?

तेवढ्यात आई आली.

' बाबे मेले बहिरी झाली की काय ग. केव्हाची ओरडते आहे ? खादडायचं असेल तर खा. सदान कदा मेली पुस्तकात डोकं खुपसून असते. ना कामाला मदत ना डोक्याला शांतता. '

आई रागाच्या भरात व्याख्यान दिल्यासारखी लांबलचक वाक्यं भराभर बोलते. सवयीनं त्याच्याकडे दुर्लक्ष करायाला ती शिकली होती. पण पुस्तक बंद करण्याची धमकी म्हणजे फारच झालं.

' अग आई मी ' ओ ' सुद्धा दिली. पण कोणालाच ऐकायला आलं नाही. '

' उतरून आली असतीस तर काही बिघडलं नसतं. '

' कशी उतरू ग. खालचा स्टूल मघ्यानं केव्हाच काढला. '

आईनं त्या दोन अडीच फुटांच्या दरम्यानच्या आपल्या खुज्या पोरीकडे पाहिलं. आणि तिच्या पोटात ढवळून आलं. सारं कसं छान चाललं होतं. कुणाचीच तशी काळजी नव्हती. पण ही बाबी. हिचं लग्न कसं होणार ? चांगली चौदा वर्षांची झाली यंदा. डोक्याला सतत काळजी. आणि मग एकाएकी आईला राग आला. मंद झालेले डोळे एकाएकी धगधगले.

' मग उडी मारली असतील तर मेली नसतीस आणि मेली असतीस तर आम्ही विवंचनेतून तरी सुटली असतो '—

बाबीचे डोळे भरून आले. तिला पोरकं झाल्यासारखं वाटलं.

आईनं तिला हात दिला. बाबीनं उडी मारली.

'उडी का नाही मारलीस ग?'

'पायबिय मोडला असता, तर तूच रागावली असती'--

घरी कुणी आजारी पडलं की साऱ्यांना काळजी वाटायची. फक्त बाबीचं काही दुखलं खुपलं की त्यांच्या कपाळावर आठ्या पडत. बाबी समजुतदार होती.

आईलाही अपराधीपणाची जाणीव झाली.

'चल आफ्रिकेतला काका येणार आहे तुझा. आठवतो का ग तुला'—

बाबीला फारच आवडायचा तो. बाबीला खांद्यावर टाकून लांब फिरायला जायचा. आई बाबा तिला रागवतात तसे ते काकालाही रागवायचे. काका पळून गेला. कुणालाही न सांगता. कुणालाही दुःख झालं नव्हतं. उलट साऱ्यांना मोकळं मोकळं वाटलं.' अडचणीत खाणारं एक तोंड कमी झालं होतं.

आणि एकदिवस काकांचं पत्र आलं. मोझँबिकवरून. त्यानं खूपसे पैसे सुद्धा पाठवले होते. तिच्यासाठी फ्राक आणि खाऊ पाठवला होता. पत्रातून तिची चौकशी सुद्धा करायचा. दोन तिनदा आफ्रिकेत या म्हणून सुद्धा बोलवलं. बाबीला खूप जावंस वाटायचं. तिथले ते कुरळ्या केसांचे धिप्पाड काळे लोक; जंगले, मोठमोठ्या नद्या, वाघ, हत्ती, सिंह सारच तिच्या आवडीचं होतं. पण तिला कोण पाठवणार? काकांनीच नेलं असतं तर जमलं असतं.

'आठवतात ना ग. तू त्यांना ऐतखाऊ म्हणायची.'

'चल चावट कुठली. असं बोलू नये.'

काका येणार ह्या आनंदानं बाबीला दोन घास कमीच गेले. रात्री काकाजवळ झोपायचं. त्यांना त्यांच्या सफरीबद्दल खूप खूप विचारायचं आणि अगदी काकांसारखं, मोठं व्हायचं.

दुपारी बाबा ऑफिसातून लवकर घरी आले. सारे तयार नव्हते म्हणून रागावले. काका येणार म्हणून साऱ्यांना विमानतळावर जायचं होतं.. ठेवणीतल्या कपड्यात सारे सजले.

'तू घरीच राहणार आहेस का ग बाबी?'

मनात नसूनही ती म्हणाली—

'हो—'

'ठीक.'

मग ती कुंदाला म्हणाली,

'कुंदाताई पुस्तक देना ग एखादं.'

'छट् लहान मुलांनी वाचू नये असली पुस्तकं.'

'म्हणजे कशी ग. माझ्यापेक्षा फक्त एक वर्षानं तर मोठी आहेस तू.'

बाबीनं ठरवलं. कुंदाचं पुस्तक चोरून वाचायचं.

मधूनं तिला लाल पहाडाची कथा वाचायला दिली. तिनं येऊ नये म्हणून तो वाटेल ते करायला तयार असे. त्याला खुज्या बहिणीची लाज वाटे. लोक तिच्याकडे पाहात, त्याची त्याला चीड येई. म्हणून बाबी त्यांच्याबरोबर बाहेर जायला तयार नसे.

कुंदाचं पुस्तक शोधायाला काही त्रास झाला नाही. तिच्याच पलंगावर लोळत पडून ती वाचायला लागली. कुंदा एवढी रात्री जागून काय वाचते; तिला कळेना. तो तिची भेट घेतो, बगिच्यात तासन तास बोलत बसतात. नंतर हॉटेलात जातात. काही तरी चावटपणा करतात, ह्या पलीकडे तिला तरी त्यात काही वेगळं दिसत नव्हतं. लढाई नव्हती, सुटका नव्हती, साहस नव्हतं. कुंदासारखेच ते लोक दोसा आणि चहा घेतात.

—तरी तिला पुस्तक टाकावसं वाटेना. अंग कसं ताणून जातं. त्याची गुंगी थेट मस्तकापर्यंत भिनते.

तिचं पुस्तक संपत आलं तेव्हा दारात मोटार उभी होती. तिनं झटकन पुस्तक जागच्याजागी ठेवलं. तोंड कसंतरी धुतलं आणि टॉवेलनं खसाखसा पुसून टाकलं.

ती काकांना सामोरी गेली.

काका चांगलेच उंच झाले होते. त्यांचं डोकं चौकटीला टेकत होतं. काकांचे केस पांढरे होत होते तरी काका रुबाबदार दिसत होते. काकांनी तिला दोन्ही हातांनी धरलं. उंच फेकलं. मग कवटाळून तिचा छानदार पापा घेतला. बाबीचं रक्त पुन्हा तापलं. तिला तो अनुभव नवा होता तरी हवाहवासा वाटला. तिला काकांनी खाली ठेवल्यावर ती लहानपणी म्हणायची तशी म्हणाली-' काका पुन्हा फेका नं फक्त एकदाच.'

काकांनी तिला पुन्हा उंच फेकली. त्यांच्या छातीवर विसावताच तिनं त्याचा कडकडून पापा घेतला. गळ्यात दोन्ही हात टाकून त्यांना घट्ट मिठी मारली.

काकांचा श्वास कोंडला.

'पुरे बाव्या पुरे आता.'

मग बाबांकडे वळून म्हणाले,

'सारे बदलले. कुंदीतर बाई झाली. पण बाबी जशी होती तशी आहे.'

'म्हणून तर काळजी वाटते बाबा—'

बाबा सुस्कारत म्हणाले.

'बाव्या एक घोटाळा झाला बेटा. तू मोठी झाली असशील म्हणून मी तुझ्यासाठी मोठे फ्रॉक्स आणले. तुला नाही होणार ते आता.'

'मला फक्त तुम्ही हवे आहात काका. फ्रॉक्स कुणालाही देऊन टाका.'

'तुला काय देऊ ?'

'पुस्तकं घेऊन द्या.'

'काय प्रोफेसरीण होणार आहेस काय ग ?'

'कसली प्रोफेसरीण होते. सारखी अद्भुत कथांची पुस्तकं वाचीत राहाते.'

'असू दे. वाटेल तितकी पुस्तकं घेऊन देईन हं. पण अभ्यास बुडवायचा नाही.'

काका आल्या आल्या येणाऱ्या जाणाऱ्यात बुडून गेलेत. काकांनी लग्न केलं नव्हतं म्हणून शेजारचे गणपतराव आले होते. ते फक्त जावई शोधायलाच घराबाहेर पडतात. बावीच्या मनात आलं. आपणच काकांशी लग्न केलं तर—

—नकोरे बाबा

तीच तिच्या विचारांनी घाबरून गेली. तो विचार दूर व्हावा म्हणून मग ती लाल पहाडाची कथा वाचू लागली. पण तिला एकही अक्षर वाचता येईना. वाचल्यावर त्याचा अर्थ तिला कळेना. काकांचा तो स्पर्श तिला सारखा आठवायचा. हवासा वाटायचा. तिनं ठरवलं आज काकांबरोबरच झोपायचं. आणि आफ्रिकेतल्या राजपुत्राची आणि त्यानं पळवलेल्या राजकन्येची गोष्ट ऐकायची.

जेवणं आटोपल्यावर तिनं काकांना विचारलं,

'काका तुम्ही कुठं झोपणार?'

'अगं व्हरांड्यात.'

'मी झोपू तुमच्याबरोबर. तुम्ही सांगाल मला छानदार गोष्ट?'

कुंदा मधेच म्हणाली.

'त्यांच्या बरोबर झोपायला तू का आता लहान आहेस.'

'मघा हीच कुंदटली म्हणाली की ते पुस्तक वाचायला तू लहान आहेस म्हणून. बावीला राग आला पण ती काही बोलली नाही. फक्त काकांकडे पाहती राहिली ?'

'बाव्या आज मी थकलो. उद्या सांगीन हं गोष्ट.'

बावीला काकांचा राग आला. रात्री बराच वेळ तिला झोपसुद्धा आली नाही. रात्री झोपताना ती वाचलेलं पुस्तक घोळवून घोळवून आठवत असे. पण आज तक्षकाचा खून करणारा राजपुत्र आठवत नव्हता. तर कुंदटलीच्या पुस्तकातला 'तो'च आठवत होता.

तिनं खिडकीतून पाहिलं. समोर व्हरांडा दिसत होता. काका गाढ झोपले होते. लहानपणी ती अशीच रात्री उठून आईजवळ जाऊन झोपायची. आणि मग बाबा मात्र खूप चिडायचे.

ती हलक्या पावलांनी उठली. तिच्या धक्क्यानं फुलपात्र खाली पडलं. ती दचकली. आज असं चोरासारखं अपराधी का वाटतं म्हणून तिला नवल देखील वाटलं. अंग देखील उगीचच्या उगीच तापत होत. ताप येणार असेल बहुधा.

काका भिंतीकडे तोंड करून झोपले होते ती त्यांच्या बिछान्यात शिरली. काका जवळ घेतील म्हणून वाट पाहात राहिली. काका गाढ झोपले होते. तिनं काकांना मिठी मारली.

काका जागे झाले.

तिच्याकडे पाहून गोड हसले. पुस्तकातल्याप्रमाणे.

'काका आम्हाला राग आला तुमचा.'

'उद्या दोन पुस्तकं बक्षीस. झोप आता. लहान मुलांनी जास्ती जागू नये.'

'मी लहान नाही काका.'

'बरं बाई तू खूप मोठी आजीबाई आहेस. मग तर झालं. झोप आता.'

'मी झोपायला नाही आले.'

'मग'

'मला गोष्ट सांग. म्हणजे मी झोपून जाईन.'

'तुझं अंग खूप गरम झालं. चेहराही लाल झाला. थांब वहिनींना उठवतो.'

'नको मला काही झालं नाही.'

'हं—एक होता राजा आफ्रिकेतला काळाकुट्ट–'

आणि काका गाढ झोपी गेले.

ती काकांना घट्ट चिकटून झोपली. हट्टानं त्यांचं तोंड आपल्याकडे वळवून तरी झोप येईना आणि काकांना तर झोप लागलेली.

मग तिला आठवलं. 'तो' ओठांचा पापी घेते. मग 'तो' जागा होतो. गोड हसतो. ताईच्या पुस्तकात त्यांचं चांगलं वर्णन होतं.

तिनं तसंच केलं.

काका जागे झाले. पण तिच्याकडे विचित्रा-सारखे पाहू लागले. म्हणाले,

'बाबी तूं झोप आता. मला एक काम करायचं आहे. आमच्या कंपनीला रिपोर्ट लिहायचाय. तूं झोप.'

काका काही तरी लिहित बसले. तिला केव्हा झोप लागली ते कळलंच नाही.

सकाळी ती जागी झाली. तेव्हा ती आपल्याच बिछान्यावर होती. रात्री स्वप्न तर पडलं नव्हतं. आणि सारं आठवल्यावर तिची तिलाच शरम वाटायला लागली. बरं झालं बाई स्वप्न होतं ते. नाहीतर काका रागावले असते. आणि तिला त्यांच्याशी बोलताना किती लाज वाटली असती.

तिनं कुंदाला विचारलं.

'काका कुठाय ग?'

'माडीवर आहे.'

मी हलक्या पावलांनी वर गेली. माडीवरच्या खोलीचं दार लोटलेलं होतं.

आई आणि काका बोलत होते. तिनं आवाजा-वरून ओळखलं.

'वहिनी बाबीची काळजी घ्या'–

'परेमश्वरी प्रकोपच तो.. आमच्या हातात काय आहे. तुम्हीच सांगा.'

'त्याबद्दल नाही म्हणत मी. अहो ती आता वयात येते आहे.'

'हो नं!'

'तिचं ताबडतोब लग्न करून द्या.'

'कोण करणार कंबरेएवढ्या मुलीशी लग्न–'

'ते शोधून काढा.'

आणि हलक्या आवाजात ते बराच वेळ बोलत होते.

बाबीला हुंदका दाटून आला. एवढीशी गोष्ट त्यांनी मनात ठेवली नाही. संपूर्ण घरात तिला त्यांचा विश्वास वाटत होता. बाकी घर तर तिला शत्रू म्हणून वागवत होतं. काकांचं तिच्यावर प्रेमच नाही. नाहीतर ते असं वागलेच नसते. पुस्तकातला 'तो' कसा छान वागतो. राजपुत्र देखील राजकन्येशी चांगले वागतात. त्यांना भूक लागली तर कासाविस होतात.

काका आता 'त्याच' नजरेनं आपल्याकडे पाह-तील. आई बाबांना सांगेल. मग कुंदा–मधूला कळेल. सारे आपल्याकडे वाईट मुलगी म्हणून पाहतील.

आईचा आवाज आता स्पष्ट झाला.

'तिची पुस्तकच बंद करते आता.'

कुंदाला खूप अपराध्यासारखं वाटायलं लागलं. आपल्याला शिक्षाच व्हायला हवी.

ती धावत गच्चीकडे धावली. अडगळ ओढून त्यावर चढली. काकांचं लक्ष जावून ते धावायच्या आत तिनं उडी घेतली.

काका धावत खाली गेले.

आईला मात्र वाटत होतं. कार्टीच्या हातपाय मोडला असेल तर सहा महिने तिची सेवा करावी लागेल.

रक्ताळलेली बाबी काकांच्या हातात होती. तिची शुद्ध हरपत होती. तो पुटपुटत होता–

'काका मला घट्ट धरा, आईला सांगू नका. कंठाची शप्पथ आहे–माझ्या मनात तसं काही नाही–काका–'

□ □

नर्स ■ ऊर्मिला सिरूर ■

[धूसर उजेड. मंद जळणारा नाईटलॅंप—पांढऱ्या-शुभ्र बिछान्याची पलंगावरची चौकट. पांघरुणात गुरफटलेला देह वेदनेनी पिळवटलेला चेहेराही तसाच. बाजूच्या खुर्चीवर बसून पेंगणारी पोरगेलीशी नर्स... हळूहळू कण्हणे वाढत चाललेय. दाद मिळत नाही.]

हृषिकेश :—(वेदनेने कण्हत) सिस्टर—सिस्टर.

नर्स (गुंगीत) अं...

हृषिकेश : (मोठ्या आवाजात) सिस्टर.

नर्स (खुर्चीतच वळत) ममी प्लीज मला झोप येतेय ग...

हृषिकेश (संतापाने उरकाळी फोडत) नर्स... यू... यू...स्टुपिड...

[खणखणून बेल वाजवतोय—नर्स तडफडून उठतेय बाजूच्या खोलीतून महेश धावत येतोय. हृषिकेश उठायचा प्रयत्न करतोय...]

महेश : दादा उठू नका...काय झालं ? काय हवंय...

नर्स : (चोरट्या चेहऱ्यानी) कसा कोण जाणे ! डोळा लागला.

महेश : (तीव्र स्वरात) चांगली नाईट ड्यूटी चाललीय.

हृषिकेश : महेश...सहन होत नाही. माय गॉड...आः

[नर्स, महेश घाईघाईने बाटल्या धुंडाळतात. गोळी काढून नर्स देतेय... गोळी घेतल्यावर हृषींची वेदना, उल्घाल कमी होतेय. महेश कपाळावरून हात फिरवतोय.]

हृषिकेश : आ...आ हा हा...(सुस्कारा सोडतोय)

[दारातून घाईघाईने हृषिकेशची दुसरी पत्नी शारदा येतेय...प्रौढत्वाकडे झुकणारी]

शारदा : काय ? गडबड कसली ?—बरं नाही का ?

हृषिकेश : झोपमोड झालेली दिसतेय तुझी.

शारदा : (दुलंक्ष करीत) काय झाले महेश ?

हृषिकेश : काही झाले नाही. अजून व्हायचंय. वेळ आली नाही...महेश त्या सिस्टरला प्रथम हाकलून दे...मला कुणाची गरज नाही.

महेश : जरा शांतपणे दादा...रागावू नका.

हृषिकेश : पैसे घेतेय भरपूर अन् झोपा काढतेय.

नर्स :.(चिडीने) हे पहा तीन रात्री मी जागून काढल्यात. डोळ्याला डोळा न लावता. मीही माणूसच आहे. येवढ्या—तेवढ्या वरून मला उलटून बोललेले चालणार नाही.

हृषिकेश : शटप्...उलटून बोलतेय.

महेश : वहिनी तिला बाहेर घेऊन जा आधी. (शारदा व नर्स बाहेर जातात.)

महेश : दादा त्रागा करू नका—तुमचेही दुःख समजते. पण ह्या पंधरा दिवसातली ही तिसरी नाईट नर्स. त्यातल्या त्यात हीच बरी.

हृषिकेश : माझ्याकरिता कुणी जागायला नकोय. [शारदा एकटीच आत येऊन उभी आहे.]

शारदा : जे जागतात तुमच्याकरिता ते तुम्हाला नकोसे आहेत. जे तुम्हाला जागायला हवेत त्यांना जाग्रणे होताहेत.

महेश : वहिनी—प्लीज.

शारदा : तर काय. जीव टाकून केले तरी किंमत नाही...पाहिल्यावर पहिले तोंड वाकडे.

हृषिकेश : (भिंतीकडे पाठ वळवून) महेश माया कुठेय ?

शारदा : (पुटपुटत) माया माया माया...जप नुसता...

हृषिकेश (मोठ्या आवाजात) महेश माया झोपलीय ?

अनुक्रमणिका

महेश : अं...नाही दादा...जरा टाऊनमध्ये गेलीय आईबाबांना भेटायला तिच्या...येईलच उद्या सकाळी...

[शारदा टक लावून महेशकड बघतेय...महेश नजर चुकवतोय]

हृषिकेश : येवढा वेळ कशी गेली ? कशी जाऊन दिली ?

शारदा : परवानगी घेणारे अन् देणारे कोण ?

महेश : (घाईघाईने त्यांचा आवाज मोठ्या आवाजात दाबत) भेटली नव्हती खूप दिवसात. वहिनी आता झोपा तुम्ही...

[शारदा आत निघून जाते]

हृषिकेश : महेश तू हिला का बोलावलेस ? कशाला सगळा बाजार जमविला ?

महेश : (शांतपणे) तुम्हाला कल्पना येणार नाही दादा. खरंच तुमची तब्येत बिघडली होती. चांगलेच घाबरवलेत सर्वांना...तुमच्या ओढीनेच आले सारे...

हृषिकेश : हाकलून दे साऱ्यांना...

महेश : गेलेत तरी अर्धेजण—विजू, अभिजीत..तारा ...आता फक्त...

हृषिकेश : शारदा ! दुखणे उलटेल माझे तिच्या तोंडाला काटे फुटलेत जसे. (थांबून) आणि दुसरा मूर्ख कारटा...जणू एखादा रोबोट हिंडावा तशा निर्विकार चेहऱ्याने हिंडतोय.

महेश : दादा आयुष्याची सतरा अठरा वर्षे त्याला संपर्कही नव्हता...राधावहिनी घेऊन गेली तेव्हा जेमतेम दोन वर्षांचा होता...आपल्या घराण्याचा एकुलता एक अंकुर आहे. एकदम रोपटे दुसरीकडून उलटून आणलेय ते रुजायला वेळ लागणारच...

हृषिकेश : खरं आहे...एकदम कबूल. पण त्याचे डोळे ..नुसते राधाचे आहेत. असे त्वेषाने बघतात...

महेश : छे ! दादा काहीतरीच...भ्रमात बोलताय.

हृषिकेश : मायाला तर बघताना गिळू पहातात तिला ते डोळे...महेश मायाला जय...ही शारदा हा विपिन—

महेश : दादा तुम्ही समजता इतकी माया दुबळी नाही.

हृषिकेश : पण ही जाते का मला सोडून सारखी बाहेर ...तिला ठाऊक आहे मला तिच्याखेरीज एक क्षण निघत नाही. तिला फोन करून बोलाव आत्ताच्या आत्ता...

महेश (शांतपणे समजुतीने) दादा ही वेळ नाही. आता सकाळपर्यंत येईलच झोपा तुम्ही. मी येथेच बसतो. (दिवा मालवतोय...नाईटलँपचा मंद उजेड)

* * *

[सकाळ उजाडलीय. तोच बिछाना—तगमगणारे शरीर...गुंगीतले जवळ उभा राहून बिपीन...कुतूहलाने तोंडाकडे बघतोय...हृषिकेश...गुंगीत माया...माया...]

बिपीन : दादा ! दादा !

हृषिकेश : (अर्धवट गुंगीत) माया...जवळ ये...लवकर जवळ ये

(विपिनच्या तोंडावर घृणा...)

विपिन : (मोठ्यांदा) दादा !

हृषिकेश : (दचकून जागा होतोय—समोर बिपिनचे टक लावून पहाणारे डोळे) कोण.. महश. .बिपिन तू...

बिपिन : (संथ भावनाशून्य आवाजात) होय मी. काका जरा झोपलेत म्हणून मला बसवले.

हृषिकेश मी काही बोलत होतो का झोपेत..

बिपिन : होय माया माया म्हणून हाका मारत होतात. जवळ लवकर ये म्हणून बोलत होतात...

हृषिकेश : हूं...जरा पाणी दे बघू—

बिपिन : (पाणी ओतून देत) मायाताई येईलच आत्ता. का शारदाबाईंना बोलवू ?...

हृषिकेश : (त्याच्या तोंडाकड टक लावून बघत) नको नको.

बिपिन : मायाताई येतीलच आत्ता...

हृषिकेश : हो ! हो ! समजले मला... तेच तेच सांगू नकोस.

बिपिन : काल रात्रीच गेली बाहेर.

हृषिकेश : माहित आहे मला—टाऊनमध्ये आईबाबांना भेटायला गेलीय.

बिपिन (भाबडेपणी) काल तुम्हाला झोप लागली होती म्हणून निरोप घ्यायला आली नाही...

हृषिकेश : होय होय...काका कुठे आहे ? महेश...

बिपिन : (चिकाटीने) जाताना पाहिली नाही. अगदी 'सुपर' दिसत होती...टॉप. रेड शिफॉन गळयात लाल नेकलेस...केसात केशरी गुलाब. शनेल फाईव्हचा सुगंध दरवळत होता. आः...

हृषिकेश : (चिडीने उंच आवाजात) महेश कुठेय–बोलाव आधी.

बिपिन : (घावरल्याचा भाव आणत) वरे वाटत नाही का ?

हृषिकेश : यू गेटाउट फर्स्ट...महेश महेश... (महेश घाईने येत) काय दादा ?

हृषिकेश : तू जाऊ शकतोस विपिन...(महेश हृषिकडे वघत विपिन तोंडावर भावडे हसू घेऊन जातोय महेश दोघांकडे पहात राहातोय)...

हृषिकेश : इडियट...माया कुठे–मी विचारतोस माया कुठे ?–अजून कशी आली नाही ? शोफरला घाड...

महेश : काय झाले दादा... आलीय ती...येईलच इतक्यात, कपडे वदलून...

हृषिकेश : रेड शिफॉन, लाल नेकलेस...

महेश (स्वत:शीच पुटपुटत) बिपिनचे काम...

हृषिकेश : (गरजत) कुठे गेली होती ती ?...मूर्ख. सगळे मूर्ख आहात.

[शारदा मोठा फुलाचा गुच्छ घेऊन येते]

शारदा : तुमच्या आवडीची फुले आणली पण नुसती कालपासून कोपऱ्यात बादलीत पडून आहेत. मला जमत नाही, पण लावावी तशीच. मायाला तर वेळच नाही. समोर फुलं पाहिली तर बरं वाटेल..

[कशीवशी फ्लॉवरपॉटमध्ये फुले रचण्याचा प्रयत्न करते...हृषिकेश शांत...महेश औषध देतोय]...

शारदा : कशी दिसताहेत ? फुले पाहिली की बरे वाटते ना ?

हृषिकेश उत्तम... माझी कुणी येवढी काळजी घ्यायला नकोय...

शारदा : असं म्हणून कुणी काळजी करायचे थांबते का ? सांगून कुणाकुणाला काळजीही करता येत नाही.

हृषिकेश : माय गॉड...! काटे–नुसते ओरबाडणारे काटे.

शारदा : (चिडून) काटे द्यावे–काटे घ्यावे...

महेश : वहिनी ठेवा ती फुले–जा तुम्ही वाहेर आता.

शारदा : (आत येणाऱ्या मायाकडे पाहात) जाते जाते...

[माया आत येतेय... शुभ्र साधे कपडे... मेकपविना चेहेरा...पाठीवरच्या मुक्त काळया केसांतला चंद्रासारखा दिमणारा चेहेरा...तोंडावरचे प्रसन्न हास्य...)

माया : (जाणाऱ्या शारदाकडे भुवया उंचावून पाहात) घुसरणारा ज्वालामुखी.

महेश : (गडवडीत...) वरंय...मी माझीही दोनचार कामे पुरी करून येतो...माया तेवढी औषधाची दहा वाजताची वेळ बघ...(घाईघाईने जातो. हृषीकेश न बोलता पाठ वळवून झोपलाय...)

माया (हळू आवाजात...) बरं वाटतंय ना आज..?

हृषिकेश बरं वाटो अगर न वाटो...आमची कुणाला काळजी ?

माया : (हसून) तरी बरे इतकी माणसे आजुबाजूला नाचत आहेत शब्द झेलायला...(टक लावून त्याचं तोंड वळवून डोळयांत बघत) रागावलात पण तोंडावर राग तर दिसत नाही...

[हृषिकेश न बोलता छताकडे पहात राहिलाय. माया उठते...फुलाजवळ जाऊन फुले रचतेय...]

माया : ही फुले कशीतरीच कुणी लावली ? बर्ड ऑफ पॅरॅडाईज ? कुणी आणली ?

हृषिकेश शारदा !

माया : ओ...! आवडतात तुम्हाला ?

हृषिकेश : आवडत होती. (एकदम मोठया व करारी आवाजात) कुठे गेली होतीस काल रात्री ?

माया : सांगितले नाही महेशभाईंनी ?

हृषिकेश : रेड शिफॉन–केशरी गुलाब–शनेल फाईव्ह.

माया : बिपिनचे वर्णन दिसतेय. इतके डिटेल–नुसता डोळे फाडून बघत असतो.

हृषिकेश : विषयांतर करू नको...खरंच कुठे गेली होती ?

माया : (पाठमोरी होत शांतपणे) राग उतरल्यावर सांगीन मी. .जाते...

हृषिकेश : (खरंच जाणार ह्या भीतीने कासाविस होऊन)

माया : का छळतेस माया !

माया : पपांच्या एकसष्टाव्या वाढदिवसाची पार्टी होती.

हृषिकेश : (निश्वास सोडत चेहेराही बदलतोय) अरे! विसरलोच होतो मी...तू दिसली नाहीस की कासाविस जीव होतो...तुला ठाऊक आहे माया.

माया : म्हणून इतके भडकायचे का ?

हृषिकेश : तुला कसे समजावू ?

माया : दुसऱ्यांना नुसता वैताग आणायला लावायचा.

हृषिकेश : पार्टीला कोण कोण होते ?

माया : (मिस्किलपणे) अ....होते पपांच्याच वयाचे मित्र त्यांचे..निदान पंचावनच्या वरचे..बाकी तेच घोक्याचे–बिनभरवशाचे...

हृषिकेश : (चेहेरा हळूहळू खुलतोय) का सोडून जाते माया मला सारखी...

माया : (गंभीरपणे) मला तरी कुठे वाटते...पण घराचा नुसता बाजार झालाय–पळून जावेसे वाटते. एकटे तरी कधी मिळता का ?–ती शारदा नुसती जळत असते मॅाझ्यावर...तुमचे चिरंजीव दुसरे नुसते खाऊ की गिळू म्हणून वासलेल्या डोळ्याने बघत असतात नाहीतर महेश–डॉक्टर–नर्स तरी बरे अर्धे नातेवाईक गेले...बाकी घाबरवले होते केवढे. महेश तारे-सरशी धावत आले म्हणून....

हृषिकेश : तू घाबरली होतीस माया खूप !

माया : तर !

हृषिकेश : (मायाचा हात पकडत) आता मी लवकर बरा होईन...मग पूर्वीसारखे....फक्त तू अन् मी. तुझ्याकरिता बरा होईन–तुझ्यामुळे..सोडून जाऊ नको माया...

[शारदा दारात येऊन उभी...खाकरते.]

शारदा : सॉलीसिटर आलेत...त्यांना बोलणे संपले तर आत धाडू का ?...

हृषिकेश : (संतापून...) यू...स्टुपिड–गेटाऊट..

माया : रागावू नका... (निर्विकारपणे शारदाच्या जळत्या डोळ्याकडे पाहात) मी घेऊन येते आत त्यांना...

[शारदा वळून बाहेर जातेय...]

* * *

[बाहेरच्या खोलीत सोफ्यावर विणत बसलेली शारदा. किट–किट–किट. व्यापून मोठे घुमणारे बिपिनच्या ट्रांझिस्टरचे पॉप म्युझिकचे सूर. टोपाझच्या सुगंधो लाटेमागून तरळत येणारी माया. जर्सी–स्लॅक्स्–मोकळे केस. डोळ्यावर मोठे गॉगल्स...उन्हाने लाल फुललेले तोंड. बिपिन तोंड वासून पहात रहातोय. आवंढा गिळत माया येऊन आरामखुर्चीवर बसते सफाईने सिगरेट काढते. लाईटरकरता पर्स चाचपते. नुसती बिपिनकडे बघतेय. .बिपिन ताडकन उठतोय...]

बिपिन : येस–येस मॅचबॉक्स ना ? (धावत पळत आत जातो.)

माया : (हसून) हाऊ स्वीट

शारदा : (मान वर न करता) गळ्यात पट्टेच घालायचे राह्यलेत बापलेकाच्या

माया : (गदगदून हसत) ऑलेंपिकची ज्योतही आणेल सांगितले तर. .बाप तसाच लेक. आपल्या घराण्याचा कुलदीपक. एकुलता एक लीगल वारस.

शारदा : दुतोंडी. तुझा दुसरा मुखवटा दिसला नाही अजून हृषीला...

माया : हूं. every dog has his day. कधी कुणाचे दिवस, कधी कुणाचे ? इतका मत्सर वाटतो की लपवता येत नाही...

शारदा : मत्सर ?...कीव येते...

माया (आश्चर्याने) माझी ?

शारदा : हृषींची...त्यांना झुलवतेस...बनवतेय. मूर्ख ठरवतेय त्यांना...

माया : वा ! वा ! त्यांचे मन रमवतेय. मधून–नर्सिंग पण करतेय. हृषी म्हणतात की माझे तोंड पाह्यले की औषधाची पण जरूर वाटत नाही...

शारदा : भाळलेत तुझ्या तोंडावर. ह्या अवस्थेला आणायला कारण तुझे तोंडच.

माया : (हसत) तेही खरंच...पण माझे तोंड नसते तर दुसरे कुणाचे...हृषींना नवनवीन छान वस्तूंचा संग्रह करायचा शोक आहे...नुसता संग्रह नाही म्हणजे पक्या मालकीच्या करून घ्यायचा...

शारदा : उलटच्या काळजाची...काल जीव तोडून महेश सांगत होते–फार बाहेर जाऊ नको.

हृषींचा जीव खालीवर होतो. फोन कुणाचे येतात सारखे. पपांची पार्टी ही थापच खरं सांग ?

माया : हूं–थोडे खरे थोडे खोटे आपण लहान मुलाला दुखवू नये म्हणून नाही का सांगत ? ते काय खोटे असते ? समाधान करतो ना त्याचे... होतेही तसेच हेही बालपण...(तुच्छतेने) चोवीस तास त्यांच्या डोक्याशी बसले तरी कमी पडेल–कसं शक्य आहे–जनरेशन गॅप आहे ना ? तुमचे—महेशचे, ठीक आहे...बोलू तरी मी कुणाशी–बिपिनशी.. तो काय शब्द तरी बोलू शकणार...त्याचे डोळे–हात...

शारदा : चूप. दुतोंडी...

माया : ओहो !...रागवायला पण लागलात. बिपिन येतोय आत...

बिपिन : सॉरी–सापडेचना मॅचबॉक्स—

माया : थँक्स् बिपिन...जरा दादा झोपलेत का बघून येतोस ?...

बिपिन : दादा ?—एकदम गाढ..डॉक्टरांनी सॉलिड झोपेच्या गोळ्या दिल्यात बहुधा. मघाशीच पहायला गेलो...डोळे अर्धे मिटले, तोंड उघडे सताड..एक सेकन्द मला वाटले...

शारदा : (चिडून) बिपिन...

[बिपिन गप्प बसतो..माया गदगदून हसते]

बिपिन : अ...वाटले ते सांगितले.

शारदा : (धुमसत..) खूपदा वाटते तुला फिरकून दिले नाही पाह्यजे हृयांच्या खोलीजवळ.

माया : (मिस्किलपणे) बरं का बिपिन, ते नेहमी तसेच झोपतात...

[शारदाचा चेहेरा धुमसून पेटतोय–बिपिनचे तोंड विचित्रसे होतेय...आतून मोठ्यांदा हृषीच्या हाका. माया माया—कुठे गेलीत सगळी ? ..माया...]

माया : (उठत) मलाच गेले पाहिजे..

[आत वेगाने जाणारी शारदा एकदम थबकते]

हृषीकेश : माया–माया...

[माया धावते...फिरून पाठोपाठ शारदा—बिपिन धावतो...आतून बिपिन बाहेर येतोय. फोन उचलतोय..काका...डॉक्टरना बोलवा लवकर...]

* * *

[आतल्या खोलीत मद उजेड. हृषींचा बिछाना. तळमळणारे शरीर–शेजारी बसलेली नवीन नर्स... आतून महेश शारदा बाहेरच्या खोलीत येताहेत... दोघांचे ओढलेले चेहेरे. .]

महेश : वहिनी तुम्ही आता पडा थोडा वेळ...विश्रांती घ्या...नर्स आहेच जवळ.

शारदा : तुम्ही दमलात महेश...

महेश : होय, पण तुम्ही झोपा आता.

शारदा : (रडवेल्या आवाजात) होय. त्यांच्या उठण्याची वेळ झालीय .ते झोपले की मला खोलीत पाऊल टाकायची परवानगी...

महेश : तसे नाही वहिनी...

शारदा : होय..तसंच. सारा जन्म ह्या माणसाकरिता उधळून टाकला–समाज–माणसे–माझे नातेवाईक कुणाची पर्वा केली नाही. (हुंदका देत) आता मला पाहिल्यावर नुसते डोके फिरतेय...का ! का !

महेश : हा विषय काढायची वेळ आहे का ?

शारदा : तिला पाहिले की अंगाची आग होते... मायाजाल...भुलवतेय त्यांना चेटकीण. हास्यास्पद केलंय त्यांना...तो दुसरा वेडा बिपिन. त्याला प्रेम नाही काही नाही. डोळे मात्र आईचे –राधाचे आहेत...जळणारे. माहित आहेत मला ते...आम्हा दोघांकडे बघणारे...

महेश : (वैतागून) वहिनी..असं बोलू नका. इतक्या वर्षांनंतर त्याच्या आजोळहून मिनतवारीने समजूत घालून आणलाय—दादांचेही मन वळवून...एकदम रुजणार तरी कसा. सारेच परके...तेही हे वातावरण–दादांची ओळख त्याला पटायला वेळ तर हवा...

शारदा : (कडवटपणे) ह्यांची ओळख ? त्याच्या आईने त्याला कानात भरवले असेल, ह्यांच्या विरुद्ध.. खूपदा एकटा पण सोडायची भीती वाटते ह्यांच्याजवळ..

महेश : वहिनी...

शारदा : होय–परवा ह्यांच्या बिछान्याजवळ उभा राहून टक लावून पाहात होता—त्याच्या डोळ्यातली विचित्र लहर.

महेश : वहिनी... तुमचे डोके भ्रमिष्ट झालेय–किती झाले, काही असले तरी आपल्या घराण्याचा एकुलता एक अंकुर आहे तो.

शारदा : (सोफ्यावर कोसळत—तोंड झाकून) मी अभागी. राधाला बिपिन दिला... त्या मायाला प्रेम दिले. .मला काही नाही. काही नाही..

महेश : (समजुतीने) वहिनी...जाग्रणाने, काळजीने मन हळवे झालेय–झोपा तुम्ही जरा.

शारदा : येथेच कोपऱ्यात सोफ्यावर पडते.

[शारदा झोपते कोपऱ्यात सोफावर. महेश निघून जातो–खोलीतला उजेड कमी झालाय. शारदावर अंधाराचे सावट पडलय. प्रकाशाची फक्त चौकोनी खिडकी. माया आळसावत येतेय बाहेर–तोंडावरून 'बोअर' झालेली.. उभी राहून ओळोखेपिळोखे देतेय... बिपिन बाहेरच्या दारातच उभा राहून भुलल्यासारखा पहातोय चेटूक केल्यासारखा माया त्याला वघून हसतेय...मंद वाद्यांचे सूर वातावरणातून येताहेत. माया खुणावतेय बोटांनी...]

माया ये! ये...आपण नाचूया...

बिपिन : (भारल्यासारखा तिच्याकडे जातोय...) माया.

माया शू! बोलू नकोस नुसते नाचूया... मंद सुरावर तरळत एकमेकाला लपेटलेल्या आकृती नाचताहेत– भान विसरलेली शरीरे...

शारदा (ताडकन उठून) कोण कोण... (टेबल-लॅंपचा दिवा पेटवते... स्वच्छ प्रकाशात माया बिपिन–) अरे देवा...

[बिपिनचे हात दचकून सुटतात... मायाचे हात लपेटलेले आहेत...]

माया : नाच वेड्या घावरू नकोस. मी भयंकर बोअर झालेय

शारदा : चेटकीण–चांडाळीण. हलकट.

[बिपिन घावरून उभा रहातो स्थिर..]

माया : (हसत) अहाहा! बाळ घाबरले...किती सुरेख रंगला होता नाच...

शारदा : (संतापाने उभी राहून थरथर कापत) चालती हो आधी ह्या घरातून..

माया : (शांतपणे) माझ्या घरात राहून मलाच चालती म्हणताहेत?

शारदा : तुझे? तुझे घर...

माया : (खिडकीजवळ जात, बाहेर बघत) माझंच. माहिती नाही? माझ्याच नावावर केलंय. पहाता क्षणीच घ्या घरावर माझे मन वसले. प्रत्येक दगड, वीट, भिंत, ही बाग–झाडे–वेल सारं काही.

शारदा : (थरथरत) खोटं साफ खोटं. हे तुझ्याकडे नाही—घराण्यातच रहाणार. .फार तर बिपिनकडे.

माया : (वळून... हसत–नजरेने बिपिनला कुरवाळत) उंहूं .. बिपिन राहूला तर माझी हरकत नाही पण त्याला टाऊनमधला मोठा फ्लॅट. मला हा बंगला–तसाच जहूचा पण. विकएन्डला समुद्राच्या लाटा ऐकत–उन्हाळ्यात महाबळेश्वरचा बंगला.

शारदा ह्याच्याकरिता तू हृषींच्या गळी पडलीस!

माया : मी नाही गळी पडले शारदाबाई.. आपले हृषीकेश माझ्यामागे धावत आले...पपांनी मला दूर लंडनला धाडली, तेथे माझ्यामागे धावत आले. दुसऱ्या विमानाने अगदी... माहित आहे!–परत येत नाही म्हणाले, तर धमकी दिली आत्महत्त्येची...

शारदा साफ खोटं–बनावट.

[बिपिन हतबुद्ध होऊन बघत रहातोय तोंड वासून.]

माया : मी परत यावे म्हणून सारे माझ्या पायावर अर्पण केले होते माहिती आहे? माझं जाऊ द्या पण येवढा आपल्या प्रेमाचा, निःस्वार्थी प्रेमाचा टिमटिमाट चाललाय पण हृषींच्या आईचे आणि ह्या बिपिनच्या आईचे हिऱ्याचे–पाचूचे दागिन्यांचे सेट कुणी पळवले चुपचाप. ऐकलं का बिपिन–माहिती आहे तुला सारे? आणि...

बिपिन : (भेसूर ओरडत) आईग. कोण आहात कोण तुम्ही–बायका का चेटकिणी? माझी आई... देवता होती...हालहाल करून गेली स्वतःचे पण मानाने. .(शारदाकडे बोट करून) हिचे

[पुढील मजकूर पान ७३३ वर]

पत्रे

'रविकिरण : एक वाङ्मयीन जमाखर्च'

मधु जामकर

'युगवाणी' दिवाळी १९७३ च्या अंकातील प्रा. यशवंत मनोहर यांचा रविकिरण मंडळावरील लेख वाचला. समीक्षेची समंजस, रोखठोक जाणीव नसणाऱ्या लेखकाने आपल्या मर्यादेचे उल्लंघन केल्यावर स्वतःचे कसे हसे होते याचा एक आदर्श नमुना म्हणून वरील लेख दाखविता येईल. वस्तुतः या लेखाची सुजाण वाचकाने दखल घेण्याचे कारणसुद्धा नाही. परंतु वेळीच 'ताळ्यावर' न आणल्यास आपली जुजबी लेखणी 'तलवारी'च्या आविर्भावात चालविण्याचा 'पोरखेळ' हा लेखक वारंवार आमच्यापुढे खेळेल, ज्यामुळे 'युगवाणी'सारख्या सकस व साक्षेपी नियतकालिकाविषयी गैरसमज निर्माण होणे कठीण नाही.

प्रा. मनोहर यांच्या या लेखात अथपासून इतिपर्यंत–विधानांतील विसंगती दिसून येते. जेव्हा एखाद्या कलावंताच्या कलाकृतीबद्दल आपण आवडी–निवडीतून बोलू लागतो तेव्हा त्याला किमान प्राथमिकतेचे स्थूल व लक्षात न ठेवण्याजोगे स्वरूप प्राप्त होते. परंतु कलावंत व त्याच्या कलाकृतीविषयीची मते एका व्यापक अशा विचारगर्भ पातळीने संपन्न असावी लागतात. मतभिन्नता किंवा आवड-निवड विविध असू शकेल परंतु ती व्यक्त होताना त्यामागे असलेली तात्त्विक बैठक यांचा अंदाज देखील विचारार्ह असाच आहे. प्रा. मनोहर जेव्हा केशवसुत ते मर्ढेकरापर्यंत बालकवी वगळून कोणीच कवी नाव घेण्याजोगा झाला नाही असा निष्कर्ष काढतात तेव्हा 'मर्ढेकरी निष्कर्षा'चीच अधिक आठवण येते. मर्ढेकर हे एक खंदे कलावंत होते व त्यापेक्षाही आधुनिक मराठी काव्य पचविणारे एक तपस्वी समीक्षक होते. प्रा. मनोहर यांना मर्ढेकरी समीक्षेची तोंडओळख सुद्धा नाही. असेलच तर ती काही जुजबी विधानांची. कारण केशवसुत ते मर्ढेकर कवितांप्रवाह ज्या ज्या भिन्न भिन्न वळणावळणातून आला त्याचे मार्गक्रमण, अंतरंग व बहिरंग तपासल्याशिवाय लेखकाने 'बिनपिळाची गीतगंगा' दैन्य दारिद्र्याचा 'काळ' असल्या क्षुद्र भाषेने सांगितले आहे. वस्तुतः केशवसुत आणि मर्ढेकर यांना जोडणारा जबर दुवा असलेल्या प्रयोगशील माधव ज्युलियन कवीत प्रभावी व सच्च्या कलावंताचे गुणधर्म आहेत–माधवरावांचे 'उपहासगर्भ 'सुधारक' तर मर्ढेकरांच्या अस्सल कवितांची नांदी आहे. ज्या संज्ञाप्रवाहाचे कौतुक आम्ही मर्ढेकरांच्या कवितेतून करतो. त्याचा प्रत्यय रविकिरण मंडळातील एक ज्येष्ठ कवी श्री. रानडे यांच्या 'काळाच्या दाढेतून' या दीर्घकाव्यातून येत नाही काय? माधव ज्यूलियन आणि यशवंत यांची कविता 'रूपवन्त फॅशन' म्हणून स्वीकारली तर काय बिघडते? याच 'युगवाणी'च्या अंकातील प्रा. क्षीरसागर यांचा लेख कोणती साक्ष देतो? अभिजात कलाकृतीकडे पाहण्यास देखील अभिजात अशी 'दृष्टी' लागते. निर्मितीमागे जसे तपस्वी व्यक्तिमत्व असते तसे आस्वादामागे देखील सखोल आणि अपूर्वग्रहदूषित वृत्तीचा भाग असावा लागतो. रविकिरण मंडळ हा एक सामाजिक व सांस्कृतिक प्रयोग होता याची यथासांग जाणीव ठेवूनही येथील प्रेम, राष्ट्रवाद, सुधारणा, ग्रामीण औदार्य 'सायक्लोस्टाईल' वाटल्यास हा दोष त्या मंडळाकडे पाहणाऱ्या दृष्टीचा आहे असेच म्हणणे भाग आहे. येथे 'दाखवेगिरी' व 'फसवेगिरी' मंडळाची नाही तर लेखकाची आहे.

आपल्या इमारतीचा पायाच मुळी ठिसूळ असल्यावर तिची उभारणी समतोल होणार कशी? प्रा. मनोहर रविकिरण मंडळाच्या 'गौरविद्ये'चा उल्लेख ज्या ज्या विधानांनी करतात त्याकडे पाहिल्यास असाच अनुभव येईल. वस्तुतः रविकिरण मंडळाजवळ काही तरी करून दाखविण्याची, नवीन सांगण्याची अदम्य

इच्छा होती. आपल्या अनुभूती या अभिनव आहेत याची त्यांना जाणीव आहे. हे मंडळ निरंकुश कवीचे आहे. स्वतंत्र, स्वयंभू व्यक्तिस्वातंत्र्याचा त्यांना नको तेवढा ध्यास आहे सप्त ऋषींच्या दैदिप्यमान संघटनेतन त्यांनी केलेली वाटचाल त्या कालाची पार्श्वभूमी लक्षात घेता ठामपणे कौतुकास्पद वाटते. रविकिरण मंडळाच्या मर्यादा आजच्या वाङ्‌मयीन कालाच्या पार्श्वभूमीवर स्पष्ट होतात हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. प्रा. मनोहर या महत्त्वाच्या बाबींचे विवेचन करीत नाहीतच त्यांना मंडळ चहापाणी, सहल व गप्पागोष्टी कशा व कुठे करीत असे एवढेच दिसते. या संदर्भात त्यांनी जी विधाने दिली आहेत ती त्यांना पु. ल. देशपांडे यांच्या विनोदी लेखात वसतील अशी वाटतात. परंतु मला असे वाटते की पु. ल. देशपांडे सारखे सुजाण रसिक लेखक असल्या थिल्लर विनोदाच्या पातळीने संपन्न असेल काय ? अर्थात पु लं.चे विनोदाचे आकलन व आस्वादन देखील 'दृष्टी'नेच करावे लागते. पु. ल. देशपांडे यांचे विनोदी लेख वाचले नसल्यास प्रश्नच मिटतात.

कवितेवरील प्रेम हे सजविलेल्या रंगीत देखाव्याने दिसत नसते याची कल्पना प्रा. मनोहर यांना असावी. परंतु मानवतावादाची आरास जेव्हा त्यांना कवी अनिल यांच्या कवितेतून दिसू लागते तेव्हा त्यांच्या वृत्तीची कीव करावी वाटते. अनिलांजवळ सुईच्या अग्रावर मावेल एवढेच काव्य आहे. असा पुरावा देखील प्रा. मनोहर पुढे देतात. परंतु सुईच्या अग्रावरील राज्यासाठी सुद्धा पानपतवरील संघर्ष करण्याची कुवत अनिलांच्या प्रतिभेत आहे. वस्तुत: चिरकाल यौवनाचे, प्रतिभावंताचे वरदान लाभलेल्या या कवीचा 'फुलवात' ते 'सांगाती' पर्यंतचा प्रवास सामाजिकतेकडून सौदर्यवादाकडे व सौंदर्यवादाकडून सामाजिकतेकडे अखंडपणे चालत आला आहे. या प्रवासाला 'मानवतेचे' वेड केव्हाच नव्हते. तसा त्यांचा दावाही नव्हता. फक्त आपण 'कवि' असल्याची त्यांची जिद्द होती. 'दशपदी'सारख्या अनिलांच्या कवि एकाच नाण्याच्या दुसऱ्या बाजू आहेत हे काय नव्याने सांगावे ? त्यातही पुन: कवीच्या 'आतडयाची प्रेरणा' दिसत नसते. ती पुन:पुन्हा जाणून घ्यावी लागते. मराठीच्या प्राध्यापकास एवढी प्राथमिक ओळख असावी ना ? बाकी कवितेऐवजी 'ओव्हल्टीन'वर लिहिणे सोपे आहे हेच खरे ! पद्य आणि कविता यांतील फरक ज्या मूलभूत दुव्यातून स्पष्ट होतो त्यातून रविकिरण मंडळाच्या काव्याचे विवेचन पुढे आले असते तर त्याला एक भरीव अर्थ आला असता. परंतु दर्शन, प्रदर्शन, अद्‌भुत फलश्रुति, कलेवराची आंधळी भक्ती इ. बिनबुडाच्या अर्थहीन शब्दांचा पसारा मांडून लेखकाने आपल्या कुवतीचे एक आगळे प्रदर्शन केले आहे.

प्रा. मनोहर यांना कादंबरी वाङ्‌मयात रविकिरण मंडळ दिसते तसेच त्यावेळच्या टीका वाङ्‌मयातही रविकिरण मंडळ दिसते. वाङ्‌मय न होऊ शकलेल्या शब्दांचे ढीग रचणे म्हणजे रविकिरण मंडळ अशी व्याख्या हा लेखक आपणापुढे देतो. रविकरण मंडळ ही एक वाङ्‌मयातील टूम किंवा फॅशन असेल तर त्याची काल व आज दखल का घ्यावी ? मराठी कवितेचा इतिहास रविकिरण मंडळावाचून अपुरा होणारा आहे. शिवाय टीकाकारांनी जर केशवसुतांवर विष ओकले तर ते सारे पचविण्याचे सामर्थ्य या कवितेत नाही काय ? आणि माधवराव पटवर्धन यांच्या वाटेला काय थोडा वनवास आला होता ? अभिजात कलावंताची कलाकृती नेहमीच कडक उन्हात फुलणाऱ्या गुलमोहराप्रमाणे तेज:पुंज असते अनेक टीकाकारांशी बेफाम सामने देत ती पुन:पुन्हा आव्हाने स्वीकारीत असते. प्रा. मनोहर रविकिरण मंडळाच्या काव्याचा जमाखर्च करण्यास तयार झाले व शेवटी त्यांनी जमाखर्च केला तो या मंडळाचा आयुष्याचा, परंपरेचा व काळाचा. या मंडळाने आपल्या चर्चेतून जी जी समीक्षामूल्ये दिली आहेत त्याला बगल देऊन प्रा. मनोहर तत्कालीन टीकाकाराचे अज्ञान व अपराध चव्हाठ्यावर आणू पाहतात. रविकिरण मंडळाचे त्याकाळचे खंदे टीकाकार कै. ना. अ. भिडे यांच्या परखड टीकेला सुद्धा शेवटी 'मी जुन्याचा कैवारी आहे' असा निष्कर्ष द्यावा लागला. यातच मंडळाचे यश दिसते. प्रा. मनोहर कै. भिडे यांना 'अपराधी' म्हणत असल्यास तो मंडळाचा एका अर्थाने पुन: गौरव नव्हे काय ? शिवाय ही मंडळी 'टीकाकार' आहेत पण प्रा. मनोहर 'टीकाखोर' झाले त्याचे काय ? केशवसुत ते मर्ढेकर यांच्यामध्ये बसलेले आणि विदर्भाचे भूषण झालेले कविवर्य बी यांनी त्या काळात लिहून ठेवले आहे की 'प्रतिध्वनीवर रागावण्यात काही अर्थ नाही आजकाल कवी बनणे जितके सोपे, त्यापेक्षाही टीकाकार बनणे फार सोपे आहे.' रविकिरण मंडळाची बेरीज आणि वजाबाकी करताना प्रा. मनोहर यांची टीका कोणत्या मापाने मोजावी ? मग ती अमूल्य आहे. पण कोणत्या अर्थाने ? हा प्रश्न महत्वाचा वाटतो. □ □

‘एक दिवस’

गो. ग. कुलकर्णी

अनुराधा पोतदारांचे ‘युगवाणी’च्या जून–जुलै ७३ च्या अंकात प्रसिद्ध झालेले ‘एक दिवस’ हे लेखन लक्षणीय आहे.

अलिकडे बऱ्याच स्त्रिया ललित लेखन करू लागल्या आहेत खऱ्या, परंतु त्यातील फार थोड्या लेखिका मराठी वाङ्मयाने विशेषत: गेल्या सुमारे पन्नास वर्षांतील वाङ्मयाने निर्माण केलेल्या, प्रतिष्ठा पावलेल्या संकेतापासून मुक्त होऊ शकल्या आहेत. आजची खरी निकड आहे आणि चांगल्या वाङ्मयाची नेहमीचीच असते ती म्हणजे स्त्रीमनाची विमुक्तता. स्त्रीमनाची अस्सल स्पंदने मराठीत तरी क्वचितच व्यक्त होताना दिसतात. तसे पाहिले तर गेल्या पिढीतल्या पुरुष-लेखकांची मने तरी अशी कितीशी मोकळेपणाने प्रगट झाली आहेत ? काहीतरी महान् तत्त्वज्ञान सांगण्याचा जाच, आल्हाद–रंजनासाठी रचनेचा, कल्पकतेचा करावा लागणारा अनुनय, निरनिराळ्या वाङ्मय-प्रकारांच्या बहिर्गत आकृतींच्या गुंतावळी—ह्यासारख्या अडथळ्याच्या शर्यतीतच सारे जण सामील झाले होते. अलिकडचे काही ललित लेखक मात्र असल्या अडथळ्यांच्या शर्यतीतून धावायला तयार नाहीत असे दिसू लागले आहे. कारण उत्तम साहित्य कधी असल्या अटी घालीत नसल्याची एक समजदार जाणीव त्यांना होऊ लागली आहे. आता त्यामुळे त्यांच्या लेखनातून निर्माण होणाऱ्या अश्लीलता, असभ्यता, असंस्कृतपणा इत्यादी-सारख्या प्रश्नांचा आपणाला पुनर्विचार करणे भाग पडू लागले आहे हे खरे. पण तो एक निराळा प्रश्न आहे. ललित लेखकाच्या व्यक्तिमनाची अस्सल स्पंदने व्यक्त-विण्याच्या वाटचालीत सध्याच्या पुरुषलेखकांनी काही पावले तरी धाडसाने टाकली आहेत एवढे खरे.

त्या मानाने सध्याच्या स्त्रीलेखिका मागेच आहेत असे म्हणावे लागते. आणि ते साहजिक आहे. एकूण सामाजिक जीवनात स्त्रीच्या वावरावर पुरुषाच्या मानाने कितीतरी निर्बंध असतात, आहेतही. त्यामुळे घरी–दारी तसेच वाङ्मयातही तिच्या अभिव्यक्तीवर संकोचाचे, कुचंवलेपणाचे सावट पडलेले असते. स्त्रीमनाच्या विभक्त अभिव्यक्तीतल्या अवरोधाची ही कोंडी फोडण्याचे कार्य अलिकडील काही धाडसी स्त्रीलेखिका करू लागल्या आहेत. अनुराधा पोतदारांचे ‘एक दिवस’ हे लेखन त्याचे निदर्शक आहे. विजया राजाध्यक्ष, वसुधा पाटील ह्यासारख्या फार थोड्या लेखिका स्त्रीमनाच्या ‘नांगरल्याविण भुई’चे असे उत्खनन करू पाहात आहेत. सामाजिक आणि वाङ्मयीन संकेतापासून मुक्त होऊन आत्मनिर्भर झालेली स्त्री जेव्हा ललितलेखन करू लागते, तेव्हा त्या लेखनात वृत्तीची किती आर्तता, उत्कटता उतरते आणि त्यातला अनुभव किती ताजा, टवटवीत वाटतो हें अनुभवायचे असेल तर अनुराधा पोतदारांचे ‘एक दिवस’ हे लेखन अवश्य नजरेखालून घालावे.

□ □

रवंथ · द० ता० भोसले

सकाळचा आठचा सुमार: भाद्रपदातील कोवळं आणि लोभस ऊन तिनं वसल्या वसल्या लपेटून घेतलं होतं. शेजारच्या बाभळीच्या फांद्या वाऱ्याच्या मंद झुळकीबरोवर हालत होत्या. त्यांच्या सावल्यांची नक्षी अंगावर उठायची. तिनं रवंथ करायला सुरवात केली. शेंपटीनं पाठीवरच्या गोमाशा झटकल्या. डोळे खोल, मंद अन् मिटल्या सारखे झाले. जवडचास लय आली. पोटातला ओला घास तोंडात येताच तोंड फुगायचे, जवडचाच्या कोपऱ्यांना फेसांची किनार जमायची. तरीही ती अर्धमिटल्या डोळयांनी सगळंच मागलं–पुढलं आठवू लागली... तीन सालं झाली. इथं आपल्याला येऊन...दोन दिस सारकं आपुन चालत हुतो. त्यात दिवस गेलेले. पोट वाढलेलं अन्नपाणी कुठलं? पायाला तळवं आलं. जड झालं! एकदाचं हितं आलो. पन आलु त्ये लई छ्यान झालं. नायतर जगतूया कशाला?...आपल्याजवळची ती म्हातारी न्हाय का पटकन मेली? त्या दिशी म्या गवताला सुदिक जवडा लावला न्हाय. सगळा दुसकाळ, गवताची वाळकी काडी नाय दिसली! शेणात भिजलेलं बुडकं खाऊन दीस काडलं! आत्ता त्यापरीस लई वरं हाय. वैरण मिळतीया...अगदी पॉट भरून. गवात खूप. दिसभर चरल्यावर रातंला काय नाय मिळालं तरी चालतं! उगीच पोटावर तर काय वांधावं? दुसकाळ पडला तो वराच झाला म्हणायचा. पण एक नकु व्हतं व्हायला...तेवडं प्वॉर जगाला पायजे व्हतं! आपुन आल्यावर दोनच महिन्यात जलमलं. चांगलं व्हतं दिसायला, पण नाय जगलं! ढवळलं पोटात, हुंवरून जीव वरखाली झाला. एकदोनदा मालकालाच धडकले. राग आला मला. पण सवयीनं मीच जाणलं. थानं तटाटून आलेली. लई वंगाळ वाटलं. म्हणून मी मनापास्नं मालकाला धार सुदीक दिली न्हाय. आपल्या पोराला न्हाय तर मग काय उपेग त्या कासेचा? वघता वघ्ता कास ज़ळून गेली.

...आपलं पॉर कसं दिसत हुतं?...आता नीटसं आठवंत नाय पण 'त्ये'च्या सारखंच दिसलं मला. तसंच लांव–रुंद. मोठं मोठं कान. रंगानंसुदिक वरं हुतं... 'त्ये'ला वरं वाटलं असतं! पण तो तरी आता तिथं असेल का? मालकानं इकला असेल तर गाठ न्हाय पडायची. मला पहिल्यांदा तो न्हाय आवडला. नुसती मस्ती करायचा. पण मग आवडू लागला. अेक–दोनदा दुसरीच माझ्या अंगावर धाऊन येताच ह्यानं सरळ टक्कर घेतली. डरकाळी लई झकास फोडायचा. मला तीच तेवडी आवडायची—येताना त्येला भेटायला हवं होतं. त्येचंच पोर पोटात हुतं म्हणून तरी! न्हाय जमलं. पण तो आपली सय काडत आसंल का? त्येला काय रोज–कुणी ना कुणी भेटायला येत असंल! पण चुकलंच: निदान कुणाकडून तरी सांगावा तरी धाडायला पायजे हुता.. .जाऊ दे. न्हाय तरो पैल्या पोराच्या बापानं तंरी कुटं वळकलं हुतं? पोर सुदीक थोराड झालं की वळकत न्हाय. इसरून जातं...वाकी मालकच लई 'वंगाळ' असत्यात. घासातला घास घालून मोटं केलं की हा लागतो त्येला दूर दूर न्यायला. सपनात सुदीक दिसू नै, काय म्हनावं या कर्माला! एकदा पैल्या पोराचा वाप असाच भेटला रस्त्यात. मी थांवले सुद्धा: पण हा गेला शिंग हालवत... चार–सहा महिन्याचं पॉर पोटात असून 'त्याला' मी वळकळे न्हाय. वाकी वापाची जातच कमी मायेची: आपल्या कोणत्याच पोराला वाप न्हाय. माया न्हाय... आतापतुर आपली किती येतं झाली असतील वरं? एक... दोन... तीन... जाऊ दी: न्हाय आठवत. पण आता थकल्यासारखं वाटतं खरं! डोळं वी रातंला वलं वलं हुत्याती कदाचित आपलं यातं आता व्हायचं न्हाय. पन मला मनापासनं आजून एखादं झालं तर वरं वाटतं! पैल्यापास्नंच झालं तर लई वरं हुईल. तेवडीच भेट हुईल!

मायेनं जवळ येईल. गळ्याला चाटेल ..मी भी त्येला लई आवडती : मला वगितलं की शेपूट वर करून नुसता धावत यायचा. आता या एका पोरासाठी तरी भेटावा ...भेटला की मला इच्यारील, आपलं पोरगं कुठाय ? कसं हुतं ते ? वागाला कसं हुतं ? ...पण 'तो' आपल्याला खरंच वळकील का ? आपला असा चोळा-मोळा झालेला. डोळा गळतुया... त्येला कशाला न्हातीया वळंख ? निदान खरं खोटं कळण्यासाठी तरी भेटावा !

...कदी कदी रातीलाच उठून बसते. सगळी जणं कान पाडून गप झोपलेली असतात. मनात आपल्या पोरांचा हिशेब येतो. आपली सगळी पोरं आता कुठं गेली असल्याल. काय करीत असत्याल. याक तर डोळ्यादेखतच मेलं : पण वाकीची तरी ! सगळीजण एका जागी असतू तर. .गेली तीच बरं झालं. पहिल्या मालकानं खरंच उपासी ठेवलं असतं... त्येचा आमा-वर कदी जीवच नव्हता. सदा न कदा मुतात वली झालेली विन पाल्याची चिंपाडं समोर फेकायचा. एवढं मळ्यात गवत–हिरवा चारा; पण कुणालाच मिळायचा न्हाय. कष्टाची कामं करणारें सोडून. एकदा मी हिसका मारून सरळ मळ्यात घुसले. दिसेल ते हावरटासमान गवागवा खात सुटले. पोट फुटायला आलं. लई दिसा-पास्नं ते मनात हुतं. नजरेला दिसायचं पण तोंडापतुर कदी यायचं न्हाय. किती म्हणून जीव तरी मारायचा. पोटभरून खाल्लं. पण दुसऱ्या दिशी पोट भरून मारवी खावा लागला. लई वदडलं. पाठ, पाय सुजून आलं. वांदून चावकानं फोडलं. शिंग हालवलं तरी वरून मार. मनात म्हटलं, मार पोट भरून तरी खाल्लं. ननाची हौस तरी फिटली माज्या. वरं त्या येळेला पोटात काय नव्हतं–न्हायतर पॉर असतं तर आतल्या आत मरून जायाचं.. त्या परीस आता वरं सगळं मिळतंया .निदान उपाशी नाही राहात. आता दिस चांगलं पण वय उरलं नाय. कदाचित मालक विनकामाचं म्हणून इकूनवी टाकायचा. देवा आसं नकू करू. आता

पान ७२८ वरून

पाऊल पडले घरात तेव्हा साऱ्यावर लाथ मारून बाहेर पडली मला घेऊन...घ्या वंगल्याचा दगडन्‌दगड भिंत–झाडे सारे तिने केले होते. हौशीने... पण पाय लावला नाही कधी येथे...

शारदा : (मायाकडे पाहून हातवारे करत) चेटकीण तू भूल घातलीस–बदलवलेस त्यांना–माझ्यापासून हिसकावून घेतलेस...

माया : तुम्हीहो तेच केलेत राघाला.

शारदा : मी अशी तशी मागे राहणार नाही. कोर्टात जाईन... 'वुईल' बदलवून घेईन ..:तू बदलायला लावलेस भूल घालून...मी कोर्टात जाईन.

(शारदाचा आवाज उंच चढत जात घुमतोय. आतल्या खोलीतही घुमतोय...नर्स उठून दारावाहेर येऊन म्हणते ..शू ! प्लीज आवाज करू नका. आत पलंगावर हृषी उठून वसलेत...कानावर आदळणाऱ्या शब्दांनी तोंड भेसूर... छाती आवळून घेतलीय...)

शारदा : वुईल घेईन बदलून. ह्या घरात तुझे नखही दिसणार नाही. तू–विनलग्नाची.

माया : माझे पपा, भाऊ सॉलिसिटर आहेत. तुझ्या-सारख्या लाखो केसिस लढवल्यात. समजले ? तुझे दागिनेही काढायला लावीन. (जिन्यावरून घडघडत महेश वाहेरून येतोय.)

महेश : (ओरडत) शारदा, माया.

बिपिन : (डोके धरत) आई आई

(हृषी नर्सला ढकलून दारात हेलपाटत येऊन उभे राह्यलेत... दोघींकडे डोळे विस्फारून पहात. शेवटची जीवघेणी कळ सरसरत येतेय...दोघींकडे पाहात भेसूर आवाजात ओरडतात..... माय गॉड...)

महेश : दादा...

शारदा अरे देवा...

(मायाचा भिजलेला चेहरा...हृषिकेश कोसळून खाली पडतात.)

□ □

शेवटचं पॉर आन् 'तो' एकाच जागी राहू दे. तेवडाच म्हातारपणी आधार. शेजारणीला सांगून तरी बगावं. मालकाची तिची जरा लई वळकवी हाय. म्हणावं, 'वग सांगून मालकास्नी. लई उपकार व्हतील.' तिच्या पोराला परवा मी ढुशी मारली म्हणून ती राग़ात तर नसंल! पण मी काय ती खऱ्यानं नव्हती मारली, गमतीनं. अंगावरच नाचायला लागलं म्हणून. आन् आसली कवळी पोरं बघितली की मला उगीचच मागचं सगळं भडभडून येतं म्हणून मी नुसती शिंगं हालविली.

आजकाल मलां गोचडांनी भारी पिसाळलंया. जिभंनं घासून-घासून जिभ लाल झाली. पन मेला येक कासतनं निगाला न्हाय. रातभर झॉप लागू देत न्हाय. मालकाचं पोरगं नुसतंच पाटीवर हात टाकतं. आता त्येला मी ह्ये कसं दाखवू? जरा लाजवी वाटतीया. पण ती त्येला कळेल तरी का? रेटलं पायजे. कुनी आलाच मला-'माज्यासाठी', सुखासाठी तर त्येलाच आडपड्यानं सांगून बगीन. पण तसा दिस तरी कवा येतुया. एकदा मागं आसंच कवळं गवात असताना आपणाला 'इच्छा' झाली व्हती. पावसाळा संपल्या-नंतर. .! आतावी नेमका गवताचाच काळ हाय. कदी इच्छा हुतीया वगू. बसून गवात खाल्यावर लवकर हुती म्हणत्यात : आता मालक आला की उठायचंच नाही. . .बसून खायाचं. . . अन् खरंच त्यानं हट्टानं उठवलं तरी बसूनच गवत खायाला सुरवात केली. मालकाच्या मनात आलं 'म्हाताऱ्या गायीला उठायचीवी ताकद राहिली नाही. पार खंगून गेलीया.

□ □

अभिरुचींचे स्पष्टीकरण : १

साहित्य / संस्कृती / समीक्षा / संशोधन

आपण वर्गणीदार झालात तर आमच्या प्रयत्नांची
दिशा अधिक नेमकी आणि बळकट होऊ शकेल.
वार्षिक वर्गणी फक्त १५ रु.

पुस्तक प्रकाशनांच्या जाहिराती 'युगवाणी'ला पाठविणे हेही ग्रंथप्रसार आणि ग्रंथ समृद्धीचे गमक होऊ शकेल. कारण मराठी जिथे जिथे आस्थेने वाचली जाते तिथे तिथे आम्ही कसोशीने पोचण्याचा प्रयत्न करतो.

चेण्डू : दौलतजादा । अनु: मोहन वासुदेव वेल्हाळ

अखेर मला शिक्षा सुनावण्यात आली. कामाच्या रगाड्याखाली वाकलेल्या माणसाला जबरदस्तीनं सांगण्यात यावं की, जा !...सुट्टी, संपूर्ण सुट्टी !...बस्स ! अशीच थरारून टाकणारी भावना माझ्या मनात उभी राहिली.

खुनाची सनसनाटीपूर्ण बातमीपत्रं मी न चुकता वाचीत असे. ती मला अत्यंत आवडत. असा प्रकार किंवा अशी घटना जोवर प्रत्यक्ष घडत नाही, तोवर मी कोण, का, काय, कशासाठी, ब्रह्मांडाची उत्पत्ती कुठून झाली, ईश्वर, राक्षस, पऱ्या, माणसाचं मन, त्याच्या विविध लीला, या सर्व लीलांची निर्हेतुकता किंवा त्यांचे तात्पर्य, मृत्यू, त्याच्या परिवेषातलं जीवन...या सर्वांच्या संदर्भातल्या सजग जाणिवेचा परिणाम याविषयी मी अतिशय सूक्ष्मपणे विचार करीत असे. फिलॉसॉफी हा तसा फारच मोठा शब्द झाला; पण एक मात्र खरे, मी खूप विचार करीत राही आणि ते मला अतिशय आवडतही असे.

या लोकांनी अखेर माझा गुन्हा शाबीत केला होता. अर्थात सारे पुरावे गोळा करण्यासाठी मीच स्वतःहून साहाय्य केले होते.

गुन्हा अशा प्रकारचा होता : एकसुरी, सतत, तासन् तास अत्यंत वेगानं, भावनेच्या आंधळ्या आवेशानं बडबड केल्यामुळं एका अतिशय बुद्धिमान परंतु मुक्या स्त्रीचा मी बळी घेतला होता. ('तू बहिरी नाहीस, ही वस्तुस्थिती एक दिवस तुझ्या संदर्भात अतिशय घातक ठरेल !' अशी पूर्वसूचना मी तिला देऊन ठेवली होती. एवढी सावधगिरी मी तिच्या बाबतीत आधीच घेतली होती.) हा गुन्हा शाबीतसुद्धा झाला. अगदी रीतसर. ती मेल्याचं सांगून ती माझ्यामुळंच मरण पावली, हे शाबीत झालं आणि तेही माझ्याच शाब्दिक आघातांनी—केवळ याच एका कारणानं ! प्रथम मला आघाताएवढंच आश्चर्यही वाटलं. मग हे अगदी शक्य आहे, असं मला वाटू लागलं. आणि मग या मुक्या बाईची शब्दांच्या साहाय्यानं मी कशी क्रूर छळणूक करीत होतो, याचं मीच स्वतः वर्णन (बव्हंशी काल्पनिकच !) केलं. खरं तर अशा प्रकारच्या कबुलीजबाबाचा विचारही मी मनात आणला नव्हता; परंतु तो मी अतिशय परिणामकारकतेनं दिला असंच सारेजण म्हणाले आणि त्याचा त्यांनी स्वीकारही केला. तेव्हा मलाही वाटलं की, होय ! असंच घडलं असलं पाहिजे.

परिणामी मला शिक्षा सुनावण्यात आली. ही शिक्षा निर्दोष बंदिवासाची नव्हती. तर साक्षेपानं सजवलेल्या एका अद्ययावत असायलयची. एका दहा मजली इमारतीच्या विशाल तळघराच्याही खालच्या तळघरात जाड सळयांनी वेढलेल्या एका खोलीत मला ठेवण्यात आलं. मी संपूर्णतया विकृत असून माझ्यात नॉरमॅलिटीचा पूर्णतः अभाव असल्याचा निर्वाळा ज्यूरीनं एकमतानं दिला होता. मृत्यू पावलेल्या त्या मुक्या (परंतु बहिऱ्या नसलेल्या) बाईच्या छायाचित्रांनी, पोर्ट्रेट्सनी, मुखचित्रांनी, रेखाचित्रांनी खोलीच्या पांढऱ्या शुभ्र भिंती झाकल्या गेल्या होत्या. खोलीच्या काळ्या छतावर दृष्टी चक्रावत राहील, अशा पद्धतीनं लिहून ठेवलं होतं :

'तुझ्या पापामुळं या स्त्रीचा मृत्यू घडला आहे !'

या खोलीत पाऊल घालताच माझ्या नसानसांमधून एक आवेश सळसळत गेला. गेली कित्येक वर्षं अगणित शब्दांनी माझी आणि माझा स्पर्श होताच सर्वांची विलक्षण छळणूक करणाऱ्या जाळ्यातून मी आता मोकळा झालो

होतो. आणि म्हणूनच मी मनोमन निर्णय घेतला की, या आनंदाच्या थरारकतेचं प्रमाणं वाढतं ठेवण्यासाठी मला मौन पाळलं पाहिजे. शब्द नाही, शब्दाचा आघात नाही.

इथली व्यवस्था मात्र चोख होती. वेळच्या वेळी उपाहार आणि कॉफी. ठरलेल्या वेळी जेवण–तेही स्वास्थ्याला पोषक होईल असं.

पहिले दहा–एक दिवस अतिशय सुखात गेले. सुखाची परमावधी म्हणा हवं तर. हे दहाही दिवस मी आणि मी स्वतः किंवा मी आणि मी अथवा मी आणि ती मुकी बाई–तिची चित्रं, तिचे फोटो, पोर्ट्रेटस्–आणि छतावर माझं पाप.

दहा एक दिवसांनंतर जेवणाच्या ताटामधून एक चेण्डू आला. चेण्डू ! गोल भरीव काळा. शिसवी. पाचेक इंच व्यासाचा. वर्तुळाकार. गोल चेण्डू. मोहक.

जेवण घेत असताना मी काही क्षण या चेण्डूकडे निःस्पृहतेनं पाहात राहिलो होतो. त्याच्याकडं पाहात राहिल्यानं मला अखेर जांभई आली. काहीच कळू शकलं नाही. म्हणून समजावून घेण्याचा प्रयत्न सोडून दिला आणि मग जेवणावरच लक्ष केंद्रित केलं. जेवण झाल्यावर त्या गोलाकर भरीव वस्तूला उपेक्षणीय समजून जसाच्या तसा राहू दिला. परंतु हे ताट, तळघरातील या खोलीमधून उचलून नेले जाईपर्यंतच्या काळात या चेण्डूविषयी मला काही तरी वाटू लागले–आकर्षण किंवा ममत्व किंवा जिला आपण आत्मीयता म्हणू शकू, असं काही असावं.

माझ्या शवपेटीत पडल्या पडल्या मी अतिशय आरामात निवान्तपणं मृत्यूचं रवंथ करीत होतो. तेवढ्यात उजवा पाय किंचित उंचावून अंगठ्याच्या साहाय्यानं मी त्या चेण्डूला धक्का दिला. तसा तो ताटातून बाहेर पडला आणि गडगडत खोलीभर फिरला.

हा चेण्डू ज्या पद्धतीनं जमिनीवरून वाहात गेला; गडगडला किंवा पुढं पुढं सरकत गेला, ती काहीशी चमत्कारिक होती. या क्षणापर्यन्त माझ्यामुळं मरण पावलेल्या त्या मुक्या बाईवरच माझं लक्ष केंद्रित झालं होतं. ते आता विनायास विभागलं केलं. चेण्डू आणि मुकी बाई—जो आहे आणि जी होती; परन्तु आता नाही—असे मनाचे दोन विभाग पडले आणि आता तर मन हळूहळू या चेण्डूभोवती जसजसं गुण्डाळत जाऊ लागलं, तसतसं माझं नावसुद्धा मला निश्चितपणं आठवेनासं झालं. नावही वाहून जाऊ लागलं. गोलाकार गतीत. काहीतरी वाहात चाललं होतं...कुठं तरी...

'नावानं हाक मारून कुणी बोलावू लागलं की, किती बरं वाटतं !' अशा प्रकारचा विचार विलक्षण वेगानं मनात उभा राहिला आणि त्याच वेगानं नाहीसाही झाला. आता तर या चेण्डूच्या आगमनानंतर माझ्या नावाच्या विस्मरणाविषयी आणि कधी तरी आठवणाऱ्या माझ्या नावाविषयीची उदासीनता माझ्या सरावाची झाली.

या खोलीत आल्यापासून दिवस, रात्र, सूर्य, चन्द्र, सकाळ, दुपार, संध्याकाळ किंवा बुधवार, रविवार, सोमवार अथवा एक, पाच, वीस अशी कोणतीही तारीख किंवा इतर कुठल्याही प्रकारानं काळाचे भाग पाडण्याविषयी मी विचार करीत राही. आरंभी–आरंभी पहिलं ताट म्हणजे सकाळ, दुसरं ताट–संध्याकाळ, पहिलं...दुसरं, सकाळ–संध्याकाळ अशा प्रकारानं काही दिवस प्रयत्नपूर्वक स्मरण ठेवू लागलो. पुढं त्याचा कंटाळा आला. कंटाळल्यामुळं काळाचे तुकडे पाडण्याच्या या कार्यामधून अनायासेच मुक्ती मिळाली. पुढं पुढं तर ताट आलं की, सकाळचे अकरा की, सायंकाळचे सात...एवढंच नव्हे, तर शेवटी शेवटी सात आणि अकरा या आकड्यांमधूनही मी मुक्त झालो. सात असोत की, अकरा; अखेर त्यामुळं काय ? असं वाटू लागलं. परिणामी किती काळ निघून गेला, हे कळलंच नाही.

पुढं पुढं तर मन जसजसं चेण्डूभोवती गुण्डाळलं जाऊ लागलं, तसतशी त्या मुक्या स्त्रीची चित्रं, रेखाचित्रं...सारं काही एक एक करून मी मनोमन फाडून सुद्धा टाकलं. तिचं अस्तित्वच मनातून नाहीसं झालं. हे सारं नाहीसं करावंसं वाटत होतं, तोवर मी भूतकाळ माझा भूतकाळ आठवीत होतो. माझा भूतकाळ आता एका छोट्याशा फूटपट्टीनं मापला जाऊ शकेल, एवढाच शिल्लक राहिला होता आणि तोही आता झपाट्यानं क्षीण क्षीण होत चालला होता. आता या भूतकाळाचं–व्यतीत झालेल्या समग्र काळाचं एक पडछायारूप फक्त उरलं होतं. या पडछायेलाही माझ्यासोबत घेऊन मी शवपेटीत रवंथ करीत राही, विचार करीत राही.

एके दिवशी, अटगदी अचानक—मी कदाचित झोपेच्या अमलाखाली असेन..मला त्या खोलीच्या बाहेर आणण्यात आलं. माझ्या डोळ्यातील बाहुल्या पांढऱ्या पडल्या होत्या. समोर उभ्या असलेल्या एका व्यक्तीकडे पाहाताना मी कॅमेऱ्यामधून एखादी निगेटिव्ह आकृती पाहातो आहे, असं मला वाटलं.

माझ्यासमोर उभ्या असलेल्या त्या व्यक्तीला मी म्हणालो,

'जरा सांभाळूनच राहा !'

'का बरं ? काय झालं ?' त्या आकृतीनं किंचित अस्वस्थ स्वरातच विचारलं.

'अरे, होणार काय...पाहाता पाहाता तुम्हाला मागच्या मागं पळ काढावा लागेल..आणि एक सांगा, ही...एवढी क्षीण कशानं झाली ?'

'काय क्षीण झाली ?'

'भल्या माणसा, तुझी आकृती !' मी जरा चिडूनच म्हटलं. त्यानं ते जरा ऐकलं न ऐकल्यासारखं केलं आणि मला विचारलं,

'कसं काय वाटतं आता ?'

'इथं काही वाटणं—न वाटण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.'

'खरं म्हणता काय ?'

'ही आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट आहे, असं मला मुळीच वाटत नाही.'

त्याच्या स्वरातली अस्वस्थता आता वाढत चालली होती. स्वतःचाच आवाज मी कित्येक दिवसांनंतर पुन्हा ऐकत होतो. तो आता किंचित क्षीण झाला होता. ही आकृती केवढे चमत्कारिक प्रश्न विचारीत आहे, या विचारानं माझी चीड वाढत चालली होती.

'तुम्हाला एकूण कसलाच त्रास होत नाही आणि तुम्ही सुखात आहात, हे पाहून मला अतिशय आनंद वाटतो आहे. परंतु खरं सांगू ? दुसरा काहीच उपाय उरला नाही. गुन्हा करणाऱ्याला शिक्षा ही भोगावीच लागते. तरीसुद्धा तुम्हाला काही त्रास, काही गैरसोय, तुमची काही तक्रार...'

मी आता खरोखरीच चिडलो होतो. म्हणालो,

'...पण म्हणालं कोण तुम्हाला की, माझी अशी अशी गैरसोय होते, असा असा त्रास होतो मला म्हणून ?...गुन्हा मी केला आहे...मी आरामात आहे, सुखात आहे, आनंदात आहे...'

'तुमच्यासारख्या फिलॉसॉफरला...नाइलाजानं ...बरं ते राहू द्या...खोलीत कसं काय वाटतं ? आम्ही जाणून घ्यावेत असे काही अनुभव...

मला एकाएकी चेन्डूचं स्मरण झालं, विलक्षण तीव्रतेनं स्मरण झालं. तो यावेळी माझ्या खोलीत; कुठल्या कोपऱ्यात आणि कसा पडला असावा, आपल्या शिसवी चेहऱ्यानं किती झुरत असावा....वगैरे वगैरे.

'अनुभव व्यक्त करायला मला आवडत नाहीत...आता तर नाहीच नाही...मला तावडतोब माझ्या खोलीत पोहोचविण्याची व्यवस्था करा. .नाही-तर मला स्वतःलाच जबरदस्तीनं तिकडं धावत जावं लागेल !...

मी पाहिलं (आणि बहुधा समोर उभ्या राहिलेल्या व्यक्तीनंही पाहिलं असावं) माझे पाय माझ्या खोलीत जाण्यासाठी अतिशय उत्सुक, आतुर झाले होते.

'तुम्हाला वाचायला हवं का काही ? पुस्तकं. वृत्तपत्रं किंवा इतर काही......तुम्हाला हवं ते मिळू शकेल.'

'खूनकथा !' असं सांगावंसं वाटलं; परंतु क्षण-भरातच सगळा उत्साहच ओसरून गेला.

'वाचण्यासाठी ?...नको !'

'तर मग खोलीत परत जायचंय का ?'

माझ्या चेहऱ्यावर पसरलेली प्रसन्नतेची छटा पाहून तोही किंचित सुखावल्यासारखा झाला.

मी त्याचा निरोप घेण्यापूर्वी माझी चाचणी घेण्याच्या उद्देशानं (किंवा कदाचित गमतीखातरसुद्धा असेल) त्यानं म्हटलं.

'आज शनिवार...!

मला एकदम हसायला आलं. खूप हसलो. मग समोरची आकृती तद्दन मूर्ख आहे, अशा दृष्टीनं तिच्याकडे पाहू लागलो.

'आज शनिवार !...त्या बिचाऱ्या मुक्या बाईला मारून टाकण्याचा गुन्हा तुम्ही शनिवारीच...

पुढचे शब्द केवळ प्रतिध्वनीसारखेच ऐकू आले. कारण तोवर मी माझ्या खोलीत पोहोचलो होतो. सग-ळ्यात आधी खोलीत चेंडू आहे की नाही, याची मी

खात्री करून घेतली. तो आपल्या जागीच होता. त्याच्याकडे पाहून मला हसू आलं. तोही हसला–किंचित फिकट. मी हळूच, दोन बोटांच्या साहाय्यानं त्याला गोंजारल्यासारखं केलं. त्या वत्सल स्पर्शानं तो अंमळ चेकाळला आणि गडगडत दुसऱ्या कोपऱ्यात जाऊन स्थिर झाला.

माझ्या खोलीच्या बाहेर काही आवाज ऐकू येत होते–प्रतिध्वनीसारखे...

'इंटरेस्टिंग केस..

आपला हा चेण्डूचा प्रयोग पहिल्या धडाक्यालाच

दुसऱ्या दिवशी जेवणाचं ताट आलं. ते पाहाताच एक किंकाळी माझ्या घशात रुतली आणि हलकेहलके विरून गेली. एक आणखी चेण्डू–दुसरा, अगदी या चेण्डूसारखाच काळा, गोल, भरीव, शिसवी, याच चेण्डूच्या आकाराचा, तितकाच मोहक–ताटामधून आला होता. पहिला माझ्या मांडीवर होता. दुसरा ताटात.

प्रथम माझ्या मनात विचार आला की, दोघांना स्वतंत्रपणं ओळखता यावं, यासाठीं त्यांना वेगवेगळी नावं द्यावीत. मग मी नावं घोळवू लागलो; पण क्षणभरातच नांव ठेवण्याची कल्पना मला अतिशय आर्य, स्थूल आणि अर्थशून्य वाटू लागली. त्या मुक्या स्त्रीच्या पुढ्यात बोलत होतो, त्याहून ही अर्थशून्यता वेगळ्या प्रकारची होती. नाव ठेवण्याचा विचार मी सोडून दिला. त्या क्षणापासून या दुसऱ्या चेण्डूविषयी खुनशीपणाची भावना माझ्या मनात आकारून आली. त्याच वेळी स्फोटक असा एखादा पदार्थ जणू माझ्या शरीरावर पडला आहे, अशी भीती माझ्या रक्तवाहिन्यांमधून भळभळत गेली.

...तर हा चेण्डू तसाच ताटात ठेवून द्यावा. काही वेळानं तो ताटासोबतच परत नेला जाईल आणि माझ्यावरचा त्याच्या अस्तित्वाचा भार कमी होईल, अशा सुटकेच्या भावनेनं मी पहिला चेण्डू हातात खेळवू लागलो. सावध हातांनी हवेत उडवून झेलू लागलो.

ताट उचलून नेण्याचा शेवटचा क्षण येऊन, मी 'हुश्श' करण्यापूर्वीच मी माझ्या पायाच्या आंगठ्यानं 'त्या' चेण्डूला अनिच्छापूर्वक धक्का दिला.

ताट उचलून नेलं गेलं. चेण्डू मात्र राहिला. माझ्या खोलीत. माझ्या दृष्टीसमोर.. अगदी 'या' चेण्डूसारखाच दुसरा एक चेण्डू.

पहिला चेण्डू काहीशा उष्ण भावनेनं माझ्या हातांतच मोठ्या सुरक्षिततेनं सांभाळून ठेवीत होतो. त्यामुळे एक व्हायचं, चेण्डूविषयी खात्री व्हायची की, हा पहिला. 'या'पूर्वीचा. अस्सल. आणि 'हा' दुसरा. पहिल्यानंतरचा. आणि एवढ्यातच आलेला.

काही वर्षं उलटली असतील किंवा काही तासही झाले असतील अथवा काही क्षणसुद्धा असतील. निश्चित काहीच सांगता येत नाही. एक चिंता मात्र मला सतत पोखरून काढीत होती. हा पहिला, अगदी प्रथम ताटामधून आला होता आणि मी सतत हातात खेळवीत असतो तो. आणि हा दुसरा, जो मी माझ्या पासून केवळ खुनशीपणामुळं आणि सुप्त भीतीमुळं लांब ठेवला आहे आणि त्याला मी 'तो' किंवा 'दुसरा' असं संबोधतो आहे, 'तो.. दोन्हीही भयंकरपणं, क्रूरपणं एकसारखे होते. अगदी हुबेहूब.' मनभर झालेल्या खुनशी भावनेमुळं मी दुसरा चेण्डू हातात घेऊन, असेल–नसेल तेवढ्या ताकदीच्या बळावर चिरडून टाकण्याची इच्छा उफाळून यायची. हळूहळू 'या' आणि 'त्या' चेण्डूमधलं भिन्नत्व, द्वैताची शक्यता शोधण्याचा खुळा चाळा माझ्या मनात जागा झाला.

मी स्वत:शीच कबूल करून टाकलं–मी आता नॉर्मल नव्हे; परंतु असलं वेडेपण आता शक्य नाही. या द्वैताची शक्यता शोधून काढण्याच्या प्रवृत्तीचा अवलंब करण्यापूर्वीच मला भीती वाटू लागली होती त्याला कारणं दोन : पैकी एक असं की, उजव्या किंवा डाव्या–दोन्हींपैकी कुठल्याही हातात पहिला चेण्डू असताना मी तो दुसरा उचलून घेतला, तर नंतरच्या काळात माझी पहिल्या चेण्डूच्या संदर्भातली सततची जागरूकता क्षीण क्षीण होत शून्याच्या सीमेपर्यन्त पोहोचण्याच्या संभव होता आणि नेमक्या याच क्षणी द्वैत शोधण्याच्या धुंदीत, कदाचित, दोन्हीमधला हा अल्पसा भेद (पहिला, दुसरा हा!) माझ्या मनातून समूळ नाहीसा होण्याची शक्यता होती. भिन्नत्वाची ही अतिसूक्ष्म तार माझ्या हातून तुटणं अगदी संभवनीय होतं.

म्हणूनच मी माझ्या हातातील चेण्डू हातातच घट्ट धरून ठेवला आणि कधी खाली वाकून, कधी उलटं झोपून, कधी शीर्षासन करून, तर कधी हल्ल्याच्या पवित्र्यात, कधी लांब वळून, तर कधी अगदी जवळून

अशा वेगवेगळ्या दृष्टिकोणांमधून मी आळीपाळीनं, सतत, एकटक दोन्ही चेण्डूंचं निरीक्षण करीत होतो. त्यामुळं डोळे ठसठसू लागले. दृष्टी ओढल्यासारखी होऊ लागली दोहोंऐवजी संख्यातीत चेण्डूंच्या गोलाकार सृष्टीशी तदाकार झालो. तरीसुद्धा दोन्हींमधलं अस्पष्टही द्वैत, भिन्नत्वाचा अंधुकसाही आधार शोधून काढण्यात मी अधिकाधिक अयशस्वीच होत गेलो.

— माझ्या वैयक्तिक बाबतीत अपयशाचा कैफ काही वेगळाच असतो.

सकाळचं (की सायंकाळचं ?) जेवण घेतल्यावर खोलीतल्या भिंतीवर मी थडाथडा मस्तक आपटलं. धुंदीतच. आणि भिंतीवर मस्तक आपटल्यावर, खूप नशा केल्यामुळं कैफ चढावा. अशा आंधळ्या आवेशानं पुन्हा एकदा माझ्या हातातील काळाचाठार अस्तित्वाचं आणि माझ्या पुढ्यात मला आव्हान देत उभ्या ठाकलेल्या जिवन्त (हो ? जिवन्तच !) अशा दुसऱ्या अस्तित्वाचं बारकाईनं निरीक्षण करू लागलो.

मी थकलो; पण हरलो नाही. संतापलो, उसळलो, उभा राहिलो, त्वेषानं हात आपटले, खसाखसा चोळले, बसून राहिलो, झोपी गेलो, ओठ आवळले, ताट आलं, जेवण घेतलं...मला सारंच व्यर्थ, अर्थशून्य वाटू लागलं दुसरी कसली भावना नाही. दुसरा कसलाही विचार नाही. केवळ गोल, घन आकृतीविषयीची धुंदी. तिच्याविषयीचाच कैफ.

...आणि अजून अज्ञात अशा द्वैताच्या शक्यतेच्या साहाय्यानं दोन्हींमधल्या अद्वैताचं रहस्य शोधीपर्यन्त ही खोली, माझं अस्तित्व, माझा श्वास, माझं मौन माझं रक्ताभिसरण, माझी शवपेटी, माझा मृत्यू, माझ्यामुळं त्या मुक्या स्त्रीचा घडलेला खून, एखाद्या नग्नतेशी बळपूर्वक केलेला क्रूर संभोग, हिंस्रपणं एखाद्याचा गळा घोटणं—या साऱ्यांचं पाप, त्याबद्दल वाटणाऱ्या विषादाचा डंख, माझा भूतकाळ (दोन चेण्डूंमध्ये विभागला गेलेला) – छट् सारं काही तृणवत, सारं काही अर्थशून्य वाटत होतं.

दोहोंपैकी कुठल्याही एकाच्या केन्द्रस्थानी पोहोचून मला अजुनी माझ्या संकल्पित शोधाला आरंभ करायचा होता आणि तोच द्वैताच्या शक्यतेचा काही अंश—त्याच्या द्वारे अद्वैताचं रहस्य.

कोण जाणे, किती काळ गेला, मी सातत्यानं याच एका शोधाच्या पाठीमागं लागलो होतो.

एके दिवशी या असायलममधली व्हीनससारखी स्वरूपसुंदर आणि असायलम कमिटीच्या वतीनं संपूर्ण नॉर्मल म्हणून जिला सुवर्णपदक बहाल करण्यात आलं होतं, अशी एक नर्स माझं जेवणाचं ताट घेऊन आली. तिची निगेटिव्हसुद्धा तेवढीच विशुद्ध आणि रम्य होती. तिला पाहाताच एका हातात सांभाळून धरलेला चेण्डू मी हळूच लपवून ठेवला आणि कोपऱ्यात पडलेल्या दुसऱ्या चेण्डूकडं पाठ करून बसलो.

जेवण घेतलं. नर्स लाघवी हास्य करीत बसून राहिली. तिच्या चेहऱ्यावर हास्य आणि करुणा एकमेकांत मिसळून संमिश्र भावना तयार झाली होती.

जेवण जवळजवळ आवरत आलं होतं.

'तुमची काही तक्रार...काही गैरसोय... तकलीफ..' एक प्रतिध्वनी कानांवर आला.

तुमची काही तक्रार, काही गैरसोय, तकलीफ आणि वगैरे हे शब्द क्षणभर निरर्थक होऊन माझ्यात विरून गेले. तिच्या चेहऱ्यावरचं ते सततचं लाघवी हास्य किंवा करुणा दोहोंचाही स्पर्श मला बिलकूल जाणवला नाही. माझं चित्त चेण्डूच्या केंद्रस्थानी पोहोचण्यात मग्न झालं होतं.

'तुम्ही एक...विचारवन्त आहात, तत्त्वज्ञ आहात—असं ऐकलंय मी...

दुसरा प्रतिध्वनी.

माझं मौन आणि चेण्डूचा शोध घेण्यासाठी व्यग्रातुर झालेलं मन.

पांढरी पडछाया बसल्या जागेवरून उठून उभी राहिली. अंमळ लाडात येऊन, मला एक टपली मारून ती एका कोपऱ्यात गेली आणि तिथं तिनं आपल्या अंगावरची सारी पांढरी शुभ्र वस्त्रं उतरून टाकली. माझ्या डोळ्यांवरच्या पांढऱ्या, पातळ थराच्या साहाय्यानं मी सारं काही पाहू शकत होतो. दोन्ही हातांनी काहीसं झाकीत ती माझ्याजवळ आली. अगदी जवळ, किंचित संकोचून, किंचित लाजून, मला लगटून बसली—चेहऱ्यावर तेच करुणेनं ओथंबलेलं हास्य खेळवीत.

'माझ्यावरसुद्धा प्रयोग चालू आहेत.' ती माझ्या कानाशी लागत म्हणाली.

'दर पंधरा दिवसांनी हे लोक तुमच्या शरीरातील चार औंस रक्त माझ्या शरीरात मिसळून देतात आणि रोज ड्यूटीनंतर खेळण्यासाठी गोल चेण्डू देतात. मी संपूर्ण नॉर्मल, तुम्ही--? '

मला हसू आलं. मग मी एकाएकी गंभीर झालो. माझ्या हातात अतिशय सुरक्षितपणं लपविलेला चेण्डू मी अत्यंत सावधपणं बोटांच्या शिरा ला ऽ ल होताहेत असं दिसेपर्यंत जोरानं दाबला. त्याच्यामधला क्रूर आशय माझ्या आता हातात आला होता.

मी तिच्या हालचाली एकाग्र दृष्टीनं पाहू लागलो. थोडचा वेळानं एखाद्या लहान मुलाला उचलून घ्यावं, तेवढचा काळजीनं माझा हात आपल्या हातात घेतला. तसा मी तिच्या हाताला चावा घेतला. ती क्षीण किंकाळी मारून जरा दूर सरून बसली.

परंतु पुन्हा एकदा तेच कारुण्यपूर्ण हास्य चेहऱ्यावर खेळवीत ती माझ्या दिशेनं सरकली. तिच्या एका स्तनावर मी कान टेकवला. घडचाळासारखी परंतु अनियमित गतीनं होणारी धडधड मी ऐकत राहिलो.

मी आता व्यूह रचण्यात गर्क झालो होतो. एका खोल अवकाशाचा शोध घेण्याचा खेळ मी सुरू केला होता. काळा, चिकट स्पर्श ओलांडून मी आता अतिशय वेगानं, अथांग आणि अंधारभरल्या अवकाशात येऊन पोहोचलो होतो.

नर्सचं वय वीस--बावीसहून कमी नसावं. हा अंदाज मी अगोदरच केला होता. माझ्या पाठीमागं पडून राहिलेल्या चेण्डूचा गोलाकार. एक खोल अवकाश. एक भरीव, घन गोलाकार--

मी दातावर दात रोवीत माझा व्यूह खुनशीपणं आवळत आणला.

एका अतिशय योग्य क्षणाची मी वाट पाहात होतो. तो आता आला होता. त्या नर्सचे डोळे आता शिथिल झाले होते. हात मोकळे पसरलेले होते. त्याच क्षणी विजेच्या वेगानं मी हातातला चेण्डू दुसऱ्या चेण्डूच्या जागी ठेवून दुसरा चेण्डू उचलून हातात घेतला आणि अद्भुत कौशल्यानं आणि ताकदीच्या साहाय्यानं तिच्यात सामावून टाकण्यासाठी---

ती किंकाळी फोडून ताडदिशी उभी राहिली आणि जे काही वस्त्र हातात आलं, ते घेऊन आरडत ओरडत झपाटचानं खोलीच्या बाहेर पळाली.

खोली बंद झाली.

माझ्या उत्तेजित वृत्ती थंडी झाल्या, तेव्हा मी सहज दृष्टी टाकली. दोन्ही चेण्डू एकमेकांशेजारी पडले होते.

विचार करण्याचं मी हळूहळू पण नेहमीसाठी सोडून दिलं. मी आता कसलाही विचार करीत नाही, असं मानलेल्या क्षणी त्या मुक्या स्त्रीची (जिचा खून केल्याच्या गुन्ह्याबद्दल मी शिक्षा भोगतो आहे) आठवण येई आणि विरून जाई. आणि मग ज्या शब्दांच्या मारानं तिचा मृत्यू घडला, त्या शब्दांचे प्रतिध्वनी तासन्तास कानावर आदळत राहात.

शब्द आठवताच मला कसलासा 'आरंभ' प्रतीत व्हायचा. त्याच्यापलीकडं मला पोहोचायचं होतं. शब्दांच्या संख्यातीत आकृतीच्या पलीकडं . . . आता मी तिथं पोहोचू शकलो, अशा निश्चित तर्कावर यायच्या विचारात मी होतो, तोच जेवणाचं ताट आलं आणि मी मोठचानं किंकाळीच फोडली.

त्या ताटात 'या' दोन चेण्डूंएवढाच काळा, शिसवी, गोलाकार असा तिसरा चेण्डू होता.

(गुजरातीवरून मराठी अनुवाद)

□ □

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी विदर्भ साहित्य संघ, संपादक व सल्लागार मंडळ सहमत असतीलच असे नाही.

वि. सा. सं. च्या सभासदांना 'युगवाणी'चा अंक पाठविला जातो. ज्या महिन्यापासून सभासदत्व स्वीकारले जाईल त्या महिन्यापासून पुढील उरलेल्या आर्थिक वर्षाच्या काळात निघणारे अंक पाठविले जातील.

केवळ 'युगवाणी'चे वर्गणीदारांकरिता वार्षिक वर्गणी रु. १५ फक्त. एका अंकाची किंमत अडीच रुपये.

दोन कथा ▫ सानिया ▫ अर्थ ▫ ती ▫

: १ :

मी डोळे उघडून बघितलं तर खिडकीशीच टेकून उभी होते. खूप रात्र झालेली. अजून मी रडत वगैरे होते का ? अंधार होता म्हणून मी डोळे पुसून बघितले. बोटांना ओलसर स्पर्श झाला. म्हणजे मी रडतच होते. किती वेळ ? खिडकीशी उभं राहून पाय दुखून येतात. पण सवयी पडलेल्या आहेत ना ? खिडकीचे गज धरून कपाळ टेकवून उभं राह्यचं. पाय दुखून आले तरी उभं राह्यचं. हे झालंय तरी काय ?

भिंतीवर एक सुंदरसं निळं चित्र लावलेलं होतं. खूप अफाट समुद्र नी त्यातून एक छोटीशी होडी चालली आहे. होडीत कोण आहे ?

मी चित्रात वाकवाकून पाहिलं. ही तर मीच होते की काय ! फारच शक्य आहे. ती मी असणं. पण एकूण मजेत जात होते. समुद्र उसळतो आहे, लाटा धावत येताहेत, भणाण वारा सुटला आहे तरी मुळीच न घाबरता जात होते. शिवाय अजून एक चांगली गोष्ट म्हणजे मी गाणीसुद्धा म्हणत होते. सर्वसाधारण समुद्रावर म्हणतात तशी गाणी.

मग पाय खूप दुखायला लागले. बाहेरचा काळोख एकदम लाटालाटांनी पुढं उचंबळून यायला लागला. आता झोपावं हे बरं काय ? कारण पापण्या जड होऊन झोप यायला लागली होती.

म्हणून मी कॉटवर पसरले. तिथूनही बाहेरचा अंधार दिसत होता. त्याचं काय आहे की जुन्या आठवणी कवटाळून तुम्हाला जगता येत नाही. फार काळ तर मुळीच जगता येत नाही. मग अशा वेळी वाटतं की आपण आता जगतो आहोत ते सुद्धा सगळं विसरूनच जाण्यासाठी काय ? तसं असेल तर समरसून जगाच कशाला ? पण तसं करू नये.

खूप रात्र वगैरे झालेली असली आणि झोपच येईनाशी झाली की अशा आठवणी बिठवणी येऊ लागतात. पण अमुक एक नक्की असं नव्हे तर एकदम एखाद्या जुन्या काळातच गेल्यासारखं वाटतं.

नवीशार पुस्तकं उघडून त्यांचा वास घ्यायला मला फार आवडतं. कारण मग जुन्या दिवसांचा वास धावत येतो. आणि काही म्हणा...पण तो वास जुना, केवळ जुना म्हणून घेरून टाकतो. एरवी तसं विशिष्ट काही असत नाही.

तर असं विचार करण्यात खूप वेळ गेला पण झोप कशी ती आली नाहीच. दिवसभरात कुठं काय घडलं ते पेपरमध्ये जसं छापून येतं तसं आपल्या मनातसुद्धा एकदम छापल्यासारखं उफाळून येतं. मला काय बरं आठवयाला हवं आहे ? तसं काही अमुक एक असं नव्हे.

पण काहीतरी अपघात, मारामारी, भांडण, खून असं जे जे म्हणून हल्ली सर्रास चालतं ते ते सुद्धा सहज म्हणून आठवलं तरी चालेल. आता इथं एक आश्चर्यकारक सत्य असं की एखादा सिनेमा पाहावा तसं रक्त वगैरे वाहायला लागतं डोळ्यापुढून. कारण मग आपण इतके काही अलिप्त झालेले असतो की समोर जे काही भयानक घडतंय त्यात आपला वाटा मुळीसुद्धा नसतो.

खूप रात्र व्हायची थांबलीय थोडीच ? आता थांबेल काय काय ? तर काहीच नाही. आपण जुनं काही तरी आठवत बसलो काय नी नवीन काही पाहात बसलो काय. . . रात्र आपली येते. सकाळ होते. तसंच, उन्हाळा येतो, पावसाळा येतो, थंडी येते. आणि रस्ते वाहात असतात, लोक पळत असतात. गंभीर विचार करायला रात्र चांगली. एकदम झोप येते.

मी अजून काय करते आहे ? खिडकी बंद करून झोपायला मला आवडत नाही. मी अंगावर पांघरूण ओढून झोपले. झोपताना केस मोकळे सोडायला मला आवडतात. केसावरूनच आठवलं की सगळे केस तोंडावर विखरून टाकले की तो म्हणतो. तू खूप सुंदर दिसतेस.

हे सुंदर दिसण्याचंसुद्धा गंमतीशीर आहे. कारण जसं संध्याकाळच्या मंद, ओसरत्या उजेडात सगळंच सुंदर दिसतं, तसंच मिठीत आपलं प्रेमाचं माणूस असेल तर ते सुद्धा सुंदरच दिसणार.

मग मी डोळे मिटून घेतले. नी बजावलं की वाई ग, जगणं हेच खरं. काय असेल ते धडपडून जिद्दीनं जगायला हवं. हरायचं काय म्हणून ?

मी डोळे पुसून पाहिले. पण आता ते रडत नव्हते. मग मला बरं वाटलं. डेल कार्नेजीचं पुस्तक वाचल्यावर कसं उत्साही, छानदार वाटतं की नाही ? अर्थात तो बालिशपणा सुद्धा असेलच. कारण छापील शब्द घेऊन असं स्वतःला काही काही म्हणत राहायचं हे मनोरंजकच आहे. तर ते तसं.

मग मी काय केलं ? खूप गर्द समुद्रात एकटी पोहत राहिले. मी खूप लहानपणी पोहायला शिकले आहे. ते कामी येईल काय ? मी अगदी सहज पोहत होते. काळाभोर गर्द समुद्र..

पोहता पोहता समजा खूप थकायला झालं नी कुणीतरी किनाऱ्यावर आणून टाकलं तर ? मग खूप थंडी वाजायला लागली. पहाटे पहाटे थंडगार वारे सुटतात. मी त्यातून सगळी ओली.

सगळं अंग थरथरायला लागलं. मी उठून पळायचा प्रयत्न केला, पण वाळू इतकी ओली, भुसभुशीत होती की पळताच येईना. सारखं पाऊल रुतायचं मग इतकं जड होऊन जायचं की निघायचंच नाही. असं होतां होता एकदम मला दिसेनासं झालं. बोलताही येईना. अंग नुसतं जडजड. श्वास कोंदतोय.

मग परत धप्पकनं पडले. वाळूत पार खोलं गाडून गेल्यासारखी.

समुद्राला ही भरती. काळ्या प्रचंड लाटा. लाटाच लाटा. लाटाच लाटा. लाटाच लाटा. डोळे उघडले तर पांघरूण गच्च गळ्यापर्यंत होतं नी खूप घाम आला होता. मग मी पांघरूण काढून टाकलं नी पंखा ऑनवर केला.

हलकं हलकं वाटलं. मग उठून पाणी प्यायले. परत खिडकीशी आले. आभाळात तारे चमकत होते. अधूनमधून निळ्या जांभळ्या ढगांचे छोटे छोटे तुकडे इकडेतिकडे लहरत होते.

माझ्याकडे बघून हळूच डोळे मिचकावले. मला रडायलाच आलं.

मग मी हुंदके देऊन रडायला लागले. तो म्हणाला आहे की रडावंसं वाटलं की पोटभर रडून घ्यावं. तसा जन्मसिद्ध हक्कच आहे. पण मग रडता रडता खूप राग आला. हे काय म्हणून ? हरलीस की काय तू इतक्यात ? हे बरं नव्हे.

मी डोळे पुसत बाहेरच पाहिलं. काळोख चकचकत होता. एक छोटंसं झुडुप काळोखाहूनसुद्धा काळं होऊन उभं होतं. तिथं काय आहे ? कदाचित कोणी लपलं असेल. भाग्य. माझं भाग्य लपून राह्यलंय तिथं.

आई म्हणते, ज्याचं जसं नशीब असतं तसं तसं घडतं. मी म्हणायचे की असं का म्हणून ? ज्याला त्याला काय लिहिता येत नाही ? मग वाई ग, आता तुझी लेखणी कुठं गेली ?

तेच ते. माझं झुडुपाआड दडलेलं भाग्य. थोड्या वेळानं ते बाहेर येऊन मला खिजवणार आहे. ते कसं असेल ? सुरूप की कुरूप ? लहान की मोठं ?

मला खूप रिकामंसं वाटलं. पाय परत दुखू नयेत म्हणून मी बसून घेतलं. पंख्यामुळं माझे मोकळे केस उडत होते.

मला परत तहान लागली.

पाणी पिताना वाटलं की आपण, म्हणजे बहुतकरून इतर लोकच, किती प्रचंड स्वार्थी असतात.

मग परत मी कॉटवर पडले. मला एक महाल बांधायचा होता. महाल हे तसं म्हणण्यापुरतं. एखादं साधंसं घरही चालेल. जाता जाता माझ्या मैत्रिणीनं

थांबवून खूप गप्पा मारल्या. सगळ्या जुन्या जुन्या आठवणी. मग मैत्रीण हळूहळू अदृश्य झाली. ती कोण होती हे आठवायचा मी खूप प्रयत्न केला पण आठवेचना. त्याचं काय आहे की मी खूप गावांतून राहिले आहे. चिकार शाळा झाल्या. म्हणून मग एकच मैत्रीण काही शेवटपर्यंत टिकली नाही.

तशा सगळ्याजणी इथूनतिथून सारख्याच की नाही? तर हो. कारण माझ्या मैत्रिणी सगळ्याच खूप चांगल्या होत्या.

चांगलं–वाईट वगैरे सगळं आश्चर्यकारकसुद्धा आहे. आहे की नाही?

उद्या कसा असेल? ते तर काही सांगता यायचं नाही. रात्र संपली की आपोआप उद्या आज बनून येतो. समजा कशाची भितीच नाही वाटली तर एकूण एक सोपं होईल की नाही?

मला झोप तर आलीच नाही. पण तो महाल वगैरे बांधायचंही राहून गेलं. समजा तो महाल नाही पुरा झाला, अर्ध्यातच कोळळला. वगैरे वगरे अशुभ गोष्टी मनात यायला लागल्या.

पण पायऱ्या बांधून झाल्या. मग मी चढत चढत गेले. गेले तर काय! खूप उंच जिना नी शेवटची पायरी चढले तर पुढं काहीच नाही. वर नाही. खाली नाही. बाजूला धरायला सुद्धा नाही. जेमतेम पाय टेकवून लटलटत उभी.

परत ते ऐकू न येणं, न दिसणं, शब्दही न फुटणं वगैरे चालू झालं. यातून करायचं काय? तर जे जे होईल ते ते पाहा.

मी आपली त्या पायरीवर तोलच सावरण्यात धडपडलेली. एवढं साधं सुचू नये का की सरळ परत पायऱ्या उतरायला लागायचं. पण मला वाटतं तो सुद्धा मार्ग बंदच असावा. कसंही असलं तरी मला मात्र आता काही आठवत नाही. मला सुचलंही नसेल म्हणा. किंवा ते बरोबरही झालं नसतं कदाचित. जाऊ द्या.

पण स्वप्नांचं एक बरं की जाग आल्यावर खतम. कधीकधी हे त्रासदायक होत असणारच. पण वाईटसाईट स्वप्नं पडली की पटकन् जागं होऊन जावं.

मी इतका वेळ तुम्हाला स्वप्नच सांगत होते की काय?

रात्र खूपच थोडी पुढे सरकते हे मला चक्क घड्याळ पाहून समजलं. मी फारच अस्वस्थ झाले. करायचं काय हे सुद्धा समजेना. रोज आपलं सकाळी उठायचं. दिवसभर काय तर जेवणखाणं वगैरे. फिरायचं, वाचायचं. परत रात्री झोपून जायचं.

तरी आपले दिवस जातच आहेत ना? इसवीसना-मागून ईसवीसन. साधारण किती झोपेच्या गोळ्या घेतल्या की आपण मरतो? मला मरायचंय असं अजिबात नाही. पण सहज माहित असावं.

हे खरं नाही वरं का? कसं जिद्दीनं जगायला हवं. हवं की नको?

समजा माझं आयुष्य असंच आहे की नुसतं द्यायचं नी घ्यायचं काहीच नाही. तर?—हे कसं पुस्तकी वाटतंय की नाही? म्हणजे खोटं खोटं, फसवं वगैरे?

स्वतःला एकदम वर नेऊन टाकायचं. बाई ग, तू खूप थोर आहेस. श्रेष्ठ आहेस. रात्री खिडकीतून सगळे दिवे सारखेच दिसतात. फ्लॅटचे किंवा झोपडीचे. अन्न-वस्त्राचे मूलभूत प्रश्न आपल्याला नाहीत. नाहीत म्हणूनच मी हे सांगते आहे, तुम्ही ऐकता आहात.

खूप उंच. अवघड असा डोंगर मी एकटी चढत होते. मधेच पाऊस सुरू झाला. कध्धी बघितला नव्हता असा घनदाट, शुभ्र, गच्च पाऊस. मुसळधार पाऊस. अविरत पाऊस. तर झालं काय की मी झाडाखाली उभी राहिले. वर एक पक्षी गात होता की आता लवकरच सूर्य उगवेल वगैरे असं काहीसं. पण माझा विश्वास कसा बसावा?

पक्षी खाली वाकून मला पाहात म्हणाला, ए वेड्या पोरी तू तर भिजून गेली आहेस. इथे ये. घरट्यात. मग मी घरट्यात वाकून पाहिलं. मग आठवलं की सगळे स्वार्थी असतात. यानं कधीतरी घरट्यातून दिलं ढकलून तर काय घ्या.

मग मी तशीच कापत, कुडकुडत उभी राहिले नी रडू लागले. खारट आसवं सगळी ओठावर आली. तरी मी रडतेच आहे.

पक्षी गाणं थांबवून म्हणाला की पोरी, आता रडतेस का? तुला वर जायचं आहे ना तर जा. मागचं आपण विसरून जायचं असतं बाई. शिवाय आयुष्यात किती काय काय आहे. तू अशी उदास होऊ नकोस.

मग पाऊस पडता पडताच मी डोंगर चढू लागले. पायात अगदी गोळे आले. खूप वेळ खिडकीत उभं राहिल्यावर नाही का होत तसं ? हात पसरून कुणाकडे काही मागत उभं राहिलं तर हातातही असेच गोळे येतील नाही ? खूप दुखून येईल. तर मी चढतेय. पण नेहमीसारखंच झालं. दिसेना. बोलता येईना वगैरे. पण गंमत अशी की हे संपलंच नाही. मी खूप प्रयत्नानं हाका मारल्या. पोटात दुखायला लागलं. तोंडाला कोरड पडली. हाकाच हाका. प्रचंड हाका.

पक्षी गाणं म्हणतोय की आता सूर्य उगवेल वगैरे.

तर कुठाय तो सूर्य ?

मी उगीचच का म्हणून रडते आहे ? मी डोळे पुसले. आता सकाळ होईल. दोन कप चहा पिता येईल. पेपरमध्ये काय काय वाचायला मिळेल.

आता मला झोप तरी येऊ दे. तो म्हणून गेलाच आहे की आहे हे असं. तुला हवं आहे ते मी मुळीच देणार नाही.

आता काय ग करशील खुळे ? मी आपली सताड डोळे उघडे टाकून पडले आहे. समोरच्या कॅलेंडरची पानं फडफडताहेत. बाकी एक पोकळ स्तब्धता.

हातपाय पसरून मी पडले आहे. शुद्धीवर ये पोरी. शुद्धीवर ये.

मला घर, आई-वडील वगैरे आहेत ना ? एका भल्यामोठ्या शहरात मी राहते आहे ना ? रोज फ्रीज-मधलं पाणी पिते आहे ना ?

कधीतरी जेवणापूर्वी जीनसुद्धा प्यायले आहे. खूप तरंगून म्हटलेलं आहे की ऐका हो ऐका, मी आज जगाची राणी. जीत माझी. मी म्हणजे सर्वकाही. मी म्हणजे हे जग. मग ओंजळ रिकामीच कशी ? तर त्याची लाजही वाटली.

मी लाटालाटांवर विहरते आहे. ही रात्र आहे तोवर हे असंच. तुम्ही हसता आहात काय ? हसणं-दुसऱ्याला हसणं हे स्वार्थीपणातून येतं. तर ते राहू द्या.

मी आता उठूच शकत नाही. पंखा बंद करायला हवा आहे. पांघरूण घालायला हवं आहे. जमल्यास कोणीतरी कुशीतसुद्धा घ्यायला हवं आहे. थोपटायला हवं आहे. मग हातपाय नाहीच हलत.

मी तशीच आहे. सताड. विखुरलेली.

केसातून लहरलेली.

लाटांवर पहुडलेली.

आणि माझ्याच पापण्यावर वहरलेली.

आता नाही म्हणजे काही देखील कळत नाही.

असणं हे एक खरं.

मला आता झोप येते आहे का ? नसेल तर मग मी करायचं तरी काय ?

असायचं. फक्त असायचं हे एक खरं.

ऊठ ग पोरी, ऊठ.

पडदे वाऱ्यावर नाचायला लागले. इच्छा असो-नसो. ताल उमलून आला.

कशी ग खुळी तू पोरी.

□ □

: २ :

एकदम एका क्षणी ती हताश झाली. सगळी शक्ती सोडून गेली असं वाटलं. उमेद वगैरे सगळं खोटं. वळेच आणून जोडलेले शब्द. ते सगळं ओझं वागवायचं तरी कुठवर ? आपण इतक्या अडकल्या जाऊ असं तरी पहिल्यांदा कुठं वाटलं होतं ? तसंही चूकच. अडकायचं तर होतंच. किंवा ते हातात सुद्धा नव्हतं. पण इतकं अस्वस्थ व्हायला होईल असं वाटलं नव्हतं. सगळा धीर गोळा करत ती उभी राहिली. लांबून येणाऱ्या बसची वाट पाहात.

तिच्या पुढ्यात नको असताना ती घाणेरडी भिकारीण येऊन उभी राहिली. तिचा अस्वच्छ; काळा देह, केसाच्या झिज्या; तिच्या कडेवर तसंच एक केविलवाणं मूल. तिला पाहावेना. आठ्या घालून ती दूर पाहण्याचा प्रयत्न करू लागली वसकडे. पण भिकारीण न हटता मागत राहिली. तोंडानं सारखं 'ताई...माई'. तिला विलक्षण संतापायला झालं. शक्य झालं तर मोठ्यांदा दोन शिव्या द्याव्यातशा वाटल्या. पण तिनं नुसतंच तिरस्कारानं भिकारणीकडं बघितलं.

आणि तिच्या डोळ्यात घुसलं ते भिकारणीचं तारुण्य. अर्ध्या चिंध्यांतून बाहेर डोकावणारं शरीर.

शरीर ! तिच्या अंगावर काटा आला. ह्या भिकारणीकडे शरीराहून दुसरं आहेच काय ? हे पोर कुणाचं असेल ? कसल्या संबंधातून झालेलं ? तिला एकदम छातीत धडधडल्यासारखं झालं. हल्ली असले विचार फार मनात येतात. नको असतात तरीही येतात. तिनं रुमाल ओल्या तळव्यात घट्ट धरला. भिकारीण पुढं गेली.

सुटल्यासारखं झालं. तिनं उगीचच घड्याळात पाहिलं. बस येतेय का ते पाहिलं. पण विचार मनातून हटेचनात. शरीराचं एवढं काय वाटून घ्यायचं सदोदीत ? पण शेवटी तेच उरतं. एक खरं...एक शरीर. नाहीतर आजूबाजूला इतके लोक दिसलेच नसते. आणि इतक्या अधाशी नजरा. स्पर्श.

ती बसमध्ये चढली. गर्दीत पुढं लोटली गेली. क्षणभर कुठं आहोत तेच कळेना. चक्कर आल्यासारखं झालं. रिकामी जागा मिळाल्यासरशी तिनं आपलं शरीर तिथं टाकलं. खिडकीतून बाहेर पाहिलं.

पावसाचा रंग दिसत होता. आभाळ गच्च भरून आलं होतं. तिला वाटलं या क्षणासारख्या अनेक वेळा असतात ज्या बरोबर खूप काही घेऊन येतात. आठवणी घेऊन येतात. खूप हवंसं वाटतं. जवळ असावंसं वाटतं.

ती एकदम बुडून गेली. प्रेमाचे जवळिकेचे क्षण आठवून आले. रवींद्राच्या घरी घालवलेल्या कित्येक दुपारी, संध्याकाळी. ते सगळं तसं किती साधं आहे, सरळ आहे, तरीही अप्रूप वाटावंसं आहे. रवींद्र खूप हवासा वाटला. त्याची मिठी, त्याचे शब्द आणि भराभरा पळणारे शब्द. ती नजर हरवून बाहेर पाहात राहिली. बसच्या धक्क्यानं भानावर येऊन तिनं भोवती पाहिलं.

सगळं सरळ, सुरळीत चाललं होतं. प्रत्येक स्टॉपपाशी बस थांबत होती. लोक उतरत होते, चढत होते.

ती उठून खाली उतरली. सगळा भाग नेहमीचा असूनही अनोळखी होऊन पुढ्यात आला. इतक्यात घरी जावसं वाटेना. काय आहे घरी ? आता तर रिकामेपणाच नुसता. मुलगा शाळेतून यायला वेळ आहे. तोपर्यंत उगीच कावरंबावरं होऊन कशाला जायचं ?

बेल दाबत ती बराच वेळ उभी होती. दार उघडत शुभा म्हणाली, 'तू होय ? मला वाटलं शेजारच्याच. यावेळी कशी ग ? ऑफीस नाही आज ?'

'नाही' आत शिरत ती म्हणाली, 'आज कॅज्युअल घेतली. म्हटलं वेळ आहे तर जावं. एरवी भेटच होत नाही.'

शुभा म्हणाली, 'तू अशी वाळल्यासारखी का दिसतेस ? छोकरा कसा आहे ?'

'ठीक आहे. मला काय झालंय ?' ती उत्तरली. शुभाचं घर पाहात राहिली.

शुभा तिच्याकडे पहिल्यांदाच पाहात असल्यासारखी बघत होती.

'काय पाहतेस ?'

'तुलाच. काहीतरी विनसलेलं दिसतंय. काही बोलायला आलीयस का ? आपण बाहेर जाऊ.'

तिला एकदम भरून आलं. शुभा इतक्या आपलेपणानं का वागते आहे ? ती गप्प बसली. काही बोललीच नाही. तसं सांगण्यासारखं काही होतं असं नाही. शुभा तर खूप दिवसांनी अशी निवांत भेटत होती. म्हणजे बोलायचंच असतं तर बोलताही आलं असतं.

पण ती तशीच बसून राहिली. शुभा इकडचं तिकडचं काहीतरी काढून बोलत होती. पण ही घुम्मच. मग कंटाळल्यासारखी शुभा म्हणाली, 'नसेल बोलायचं तर राहू दे. मी आपली चहा करायला जाते.'

बाहेर पाऊस पडायला सुरुवात झाली होती. तिला वाटलं, असं झडझडून बरसता का येत नाही ?

शुभापाठोपाठ ती किचनमधे आली. खुर्ची ओढून बसली. गाणं गुणगुणत शुभा चहा करायला लागली.

पाठमोऱ्या शुभाकडे ती पहात होती. पूर्वीपेक्षा शुभा अधिक गोरीपान, अधिक भरल्यासारखी दिसत होती. नाहीतरी शुभाला सुखात असण्यापलीकडे होतंच काय निराळं ? लग्न, घर, नवरा...एवढयात अतिशय सुखानं, समाधानानं गुंतवून घेऊन ती राहात नव्हती का ?

शुभाचा तरी तिला हेवा वाटला नाही. एकदम कीवच आली. तिला प्रथमच हसायला आलं.

शुभानं विचारलं, 'का ग ? काय झालं ?'

'काही नाही. शुभा, मजेत आहेस ना ?'

'का नाही ? आहे ना. मजेतच आहे.'

चहा घेताघेता ती म्हणाली, 'एक विचारू... रागवणार नसलीस तर !...'

'विचार.'

'नवऱ्यावर किती प्रेम करतेस ?'

शुभा हसायला लागली, 'काय पण विचारतेस ? नवऱ्यावर प्रेमच नाही का करायचं ?'

'ते तात्वीक वगैरे ठीक आहे ग. पण असं एकदम उन्मळून वगैरे.'

पण शुभानं हसण्यात उडवूनच लावलं. तिच्यासारखीनं असले प्रश्न का म्हणून विचारावेत ? शुभा हसत होती पण ती परत गप्प होऊन गेली.

बाहेर पाऊस खूपच पडत होता. अशा वेळी ती धावत रवींद्राला भेटायला जायची ते आठवलं. खरं म्हणजे हे अगदी ठरीव झालं. लग्नानंतर पूर्वी समरसून केलेलं प्रेम आठवायचं. त्यात डुंबून जायचं मग एकदम वर्तमानात यायचं. पण सगळे मूलभूत प्रश्नच तिच्यापुढे आले असं वाटलं.

रवींद्राचा स्पर्श अशा पावसात किती हवासा वाटतो ते तिच्या लक्षात आलं. ती उठून खिडकीशी आली. सगळं शुभ्र, धुरकट झालेलं. रवींद्राच्या खोलीत आसुसून घातलेली मिठी या क्षणी, आत्ता हवी आहे. ती फार अस्वस्थ झाली.

तसं पुन्हा अनुभवलंच नाही. लग्नात ऐन वेळेला, खरं तर लग्नानंतर रात्रीच तिला रवींद्राची आठवण येत होती. आणि तिला लक्षात असंही आलं की आपण समाधानी आहोत. त्यावेळी रवीला सगळं समर्पून मोकळ्या झालो याचं समाधान अजून आतून फुलून आलं आहे.

त्यावेळी तसं काही मुद्दाम करावं असं वाटलं नव्हतं. पण प्रेमाचे आवेग वगैरे असतात त्यात त्या लाट आल्या नी वाहून घेतल्यागत झालं. बस्स ! पुढं त्याच्या खंती नाहीत. नवऱ्याच्या मिठीत तर तिला वाटायचं की आता देण्यासारखं काही नाही. होतं ते उन्मादात ओसरून गेलं आहे.

रवींद्राला मुलगा फार हवा होता. पण तसं काही झालं नाही. तिला आपला मुलगा नेहमी निराळा

वाटायचा. हवा होता तसा उकट प्रेमातून हा झाला नाही.

हाच का सगळ्याचा अर्थ ? तिला वाटलं की एका शरीरापलीकडे आपल्याला तरी काय अस्तित्व आहे ? शेवटी जर स्त्री–पुरुष एवढंच एक नातं सनातन असेल तर अनेक मूल्य घेऊन जगायचंच कशाला ? शुभाचा निरोप घेऊन ती बाहेर पडली. शुभाचा आतून राग आला. फारच सामान्य होऊन कसं जगता येतं ? पण मग शुभाचंही काही वाटेनासं झालं. तिला हवं आहे तसं जगू दे.

ती चालत राहिली. मधूनच पडणारे पावसाचे तुषार. ओली झाडं–पानं. ताजी, तृप्त, ओली झाडं. परत रवीच्या खोलीतली ती स्वतः आठवली. मनातून सगळं काढायचा प्रयत्न करत ती चालत राहिली. भोवतीचे बंगले, बागा, रस्ते रिकाम्या मनानं पहायला लागली.

कुठूनतरी गाणं ऐकू आलं. लताचे लाडके सूर. ती एकदम कावरीबावरी झाली. ते गाणं मनात परत परत म्हणायला लागली. सगळं आजूबाजूचं विसरून.

समोरून एकजण सायकलवरून येत होता. जाता जाता सहज धक्का देऊन गेला. ती दचकली. एकदम रस्त्यातच उभी राहिली. राग आला. तिरस्कार वाटला.

पदर आवळून घेत ती भरभर पावलं टाकायला लागली. मघाचं गाणं केव्हाच विरून गेलं होतं. प्रयत्न करूनही आठवेना. रस्ता मोकळाच होता. आपण एकट्याच आहोत याची तिला प्रथमच भिती वाटली. कुणी येऊन धरलं तर ? तर–तर त्या भिकारणीत नी आपल्यांत काही एक फरक नाही.

मनातून असले विचार काढून टाकायचा तिनं आटोकाट प्रयत्न केला पण इतकी कसली तरी भिती वाटत होती की उलट अधिकच बुडायला झालं.

आज कशाला रजा घेऊन बसलो आपण ? ती आठवत होती. कुठंतरी जायचं होतं. पण ते जाणं, निम्मा दिवस सगळा पुसल्यासारखाच गेला होता. नाहीतर एरवी कामात मन गुंतून राहतं.

पण तिथं सुद्धा तिला स्वस्थ राहाता येत नाही हे माहित होतं. सगळे भोवतीचे तिच्याबरोबर काम करणारे लोक कसे वागतात याकडेच लक्ष लागतं. मग कुठंतरी नको असलेले धक्के बसतात. उद्विग्न व्हायला होतं. पण हे असंच चालणार नाही का ? चालताचालता तिला बरोबरचे सहकारी, त्यांची बोलणी, त्यांचे सहेतुक स्पर्श आठवले. सगळे बायकामुलं असलेले. तरीही स्त्री म्हणताच हपापून बोलणारे.

ती शहारली. सगळीकडे आपणच हे वीष घेऊन पहात आहोत. या घाईच्या वेगवान आयुष्यात काही इतर कोपरेच नाहीत ? पण तरीही सगळ्या बाजू तिथंच येऊन पोचायला लागल्या.

ती घराच्या पायऱ्या चढत होती. तिचा मुलगा धावत आला. काहीतरी सांगायच्या आत त्याला ढकलत ती ओरडली, 'आल्या आल्या काय रे चिकटतोस ? हो दूर. मला पाय धुवू दे.'

मुलगा लांब झाला. त्याच्याकडे न पाहता ती तरातरा आत गेली. पाणी घेऊन हातापायावर, चेहऱ्यावर सपकारे मारले. तरीही पुरेना. खूप चीड आली.

मग बाहेर येऊन ती टॉवेल घेऊन पुसत राहीली.

परत हताश होतेयसं वाटलं. रवींद्र कुठे आहे सध्या ? कुठल्या क्षणी त्यालाही अशा आठवणी बावऱ्या करत असतील का ? बघता बघता ती स्वतःला विसरून गेली. सगळं भोवतीचं अनोळखी झालं. ती आणि पूर्वीचा तो आवेग.

तो आवेगसुद्धा एक नात्यातून आला होता. पण भावनेची डूब घेऊन. परत तसले क्षण घेऊन दिवस येईनासे झाले नी उरलं फक्त सनातन, कोरडं नातं. अनेक प्रश्न. आणि सगळ्याच्या मुळाशी एकच एक –म्हटलं तर समस्या म्हटलं तर काहीच नाही.

आपण शुभा नाही याचं तिला फार बरं वाटलं. अगदीच न कळण्यापेक्षा प्रश्न पडलेले काय वाईट ?

□ □.

राहू आणि केतू मंदाकिनी गोगटे

शॉपिंगला जायचं होतं म्हणून तिची धावपळ खरं तर ती एक सवयच.

धावपळत काम केलं की माणूस कसा बीझी दिसतो. नि बीझी माणूस म्हणजे जरा त्याचा ग्रेटनेस वाढतोच की ! मेजरच्या बायकोला शोभेसंच की ते !

'आई कसली एवढी धावपळ चाललेय ? माझं आधी कौतुक कर,

संजूची कॉटवरून आज्ञा होते.

'चुप रे' शब्द ओठापाशी येऊन गप्प होतात. लुकलुकते डोळे पाहून मन ओढ घेतं...शॉपिंग काय होईल सावकाश...

... कसा मजेत गुबदुल पडला आहे ?...थोड्याशा पापण्या उलगडलेल्या. निळेशार डोळे. नि पापण्यातून डोकावणारे मिस्किल हास्य—मेजरचेच प्रतिबिंब.

ती थबकते.

'चल लबाड कुठला ? कौतुक कर म्हणे ! कशाला रे, कौतुक ?' पण असं बोलत असता डोळ्यात वात्सल्य मात्र तुडुंब.

ती पहाते. थेट मेजरचीच डुप्लिकेट. अगदी गोबऱ्या गालासकट.

'माझा सोन्या ग तो. किती छान गाल आहेत रे?' ती गोबरे गाल ओढते, कुस्करते अगदी मेजरची आठवण अनावर होऊन.

'आई पुरे पुरे. गाल दुखायला लागले'—मुलाचं आपलं स्पष्ट उत्तर. नाही तरी मुलांना आवेग कुठला समजायला ?

... दुखू देत. किती दिवसात भेट नाही... ती मनातल्या मनात पुटपुटते.

'अग पुरे म्हणतो ना ? केवढे गाल कुस्करतेस ?' संजूचा रोखठोक प्रश्न.

ती भानावर येते. एकदम वात्सल्य उचंबळून येतं.

मग नेहमीचं ते हळू हळू पुढे येणारं अस्वल नि गुदगुल्या. पुरणपोळी, साखरभात आदि वडी बडी पक्वान्नं करता करता कढीच्या पाळीत होणारं पर्यवसान.

'आई ऽ. आम्ही पण इथं आहोत—'

दुसऱ्या कॉटवरचा मत्सर जागृत.

'असं का ? आम्हाला माहितच नव्हतं.'

'नसायचंच. दोडके ना आम्ही !'

'अस्सं. चालायचंच. काही लाडके काही दोडके.'

मेजरचंच अपत्य. तेही त्याच चालीवर बोलतं, 'अस्सं. नाही तरी दोडकेच आम्ही. जातो सैन्यावर. लागली गोळी आम्हाला तरी चालेल. नाही तरी दोडकेच.'

'अरे अरे. असं काय ते–' मेजरची वायकोच पड ते. दुसऱ्या कॉटजवळ जाऊन त्याला कुशीत घेते.

'काय ग आईऽ, तो सोन्या नी मी ?'

'अरे तू वेडचा.'

...हे कौतुक करून घेणं. रुसणं, फुगणं सारं कसं मेजरचंच मळण. ह्या दोघांच्या रूपानं जणू तोच आकार घेतो ! ...

आठवणी सळसळतात.

मुलाला गोंजारणं वाढतं.

'राहू दे. राहू दे. आता नको माझं कौतुकं' –स्वर दुखावलेला.

'का ? काय झालं बुवा ?'

'प्रथम संजूचं कौतुक केलंस नि मग माझं ना ?'

'अरे तुम्ही दोघंही माझीच ना ?' असं म्हणत ती राजूचा पापा घेते.

जोरानं पापा पुसून टाकून प्रश्न.

'मला नको उष्टा पापा. माझे का नाही आधी कौतुक ? आता नको माझं कौतुक.'

राग अगदी नाकाच्या शेंड्यावर.
हताश होऊन ती म्हणते.

'खरं आहे बाबा. तुमच्या रक्तातच जमवून घेण्याचा स्वभाव नाही. त्यांना तरी तडजोड कुठं चालली ?'

'काय म्हणालीस आई ?'

ती चपापते.

'आई तुला पपांची आठवण झाली ?'

'नाही नाही' ती सारवासारवी करते. पण चपापलेलीच.

'कशावरून म्हणालास रे ?' तीच विचारते.

तो किंचित हसतो अगदी मेजर टाईप.

'त्यात काय ? मला आठवण येते तशी तुला झाली का विचारलं ?' बालसुलभ उत्तर.

ऐकताना तिलाच पाय घसरल्यासारखं होतं.

'आईऽऽ संजूला ठोकून काढू ?' दुसरीकडून सरळ सोट प्रश्न.

'का रे बुवा, त्याच्यावर राग ?'

'मग ? आमच्या कौतुकात जिथं तिथं मध्ये येतो.' बोलताना गाल आणखीनच फुगलेले.

...लग्नापूर्वी हीच रग. मार्गात येईल ते ते तोडून काढीन अशी हिंमत आहे ह्या मनगटात. एकदा आवडलीस म्हणजे आवडलीस...

जणू मेजरच्याच लष्करी थाटात गोबरे गाल प्रश्न करत असतात.

ती समजावणीच्या सुरात म्हणते.

'अरे तुझा तो पाठचा भाऊ आहे. तू त्याला संभाळून घ्यायचंस.'

राजू अलगद हसतो.

तगडेपणालाही रेखीव हास्याची झाक.

'अगदी पठाण आहात' पाठीवरून हात फिरवत फिरवत ती हसत म्हणते.

...आपण ह्या पठाणांना मिलीटरीतच घालू. एकदम कमांडर इन् चीफ करू... त्याचे पपा एकदा बोलले होते.

नको ग बाई मिलिटरीत. नुसतं आठवणींवर जगायचं–ती पुटपुटते.

मनावरचा ताण असह्य. भेट न झाल्याची रुखरुख वाढलेली.

...किती दिवसात भेट नाही. किती वर्षात रजाही घेतली नाही. पण साधं पत्रही पाठवलेनी नाही ? की माझा विसरच पडला ? की कुणी दुसरीच ?... sailor has his house on every port ?...

इथं आले तरी नेहमी बाहेर बाहेर. अगदी मेजरची बायको असूनही. न कळत डोळ्याच्या कडा ओलावतात.

'आईऽ तू रडतेस ?' प्रश्न विचारताना 'मोठी माणसं कधी रडतात ?' त्याचं आश्चर्य डोळ्यात.

'छे रे. डोळ्यात काहीतरी गेलंय' तिचं आपलं नेहमीचं नाटक.

'सारखं सारखं कसं डोळ्यात जातं रे हिच्या ?'

'हो ना. आधी आपलं कौतुक करते नि मग हिच्या डोळ्यात काहीतरी जात रहातं.'

'राहिलं बुवा. नका करू आमचं कौतुक' बोलताना गाल आणखीनच फुगलेले.

पण तिच्या डोळ्यात गेलेलं काही निघतच नव्हतं.

तेव्हढ्यात फोनची घंटा खणखणते.

ती धावत जाऊन रिसिव्हर उचलते.

'इज इट फोर फाईव्ह सिक्स थ्री नॉट वन्.'

'यस् '

'मिसेस सुलोचना रेगे '

'स्पिकींग, '

'स्पीक टु मिस्टर रेगे '

त्याचा अनपेक्षित ट्रंक कॉल.

तो चिरपरिचित आवाज.

'काय ? आठवण येते का ? '

उबदार आवाजातला प्रश्न. मनाच्या सहस्र पाकळ्या उमलतात.

'खूप खूप. तुला-तुम्हाला ' समोर मुलं पाहून तिचं चाचरतं उत्तर.

'नक्कीच, म्हणून तर फोन केला.'

मनाला उभारी येते. तरी तिला वाटतं एकदाची मनाची शंका बोलून मोकळं व्हावं.

'आई कोणाचा फोन ?' चार चौकस नजरांचा प्रश्न.

ती चपापते. हे दोघं समोर असताना मोकळेपणी कसं विचारायचं.

'मजेत अहात ना ?' फिरून प्रश्न.

'अं-हो ' तिचं कसंवसं उत्तर.

'का ? काय झालं ?' तिकडून प्रश्न.

'नाही नाही. ? मजेत आहोत ' ती कसंबसं म्हणते. पण तरी त्याच्याकडून आश्वासन हवं आहे.

समोर हातावर हनुवटी ठेवून सावध नजरा लक्ष देऊन वसलेल्या.

'अरे जरा आत जा ना ?' स्वर चिडका.

'काय म्हणालीस ?' तिकडून प्रश्न.

ती गोंधळते.

'आई ऽ बाबा येणार आहेत ?'

'आई बाबांना म्हणावं; लवकर लवकर या.' कंमरेवर हात ठेवून चमकते डोळे सांगतात.

'हो हो सांगते. तुम्ही दोघं आत जा ना ' ती आशेनं पहाते.

'आधी निरोप सांग ना आमचा.'

असं सांगताना चार डोळे रोखलेले.

'अग बोलत का नाहीस ?' तिकडून प्रश्न.

'जरा थांबा हं. अरे तुम्ही आत कॅरम खेळा. जो जिंकेल त्याला पाच रुपये बक्षीस.'

'अग थांब काय ? लवकर बोल. वेळ थोडा असतो.'

'अं. हो हो ' म्हणत ती रागानं चार डोळ्यां कडे पहाते.

'परीक्षा जवळ आलेय आमची. कॅरम काय खेळा ' मान उडवत त्या रागाला उत्तर.

'अरे मग अभ्यास कर जा. जरा आत जा ना !' चिडीत डोकावलेलं केविलवाणेपण.

'काय म्हणालीस ?' तिकडून गोंधळून प्रश्न.

'नाही मुलांशी बोलले ' बोलता बोलताच ती रागानं मुलांकडे पहाते.

दोघेही चुळबुळतात. पण उभेच.

तिचा अनावर होत प्रश्न.

'आता तू कधी येणार आहेस ?'

'हातात का आहे माझ्या ? आर्डर मिळेल तसं !'

'आई बाबांना एअरगन आणायला सांग. पाच रुपये नकोत आम्हाला.'

ती फिरून डोळे मोठे करत पहाते.

मान दुसरीकडे करून कंमरेवर हात ठेवून, मिलीटरी बेडरपणानं दोघे उभे ठाकलेले.

'एवढा फोन केला तर भरभर बोलतसुद्धा नाहीस ?' तिकडून प्रश्न.

ती भांबावते.

'अहो तसं नाही. अरे आत जा की रे '

तिला वाटतं मनात आललं सारं सारं बोलावं. पत्र यायचीही आजकाल कमी झालेली आहेत. मलाच विरसला नाहीस ना ? पण ती कसंवसं म्हणते '

'वरचेवर पत्र तरी पाठवत जा.'

'जमेल तसं पाठवतोच.'

'पूर्वी जमत होतं नि आताच नाही का ?'

'कामं वाढलेत' त्याचं शांत उत्तर.

...खरं का हे सारं ? स्पष्ट विचारलं तर की मी आवडेनाशीच झालेली आहे...

पण समोर चार नजरा रोखलेल्या.

'आई तू आमचा निरोप बाबांना सांगतच नाहीस ?' गाल फुगलेले.

'आई ऽ मला फायटर जेट आणायला सांग.'

'तू बोलत का नाहीस. तब्बेत ठीक आहेत ना ?' पलीकडून प्रश्न.

'अग आई लवकर सांग' संजूचा राग नाकावर.'

'अग आई माझा निरोप आधी' असं म्हणत दुसऱ्याच्या पाठीवर दणका.

'अरे तुम्ही आत जाता की नाही ?' तिचा कमालीचा चिडलेला प्रश्न.

'आई बाबांना म्हणावं एअरनं या ट्रेननं नको.'

'मुलं आहेत का तिथं ? मग त्यांना तरी दे फोन.'

'तसं नाही तसं नाही आत जातातच आहेत ती' तिचं कसंवसं उत्तर.

एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून दोघेही कान देऊन उभे असतात.

'सारी ठीक अहात ना ?' पलीकडून प्रश्न.

'आई ऽ लवकर निरोप सांग.'

'आई माझा आधी निरोप' बोलताना शब्दात दटावणी.

'तुझा मूड सध्या ठीक दिसत नाही ?' पलीकडून प्रश्न.

'तसं नाही हो,' कमालीची अस्वस्थ होत तिचं उत्तर.

फोन जरा बाजू करून ती फिरून मुलांना दटावते.

'इतके प्रश्न विचारतो आहे तर काही धड बोलत सुद्धा नाहीस ? मला वाटतं उगाच फोन केला ?'

पलीकडच्या शब्दात राग डोकावलेला.

ती केविलवाणी. शब्द जुळवू पहाते. तसं मुलांच्या देखतच निडरपणे बोलू पहाते. तेव्हढ्यात—

'बरं अच्छा टाईम इज अप' पलीकडून त्याचा चिडलेला स्वर.

'टाईम इज अप्.'

हातातला फोन खाली ठेवताना समोरच्यांच्या बाबत राग अनावर.

'रहा आता इथंच उभे. जरा म्हणून ऐकणार नाहीत' कधी नव्हे ते ती मोठा आवाज काढते.

'तू का ऐकलं नाही आमचं ?' हळू आवाजात मान उडवत फिरून प्रश्न.

'आई बाबा कधी येणार आहेत ?' दुसऱ्याचा प्रश्न.

'मला नाही माहित' तिचं चिडकं उत्तर. नकळत तिच्या डोळ्याशी अश्रू उभे रहातात.

दोघेही चपापतात. दोघे मान खाली घालून किलकिल्या डोळ्यांनी एकमेकांना पहात रहातात.

...तुझा मूड ठीक दिसत नाही म्हणे....मनात किती साठलं होतं ? सारं व्यक्त करायला योग किती जुळून आला होता ! पण मुलांसमोर व्यक्त कसं करायचं !

ती रागानं पहाते.

कमरेवर हात ठेवून, उत्सुक नजरेनं समोर दोघे उभे ठाकलेलेच असतात.

त्या रागाच्या उर्मीत तिला वाटतं समोर दोन उभे आहेत—

राहू आणि केतू.

□ □

द्राक्षे आंबट नव्हती

रा. भि. जोशी

१९२१ साली मी मॅट्रिक झालो. मॅट्रिक झाल्यावर पुढे काय करायचे ह्यासंबंधी निरनिराळे विचार माझ्या मनात मॅट्रिकच्या वर्गात असल्यापासूनच येत होते. मॅट्रिकपाशी शिक्षण थांबवायचे नाही हे मनाशी ठरवले होते. पण काय करायचे ते नक्की ठरत नव्हते. वऱ्हाडात बहुतेक मोठ्या गावी कापसाच्या जिनिंग आणि प्रेसिंग कारखाने असत. सेकंड क्लास इंजिनियरला त्यात राहायला बंगला, घरात नोकर, आणि सर्पण फुकट मिळत असे. शिवाय १००।१२५ पर्यंत दरमहा पगार. वर्षभर नाही. पण निदान कापसाच्या हंगामात जरी नोकरी मिळाली तरी त्या दिवसांत वर्षाची बेगमी होऊ शकत असे. म्हणून वाटले, आपण इंजिनियर व्हावे. त्याप्रमाणे मॅट्रिकची परीक्षा झाल्यावरोबर मुंबईला जाऊन व्ही. जे. टी. आय. च्या प्रवेशपरीक्षेला बसलो. पण नापास होऊन परत उमरावतीला आलो. पुढे मॅट्रिक परीक्षेचा निकाल लागला. मी दुसऱ्या वर्गात पास झालो. तेव्हा वाटले आपण कॉलेजात जावे. पण वाटणे सोपे होते तितके जाणे सोपे नव्हते. आमच्यावरोबर पास झालेल्यांपैकी बारा की तेरा विद्यार्थी दुसऱ्या वर्गात आले होते. आणि माझ्या आठवणीप्रमाणे त्यांतले चार की पाचच कॉलेजात गेले. कॉलेजात जायला घरची स्थिती चांगली हवी, पैसा हवा. माझी तर स्थिती अशी होती की मला घर नव्हते. आईवडील नव्हते. कॉलेजशिक्षण करतील असे जवळचे कुणी नातेवाईक नव्हते. आणि पैसा नव्हता. शिवाय माझ्यापेक्षा चार वर्षांनी लहान—बारा तेरा वर्षे वयाची—एक बहीण होती. मी चवदा वर्षांचा असताना वडील वारले, पांच वर्षांचा असताना आई वारली होती. वडील वारल्यानंतर आम्हा दोन भावंडांना आमचे मामा वऱ्हाडात आपल्याकडे घेऊन आले. आणि त्यांनी स्वतःच्या मुलांप्रमाणे आमचे पालन—पोषण आणि शिक्षण केले. पण माझ्याच एका चुकीमुळे आणि गफलतीमुळे वेळ अशी आली की मॅट्रिकच्या परीक्षेला बरोबर एक महिना राहिला असताना त्यांनी मला घर सोडून स्वतःची स्वतंत्र सोय पाहायला सांगितले. बहिणीलाही बरोबर न्यायला सांगत होते. आणि मी तयारही झालो होतो. पण त्यांनाच काय वाटले, "काही दिवस राहू दे." म्हणाले. मी वेगळा राहू लागलो.

मॅट्रिक झाल्यानंतर तिचीही जबाबदारी माझ्यावर पडली. तिचे लग्न करून द्यावे की तिला उमरावतीतल्या मुलींच्या सरकारी हायस्कुलात शिक्षण द्यावे हा माझ्यामुळे प्रश्न होता. वडलांनी ७०० रुपये ठेवले होते ते तिच्या लग्नासाठी खर्चावेत अशी त्यांची इच्छा होती. त्यांची इच्छा मी मॅट्रिकच्या पुढे शिकू नये अशीही होती. कारण आमची परिस्थिती पुढल्या शिक्षणाला अनुकूल नव्हती.

पण इंग्रजी सहावीत असल्यापासूनच माझ्या मनात काही काही विचार येऊ लागले होते. मुलींना जितके शिक्षण देता येईल तितके द्यावे. त्यांचे शिक्षण झाल्यानंतर लग्न करायचे की नाही हे त्यांच्या इच्छेवर सोपवावे; आणि त्यांना लग्न करायचेच असले तर ते त्यांच्या पसंतीने करू द्यावे, अशी माझी मते होत चालली होती. (सहावीतच माझा मित्र झालेला त्र्िंबक अळूरकर नावाचा मुलगा सोडला तर माझ्या मित्रांपैकी ह्या मताचे कोणीही नव्हते.) आम्ही आमच्या मामाकडेच राहिलो असतो तर बहीण चवदा पंधरा वर्षांची झाल्यावर त्यांनी तिचे लग्न लावून दिले असते. त्या आधीही एकदोनदा त्यांनी तसा प्रयत्न केला होता. पण मुलगा पसंत पडला नव्हता म्हणून राहून गेले. 'उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी' ही मामांची विचारसरणी होती. 'इंग्रजी' पद्धतीची म्हणजे

ब्रिटिशांनी चालू केलेली शिक्षण पद्धती त्यांना मुळीच पसंत नव्हती. त्यांची मते मला पटत नव्हती. न शिकलेल्या किंवा कमी शिकलेल्या मुलाशी माझ्या वहिणीचे लग्न व्हावे हे मला पसंत नव्हते. अर्थात् त्यांनीच तिचे लग्न लावून दिले असते तर माझ्या मताला किती महत्त्व दिले असते हा प्रश्नच आहे. पण आता परिस्थिती अगदी वेगळी होती. काय करायचे ते मलाच ठरवायचे होते. तिचे लग्न न लावून देता तिला शाळेत घालायचे असे मी ठरवले. पण तिचे शिक्षण करायचे म्हणजे कॉलेजात जाण्याचा विचार सोडून नोकरी करणे मला भाग होते. वडलांनी ठेवलेल्या पैशांत वहिणीचे शिक्षण होण्यासारखे नव्हते आणि माझे कॉलेजचे शिक्षणही होण्यासारखे नव्हते. अशा परिस्थितीत मी कॉलेजात जाण्याचा विचार करणे म्हणजे बुटक्या माणसाने उंचावरचे फळ मिळविण्याचा प्रयत्न करण्यासारखे होते. इसापाच्या गोष्टीतल्या कोल्हयासारखी माझी स्थिती होती. पण द्राक्षे आंबट असे मी म्हटले नाही. तसे म्हणायचे माझ्या मनातही आले नाही.

मी वहिणीचे नाव मुलींच्या हायस्कुलात घातले. तिला बोर्डिंगमध्येच ठेवायचे ठरवले. त्रिवकची एक वहीण शांता त्याच शाळेत इंग्रजी सहावीत होती. आणि बोर्डिंगातच राहात होती. तिचा माझ्या वहिणीला आधार होता. किंवहुना शांता बोर्डिंगात होती म्हणूनच मी वहिणीला बोर्डिंगात ठेवायचे ठरवले. तिला एक स्कॉलरशिपही मिळाली.

मी उमरावतीच्या डेप्युटी कमिशनरच्या (डी. सी.) ऑफिसात नोकरीसाठी अर्ज केला होताच. डी. सी. ऑफिसचे सुपरिंटेण्डण्ट दादासाहेव परांजपे हे पूर्वी दक्षिण हैदरावादला रेसिडेन्सी ऑफिसात होते आणि तिथून वदलून वऱ्हाडात आले होते. त्यांची आणि आमच्या वडलांची हैदरावादची ओळख होती. ती त्यांनी ठेवली होती. मी त्यांना अधून मधून भेटत असे. त्यांनीच मला अर्ज करायला सांगितले होते. आणि त्यांच्या मुळेच मला लवकर नोकरी मिळाली.

मी माझे ऑफिसचे काम व्यवस्थित करीत होतो. इतर कारकुनांशी माझे संवंधही चांगले होते. पण ते कारकुनी वातावरण मला अगदी अपरिचित होते. माझ्या वृत्तीशी विसंगत होते. त्यात मी रमू शकत नव्हतो. मी त्यांच्यात होतो, पण त्यांच्यापैकी नव्हतो. डी. सी. च्या खोलीत काही पुस्तके होती. डी. सी. दौऱ्यावर गेलेले असले म्हणजे सुपरिंटेण्डण्टच्या परवानगीने मी ती पुस्तके घरी नेऊन वाचीत असे. त्यामुळे आणि माझ्या इतर सवयी, माझे स्वच्छ नीटनेटके कपडे ह्यामुळे मला कारकून मंडळी त्यांच्यापैकी समजत नसत हे माझ्या लक्षात येऊ लागले होते. पण मी माझ्या पद्धतीने वागत असे.

वर्षभरात मी काही पैसे साठवले. वहिणीचीही प्रगती चांगली होती. तिला काही मैत्रिणी मिळाल्या होत्या. ती शाळेत रमली होती. १९२२ चा मे महिना आला आणि कॉलेजात जाण्याचे विचार पुन्हा माझ्या मनात येऊ लागले. नागपूरला जावे, मॉरिस कॉलेजात नाव घालावे, काही शिकवण्या मिळेपर्यंत वाटल्यास वार लावून जेवणाची सोय करावी, असे माझ्या मनाशी मी ठरवले. वहिणीला सांगितले. तिनेही संमती दिली. नागपूरला वावू कोर्के नावाचा माझा एक मित्र होता. त्यांचे क्रॅडॉकटाऊन मध्ये आता (धंतोली) स्वतःचे घर होते. त्याला मी पत्र लिहिले. त्याने आपल्या घरी माझी राहण्याची सोय करण्याचे कवूल केले. त्यांच्या नागपुरात चांगल्या ओळखी होत्या. तो मला शिकवण्या मिळवणे, वारांची सोय करणे ह्या वावतीतही मदत करणार होता.

मी नागपूरला गेलो. मॉरिस कॉलेजात नावही घातले. वारांची सोय करण्यासाठी एकदोघांच्या भेटी घेतल्या वार लावून अत्यंत गरीवीतून शिक्षण घेऊन वर आलेले एक प्रसिद्ध वकील होते. त्यांना माझी परिस्थिती कळेल ह्या भरवशाने त्यांना भेटलो. त्यांच्याकडे विषय काढला. अडचणी सांगितल्या. शिकवण्या मिळाल्यावर मला वारांची गरज राहणार नाही हेही सांगितले. त्यांनी माझे वोलणे ऐकून घतले. थोडा वेळ थांवून म्हणाले,

'कशाला तुम्ही ह्या भानगडीत पडता ? किंमत काय आहे ह्या शिक्षणाला ? तुम्ही तिथे डी. सी. च्या ऑफिसात आहात, कायं एकेका वकिलाची प्राप्ती आहे ते तुम्हाला ठाऊकच आहे. वरं. ह्यापुढे ब्राम्हणांना सरकारी नोकरीचा काही चान्स नाही. आहात तिथेच चिकटून राहा. हळूहळू रिटायर होईपर्यंत सुपरिंटेण्डण्ट नाही तर असिस्टेंट सुपरिंटेण्डण्ट व्हाल. सुखाने पेन्शन खात वसाल.'

मी बराच खट्टू झालो. ते त्यांच्या लक्ष्यात आले असावे. थोड्या वेळाने ते पुन्हा म्हणाले. 'मला तुमचा हिरमोड करायचा नाही. परिस्थिती सांगितली. तुमचा विचार पक्काच झाला असेल 'तर एका वाराची एका वेळची सोय करण्याचं पाहता येईल.'

आणखी एकदोन ठिकणीही इतपतच उत्तेजन मिळाले. माझी अडचण होती. त्यामुळे उपकार घ्यायला माझी तयारी होती. पण अशा मनोवृत्तीने केलेले उपकार घ्यावे की नाही ह्यावद्दल मी साशंक होऊ लागलो. 'वारांची सोय होईपर्यंत तुम्ही आमच्याकडेच जेवा.' असे कोर्के म्हणाला होता. पण वारांची सोय कशी होणार आणि तोपर्यंत त्यांच्यावर भार कसा घालायचा ? शिवाय तो तरी माझ्याच वयाचा आणि विद्यार्थीच होता. तो काही घरातला कर्ता पुरुष नव्हता. तरी पण प्रयत्न चालू ठेवले. काही काही गोष्टी जुळून येतीलसे वाटू लागले. तेवढचात मला आव झाली आणि माझी प्रकृती विघडली. मला काही करणे. कुठे जाणे येणे शक्य होईना. असा स्थितीत शिकवण्या कशा मिळवायच्या आणि करायच्या ? वार मिळाले तरी पोटाची अशी अवस्था असताना वाराच्या ठिकाणी कसे जेवायचे ? इथे दुसऱ्याच्या घरी राहून आवेचा इलाज कसा करायचा ? डॉक्टरांचे पैसे कसे द्यायचे ? असे अनेक प्रश्न उभे राहिले. उमरावतीला माझी राहायची जागा होती. शेजारी मामेभावचे विऱ्हाड होते. काही पैसे न घेता औषध द्यायला डॉ. जोशी होते. ऑफिसातून मी जम बसवण्यापुरती रजा घेऊन नागपूरला आलो होतो. जम बसला असता म्हणजे नोकरीचे काय करायचे ते ठरवणार होतो. पण आता अशी परिस्थिती आली होती की रजा वाढवणे शक्य नव्हते. अनिश्चित अवस्थेत नागपुरात अधिक दिवस राहणे शक्य नव्हते. शेवटी कॉलेजात जायचा विचार रहित केला, मन दगडासारखे कठिण आणि जड केले आणि उमरावतीला परत आलो. प्रकृती बरी व्हायला दोन तीन महिने लागले. कॉलेज हुकले.

कॉलेज हुकले. पण पण मनातून विचार जाईना. एखाद्या खोलीत भुंगा शिरावा आणि आपण कितीही वेळा हाकलले तरी पुन्हा पुन्हा परत येऊन त्याने आपले गुङगुङ चालू ठेवावे आणि आपल्याला स्वस्थता मिळू देऊ नये, तशी माझ्या मनाची अवस्था झाली होती.. मी ऑफिसचे काम करीत होतो. कॉलेजचा विचार दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत होतो. अस्वस्थ होतो.

१९२२ चे वर्ष संपले. १९२३ उगवले. तसे कॉलेजचे विचार पुन्हा उसळून वर येऊ लागले. १९२३ च्या एप्रिलमध्ये मला आणि बहिणीला मुंबईला जायची संधी मिळाली. शांता अलूरकर मॅट्रिक होऊन मुंबईला गेली होती. तिथे आनंद विठ्ठल श्रीखंडे ह्यांच्याशी तिचे लग्न व्हायचे ठरले होते. त्या लग्नाचे आम्हाला आमंत्रण आले होते. एव्हांना अलूरकर मंडळींचा आणि आमचा चांगला स्नेह झाला होता. आनंदराव श्रीखंड्यांची आणि माझी मी १९२१ साली व्ही. जे. टी. आय. च्या परीक्षेसाठी मुंबईला गेलो होतो तेव्हा ओळख झालेली होती. आम्ही लग्नाला जायचे ठरवले. त्यात माझा आणखी असाही हेतू होता की नागपूरला मॉरिस कॉलेजात जायचे जमले नव्हते. आता मुंबईला जायचे जमते का पाहावे. शिकवण्या वगैरे मिळवणे मुंबईला सोपे जाईल. कोणाकडे तरी राहण्याचीही सोय होईल...!

लग्न प्रार्थनासमाजात झाले. त्याच दिवशी समाजातच आनंदरावांचे धाकटे वंधु विश्वनाथ (गुणी) ह्यांचेही कल्याणीवाई सय्यद ह्यांची मुलगी रमा हिच्याशी समाजातच लग्न झाले. ह्या लग्नामुळे झालेल्या मुंबईच्या मुक्कामात डॉ. काशीताई नवरंगे, श्री. द्वारकानाथ गोविंद (भाऊसाहेव) वैद्य, जनार्दन गंगाधर (अण्णा) गद्रे, वगैरे प्रार्थना समाजातल्या ज्येष्ठ मंडळींची ओळख झाली. सगळ्या स्त्री–पुरुष मंडळींचे वागणे इतके खेळीमेळीचे आणि मोकळे होते की आम्ही नवीन होतो तरी आम्हाला मुळीच परके किंवा संकोचल्यासारखे वाटले नाही. माझी कॉलेजात जाण्याची फार इच्छा आहे पण काही कुठे जमत नाही हें त्या मंडळींना कळले होते.

विल्सन कॉलेजात प्रवेश घेता येईल. आणि शिकवण्याही मिळू शकतील. पण शिकवण्यांसाठी कदाचित् चारसहा महिने थांबावे लागेल. आणि खर्च निघू शकेल इतके पैसे शिकवण्यांतून नाही मिळाले तर ? दोनवर्षांच्या नोकरीत मी काही पैसे शिल्लक टाकले होते. पण एकंदरीत असे दिसू लागले की, मुंबईच्या खर्चाला निदान वर्षभर पुरतील इतके पैसे जवळ असल्याखेरीज मुंबईला येण्यात अर्थ नाही. मदत

सगळीजणे करतील, पण हमी कोण कशी घेणार? अपुऱ्या तयारीने आलो तर कदाचित् तोंडघशी पडल्यासारखे होईल. पुन्हा निराश वाटू लागले.

गिरगावात मॅजेस्टिक सिनेमासमोर आंबेवाडीत एक अगदी वरच्या मजल्यावरच्या जागेत सय्यद मंडळी राहात असत. तिथे एकदा रात्री जेवणाखाण्याच्या निमित्ताने आम्ही सर्व जण जमलो होतो. घरासमोरच्या गच्चीवर गप्पा मारीत उभे होतो. अण्णा गद्र्यांशी माझे कॉलेजसंबंधी कशी सोय करावी, काय करावे वगैरे बोलणे चालले होते. बोलता बोलता त्यांनी एकदम आपल्या धाकट्या भावाला बळवंतरावांना हाक मारली. 'बाळू, इकडे ये. हे जोशी पाहा काय म्हणताहेत. त्यांना कॉलेजात जायचंय्, पण कुठे कशी सोय होईल हा त्यांना प्रश्न पडला आहे. इंदूरला काही सोय होईल का? तिथे आपले अण्णा सुखटणकर आहेत. स्कॉलरशिप वगैरे मिळेल.'

बळवंतराव इंदूरला अहिल्याश्रमात शिक्षक होते. त्यांच्या पत्नी इंदिराबाई उमरावतीच्या ताराबाई मोडकांची धाकटी बहीणदेखील तिथेच शिक्षिका होत्या.

एक क्षणभरसुद्धा न थांबता बळवंतराव मला म्हणाले, 'तुम्ही आमच्याकडे या इंदूरला. आपण बघू काय करायचं ते. आणि दुसरी काही सोय झाली नाही तर तुम्ही आमच्या घरी राहून कॉलेजात जा. कशाचीही काहीही काळजी करू नका.'

मी स्तिमित झालो. माझा प्रश्न असा इतक्या सहजपणे सुटेल असे मला कधीच वाटले नव्हते. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. माझ्या मनावरची सगळी दडपणे गेली. माझ्या वाटेतले सगळे अडथळे दूर झाले. माझी पुढली वाट मोकळी झाली. माझे मन इतके भरून आले की मला बोलायला शब्द सुचेनात. आभार मानणे वेडेपणाचे झाले असते. मी एवढेच म्हटले, 'मी येईन इंदूरला.'

मी उमरावतीला परत आलो तेव्हा माझे मन आनंदाने नाचत होते. परत आल्यावर मी बळवंतरावांना आभाराचे पत्र पाठवले. आता माझे सगळे विचार इंदूरला जायची तयारी करण्याकडे लागले. बहीण आता मोठी झाली होती. पहिल्यापासूनच ती सोशिक आणि समजूतदार होती. आपली परिस्थिती कशी आहे आणि तिच्यातून बाहेर पडण्यासाठी आम्ही कशी धडपडत होतो, ह्याची तिला कल्पना आली होती. तिने मन घट्ट केले होते. स्कॉलरशिप आणि थोडीबहुत इतर मदत ह्यावर तिचे शिक्षण व्यवस्थित चालले होते. तरी पण पैशांची काही तरतूद करायला पाहिजेच होती. बळवंतरावांनी भलेपणाने बोलावले. त्यांच्या घरी निश्चिंतपणे राहायला बोलावले, हे मोठेच आश्वासन होते. पण म्हणून त्यांच्यावर भार घालणे योग्य झाले नसते. आपली म्हणून काही तरतूद पाहिजे. काय करता येईल ह्याचा मी विचार करीत होतो. वडलांनी जे पैसे ठेवले होते त्यांना शक्य तोवर हात लावायचा नाही हे मी आधीपासूनच मनाशी ठरवले होते. अगदीच निरुपाय झाला तर गोष्ट वेगळी.

डी. सी. च्या ऑफिसात काम करीत असताना काही वकिलांशी माझी थोडीशी ओळख झाली होती. पण वय, शिक्षण, व्यवसाय आणि परिस्थिती ह्यांमुळे त्यांच्या माझ्यात इतके अंतर होते की ती ओळख नुसती नमस्कारापुरती आणि भेट झाली म्हणजे त्यांनी माझे कुशल विचारण्यापुरती होती.

असेच दिवस आणि माझे विचार चालले होते. एकदा वैजनाथ जनार्दन ओक, वकील भेटले. तेव्हा ते म्हणाले, 'उद्या सकाळी माझ्या ऑफिसात मला भेटा.' कशासाठी वगैरे मी विचारले नाही. म्हटले काही काम असेल. त्यांचे राहते घर अंबा दरवाज्याच्या आत दहीसातीजवळ होते. ऑफिस अंबा दरवाज्याबाहेर डॉ. जोश्यांच्या दवाखान्याच्या ओळीत होते.

मी दुसऱ्या दिवशी त्यांना भेटायला गेलो. आरंभी थोडेसे खुशालीचे बोलणे झाल्यावर ते म्हणाले, 'तुम्हाला कॉलेजात शिकायला जायचंय् पण पैशांची अडचण आहे म्हणून तुम्हाला जाता येत नाही असं मी ऐकलेय् खरं आहे का?'. मी 'होय!' म्हटले. आणि विचारले. 'तुम्हाला कोणी सांगितले?' 'गोखले मास्तरांनी.' आणि पुढे म्हणाले, 'मी तुम्हाला दर महिन्याला नेमाने काही मदत करीन. तुम्ही कॉलेजात जा. गरज लागेल तेव्हा अधिकही पैसे देईन. इथे खितपत पडू नका, तुम्हाला आणखी कोणी मदत करणार आहेत का?'

मी म्हटले, 'मी कोणालाच मदतीबद्दल विचारलं नाही. पगारातून थोडे पैसे साठवले आहेत. काही शिकवण्या वगैरे केल्या. त्याचेही पसे आहेत थोडे.'

वैजनाथपंत ओकांनी मला पैशांची मदत तर केलीच पण कॉलेजच्या अभ्यासाला उपयोगी पडतील अशी आपल्या जवळची संस्कृत–इंग्रजी पुस्तकेही दिली. त्यांपैकी वॉल्टर रॅलीचे 'शेक्स्पिअर' हे पुस्तक मी अजून जपून ठेवले आहे. त्याचा मला बी. ए. च्या तसेच एम. ए. च्या वेळी चांगला उपयोग झाला.

ओक वकीलांनी गोखले मास्तरांचा उल्लेख केला. गोखले मास्तर म्हणजे श्रीपाद सखाराम (अप्पासाहेब) गोखले. रवीन्द्रनाथ टागोरांच्या आठवणींचे त्यांनी 'जीवनस्मृति' या नावाने भाषांतर केले होते. आम्हाला सहावीत गणित शिकवीत काही निवडक विद्यार्थ्यांना. सुट्टीच्या दिवशी आपल्या घरी बोलावून अधिक अभ्यास करून घेत त्या विद्यार्थ्यांत मीही होतो.

सहावीत असतानाचीच गोष्ट. सहामाही परीक्षा होऊन गेली होती. नेहमीसारखाच इतरांबरोबर अभ्यासासाठी त्यांच्याकडे गेलो असताना अभ्यास झाल्यावर त्यांनी मला थांबवून घेतले. बाकीचे विद्यार्थी गेल्यावर मला विचारले, 'तुमच्या घरी कोण कोण आहे ? तुम्ही इथे कुठे राहता ? ' मी त्यांना सांगितले, 'मला आई–वडील नाहीत. एक माझ्यापेक्षा लहान बहीण आहे. आम्ही दोघं इथे आमच्या मामांजवळ राहतो.'

'तेच तुमचा सांभाळ–शिक्षण सगळं करतात ?'

'हो.'

'सहामाहीत तुम्हाला गणितात किती मार्क मिळाले ?'

प्रश्न अनपेक्षित होता आणि वर्मी लागणारा होता. मला सहामाहीत गणितात शंभरापैकी सतरा की अठरा मार्क मिळाले होते आणि मी परीक्षेत नापास झालो होतो. खजील होऊन, खाली मान घालून, मी त्यांच्या प्रश्नाचे उत्तर दिले.

'पाचवीच्या वार्षिक परीक्षेत तुम्ही कितवे आला होतात ? ' ते विद्यार्थ्यांना नेहमी 'अहो जाहो' म्हणत.

'चवथा.'

पाचवीच्या वर्गात मी डिसेंबरात आलो होतो. त्याच्या आधी आम्ही एलिचपूरला राहात होतो आणि मी शहरातून परतवाड्याला हायस्कूलात जात असे. मामांची बदली एलिचपुराहून उमरावतीला झाली तेव्हा आम्ही उमरावतीला आलो. आणि मग माझं नाव हिंदु हायस्कुलांत पाचवीच्या वर्गात घातले. शाळेत मी अगदी नवा होतो. माझी कुणाशीही ओळख नव्हती. वार्षिक परीक्षेत सगळ्या विद्यार्थ्यांत मी चवथा आलो होतो. त्यामुळे शिक्षकांना मी माहीत झालो होतो.

'मग हे बरं कां ?' गोखले सर म्हणाले. त्यांच्या प्रश्नाचा रोख माझ्या लक्ष्यात आला. चारच साधे शब्द. पण ते माझ्या मनाला लागले. त्यांनी मला एकदम माझ्या परिस्थितीची जाणीव करून दिली. मी थोडासा रडवेला झालो. गप्प बसलो. थोड्या वेळाने त्यांचा निरोप घेऊन घरी गेलो. नंतर सहावीच्या वार्षिक परीक्षेत मी पहिला आलो. गणितातही मला चांगले मार्क मिळाले. मॅट्रिकच्या वर्गातही माझी प्रगती चांगली होती. वक्तृत्वात पहिले बक्षिस मिळवले. निबंधस्पर्धेत भाग घेतला. आणि मॅट्रिकची परीक्षाही चांगल्या प्रकारे पास झालो.

गोखले सरांचे ते चार शब्द माझ्या मनात खोल रुतले. त्यांची मला पुढेही आठवण होत राहिली. तेव्हापासून त्यांचेही माझ्याकडे सारखे लक्ष्य असे. ओक वकीलांनी गोखले सरांचा उल्लेख केला तेव्हा त्याचे पहिल्यांदा प्रत्यंतर आले.

ओक वकीलांच्या भेटीनंतर दोन–तीन दिवस गेले. संध्याकाळी ऑफिस सुटल्यावर मी मोरोपंत जोश्यांच्या बंगल्यावरून शहराकडे रस्ता जातो त्या रस्त्याने घरी चाललो होतो. माझ्याबरोबर ऑफिसातलेच आणखी दोघे तिघे होते. उतार संपून रस्ता सपाटीला लागला तेवढ्यात मागे कोणीतरी सायकल थांबवून उतरल्यासारखे वाटले. म्हणून मी वळून पाहिले. पु. बा. साठे (बाबूराव) वकील सायकलवरून उतरून आमच्याकडे येत होते. मी त्यांना नमस्कार केला. ते म्हणाले, 'जोशी, एक दोन दिवसांत मला घरी भेटा.'

मी 'बरे' म्हटले. ते सायकलवर बसून पुढे गेले.

ओक वकीलांनीही मला असेच भेटायला बोलावले होते. बाबुराव साठे त्यावेळी नमुन्यात खापड्यांच्या घराच्या मागल्या रस्त्यावर काणे वकीलांच्या बंगल्यात राहात असत. ते एल्‌एल्. एम. होते. मीमांसाभूषण होते. त्यांच्या लघुकथा आणि इतर लेख मासिकांतून येत असत. मला त्यांच्याबद्दल फार आदर वाटे. आणि

लेखक म्हणून विशेष आकर्षण वाटे. माझी त्यांचीही ओळख झालेली होती. आणि मधून मधून मी त्यांच्या घरी त्यांना भेटत असे.

त्यांना भेटायला गेलो तेव्हा ओकांच्या कडल्यासारखेच सगळे बोलणे झाले. त्यांनाही गोखले सरांनीच माझ्याबद्दल सांगितले होते. बाबूरावांचे मामा डॉ. सी. का. काणे यवतमाळला असत. विद्यार्थी–सहायक फंड ह्या नावाच्या एका फंडाची व्यवस्था त्यांच्याकडे होती. त्या फंडातून काही मदत मिळू शकेल असे बाबुरावांनी मला सांगितले. साहजिकच माझा हुरूप वाढला.

त्रिंवक अलूरकरने माझी ताराबाई मोडकांशी ओळख करून दिली होती. त्या त्रिंबकची आते वहीण. त्यांच्याबरोबर मी केव्हातरी मोडकांकडे जात असे. त्यामुळे ताराबाईंचे यजमान के. व्ही. मोडक ह्यांची माझीही ओळख झाली होती. पहिल्या पिढीचे प्रार्थना समाजिस्ट पुढारी वामन आबाजी मोडक ह्यांचे ते सगळयात धाकटे चिरंजीव. ते उमरावतीचे एक नामांकित फौजदारी वकील होते. उत्तम रूप, तल्लख बुद्धी, उत्कृष्ट इंग्रजी वक्तृत्व, तडफदार वागणे, अपटुडेट यूरोपिअन पोषाख ह्यांमुळे त्यांची पाहतक्षणी छाप पडत असे. मला वाचनाची आवड आहे असे कळल्यावर ते मला स्वतःच्या जवळची पुस्तके वाचायला देऊ लागले. डिकिन्सच्या सर्व ग्रंथांचा कापडी बांधणीचा एक सुंदर सेट त्यांच्याकडे होता. त्यातून डिकिन्सच्या बहुतेक कादंबऱ्या मी वाचल्या. ऑस्कर वाइल्डची काही नाटके वाचली. मी वहिणीचे शिक्षण करतो आहे आणि मला कॉलेजात जायचे आहे ह्याचे त्यांना आधीच कौतुक होते. बळवंतराव ह्यांनी मला इंदूरला बोलावले आहे हे कळल्यावर त्यांनीही मला दरमहा काही मदत द्यायचे कबूल केले.

मी डी. सी. ऑफिसात नोकरीला लागलो तो कॉपीइंग डिपार्टमेण्टामध्ये. सगळे आधी त्याच डिपार्टमेण्टमध्ये लागत. पण १९२३ च्या उन्हाळयात मी चांदूर मोर्शीचे सबडिव्हिजनल ऑफिसर आणि मॅजिस्ट्रेट पी. एस. राव, आय्. सी. एस. ह्यांच्या कोर्टात सेकंड क्लर्क म्हणून काम करीत होतो. माझी कॉलेजात जाण्याची इच्छा आहे, असे त्यांनाही कोणाकडून तरी कळले. बहुधा के. व्ही. कडून. कारण त्यांची त्यांची मैत्री होती त्यांनीही मला कॉलेजची पहिली दोन वर्षे मदत देऊ केली.

'मी इंदिराबाईंना तुमच्याबद्दल सांगितले आहे. त्या तुमच्या येण्याची वाट पाहात आहेत.' असे इंदूरहून बळवंतरावांचे पत्र आले. कॉलेजला जाण्यासाठी सर्व प्रकारची अनुकूलता निर्माण झाली होती. दादासाहेबांना भेटून मी त्यांच्याजवळ कॉलेजला जाण्याचा विषय काढला. सर्व गोष्टी कशा जुळून आल्या होत्या ते त्यांना सांगितले. माझी दोन वर्षांवर नोकरी झाली होती. मी कायम झालो होतो. माझी कशासाठी धडपड चालली आहे ते दादासाहेबांना माहीत होते. नोकरीही राहावी आणि कॉलेजचे शिक्षणही व्हावे असा एक मार्ग निघाला. माझी जितक्या दिवसांची भरपगारी हक्काची रजा साचली असेल त्याच्या दुप्पट दिवसांची अर्ध पगारी रजा मी घ्यावी. कॉलेजच्या वर्ष अखेरीपर्यंतच्या बाकीच्या दिवसांची बिनपगारी रजा घ्यावी. कॉलेजचे वर्ष संपल्यावर उमरावतीला येऊन पुन्हा कामावर हजर व्हावे. सबंध सुटीत काम करून पुन्हा पुढल्या वर्षासाठी आदल्या वर्षासारखीच रजा घ्यावी. ह्यामुळे सगळया गोष्टी साधत होत्या. काही कारणामुळे कॉलेजचे शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागले तर नोकरी चालू होती. शिक्षण पुरे करता आले तर सुटीत केलेल्या कामाचा पगार मिळणार होता. 'देता किती घेशिल दो करांनी' असे मी स्वतःला विचारावे अशी परिस्थिती होती.

मी इंदूरला गेलो. बळवंतरावांनी अण्णा सुखटणकरांची आणि माझी भेट करून दिली. अण्णांना माझी सगळी परिस्थिती सांगितली. अण्णा त्यावेळी होळकर कॉलेजचे प्रिन्सिपल होते. ते मला म्हणाले, 'मी तुम्हाला अॅडमिशन देतो. पण स्कॉलरशिप आधीपासून मिळणार नाही. टर्मिनलमध्ये तुमचा पहिला नंबर आला तर मिळेल. आणि तसाच दर परीक्षेत आला तर शेवटपर्यंत मिळेल.'

माझी थोडी निराशा झाली. पण पैशांची तरतूद बरीचशी झाली होती. माघार घेण्याचा प्रश्न नव्हता. मी कॉलेजात अॅडमिशन घेतली. हॉस्टेलमध्ये राहायचे ठरवले. ईस्ट ब्लॉकमध्ये खोली मिळाली. कॉलेजची चारही वर्षे मी त्याच खोलीत राहिलो.

पहिल्यांदा कॉलेजात जायचा प्रयत्न केला तो साधला नाही. द्राक्षे फार उंचावर होती. उडी पोचत नव्हती. शिडी कुठे जवळपास दिसत नव्हती. पण तेव्हाही द्राक्षे आंबट आहेत असे मी मनाशी किंवा मोठ्याने म्हटले नव्हते. आता तर म्हणायचे कारणच राहिले नव्हते. □ □

गोष्ट ◻ विजय मुनशी ◻

कधी कधी फार वाईट स्वप्नं पडतात.
म्हणजे कसलीही.
त्यावेळेस वाईट वाटतं.
पण नंतर विसरल्यासारखं होतं.

एक कावळ्या–चिमणीची गोष्ट आहे.
शेणाच्या घराची.
तर हा कावळा चिमणीकडे गेला.
पावसानं वाहून गेलेल्या शेणाच्या घराची तक्रार घेऊन.

ही गम्मत वाटते.

एकदा असाच खूप मोठा पाऊस पडला.
मला त्या गोष्टीची आठवण झाली.
समोर पाहिलं.
आमच्या घरासमोरच्या वडाच्या झाडावर.
असंख्य कावळे पानाच्या आडोश्याला.
ओले होत थरथरत बसून होते.
फांदीफांदीला पक्के पकडून कावळे फडफडत होते.

पाऊस पडत होता.
कावळे तसेच आडोशाला होते.

तसे इतरही पक्षी होतेच.
वारक्या चिमण्याही.
त्याही थरथरत होत्या पावसाच्या माऱ्यानं.

पाऊस पडून गेला.
पानापानाआडच्या चिमण्या, कावळे पंख फडफडवत स्वतःला सुकवत बसले.
कावळ्या–चिमणीची गोष्ट तशी फार जुनी.

एकदा देशपांडे असेच कधी तरी आले. त्यांना सारं सांगत बसलो.
गंमती असतात.
मला वाटलं ते घर शेणाचं असो वा मेणाचं.
वडाच्या झाडावर अशीही कदाचित घरटी असतील.
त्या दिवशी देशपांडे न बोलताच परत गेले.

चालायचंच.

त्या फडफडणाऱ्या जीवांकरता देशपांड्यांचंही स्वत:चं असं मेणाचं घर असावं.

मध्यंतरी देशपांडेंकडे जाणं जमलं नाही.

आजी गेल्याचं कारण घडलं त्यावेळेस त्यांच्या घरी जाऊन मनसोक्त रडलो.

देशपांडेंना ते आवडलं नाही. कारण माझं कुणाशीच रक्ताचं नातं नव्हतं.

त्या दिवशी मात्र विलक्षण उदासीनता आली.

देशपांडेंनी नात्याची आठवण दिली नसती तर रडल्याची किंमत वाटली असती.

पण हे देशपांडेंनी करायलाच हवं होतं कां ?

मला हे त्यांना विचारणं प्रशस्त वाटलं नव्हतं येवढं खरं !

माझा मीच उद्योगात होतो. देशपांडे येण्यापेक्षा मीच त्यांच्याकडे जात असे.

गप्पा निघाल्याच तर कधी तरी देशपांडे माझ्या-करता अस्वस्थ होत.

मला त्याचीही भीती असायची. देशपांडे मेले तर मला प्रामाणिकपणे त्यांच्याकरता आक्रोश करता येईल कां ?

पण देशपांडे ज्यास्त वेळ कासाविस नसत.

मग मला बरं वाटायचं.

हे आठवलं की आणिक वाईट वाटायचं.

एकदा पहाटेस स्वप्न पडलं.

घाबऱ्या घाबऱ्या मुद्रेनं देशपांडे आले.

माझ्याकडे पाहून एकदम म्हणाले, 'तू बरा आहेस नं ?'

माझ्या अंगाला हात लावून पाहिला.

मी हसत म्हणालो, 'देशपांडे तुम्ही फार काळजी करता.'

देशपांडे आणखी अस्वस्थ झाले

त्यांच्या डोळ्यांत पाणी आलं म्हणून मीही गप्प बसलो.

जरा वेळानं देशपांडे जायला निघाले.

जाण्यापूर्वी मला जवळ ओढून धरलं.

डोक्यावरून हात फिरवीत म्हणाले,

'स्वत:ची काळजी घेत जा रे.'

सक्काळी.

उठलो तेव्हा अंग घामानं थबथबलं होतं.

डोळ्यात पाणी. कुठंतरी स्वत:च हललो होतो.

त्या दिवशी हजार वेळा मनात विचार येऊन गेला.

पहाटेची स्वप्नं खरी होतात का ?

त्या दिवसापासून मी देशपांडेंना नात्याचा प्रश्न विचारला नाही.

त्या स्वप्नाची रोज वाट पाहिली.

पण देशपांडे परत आपणहून स्वप्नात आले नाहीत.

अधून मधून देशपांडे भेटायचे पण त्यांच्या डोळ्यात त्या स्वप्नाची जाणीव नसायची.

मी अस्वस्थ होतो.

त्यापेक्षा देशपांडेंनी आश्रमातून आणलं नसतं तर हा लोभ जमला नसता.

एक दिवस सहज देशपांडेंचा हात पाहिला.

त्यांच्या संपलेल्या आयुष्याच्या रेषा पुसट झाल्या होत्या.

त्यांच्याच अनुभवाच्या आधारानं मी बोलत होतो.

देशपांडे जमल्यास हो म्हणत.

मला स्वप्नाचं आठवलं.

मी सावधपणे देशपांडेना म्हणालो.

तुमच्या आयुष्यात तुम्ही कुणावर तरी विलक्षण जीव लावून जाल.

पण त्यांचं माझ्याकडे लक्ष नव्हतं.

ते एकदम म्हणाले, 'तुला दिलेले पन्नास रुपये तू केव्हा परत करणार आहेस ?'

देशपांडे नसते तर मी कोलमडून पडलो असतो.

निघालो त्यावेळेस मी दिलेले पैसे न मोजता देशपांडे आत ठेवायला निघून गेले.

त्यांच्या घरून निघेपर्यंत माझा एकट्याचा प्रवास चालू होता.

त्या दिवशी त्याच्या आठवणीनं विलक्षण उदास झालो.

मला वाटलं निदान त्यांनी तरी माझ्याशी असं सांगायला नको होतं.

देशपांडे—

आज तरी त्या दिवशीसारखे पहाटेस या.

असं होणार नाही याची कल्पना असतानाही मी पहाटे झोपण्याचा प्रयत्न करत होतो.

" पहाटे देशपांडे आले.

शांतपणे बसले.

माझ्या डोळ्यात त्यांच्याबद्दल आसक्ती होती.
आश्रमातून आणल्यापातून कधी नव्हे ते देशपांडे माझ्याकरता अस्वस्थ झालेत.
मी एकदम देशपांडेंना बिलगलो.
माझ्या वयाची जाण माझ्याजवळ नव्हती
देशपांडे 'पोरा–पोरा' म्हणून रडत होते."

देशपांडे—
स्वप्नांच्या गोष्टी स्वत:च्या असू नयेत.
निदान असल्या तरी त्या स्वत:च्या रक्ताच्या असाव्यात.

मला आठवण आली त्या दिवशी पानामागे फडफडणाऱ्या पक्षाची.

नंतर मात्र कौतुक वाटलं त्यांच्या संयमाचं. कदाचित चुकून माझ्या खिडकीशी ओडाशाला बसला असता तर मीही देशपांडेंसारखा वागलो असतो.

एका परीनं हे बरंच झालं.

मध्यंतरी देशपांडे खूप मोठे झाले.
माझं मलाच कौतुक वाटलं. पण मला देशपांडेंना सांगता आलं नाही.
देशपांडे हे सगळं मला सांगत होते.
त्यांच्या डोळ्यांत त्यांचा स्वत:चा अभिमान होता.

किती दिवसांची नोंद ठेवणार.
जमेल तसं मी देशपांडेंना भेटत होतो.

देशपांडे जपून वागत होते.
हेही किती दिवस सहन करायचं ?

एक दिवस मोठी खोट बसली. सडसडून निघालं सगळं अंग.
मोकळं व्हावं म्हणून देशपांडेंना सारं सांगून टाकलं.
सांगता सांगता थकलो.
सांगणंही जिवावर आलं. माणूस मेल्यासारख्या देशपांडेंच्या मांडीवर लहान होऊन शिरलो.

गोष्ट त्याच दिवशीची.
पाऊस नव्हता पण भीतीनं मन तडफडत होतं.
कुठून तरी 'वाघळं' भरकटली मनात. थरारून उठलो.
शेजारी देशपांडे झोपले होते.
आश्रमात ह्याची सवय होती. पण देशपांडेंमुळे ते सहन करण्याची ताकद संपली होती.
प्रयत्न करूनही वाघळं हलत नव्हती.
'बाबा' म्हणून ओरडलो.
(देशपांडेंची मुलंही त्यांना बाबाच म्हणतात)

काय झालं ? म्हणत देशपांडे उठले.

मी देशपांडेंचा कुशीत शिरलो.
त्यांनी थोपटायला सुरवात केली.
पाऊस पडतोय.
पानाआडही भिजणारं पाखरू आडोसा शोधत सरकतं.

बाबा.
शब्द भिजतात.
देशपांडे हात फिरवीत राहतात.

त्या दिवशी भयंकर स्वप्नं पडतात.
कासाविस होतो.
आश्रम आठवतो.
आठवू आणखी कोणाकोणाला !

मागं ऐकदा स्वप्न पडलं असतं पहाटेस.
आजचं काय ?
देशपांडे कोण ? मी कोण ?
हे खरोखर आवश्यक.
ही नेमकी पहाटच का ?

देशपांडे अधिक जवळीक करतात.
मनातली वाघळं देशपांडेंना घाबरतात.
कुठं तरी स्वस्थ झाल्यासारखा मी देशपांडेत शिरतो.

सकाळी उठतो त्यावेळेस ते शेजारी नसतात.
चहा घेताना सांगतात.
तू आता एकटा राहात जाऊ नकोस.
त्यापेक्षा......
देशपांडे थांबतात.
मी त्यांच्याकडे पाहतो. ते मुद्दामच नजर चुकवतात.

विनाकारण.
त्या दिवशी खूप पाऊस कोसळावासा वाटतो.
म्हणजे...
पण नको. त्यापेक्षा घरी यावं.
पानापानाआड दडणारे. आश्रय शोधणार कावळे पाहावेत.
कदाचित मीही त्यातलाच होईन.

एखाद्याला विचारेन.
तुला आश्रय देणाऱ्या चिमणीच्या मेणाचं घर कुठाय म्हणून—

देशपांडे.

प्रत्येकांनाच स्वत:ची अशी गोष्ट असते.
कावळ्याची असणारा एखादाच. ☐ ☐

मीनल ▪ शिरीष पै ▪

एखादी रात्र अशी का येते कुणास ठाऊक. काही केल्या, काही केल्या झोप मुळी लागतच नाही. विचार कुठल्या कुठं भरकटत जातात. एकातून दुसरा, दुसऱ्यातून तिसरा... साखळी कुठं तुटतच नाही. डोळे घट्ट मिटून घेतले तरी त्यानं झोप येते थोडीच. तिचं तंत्रच काही वेगळं असतं... तिचा विचार सोडल्याशिवाय ती येत नाही. तिला हाक मारली की ती दूर पळते. तिच्याकडे पाठ फिरवली की ती आपणहून येते. आजची रात्र अशीच आहे. घड्याळातले ठोके मोजले तेव्हा अकरा भरतील असं वाटलं होतं. पण बापरे–बारा वाजले होते. इतका वेळ आपण जाग्या आहोत ? ह्या कुशीवरून त्या कुशीवर, त्या कुशीवरून ह्या कुशीवर वळत तळमळत मी थोडा वेळ कसा तरी काढते. मग एक वाजतो–मग दीड–मग दोन–झोप अजून नाहीच––

पलीकडे 'हे' मस्त घोरत पडले आहेत. माणसाला इतकी गाढ झोप कशी लागते कुणास ठाऊक–ह्यांना काय, रात्रभर गाढ झोपून सकाळी उठल्यावर 'परत झोपा' म्हटलं तरी परत गाढ झोपतील. एकदा झोपायची वेळ झाली म्हणजे दिवसाचं सारं विसरतात. नाहीतर आम्ही–नेमकं झोपायच्या वेळीच सगळं आठवीत बसतो. मी उठून मुलांच्या खोलीत चक्कर मारून येते. बलू आणि बाबा–दोघेही गाढ झोपलेत. वर पंखा अगदी टॉपवर फिरतोय्. बाबाच्या कुशीत भली जाडी कादंबरी अर्धवट उघडी पडलीय. बलूनं डोक्यावरून पांघरूण घट्ट ओढून घेतलंय, मी पंखा कमी करते. बाबा एकदम कण्हतो. द्वाड कुठचा. पंख्याचा वेग कमी झालेला झोपेत सुद्धा त्याला कळतो. दुसरं अगदीच भावडं आहे. चोर उशाखालची वस्तु घेऊन गेला तरी झोपेत पत्ता लागायचा नाही. बापाचा अवतार.

मी फ्रीज्मधलं थंडगार पाणी घटाघटा पिते. तशीच अंधारात घरभर फिरत राहते. व्हरांड्यात येऊन उभी राहते. वारा साफ पडलाय. जिवाची तगमग होतेय. रस्त्यावरच्या दिव्याभोवती हजारो कीटक भिरभिरताहेत. मनाला आज अशी अस्वस्थता का ? ही हुरहुर का ? आज माझं काहीतरी हरवलंय. जे काही आठवतच नाही त्याची अठवण आज कशी येतेय्. काही कळत नाही. तशीच बेडरूममध्ये येते आणि बिछान्यावर अंग धाडकन् टाकून देते. झोप नाहीच. अडीच वाजलेत. मला आज झालंय काय ? आता वेड लागायची पाळी आलीय ! झोप येणार तरी कधी.

आज सकाळी आठ नाही वाजले तो विनू आला होता. म्हणाला, 'इकडच्या बाजूनं चाललो होतो. गाडीत निम्मी होती. तिनं हट्ट धरला–आत्याकडे चल–मला रिंगोशी खेळायचंय' निम्मी अशी रडकी आहे. रिंगोशी खेळायला येते–पण रिंगो तिच्या अंगावर उड्या घ्यायला लागली म्हणजे मात्र ती मोठ्यानं किंचाळते विनूच्या अंगाला बिलगते–त्याला घट्ट पकडून ठेवते आणि मग रिंगोनं तिचे पाय चाटायला सुरूवात केली म्हणजे तर काय–भोकांडच वासते. त्यातून आज मला कुठली दुर्बुद्धी झाली कुणाला ठाऊक–मी रिंगोला हातात उचलून घेतली आणि निम्मीच्या अगदी जवळ नेऊन म्हटलं 'निम्मो–रिंगोच्या पाठीवरून हात फिरव–बघ कसे मऊ मऊ केस आहेत तिचे !' निम्मीनं भीतभीत रिंगोच्या पाठीला हात लावला मात्र टवळी भक्कन् भुंकली नी तिच्या हाताला पटकन डसली. रिंगोसुद्धा अगदी घातकी आहे मेली. नाही तरी ही पॉमंजात बाईटच. उलट्या काळजाची. मग निम्मीनं जे भोकांडं वसलं–गप्पच होईना काही केल्या. मी तिला पटकन् उचलून कडेवर घेतलं आणि 'नाय् ग बाई माझी

शाणुली ती–तुला काय देऊ–कॅडबरी ?' असं म्हणत तिला बागेत घेऊन आले–तेव्हा कुठे स्वारी रडायची थांबली. बलूनं धावतच जाऊन कोपऱ्यावरच्या इराण्या-कडून कॅडबरी आणलं. नाही तरी त्याला स्वतःला हवंच होतं. तेव्हा जी काही खुलली निम्मीची स्वारी–माझ्या खांद्यावर मान टाकून कॅडबरी मजेत चघळीत राहिली. तिच्या मऊ रेशमी पिंगट केसांचा माझ्या मानेला–गालाला सुखदसा स्पर्श होत राहिला. तिच्या अंगाला लावलेल्या बेबी टॉल्कम पावडरचा सूक्ष्म मधुर गंध तिच्या भोवती दरवळत होता. माझ्या खांद्यावर मान टाकून ती चॉकोलेट चघळतच होती. खाता खाता तिच्या ओठाला लागलेलं चिकट चॉकोलेट माझ्या गालाला लागलं.

'शीः माझं अंग चिकट केलंस बघ', मी लटक्या रागानं तिला म्हटलं.

ती गीड्गीड् हसतच राहली.

'आता हस्तेस नाही का लबाडे! मुलीच्या जातीनं असं लबाड असलं नाही पाहिजे. मुलगी कशी शहाणी हवी. सकाळी उठून काय काय केलं छोनीनं ?'

'दात घासले. कोको घेतला. आंघोळ केली'

'इतक्या लौकर ?'

'हुं ऽऽ' (माना डोलावीत)

'म्हणजे फारच शहाणी आहे म्हणायची छोनी'

पुन्हा गिड्गीड् हसणं.

'फूल पाहिजे फूल ?'

बागेतल्या विलायती तगरीचं एक नाजुकसं पांढरं फूल मी तिच्या हातात दिलं. तिनं वास घेऊन 'छानै' म्हटलं.

'हात् वेडे ह्या फुलाला वास नसतो काही.'

पण ते बिनवासाचं फूल हुंगतानाही तिचे डोळे किती स्वप्नाळू दिसत होते. इतके स्वप्नाळू डोळे फक्त मुलींचेच दिसू शकतात.

'शाळेत काय काय शिकलीस काल ?'

'कविता.'

'मला म्हणून दाखव ?'

लगेच कोवळा कोवळा आवाज बोलू लागतो.

'परी ग परी

कोण तुझ्या घरी'

मग मी तिला खांद्यावरून उतरवून खाली सोडली. एकदम धावतच सुटली. धावताना चप्पल वाकडी झाली. नी धुप्पकन् आपटली,

'हात् वेडी'

मला वाटलं रडेल. पण पुन्हा गिड्गिड् हसली.

'आता कशी हसली ? नी मघाच काय झालं ग तुला रडायला ? रिंगो काय तुला खाते ?'

'हो, रिंगो मला खाते !' पुन्हा गिड्गिड् हसणं.

थोडा वेळ खेळून निम्मी विनूबरोबर निघून गेली. तिची बालिश बडबड मी आठवून आठवून किती वेळ तरी स्वतःशी हसत राहिले. जराश्यानं केव्हातरी रमाचा फोन आला.

'गेले का साहेब ऑफिसात ?' नेहमीप्रमाणे पाहिला प्रश्न.

'हो, आत्ताच !'

'मग बडबडायला हरकत नाही.'

'का ग ? ते घरात असले म्हणून काय झालं ?'

'अग तुला एक विलक्षण गोष्ट सांगायचीय.'

'काय ?'

आमच्या शेजारी ते फडके राहतात ना तुला माहीतय् ते. अनाथाश्रमाच्या मंडळावर आहेत ते. त्यांच्या घरी कालपासून दोन मुलं आणून ठेवलीयत. दोन्ही मुलीच आहेत. एक तर अगदीच तान्ही आहे आणि दुसरी अडीचतीन वर्षांची आहे. तान्हीय ना ती. म्हणे आश्रमाच्या दाराशी कुणीतरी आणून टाकली होती. अन् दुसरीची आई फटपाथवर रहात होती. ती मेली म्हणे. तर ह्या दोन्ही मुली एक जर्मन जोडपं आपल्या-बरोबर घेऊन जाणार आहे. काय सांगू तुला ? ती तान्ही मुलगी इतकी अप्रतिम सुंदर आहे अन् दुसरी तर इतकी समंजस आहे. कुठून इतकी समजूत आलीय ह्या मुलीला कुणास ठाऊक. जे पुढ्यात ठेवाल ते खाते. जिथं बसवाल तिथं बसते. कशाचा हट्ट नाही. काही मागत नाही. काहीही खेळणं दिलं हातात की घेऊन खेळत बसते. इतकं वाईट वाटतं पाहून म्हणून सांग. आणि ही दोन्ही मुलं परदेशात जाणार बघ. आपल्याकडे कोणीच अशी मुलं घरी आणून ठेवीत नाहीत. नी फॉरेनर्स पहा !'

खूप वेळ रमाची बडबड चालली होती. तिला सदाकाळ सर्वांचाच कळवळा असतो. अन् मुलींचा

तर विशेष. माझ्यासारखेच तिलाही दोन मुलगेच. मुली नाहीत म्हणून स्वारी घरातल्या एका मोठ्या बाहुलीचेच लाड करीत बसते. तिला रंगीबेरंगी कपडे शिवते काय, तिच्या भुऱ्या भुऱ्या सोनेरी केसांच्या स्टाईल्स करते काय–गंमतीदारच आहे रमा म्हणजे.

रमाचं फोनवर बोलून संपलं आणि एकदम आठवण झाली. मालकीणबाईंच्या सुधाला मुलगी झालीय. सुधाचे सासरे वारले म्हणून बारसं वगैरे काही केलंच नाही. शिवाय. चौथी मुलगी. मुलगी जन्मली तेव्हा सुधा ठसठसा रडली म्हणे. 'ह्याही खेपेला मुलगीच' म्हणून. सासूचा तर फारच राग झालाय. बरेच दिवस आईकडेच राहणार आहे. पटकन् पाहून यावं म्हणून भरकन् साडी बदलली, केसांवरून फणी फिरवली आणि पायाला चपला अडकवून चौथ्या मजल्यावर गेले. घरात नेमकं कुणीच नव्हतं. मालकीणबाई बाजारात गेल्या होत्या. सुधा डॉक्टरांकडे गेली होती. तिची बेबी पलंगावर गाढ झोपली होती. आंघोळ घालून, पावडर काजळ लावून अंगावर मऊ गुलाबी बेबी ब्लँकेट घालून तिला झोपवली होती. तिच्या गोंडस गुलाबी मुठी तिने छातीपाशी घट्ट आवळून घेतल्या होत्या. ओठ उगीचच पुढंमागं होत होते. मी तिच्याकडे पहातच राहिले. तेवढ्यात ती हुंदका दिल्यासारखी घशातल्या घशात चमत्कारिक आवाज काढून ओरडली. तिचा कोवळ्या गुलाबी गुबगुबीत पायावर मी अलगद बोटे फिरवली. एकदम माझ्याच अंगावर गोड शहारा उठला. किती गोड वास येत होता तिच्या अंगाचा. तान्ह्या मुलांच्या अंगाला एक मधुर परिमळ येत असतो. बेबीला मनसोक्त पाहून घेतलं नी खाली आली.

घरी आले तोच विजया येऊन बसली होतीच.

'गेल्याच आठवड्यात येणार होते. पण प्रकृती बरी नव्हती. त्यामुळे तुमची पोलकी शिवता आली नाहीत मला. आज आणली आहेत सगळी. बघता घालून? साडी मात्र अजून भरून झाली नाही पण तीही पुढच्या आठवड्यात पुरी करायला हवी. कारण...' तिनं लाजून खाली मान घातली.

तिचे दिवस भरत आले आहेत. तिची ही दुसरी खेप. पहिला मुलगा आहे. डोळ्याखाली काळी वर्तुळं पडली आहेत. चेहऱ्यावर बरीच सूज आहे. चेहरा फार फिका पडलाय. फार कष्ट करते बिचारी. नवऱ्याचा पगार पुरत नाही. घरात लहान दोघे दीर. सासू सदा आजारी. मुलगा तर आताशी दोन वर्षांचा झालाय. फार लौकर दिवस राहिले दुसऱ्यांदा. त्याच्यातच पैसे मिळवण्यासाठी कुणाचे कपडे शीव, कुणाच्या साड्यांवर भरतकाम करून दे–कुणाला बाळंतविडे करून दे–असले नाना उद्योग करत असते ही सालस पोरगी. त्यातून नवरा तरी समंजस असायला हवा होता. त्याच्याकडूनही म्हणावी तितकी चांगली वागणूक नाही. आली भेटायला की टिपं गाळून जाते, जिवाला सलणारी दुःखं उघडी करून जाते.

'कसं आहे ग घरातलं वातावरण सध्या?'

'नेहमीचंच.'

'तरी पण...त्यातल्या त्यात बरं नाही का?'

'चांगलं काही नाही नी वाईटही नाही. तेच सुख मानायचं.'

तिच्याकडे मी निरखून पाहिलं. ह्या खेपेला गरोदरपणात ही जरा लठ्ठ झालीय. चेहऱ्यावर एक प्रकारची सुस्ती आलीय. डोळे झोपाळू वाटताहेत. हिला नक्की मुलगीच होणार. मला आतून कुठून तरी वाटलं.

'तुझी ह्या वेळची लक्षणं मुलीचीच दिसताहेत.'

'इश्श', ती लाजून हसली.

'तुला नक्की मुलगीच होणार. आणि एक सांगू तुला. मुलगीच झालेली बरी. मुलावर मुलगी झाली म्हणजे ती अधिक प्रिय होते सर्वांना. आणि असं म्हणतात की मुलगी झाली की बापाचं हृदय विरघळतं. तुझ्या नवऱ्यात नक्की चांगला बदल होईल बघ!'

तिनं मला काहीच उत्तर दिलं नाही. पण तिचे डोळे मात्र पाण्यानं भरले होते.

विजया गेली आणि काळजात एकदम गलबलून आलं. त्या खेपेला मला कदाचित् मुलगीच झाली असती. माझं चुकलंच त्यावेळी. एकावर एक दोन मुलगे झाले आणि लगोलग दिवस राहिले. त्या काळात घरातही फार असंतोष होता. कौटुंबिक वाद माजले होते. माझं तर डोकंच ठिकाणावर नव्हतं त्या काळात. एकदम ठरवलं–नकोच हा त्रास पुन्हा. सगळी धडपड–सगळे कष्ट मीच का करायचे? पण माझं चुकलंच. ती नक्की मुलगीच होती. जन्माच्या उंबरठ्यावर ती उभी असतानाच मी तिच्या येण्याचा दरवाजाच बंद केला. कुठल्या

अज्ञात काळोखात ती भिरकावली गेली असेल. त्या काळोखात अजून तिचा आत्मा न जन्मल्याच्या दु:खानं तळमळत भिरभरत असेल का ?

*   *   *

असं काय झालंय आज. झोपच का येत नाही अजून. तीन वाजून गेलेत. साडेतीन आता वाजतीलच. कुठे तरी कावळा आर्तपणे आरेडतोय. खुळघाला वाटतंय बहुधा उजाडलंय. कदाचित् चंद्र आता पश्चिमेकडे झुकू लागला असेल. मध्यरात्रीच्या मावळू लागलेल्या अंधारात हा चंद्रप्रकाश कधी कधी पहाटेच्या उजेडासारखा भासतो नी कावळे फसतात. कावळा ओरडतोय् नी छातीत उगीचच धस्स झालंय. कोण यायचंय आज ? कुणीतरी...नक्की कुणीतरी आपल्याकडे येणार आहे. आजच... त्या कोपऱ्यात तिथं काय हललं ? कोण आहे तिथं ? कुणी बसलंय का ? कोण ? एखादा प्राणी घरात आलाय् का ? माझे हातपाय एकदम थरथरायला लागतात. मी बिछान्यावर ताडकन् उठून बसते. घशाला भयंकर कोरड पडलेली असते. 'पाणी... पाणी' किंचाळते. पण माझ्या तोंडून शब्दच फुटत नाहीत. त्या कोपऱ्यात बसलेलं ते कुणीतरी किंचितशी हालचाल करू लागतं. मी धीर धरून उठते आणि दबकत दबकत तिथवर जाते. खिडकीतून जमिनीवर पसरलेल्या चांदण्यांच्या शुभ्र पट्ट्यात मला दिसतं—ती आहे एक दुपट्ट्यावर मजेत पडलेली, हातपाय उडवून आनंदात खेळणारी तान्ही मुलगी. मी धावतच तिच्याजवळ जाते आणि तिला हलकेच दोन्ही हातांवर उचलून घेते. ती माझ्याकडे टक लावून पहाते. चांदण्यांच्या नितळ मंद प्रकाशात तिची गोरी कोमल त्वचा किती मुलायम दिसतेय. मला पाहून ती गोडसा हुंकार देते आणि किंचित् हसते. मग 'हुं' 'हुं' करून घुमायलाच लागते. आश्चर्य आहे ! ही मुलगी कुणाची ? ही इथं कशी आली. मी 'ह्यां'ना हाका मारते. पण 'हे' मुळी बिछान्यावरच नसतात. अय्या ! मग 'हे' गेले तरी कुठं.

मी बलूला नी बाबाला हाका मारू लागते. दोघेही डोळे चोळत लगेच उठून हजर होतात. 'बलू, बाबा, अरे ही मुलगी इथं कशी आली ? ही कुणाची मुलगी !'

'आता आपल्याला काय माहिती ?'—बलू.

'मला वाटतं, बहुधा ही चंद्रा वरून आली असेल'—बाबा.

'चल, थापा देऊ नका उगीच.'

'आई—हिला तेल लावून आंघोळ घालू या का आपण ?'—बलू.

'इतक्या रात्री ? थंडी होईल ना तिला !'

'रात्र कुठाय ? आता तर उजाडलंय !'

मी मान वर करून बघते. खरंच की ! चांगले सात वाजले असावेत. इतक्या लौकर उजाडलं कसं.

मग मी मुलीला पांघरुणात गुंडाळून बिछान्यावर ठेवले. भराभरा पाणी काढते. वाटीत तेल घेते आणि तिला दोन पायांवर घालून तिच्या अंगाला भरपूर तेल माखते. ती आपली सारखी हसतेच आहे. हात पाय उडवून खेळतेच आहे. हिला रडणं कसं ते जणु माहीतच नाही.

'अरे पण ही मुलगी आहे तरी कुणाची ? आता करायचं काय ?'

'आपणच आता हिला ठेवून घेऊ.'—बलू आणि बाबा.

'खरंच रे—आपण हिला ठेवून घेऊ. आणि हिचं नाव काय ठेवू या रे ?'

'तूच ठरव'—बलू.

'गोड गोड नाव ठेव'—बाबा.

'मीनल...मीनल नाव ठेवू या तिचं.'

'मीनल—छानै' बलू आणि बाबा. मीनलला मी गरम पाण्यानं नाहू घालते. मऊश्या टॉवेलनं तिचं अंग पुसून कोरडं करते. अंगाला नी तोंडाला पावडर लावते. डोळ्यात काजळ घालते. काजळ घालतानं बेटीनं हुं की चुं सुद्धा केलं नाही. कमाल आहे पोरीची. भलतीच सहनशील आहे. निळ्या फुलांचा मलमलचा मऊसूत फ्रॉक तिच्या अंगावर मी चढवते.

'हिला जरा खेळवा रे—मी दूध आणते तिचं गरम करून.'

दूध घेऊन परत येते तो मीनल उठून बसलेली.

'अरे—इतक्या लौकर ही उठून कशी बसली ? आणि गधड्यांनो तिचे हात काय ओढताय ? रडेल ना ती !'

वलू तिचा हात ओढतोय नी बाबा तिला गुदगुल्या करतोय. पण मीनलं फक्त हसतेय. तेवढ्यात बाबा तिला उचलतो नी दोन्ही हातांनी हवेत उंच फेकतो. ती विचारी हुं की चुं करीत नाही. सगळे हाल मुकाटंयानं सोसते. मी धावरून ओरडते—

'बावड्या—गधड्या— तुला काही दयामाया दिलीय् की नाही देवानं—अरे तिचे हातपाय कोवळे आहेत—काहीतरी करून ठेवशील तिला. पुरुषाची जात मेली क्रूरच. राक्षस कुठला !'

बाबाच्या हातून मी तिला अलगदपणे ओढून घेते आणि तिच्या तोंडात दुधाची वाटली देते. दोन्ही हातानी वाटली वाटली धरून ती बसल्या बसल्या हळुहळू शांतपणे सगळं दूध पिऊन टाकते.

'ज्यालं !' ती मला मान डोलवून सांगते.

'अरे, ही बोलायलाही लागली—बघा, कशी शहाणी आहे. नाहीतर तुम्ही कधी दुधाची वाटली रिकामी करीत नव्हतात. रोज दुधाचा नास करायचे तुम्ही दोघेही.'

'आई, आम्ही आता बाहेर जातो खेळायला.' —वलू नी बाबा.

'अरे हिला जरा सांभाळा. मला आता स्वयंपाक करायचाय.'

'आम्ही नाही जा.'

'आता कसं करू ? घरात तर खेळणं नाही.'

मग मी एक वाटी नी चमचा आणून मीनलपुढं ठेवते आणि एका जुन्या टॉवेलची गुंडाळी करून तिच्या मांडीवर ठेवीत तिला म्हणते.

'ही मुन्नीची डॉली. आता हिच्याशी खेळायचं. तिला दू दू पाजायाचं.'

मीनल शहाण्यासारखी मान डोलावते. मीनलला तशीच खेळत टाकून मी स्वयंपाकघरात जाते. घाईघाईत डाळ शिजत लावते, कणिक मळते. तांदुळ निवडून घेते, भाजी चिरून फोडणीला टाकते. हां हां म्हणता अर्धा स्वयंपाक होतोही. मीनल काय करतेस हे बघायला मी बाहेरच्या खोलीत डोकावते. स्वारी बाहुलीला मांडीवर घेऊन तिला थोपटतेय, तिच्याशी काहीतरी बोलतेय. किती शहाणी, किती समंजस मुलगी. केव्हापासून एकटी खेळतीय. मगा बराच वेळ वाटीवर चमचा आपटून खेळली. आता बाहुलीत रमलीय स्वारी. कुणी कुणी हिला नको. स्वतःच स्वतःला रमवतेय, खेळवतेय. स्वतःच स्वतःला पुरेशी आहे. हिच्याशी बोलू की नको ! नाहीतर मला पाहून काही तरी हट्ट करील. वरी आपल्याच नादात आहे. तितक्यात तिचं लक्ष माझ्याकडे जातं. दोन्ही हातांनी बाहुली—म्हणजेच टॉवेलची गुंडाळी उचलून ती मला दाखवते नी खुदकन हसते.

'भूक लागली पपीला ?' मी विचारले.

ती मानेनंच 'नाही' म्हणते आणि पुन्हा बाहुलीला थोपटत राहते. मी गडबडीनं स्वयंपाकघरात येऊन मीनलसाठी मऊ भात शिजवते. एका ताटलीत मऊ भाताचं गुरगुट कालवून तिच्याकडे पुन्हा धावते. ती जमिनीवर लोळतेय आणि छातीवर बाहुलीला धरून 'गुं' 'गुं' असं काहीतरी मजेदार गुणगुणतेय.

'मीनु बाळा, चला, आता जेवी जेव करा' मीनलला हलकेच बाहुलीला छातीशी धरून उठवते आणि तिला आपल्या मांडीवर ठेवीत 'हिला आधी भरव' असं मला खुणेनं सांगते.

'एक घास बाहुलीचा—एक घास मिनूचा' असं करीत मी मीनलला एकेक घास भरवते. ती मटा मटा अगदी चवीनं जेवते. तिचं तोंड धुवून झाल्यावर 'तू जा' असं मला सांगते. मी स्वयंपाकघरात येऊन पोळ्या नी कोशिंबीर करून घेते. पुन्हा पुढल्या खोलीत येते तो मीनल जमिनीवरच अंग टाकून बाहुलीला कुशीत घट्ट घेऊन झोपली आहे. मी तिला हलकेच उचलून पलंगावर ठेवते. संथ श्वासोच्छ्वास करीत ती गाढ झोपलीय. किती शहाणं मूल. बाहुली हातात नाही तरी पण जे आहे त्याला बाहुली मानून खेळतंय. हे कोण, कुठलं मूल ! हे माझ्या घरी कसं आलं ? इतक्या अल्पावधीत ह्यानं माझ्या जिवाला इतका जीव कसा लावलाय ? माझ्या घरात ते इतक्या भराभरा वाढतंय कसं ? मिळेल त्यात आनंद मानतंय कसं ? मीनल...मीनल... नाव सुद्धा मला नेमकं हेच का सुचावं ? मी मीनलकडे भारल्यासारखी पाहते. तिचे कमळासारखे सुंदर विशाल डोळे मिटले आहेत. लांबसडक काळ्याभोर पापण्या गालावर विसावल्या आहेत. चिमुकले ओठ झोपेतही हळूवारसं हसताहेत. मीनल...माझी मीनल... हे काय पण ? खिडकीतून संध्याकाळची मावळती उन्हं कशी एकाएकी आत आली आहेत ? मीनलच्या अंगावर

एकदम एक मंद सोनेरी उन्हाचा पट्टा पसरतो. ती हलकेच जांभई देत उठते. अय्या! ही तर आठ नऊ वर्षांची दिसायला लागलीय एकदम. लाल जरी काठाचा जांभळया खणाचा सुंदरसा परकर पोलका नेसलीय. ती घटकन् उठून बसते आणि पलंगावरून टुणदिशी उडी मारून खाली उतरते. धावतच खिडकीकडे जाते नी मावळत्या सूर्यप्रकाशाकडे पहाते. तिचे निळसर डोळे कमालीचे स्वप्नाळु दिसताहेत. त्या डोळयांतूनच जणु सोनेरी ऊन पाझरतंय.

'मीनल...मीनल...काय बघतेस बेटा?' मी तिला विचारते.

ती माझ्याकडे नुसतीच बघत राहते. तिच्या शांत, समंजस, सोशिक चेहऱ्यावर हलकेच स्मिताची एक कोवळी लाट झुळझुळते. ती खिडकीपाशी जाते आणि बाहेर डोकावून पाहते.

'मीनल कुठं चाललीस तू?'

ती काहीच उत्तर देत नाही. तितक्यात बलू नी बावा हुंदडतच बाहेरून येतात. ती 'हुईsss' असं करून ओरडतात. मीनलकडे धाव घेतात मीनल दचकते. तिचा एकदम पुढं तोल जातो......

'कारटयांनो–कशाला ओरडलात–अरे ती खाली पडली...मीनल...मीनल...' मी धावतच खिडकीकडे जाते आणि खिडकीच्या बाहेर डोकावते. वापरे बाहेर सोनेरी उन्हाची नी करडया रंगाच्या धुक्याची एकच सरमिसळ होऊन त्या चमत्कारिक प्रकाशाची एक खोल, रुंद दरी नजर पोचणार नाही इतकी दूर, इतकी खाली खाली पसरलीय आणि मीनल कुठं दिसतच नाही. फक्त एका निळया रंगाचं चिमुकलं फुलपाखरू इवलाले पंख झुलवीत त्या दरीत उडतंय... उडता उडता दूर दूर जातंय...दिसेनासं होतंय...

'मीनल...मीनल...' मी हुंमसाहुमशी रडू लागते. डोळयातून भरभरून अश्रू वाहू लागतात. पुढं झेप घ्यावाशी वाटतेय. पण घेता येत नाही. मीनलला घट्ट धरून ठेवावंसं वाटतंय पण धरता येत नाही. हात असून ते हलत नाहीत. जिवंत असून मी मेले आहे. इच्छा असून मला तिच्यापर्यंत पोचता येत नाहीय्. 'आई, ऊठ ना...ऊठ ना...किती झोपणार आहेस आज?' बावा मला ढकलून ढकलून उठवतो.

'अग सात वाजून गेलेत. ऊठ. आमचा सगळयांचा चहा झाला सुद्धा.'

मी डोळे उघडते. उघडता उघडत नाहीत. पापण्या जड झाल्यायेत.

'नको रे उठवूस मला...कशाला ढकलताहेत मला...मला झोपू दे...झोपू दे मला.'

मी डोळे उघडते. गालांना हात लावते. तो ते अश्रूंनी भिजलेले असतात. मीनल...मीनल...आत कुणीतरी सारखं हाका मारतंय. झोपेत होते तेव्हा ती दिसत तरी होती. पण आता पाण्यात साखर विरघळावी तशी मीनल एका गूढ, अनाकलनीय विश्वाच्या पोकळीत विरून गेली आहे. आता ती पुन्हा कशी दिसणार? पुन्हा कशी भेटणार? माझी सुंदर समंजस, सोशिक, शहाणी, कोमल, निळया डोळयांची गुणी मीनल–गेली ती मला सोडून. जिथून आली तिथंच निघून गेली. मला आता उठवलंत कशाला? मला उठायचं नव्हतं. त्या निद्रेच्या गूढ विश्वात मीनलकडेच पहात बसायचं होतं.

नाइलाजानं मी उठते. घशात हुंदके अडकलेयत. मी तशीच तोंड धुते नी जेवायच्या खोलीत येते. टेबलावर वर्तमानपत्रांचा पसारा टाकून 'हे' वाचीत बसले आहेत. माझी चाहूल लागताच माझ्याकडे मान वरही न करून बघत ते पुटपुटतात,


'उठलीस का तू?'

मी टेबलापाशी बसते. किटलीतून कपात चहा ओतते, पण चहा पीत नाही. पिऊ शकतच नाही. हुंदक्यावर हुंदके घरात धुमसताहेत. डोळे पुन्हा आसवांनी भरणाराहेतसं दिसतं. आतल्या आत आतल्या आत कुठेतरी मी गदगदून रडतेय. संपली ती झोप. संपलं ते स्वप्न. मीनल गेली. मीनल लोपली. हाताला लागली नाही तोच निसटली.

'मीनल...मीनल...ये ना.. पुन्हा येशील? पुन्हा कधी दिसशील?'

का? का झोपेतून उठवलं मला ह्या कारटयांनी. एक दिवस आणखी थोडा वेळ झोपले असते तर काय बिघडलं असतं?

□ □



॥ क वि ता ॥

काही ग्रीक कविता : कोस्तिस पापाकोंगोस

अनुवाद : सविता जाजोदिया

१. प्रकाशाच्या मागे

आकाशात जो ढग पोहतोय
फक्त पांढुरका धूर नाही
तर एक पक्षी आहे
ज्याच्या तहानेचा आकार
त्याच्या स्वतःच्या शरीरासारखा आहे
आमची इच्छा होताच
त्याची काच तडकून ढीग होतो
सडकेवरल्या
आमच्या सावल्यांवर.

कोस्तिस पापाकोंगोस हा कवी ग्रीसमधील विद्यार्थ्यांचा पुढारी असून ग्रीक सरकारने त्याला हद्दपार केले आहे. सध्या तो हॉलंडमध्ये राहतो.

२. हवा

प्रत्यंचेसारखी थरथरते
पिकल्या फळांवरून घसरते.

निद्रिस्त नगरीला
चांदण्यांवर बसवून येते
घोषणा, भित्तिपत्रकं आणि लाल फुलांचा गोंगाट
पुरात वाहून जातो.

आणि वेळ आल्यावर
हवेमुळेच
माणसाचा गळा घुसमटतो.

३. कलकत्ता

मला नाही ठाऊक
तुम्ही कधी स्पर्श केला आहे
हाताच्या कोढाला
आणि भेटला आहात त्या लोकांना
ज्यांच्या डोळ्यात
भयाच्या विहिरीचा खोलपणा आहे

आणि ज्यांच्या जखमा
फुलांवर पडलेल्या शेवाळाची आठवण करून देतात.

मला नाही ठाऊक
तुम्ही कधी
कलकत्याला सरपटताना ऐकलं आहे
आपल्या आत.

हाडं
जी प्रश्नवाचक चिन्हांनी साचेबंद झाली आहेत
आणि मरणासन्न फुपफुसांच्या हवेत
श्वास घेतात
बंडखोर पिढ्या.

तुम्हाला अपघात झाला नाही
पण तुमच्या हृदयात जणू
कुणी दारूगोळा भरला आहे
आणि विस्थापित–स्वप्नं चांदण्याच्या मीनारांवर
तुम्हाला फाशी द्यायच्या प्रयत्नात आहेत.

जागं झाल्यावर बघतोय
सूर्य निस्तेज आहे
आणि कलकत्ता अडकलं आहे
किंकाळीसारखं
वास्तवतेच्या गळ्यात.

४. काल महान

संघर्षाच्या क्षणी
आम्ही कविता लिहीत नाही
एक रानटी गीत गात
आमची हाडं विखुरतात
आणि काडतुसांचा झणझणाट
हवेत भरून जातो.

हवेत उठलेल्या पुलांवरून
आमचे हुंकार आम्हास ऐकू येतात
खालून मात्र जहाजे जात असतात.
संघर्षाच्या क्षणी
आम्ही 'तत्त्वज्ञान' वाचीत नसतो
आमच्या शरीरात आश्रय घेतात
हजारो हद्दपार सूर्य
त्यांच्या ज्वाळा दिसतात
आमच्या अस्त्रातून झेपावताना

अरे काल महान !

५. वृत्तांत

रात्रीचं शिळं शव
रक्तानं माखलेलं माझ्या डोळ्यांसमोर पडलं आहे
त्याच्या डोळ्यांत थंड आग भरलेली आहे.

हे शव
फुग्यासारखं फुगत चाललं आहे
कोणत्याही क्षणी ते फुटू शकतं
माझ्या डोळ्यांपाशी
हँडबॉंबसारखं.

मला आकाशाचा रंग बदलून टाकायचा आहे. * *

अनाथ

सदानंद रेगे

भिंतीवर लिहिलंस संडासाच्या : आई !
पाटीवर खरडलंस सूतिकागृहाच्या : बाबा !
कुठूनसा आला अकाळविकाळ हात
बोंबलत अस्ताव्यस्त केसाळ
तोबा...तोबा !

नाळ गळता गळताच
कळलं तुला कुणीही न सांगता
च्यायला या वैतागवाडीला
उगीचच घातला आपण वळसा.

आता काय...?
नुसतं इथं पायरीवर बसणं
सूर्यावरच्या वीर्याच्या डागांत
बापूस दिसला तर पुसटसा पाहून घेणं.

आई तर वहाते आहे
गटारगंगा होऊन येणाऱ्या.
वाटेतल्या लिंगांवर अभिषेक करीत. * *

ऊन

सुलभा तेरणीकर

ऊन ओंजळीत
केसात अत्तर
काल माळलेल्या फुलांच
पाणी डोळ्यात
मेघ श्वासात
रात्र मालवत्या दिव्यात * *

मनसोक्त

प्रकाश माडगूळकर

नुकते उमलून आलेले...
देठ कमळ...
सावरीत कुठे निघालीस
शिवारातून अवेळी...?
—जपून बाई,
पिकाच्या आडोशात;
लुबाडेल,
मागोमाग आलेले,
लबाड चांदणे...
मनसोक्त...

* *

वस्तुस्थिती

चंद्रकांत प्रभाकर देशपांडे

उघडया आकाशाखाली आलो बाहेर लख्ख उन्हात
आणि माझ्या रक्तपिपासेची वस्तुस्थिती हरवली...

माझ्या शर्टावरचे सगळे डाग कुठे गेले ?
क्षणभर अवाक् झालो. इकडे तिकडे पाहिले.

दूरवर लोकांनी कसली तरी रांग लावली होती.
ओरडलो, 'अरे, इकडे या, इथे काहीच नाही,

न तिष्ठता मी इथे आहे, माझा शर्ट
पहा हा प्रकाश डोळयांवर पडताच किती स्वच्छ' !

छरे मारून उष्ण तडफडते पक्षी पाडावेत
तसे माझे शब्द रांगेच्या इतस्ततः पडले.

माझे खिसे रिकामे होते. आणि डोळेही
खूप लांब मी उभा होतो. मग मी मागे पाहिले नाही.

* *

मृत्यूचे दार

सुधाकर गायधनी

येथून पुढे जायचे
बर्फाच्छादित टेकडया ओलांडतांना
रक्तरंजित सूर्याला सन्मुख होवून
हे असे बजवायचे—
हे क्रांतीच्या नारायणा
बर्फाचे पाणी कर
काळाच्या गाभाऱ्यात
एक अज्ञात गर्भ आकार घेताहे
माणसासारखा पण माणूस नसलेला
आणि तडक पुढे निघायचे
पायाखालची वाळू सरकत नाही
अशा जलप्रवाहात मुळी न थांबायचे
मेलो तरी बेहत्तर असाच संकल्प असेल
तरच पुढे जायचे
पुढे पुढे जाता जाता
थोडे थोडे थांबायचे
अफाट अंतराळातून
विराट शून्यात शिरण्यापूर्वी
मृत्यूचे फाटक बंद करायचे
कायमचे नाही रे बाबा
मृत्यूचे दार ठोठावणाऱ्यास
उघडता आले पाहिजे ना.

* *

दूरची पडशाळा

उषा मेहता

पुन्हा मावळतीकडे निघून जायला
हवंय् का मला ?
कुणाला माझ्यापासून आडोसा हवा असेल
तर जाईन मी निघून—वाऱ्यावर तरंगत,
पावसात भिजून.
मग विश्वास डळमळण्याचं कारण तरी काय ?
इथे माझ्याही भोवती, समुद्रढगांच्या
भिंती कोसळत नाही काय ?
आणि कुंडयामधली सगळी पानं, निस्तब्ध
टवकारून पाहत राहतात;
आणि कुठल्या दुरून येणाऱ्या अक्षरवेलीत
मी गुरफटून गेले की मोकळेपणी
हसू लागतात.

* *

बाजार

शरू रांगणेकर

आशा निराश झाली अंधार शोधला मी
घनदाट विस्मृतीचा आधार घेतला मी
हासून देत होती साकी भरून प्याला
ती याद विस्मराया प्यालाच फोडला मी

छेडून एकतारी झंकार सोडला मी
मुखरून शब्द माझा पडसाद शोधला मी
कोलाहली जगाच्या लोपून साद गेली
गर्दीत एकटा मी ना बंधु जोडला मी

ओढून दोन रेषा आकार मांडला मी
घेऊन स्वप्न टळते संसार मांडला मी
उत्फुल्ल पुष्पराशी लेवून विश्व सजले
कोमेजल्या कळ्यांचा बाजार मांडला मी

* *

टी. बी. झालेल्या मैत्रिणीसाठी

प्राणेश जोशी

उडत्या पक्षाला सांभाळा
पिंजरा असून निसटला

सरतं काळीज डाव तुझं
मन माझं फार माझं
सजवं काळीज डावं तुझं
सोनं माझं सारं माझं

आठव गायलेली बालपणी
माझी'तुझी व्यालेली गाणी
खूप दूर दोरा आणि
ओवायाला डोळाभर मणी

पी मघ फुलांतला
फुगव फुगा हवा हवा
फुटणार नाही, वचन तुला
काटा काढून आणलंय फुला

उडत्या पक्षाला सांभाळा
पिंजरा असून निसटला.

* *

सायंकाळचे प्रश्न

उत्तम कोळगांवकर

सायंकाळे होऊ लागलेली
या सावल्यांना कोण नेतय् फरफटत ?
पक्षांचा केवढा हा
काळीज हलवणारा किलबिलाट
कुणी उधळून लावलं त्यांना ?
हा सूर्य असा पळत का सुटला ?
का त्याने आखडून घेतलेत हात ?
आभाळ असं काळवंडत का चाललं ?
कुठे गेली ती सात रंगांची आरास ?
सर्वच असं शांत शांत का झालं ?
दूरात समुद्रावर अचानक
हे चितेसारखं काय धगधगू लागलं ?
आभाळ, झाडे, घरे कुठे निघून चालली ?
खोपटा खोपटात जाऊन
या वाटा अशा मरून का पडतायत् ?

* *

काठ

नारायण प्रल्हाद आवटी

धावणाऱ्या गर्दीत हे एक कळीदार पान उभे
ज्याचा अजाण काठ आहे थोडासा कललेला;
...तृप्तीने भरलेला.
हा कळीदार काठ कुठून कसा पहावा
... आसुसल्या रेषांना आंवर कुठे घालावा ?

* *

भिंती

सीमन्तिनी मनोहर

फक्त उदास भिंतींना
फक्त रानं पावसाळी
फक्त हताश आकाशाला
फक्त तुटके समुद्र
पाऊस सगळे सारखेच
फक्त काही झाडांची
साऱ्या ऋतूंत फक्त पानगळ

* *

कविता

अशोक बागवे

तू अशीच ओथंबून यायचीस
मी मात्र केव्हाच संपृक्त झालो नाही
हा माझा दोष असेल कदाचित
पण या दोषाचं दान मी तुलाच केलं होतं ना ?
मग माझ्या मनाचा मठ असा हिंदकळत का ठेवलास ?
नाही तरी अभाळाला कवेत घेण्याचा अट्टाहास
मातीचाच होता ना !
मग मावळतीला मिटण्याचे डोहाळे का लागले ?
का ??

* *

अस्तित्व

मेधा वसंत खानोलकर

पार सुरकुतून गेलंय् आयुष्य
(नी असल्या कवितांचाही चोथा झालाय्.)
आता खरंच जमत नाही
छातीवर त्रिकोण आवळून धरणं
नी पाय लागला की नमस्कार करणं.
एक उभा सूर्य पेटतो कधीतरी अंगात
किंवा कधीतरी एक चांदणी येऊन बसते जिवणीवरती
पण दुसऱ्याच क्षणी खांद्यावरचं कबुतर उडून गेलेलं असतं.
तरी अजून उगाच
रक्ताळ का होईना, कंदील टांगलेला दिसतो पुढ्यात
आणि भीतीने पाय खचतो वाटेवरला.
उद्या वाटेनेच जाळून घेतलं कंदिलाच्या ज्योतीवर
की मग असं अंधारात उतरणार नाही आयुष्य खाटेवरून.

* *

पदवी घेताना

अंजलि ठकार

उत्फुल्ल सोनकेळ
उराशी गच्च
गर्भरेशमी पानाची सुरळी
पदवी घेताना
लेकुरवाळेपणाची...

* *

'चलो मछंदर गोरख आया'

शिरीष गोपाळ देशपांडे

आभाळाचा तप्त मुलामा;
रात्र वितळली पोलादाची :
नभमुकुरावर थंड सांडशी
कुणी टोचली एक ढगाची :

"चलो मछंदर गोरख आया।"
ललित मुरकल्या सर्व शृंखला;
धरून बाहूंमधे पुरंध्री
संन्याशी गालांत हासला :

आक्रोशाच्या सम्राज्ञीला
कळले नाही मूक मनोगत;
हिमालयाची सशब्द शांती
नव्हती त्या मुलुखाला अवगत

विफल उसासे : स्मशानमंचक;
कशी पडावी कंपित काया
मृदुंग विव्हल यती म्हणाला,
"चलो मछंदर गोरख आया"

* *

नुक्ती नुक्तीच

शंकर रामाणी

नुक्ती नुक्तीच
मी उघडली दारे
नी शिलगावलाय माझ्या घरातला
घुस्मटगार अंधार...
आता अंबर डोळ्यांतली उत्तररात्र
पालवते आहे
एक मोच्छदर वाट,
जिथे जर्द एकांती जाणीव
ओलांडतेय
माझ्या अस्तित्वाची वेस
अ-जून अज्ञेयाची सुलाखी पहाट
पांघुरण्यासाठी...

* *

अर्घ्य

रमेश पानसे

तुझ्या सूर्यकालीन स्नेहाची फुलं उमलताहेत माझ्या सर्वांगावर.

कोवळेपणातून बाहेर पडलेली अपेक्षांची उन्हं
मध्यान्हीकडं वाटचाल करताहेत,
तोवर मन-बिन बदलून ठेव.
मध्यान्हीच्या अर्घ्यदानाला आपणा दोघांनाही सहभागी
झालं पाहिजे.

उन्हं उतरतात तसे उतरत जातात सौंदर्याचे पदर.
तुटत जातात आपल्या अस्तित्वाचे
भूगर्भाशी बांधलेले एक एक धागे.
आपल्यात गुदमरलेले आपले श्वास शाश्वत नसतात.
आत्म्याला आकाशाचं वेड लागण्यापूर्वी
नांगरून ठेवलेल्या या क्षेत्रात
पेरणी-बिरणी करायची हवी नव्यानं उगवण्यासाठी.
येवढं भान ठेवलंस तरी पुरे आहे
आजच्या घटकेच्या आशावादाला.

जजमेंट

पुरुषोत्तम पाटील

ही देहाची वळणवारी
व्हीनसच्या पुतळ्यापाहून भारी
(असे डोळे म्हणाले)

पण शाबूत असलेले हात
गळ्यात माळताना
आमचेच हात थोटे कसे झाले
ते कळले नाही.

उन्मादाला मापताना
देहावर विश्वास ठेवू नये
(असे मन म्हणाले)

अवेळी

बजरंग सरोदे

टप् टप् टप्
सरीवर सरी
माझ्या घराच्या
छपरावरी

उरावर अर्धी
रात्र काळी
झोपेत चेव
अशा अवेळी

तुळशीचे पान

दिलीप परदेशी

मिल्टनचे डोळे
वॅनगॉग्चा कान
एकलव्याचा अंगठा
मजनूची तहान
अमानुष ओझ्याखाली
माझी कललेली मान
मारावले का ग ऽ ऽ
तुझे तुळशीचे पान ?

वन्ही

वसुधा माने

रात्र संपली दिवसही सरला
उरली संध्याकाळ
ऐलही नाही पैलही नाही
पिकली रानोमाळ
कर्डुनिबाचा शुभ्र फुलोरा
झिंगे सगळी वाट
दहा दिशांचा कापुरवन्ही
जळतो अष्टांगांत

लाकडाचे पक्षी

फ. मुं. शिंदे

आकाश फिरून झाल्यावर
पक्षी घरात शिरले
भिंतीला चिकटल्यावर
परत नाही फिरले.

एका जागी बसून
खिळ्यांमध्ये फसून
पाहातं असतात वर
खरंच आपण येथून
निसटलो तर ?

कविता

विद्युत् भागवत

अशा पावसाळी संध्याकाळी
मी उदास एकटी
आठवणीत बुडण्याच्या प्रयत्नात !
आकाश ओसंडून दमलंय
ओलसर मातीची निवांत लय
गळाभर तुडुंबली आहेत झाडं
गुबगुबलेत डोंगर पहाड.
भरून आलेलं आभाळ...
असं कोसळावंच लागतं !
मातीच्या कणाकणात
असं झिरपावंच लागतं.

नरेंद्र विरचित संपूर्ण 'रुक्मिणी स्वयंवर' : आणखी एक पोथी

वि. भि. कोलते

नरेंद्र विरचित संपूर्ण 'रुक्मिणी स्वयंवर' काव्याच्या आतापर्यंत दोन पोथ्या मला उपलब्ध झाल्या होत्या. त्यांची माहिती 'युगवाणी'च्या यापूर्वीच्या दोन अंकात मी दिलेली आहे. या दोन पोथ्यांपैकी एका पोथीत १८८५ ओव्यांचे 'रुक्मिणी स्वयंवर' काव्य असून दुसऱ्या पोथीत २९३९ ओव्यांचे काव्य आहे. या दुसऱ्या पोथीच्या उपलब्धीमुळे २९३९ ओव्यांच्या नरेंद्रविरचित 'ऋक्मिणी स्वयंवरा'चे एकमेव हस्तलिखित उपलब्ध आहे या समजुतीला तडा गेला आहे. पहिल्या पोथीतील १८८५ ओव्यांच्या नरेंद्रविरचित 'रुक्मिणी स्वयंवर' काव्याचेही दुसरे एक हस्तलिखित आता उपलब्ध झालेले आहे. त्याची माहिती या टिपणात देत आहे.

१८८५ ओव्यांच्या नरेंद्रविरचित संपूर्ण रुक्मिणी-स्वयंवर काव्याची पहिली पोथी मला महंत श्री राजधरबाबा महानुभाव, संवत्सर (जिल्हा अहमदनगर) यांच्या कडून मिळाली होती. याच काव्याची दुसरी पोथी गेल्याच महिन्यात, महंत श्री नागराजबाबा महानुभाव, वाघोदे (ता. रावेर, जिल्हा जळगाव) यांच्या जवळून मिळाली. या दोन्ही महंतांचा त्यांच्या प्रसन्नतेबद्दल मी अत्यंत आभारी आहे. पहिल्या पोथीला राजधर प्रत, व दुसऱ्या पोथीला नागराज प्रत म्हणून पुढे संबोधिलेले आहे.

नवीन मिळालेल्या नागराज प्रतीच्या पोथीचा आकार १३.८ सें. मीटर × ८.५ सें. मीटर असून नेहमीप्रमाणे ती दोन जुड्यात बांधलेली आहे. पोथीची आरंभीची व शेवटची काही पाने नष्ट झालेली आहेत. पोथीच्या एका बाजूने (१) २९४ व्या ओवीपासून पुढील संपूर्ण शिशुपाळवध काव्य लिहिलेले आहे. त्यानंतर (२) दामोदर पंडितकृत वछाहरण, (३) भास्कर कवीच्या 'नरविलाप' स्तोत्रावरील मराठी ओवीबद्ध टीका, (४) 'विल्लमंगल स्तोत रासक्रीडा'–संस्कृत श्लोक; (५) भास्कर कवीकृत मराठी पूजावसर; आणि (६) विश्वनाथबासांचा ज्ञानप्रबोध (अपूर्ण) ही काव्ये लिहिली आहेत. दुसऱ्या बाजूने सुरदात करून प्रथम (१) नरेंद्र विरचित संपूर्ण रुक्मिणी स्वयंवर.––१९२ ते ११२६ ओव्या–लिहिले आहे. त्यानंतर (२) 'भाशा चित्रविचित्रार्थ श्रीकृष्ण-गुणवर्णन' 'कवि दामोदरेणोक्त चवादिकूंजर केशरी–' ३० श्लोक. आणि त्यानंतर (३) नरेंद्र विरचित रुक्मिणीस्वयंवराच्या 'उमेशंकराचा कुमरू–' या पहिल्या ओवीपासून ५६२ ओव्या. ही काव्ये लिहिली आहेत. दोन्ही बाजूंनी लिहिलेल्या ग्रंथांचे हस्ताक्षर स्वच्छ, सुंदर व वळणदार आहे.

पोथीच्या दुसऱ्या बाजूने लिहिलेल्या नरेंद्र विरचित संपूर्ण रुक्मिणी स्वयंवराची त्रोटक माहिती येथे देतो. आरंभीची पाने फाटल्यामुळे यातील पहिल्या १९१ ओव्या नष्ट झाल्या आहेत. १९२ पासून शेवटपर्यंतच्या ओव्या उपलब्ध आहेत. यातील 'असो हे तया प्रमयाची गोडी : तोचि एकू जाणे फुडी : मग दर्शन केले दडवादडी : श्रीचरणेसी' ही १९३ वी ओवी म्हणजे राजधर प्रतीतील १०७७ वी ओवी होय. नागराज प्रतीतील १९३ व त्यानंतरच्या ओव्या आणि राजधर प्रतीतील १०७७ व त्यानंतरच्या ओव्या स्थूल मानाने सारख्याच आहेत. नागराज प्रतीतील काव्याची एकूण ओवीसंख्या १०२७ आहे, तर राजधरप्रतीतील ओवीसंख्या १८८५ आहे. याचा अर्थ असा की नरेंद्राच्या एरवी उपलब्ध असलेल्या अपूर्ण रुक्मिणी स्वयंवराच्या ८८६ ओव्या वगळून संपूर्ण काव्याचा पुढील भाग तेवढा नागराज प्रतीत लिहिलेला आहे. ८८६ + १०२६ = १९१२ अशी ही एकूण ओवीसंख्या येते. म्हणजे स्थूल मानाने राजधर प्रतीतील ओवीसंख्येपेक्षा २७ ओव्या नागराज प्रतीत

ज्यास्त आहेत. त्यांची संगती शोधपूर्वक लावली पाहिजे. तथापी, आरंभीच्या ८८६ ओव्या वगळून पुढील भाग तेवढाच या पोथीत लिहिला आहे, आणि त्याला स्वतंत्र क्रमांक दिले आहेत ही गोष्ट अत्यंत सूचक वाटते. नरेंद्राच्या अपूर्ण रुक्मिणी स्वयंवराचा पुढील भाग स्वतंत्रपणे पण नरेंद्राच्या नावावर लिहून तो ग्रंथ पूर्ण करण्याचा कोणी तरी प्रयत्न केलेला असावा असे त्यावरून सूचित होत असावे, असे वाटते.

नागराज प्रतीतील या काव्याच्या शेवटी आलेला समाप्तिलेख पुढील प्रमाणे : ' शुभं भवतु लेंखक पाठकयो वाचिता विजया हो ।। * ।। * ।। शके १५९ सर्वजीत नाम संवछरे शुक्रवारे आश्विनमासे वधि द्वादशी ग्रंथु संपूर्ण माह ।। * ।। पटवर्द्धन येल्हराजसूतें मुनि नागेंद्रे लिहिलें तयाचीच पोथी ।।१११०२७।। '

या समाप्तीलेखातील शक निर्दिष्ट करताना कोणतातरी आकडा गळालेला आहे. या पोथीतील इतर काव्यांच्या शेवटी आलेल्या समाप्तिलेखातही तो सर्वत्र गळालेला आहे; सर्वजित संवत्सर मात्र सर्वत्र उल्लेखिलेला आहे. सर्वजित संवत्सर गतशक १५०९ आणि १५६९ ला येतो. तिथिवाराच्या दृष्टीने १५६९ हा शक पिल्ले जंत्रीप्रमाणे बिनचूक ठरतो. तेव्हा तोच गृहीत धरण्याला हरकत नाही. या दिवशी इंग्रजी तारीख १५ ऑक्टोबर १६४७ ही येते. म्हणजे स्थूल मानाने राजघर प्रतीहून प्रस्तुत नागराज प्रत ही ३३ वर्षांनी जुनी आहे. प्रस्तुत संपूर्ण रुक्मिणी स्वयंवराचा लेखनकाळ ठरविण्यास ही माहिती बरीच उपयोगी पडेल.

□ □

साभार पोच

अमेय प्रकाशन, रूईकर पथ, नागपूर २.

(१) **असंच आणि इतकंच** (नाटक)
लें. श्रीनिवास भणगे
पृष्ठे ६९ किं : ५ रु.

(२) **दंबद्वीपचा मुकाबला** (नाटक)
ले. विजय तेंडुलकर
पृष्ठे ९४ किं. ८–५० रु.

(३) **व्यक्ती तितक्या प्रकृती** (नाटक)
ले. पद्माकर गोवईकर
पृष्ठे : ८४ किं. ९ रु.

(४) **ऐक जनमेजया !** (नाटक)
ले. आद्य रंगाचार्य
अनु. पद्माकर गोवईकर
पृष्ठे ६४ किं. ९ रु.

(५) **पोपटपंची** (विनोदी कथा)
ले. पद्माकर गोवईकर
पृष्ठे : १२० किं. १० रु.

(६) **वारा वाजे रुणझुणा** (ललितलेख)
ले. चिं. त्र्यं. खानोलकर
पृष्ठे ३१२ किं. १० रु.

(७) **उत्तररात्र** (कथा)
ले. ना. व्यं. देशपांडे
पृष्ठे : १२५ किं. १० रु.

नॅशनल बुक ट्रस्ट, ऑफ इंडिया, नवी दिल्ली.

(८) **कथा भारती** : तामिळ कहाण्या
संपा : मी. पा. सोमसुंदरम्
अनु : श्रीपाद जोशी
पृष्ठे २१२ किं. ५ रु.

(९) **श्वेतरक्त** (कादंबरी)
ले. नानकसिंह
अनु : डॉ. उर्मिला जावडेकर
पृष्ठे : १८५ किं. ५ रु.

(१०) **कवी** (कादंबरी)
ले. ताराशंकर वन्द्योपाध्याय
अनु : सौ. अरुणा नगरकर
पृष्ठे २०० किं. ५ रु.

(११) **अंधारयात्रा** (कादंबरी)
ले. प्रल्हाद पांढारकर
प्रकाशक : मंजू प्रकाशन, नागपूर.
पृष्ठे : ४९ किं. ३–५० रु.

टिपणे

द. भि. कुळकर्णी

स्नेहांकिता

'स्नेहांकिता' ही स्नेहप्रभा प्रधान यांच्या भावजीवनाची आत्मकथा आहे.

या भावजीवनात केंद्रस्थान लेखिकेच्या मनालाच आहे. हे मन कसं आहे? आत्मलुब्ध. स्वतःची बुद्धी स्वतःच्या सात्विक भावना यांवर हे मन लुब्ध झालं आहे. स्वतःवर लुब्ध व्हावं असे अनेक गुण या व्यक्तित्वात आहेतच: **रूप**. ग्रंथाच्या प्रारंभी प्रधानबाईंची छायाचित्रे आहेत. ती बाईंच्या रूपाची कल्पना देतात. विशेषतः 'दिनरात'मधील डॉक्टरच्या भूमिकेतील त्यांचे चित्र मोहक आहे. **अभिनय**. हिंदी–मराठी चित्रपटांत आणि नाटकात बाईंनी महत्त्वाच्या भूमिका केल्या; व एक काळ गाजविला. **बुद्धी**. ती तर माता–पित्यांकडूनच त्यांना जन्मजात लाभली होती; वैद्यकीय अभ्यासक्रम त्यांनी सुरू केला होता; त्यातली त्यांची प्रगती समाधानकारक होती; या आत्मकथेत त्यांनी जीवनविषयक जे जागोजाग उद्गार काढले आहेत त्यांतून व विशेषतः स्वतःची 'केस' मांडण्याच्या त्यांच्या प्रयत्नातून त्यांची बुद्धिमत्ता दिसून येते. **सात्विकपणा**. आई आणि डॉक्टर शिरोडकर यांच्यावरचे त्यांचे उत्कट प्रेम. एवढेच नव्हे तर इतरांना, सर्व व्यावहारिक सावधगिरी दूर सारून, त्यांनी केलेले साह्य. हे गुण माणसाला आत्मलुब्ध करायला पुरेसे आहेत. जगताना अशी आत्मलुब्धता अनेकदा उपकारकही ठरते: निराशा, न्यूनगंड यांपासून संकटकाळी ती माणसांचं रक्षण करते.

पण ही आत्मलुब्धता आत्मलेखनाला उपकारक ठरत नाही. कारण आत्मलेखनात स्वतःच्या आयुष्याचा आस्वाद अपेक्षित असतो; आस्वादप्रक्रियेस ही आत्मलुब्धता मारक ठरते आस्वादासाठी आप–पर–तटस्थभाव सोडून आस्वादविषयामध्ये अनुप्रवेश व्हावा लागतो. जगणारा माणूस आजच्या आस्वाद घेणाऱ्या माणसापेक्षा वेगळाच होता; तो सुटा–एकाकी नव्हता–त्याच्या अवतीभोवती कौटुंबिक–सामाजिक इत्यादी शक्ती कार्यप्रवण होत्या; तो कशाच्या केंद्रस्थानीही नव्हता; एका आदिअंत नसलेल्या जीवनपटातील तो एक ताणा वा बाणा होता हे आत्मकथाकाराला समजणे आवश्यक असते.

प्रधानबाईंनी ही आत्मकथा लिहिली ती स्वतःला केंद्रस्थानी कल्पून, स्वतःवर लुब्ध होऊन, कौटुंबिक–सामाजिक इत्यादी व्यक्तिजीवनाचाच विस्तार असणाऱ्या शक्तींना पुरेसे न ओळखून.

त्यांना त्यांची–शिरोडकरांची स्नेहकथा सांगायची होती, हे ठीकच आहे; या स्नेहकथेला केंद्रस्थान मिळावे या पद्धतीने आत्मकथा लिहिली गेली हेही ठीकच झाले. पण बाईंचे डॉक्टरांवरील विषयनिरपेक्ष उत्कट प्रेम–त्याला उभयांगी वात्सल्याची मिळालेली जोड; आणि डॉक्टरांचे व्यवहार आणि भावना यांच्या कचाट्यात सापडलेले प्रेम–यांचे संपूर्ण दर्शन घडण्यासाठीच या स्नेहकथेला इतर अनेक परिमाणे मिळणे फार आवश्यक होते: आपल्याला वडिलांचे प्रेम मिळाले नाही व आपल्याला मातृत्वही लाभले नाही म्हणून आपली डॉक्टर शिरोडकरांविषयीची स्नेहभावना पिता–कन्या व माता–पुत्र अशी संमिश्र होती असे बाईंनी पुनःपुन्हा म्हटले आहे.

अनुक्रमणिका

ठीक आहे. पण मग यासाठी आपल्या पित्याचे चित्रण, या संदर्भात, व्हावयास हवे होते. ते कुठेच नाही. मातृत्वाचे सुख मिळविण्यासाठी शिरोडकरपूर्व काळात आपण कोणकोणते व्यावहारिक व भावनिक प्रयत्न केले ते यावयास हवे होते. गर्भपाताची सूचना किंवा कुत्र्यांवरील लोभ हे संदर्भ फारच त्रोटक आहेत. शिरोडकरपूर्व काळात बाईंच्या अतृप्त, उत्कट वात्सल्यभावनेचे दर्शन कुठेच घडत नाही; डॉक्टरी पेशाचे त्यांचे आकर्षणही वात्सल्य-भावनेचे दर्शन घडवू शकत नाही. उलट असे दिसते की पित्याचे नाही तरी मातेचे वात्सल्य त्यांना पूर्वायुष्यात पुरेसे मिळालेले आहे.

शिरोडकरपूर्व काळाकडे पाहिले तर असे दिसते की दोनदा विवाह करूनही बाईंना कोणत्याच अर्थाने वैवाहिक सुख अजिवात मिळाले नाही. एका पतीशी तर त्यांचा एकदाही शरीरसंबंध आलेला नव्हता; स्त्री–पुरुषामधील प्रणयसुखालाच त्या मुकलेल्या होत्या. त्याबाबतीत विकृती वाटावी अशी नावड त्यांच्या मनात होती असेही दिसत नाही; म्हणजे कुठल्याही तरुण जीवाची असावी तशी ती त्यांची नैसर्गिक गरज होती. बाईंनी या आपल्या गरजेचे कुठेही चित्रण केलेले नाही. त्यांना जी स्नेहकथा सादर करायची होती तिच्या संदर्भात हे चित्रण फार साभिप्राय होते. शरीरातून उत्पन्न होणाऱ्या पण त्याच्या फार पलीकडे जाणाऱ्या या प्रणयभावनेचे त्यांनी कसे शमन केले? कसे उन्नयनीकरण केले? की दमन केले? हे समजल्याविना त्यांची वासनारहित स्नेहकथा अपुरी राहते; अपुरीच नाही तर आत्मविसंगत देखील.

आत्मचरित्रातील अनुभवाचा प्रामाणिकपणा कसा जोखायचा हा वाचकांपुढे मोठा प्रश्न असतो. आत्म-चरित्रकारावर पूर्ण विश्वास ठेवूनच वाचक आत्मचरित्र वाचावयास घेतो. लेखनपूर्व आत्मनिष्ठा हे आत्मचरित्राचे गृहीतकृत्य तो मानीत असतो. पण आत्मचरित्रातील अनुभवामध्ये आत्मसुसंगती नसली म्हणजे वाचक साशंक होऊ लागतो. आत्मचरित्रातील अप्रामाणिकपणा जोखण्याचा एवढाच मार्ग त्याच्यापाशी असतो. हा अनुभव आत्मसुसंगत आहे की नाही?—हा प्रश्न स्वत:ला विचारणे.

'स्नेहांकिता'मधील अनुभव आत्मसुसंगत नाही हे स्पष्ट आहे. त्याचे दुसरे उदाहरण डॉक्टर शिरोडकर व त्यांच्या पत्नी कमलाबाई यांचे चित्रण. बाईंनीच म्हटल्याप्रमाणे डॉक्टर शिरोडकरांभोवती सुंदर—आणि—तरुण स्त्रिया सदोदित वावरत होत्या; व त्यांच्या म्हणजे डॉक्टर शिरोडकरांच्या स्त्रीविषयक वर्तनाकडे त्यांचे मित्र दुर्लक्ष करीत होते व त्यांची पत्नी त्याबाबत संशयी होती. डॉक्टर शिरोडकर आपल्या भोवतीच्या स्त्रियांशी वासनाजन्य संबंध ठेवत असतील तर तसा प्रयत्न त्यांनी प्रधानबाईंच्या संदर्भात जरूर केला असेल; बाई सुंदर होत्या, एकाकी होत्या, नटी होत्या, अतृप्त आणि उत्कटही होत्याच. प्रारंभी तरी डॉक्टर शिरोडकरांना त्यांच्याविषयी प्राथमिक वैषयिक आकर्षण वाटले असेल; त्या दृष्टीनेच त्यांनी संबंध वाढू दिले असतील—वेगळी खोली भेटीसाठी घेण्याचा त्यांचा सल्ला या दृष्टीने सूचक आहे. असे असेल तर त्यांनी, प्रारंभकाळात बाईंच्या दृष्टीने, अतिक्रमणही केले असेल. बाईंचा आणि त्यांचा वैषयिक संबंध नव्हता या बाईंच्या कथनावर वाचक अविश्वास ठेवत नाही; पण त्याला प्रश्न पडतो की 'तसे' शिरोडकर हळूहळू पण निश्चयाने 'असे' शिरोडकर कसे झाले? तो त्यांचा मानसिक प्रवास या स्नेहकथेतील अत्यंत महत्त्वाचा घटक असणार. तो इथे संपूर्ण अनुपस्थित आहे. या उदात्त मैत्रीमुळे त्यांना वासना कमी महत्त्वाची वाटायला लागली का? की इतरत्र वासना भागवून आपल्या जीवनाचा 'उदात्त' कोपरा त्यांनी बाईंच्या स्वाधीन केला होता? ही उदात्तता हीदेखील एक चैन होती की तो त्यांच्या व्यक्तित्वातील सर्वस्पर्शी बदल होता? या प्रश्नांनी वाचक हैराण होतो. पण त्यांची उत्तरे इथे कुठेच मिळत नाहीत; व मग इथला अनुभव अपूर्ण आणि आत्मसुसंगतिरहीत आहे असे त्यास वाटू लागते.

हाच प्रकार कमलाबाईंच्या चित्रणाबाबतही. डॉक्टर शिरोडकर व प्रधानबाई यांच्या खुल्या संबंधांच्या आड कमलाबाईंचा संशयीपणा येत होता; शिरोडकर त्याला घाबरत होते. आपल्या मोलाच्या संबंधाच्या आड जी व्यक्ती अखेरपर्यंत येत राहिली तिच्या प्रतिक्रियांचा यापेक्षा अधिक व्यापक शोध आवश्यक होता—त्याविना ही स्नेहकथा एकतर्फी समर्थनासारखी वाटू लागते. कमलाबाईंच्या संशयीपणातून त्यांच्या स्वभावाइतकेच शिरोडकरांचे

वर्तनही प्रतिबिंबित होत नाही का ? त्यामागे प्रधानबाईंचे पूर्वायुष्य आणि त्यांचे नटीपण भरीला आहे का ? या प्रश्नांची उत्तरे बाईंनी दिलेली नाहीत. टेलिफोनवरील धमक्या आणि शिरोडकरांची भीरुता हे उल्लेख, या संदर्भात, साभिप्राय न होता कमलाबाई व शिरोडकर यांच्याप्रमाणेच बाईंच्या स्नेहसंबंधावर फक्त अन्याय करीत राहतात.

याचा अर्थ आपल्या स्नेहकथेच्या आकलनासाठी तिचे जे सर्व आवश्यक अन्वय शोधावयास हवे होते ते बाईंनी शोधलेले नाहीत असा होतो.

या मागे अप्रामाणिकपणा किंवा बुद्धीचा तोकडेपणा नाही तर आत्मलुब्धता आहे. अजूनही बाई आपल्या पूर्वायुष्यातून बाहेर आलेल्या नाहीत; म्हणून त्या स्वतः व वाचकही त्यांच्या पूर्वायुष्याच्या आत शिरू शकत नाही. एका उत्कट मनाची भावकथा आपण बाहेरून ऐकत आहोत असेच वाचकास वाटत राहते. त्यातील काही प्रसंग– जसे, ओंजळीत ओकारी घेण्याचा, उभयतांच्या आजारपणाचा–प्रभावी वाटतात; पण एकूण कथेचा ठसा मात्र 'कोणीच मला ओळखले नाही; मी मात्र साऱ्यांना ओळखले' हा असतो; तोच सर्व प्रसंगांतून गिरविला जातो. हे खरेही असेल; पण ते खरे आहे अशी प्रचीती मात्र ही आत्मकथा वाचकांस देऊ शकत नाही. ती पुनरावृत्तीमुळे वाचकाला रोमँटिक कंटाळा आणते; अनुभवाचे आकलन अपुरे झाल्यामुळे त्याची मांडणीही अविकसनशील झाली याची त्याला जाणीव करून देते.

□ □

साभार पोच

(१२) **लिटमस्** (कविता)
कवी : शिरीष गोपाळ देशपांडे
प्रकाशक : साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.
पृष्ठे : ५५ किं. ५ रु.

(१३) **वस्ती वाढते आहे** (कादंबरी)
ले. डॉ. भाल पाटील
प्रकाशक : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
पृष्ठे ३४१ किं. २० रु.

(१४) **विदूषक** (नाटक)
ले. वि. वा. शिरवाडकर
प्रकाशक : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
पृष्ठे ७७ किं. ५ रु.

मौज प्रकाशन गृह, मुंबई.

(१५) **नाट्याचार्य कृ. प्र. खाडिलकर** (समीक्षा)
ले. न. र. फाटक
पृष्ठे : १८६ किं. १२–५० रु.

(१६) **विचारविलसिते** (ललित लेख)
ले. वि. द. घाटे
किं. १५ रु.

(१७) **रेणू** (कादंबरी)
ले. पु. शि. रेगे
पृष्ठे : १०५ किं. ६ रु.

(१८) **कॉंग्ज** (कथा)
ले. शरच्चंद्र चिरमुले
किं. १२–५० रु.

(१९) **जीवनाचा फेस उठला** (कविता)
कवी : शिरीष
प्रकाशक : माग्रस प्रकाशन, नागपूर.
पृष्ठे १२० किं. ६ रु.

(२०) **पंडित नेहरू : एक मागोवा**
ले. १. डॉ. न. गो. राजूरकर
२. नरहर कुरुंदकर
साधना प्रकाशन, पुणे.
पृष्ठे : १५७, किं. १० रु.

सोमय्या पब्लिकेशन्स प्रा. लि., मुंबई.

(२१) **माझी जीवन गाथा** (आत्मचरित्र)
ले. प्रबोधनकार ठाकरे
पृष्ठे : ४६७ किं. १५ रु.

(२२) **वीज** (कथासंग्रह)
ले. प्रल्हाद वडेर
पृष्ठे १६८, किं. १६. रु.


काही लीटल मॅगझीनवाल्यांच्या जन्मपत्रिका

चंद्रकान्त पाटील.

मराठी साहित्याच्या अलिकडील इतिहासावर दृष्टिक्षेप टाकल्यास काही जाणकार व सूज्ञ वाचकांच्या असे दृष्टोत्पत्तीस येईल की ज्याला एकदम नव्या व समकालीन जाणिवा म्हणता येईल त्यांचे बिंब ज्यांच्या लेखनातून प्रतीत झाले आहे असे बहुतेक लेखक हे लघुनियतकालिकांतून लेखन करणारे होते. शिवाय त्यांनी लघुनियतकालिकांची चळवळ सुरू करून तिला गतिमान ठेवण्यासाठी बरेचसे प्रयत्न केले होते. या बहुतेक लेखकांनी प्रस्थापित व्यवस्थेतील प्रचलित व संभाव्य धोके टाळून, साहित्याचा भौतिक पातळीवरून विचार न करता, केवळ नाविन्याचा हव्यास न धरता, प्रसंगी सामाजिक विरोध पत्करून व प्रसिद्धीच्या एका सीमित परिघात राहण्याचे मान्य करून मराठी साहित्यात नवनवे व एकूण साहित्याच्या संदर्भात अतिशय महत्त्वाचे प्रयोग केले व वाचकांच्या अभिरुचीला वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न केला. त्यांचे हे ऋण मान्य करून लघुनियतकालिकांशी संबंधित असलेल्या काही लेखकांच्या जन्मपत्रिकांचा अगदी स्थूल मानाने परिचय करून देण्याचा व त्यावर अल्प कुवतीप्रमाणे भाष्य करण्याचा प्रस्तुत टिपणकर्त्याचा इरादा आहे. अर्थात या टिपणात फक्त साहित्य आणि त्याशी संबंधित मनाची जडणघडण एवढ्यापुरतेच मर्यादित विवेचन केले आहे हे लक्ष्यात असो द्यावे.

वर निर्देशित स्वरूपाचे विवेचन करीत असताना जन्मकुंडलीतील प्रथम स्थान–ज्याला ‘ लग्न ’ असेही म्हणतात–हे बुद्धीचे, विचारांचे व आंतरिक मनोव्यापाराचे कारक स्थान, प्रत्यक्ष मनाचे व काही पाश्चात्य ज्योतिर्विदांच्या मते लेखनाचे असे तृतीय स्थान, विद्या व लेखनाचे पंचम स्थान, भाग्य व प्रसिद्धीचे नवमस्थान व प्रस्तुत टिपणकर्त्याचे मते पुन्हा प्रसिद्धीचेच द्वादश किंवा व्ययस्थान, या सर्व स्थानांचे स्वामी, त्यांचे परस्पर नाते व त्यांचा तौलनिक अभ्यास आणि मनःकारक असा चंद्र हा ग्रह, याकडे विशेष लक्ष पुरवणे आम्हास आवश्यक वाटते. या उप्पर या लघुनियतकालिकवाल्यांना प्रसंगी समाजाला धन व ऋण पद्धतींचे धक्के वेळोवेळी दिले असल्यामुळे चंद्राप्रमाणेच हर्षल व नेपच्यूनचा अभ्यासही आवश्यक आहे. वरील बाबींचा विचार करून प्रस्तुत टिपणकर्त्याने काही विशिष्ट निष्कर्षाप्रत पोचण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत सफळ झाला आहे हे अखेरीस वाचकांनीच ठरवावे.


(१) कुंडली १ रा. भाऊ पाध्ये. जन्म १९२६. ख्यातनाम कादंबरीकार, पत्रकार, सिनेपरीक्षक व ‘ असो ’शी संबंधित एक लेखक. वृश्चिक लग्न, कन्या राशी.



मंगळाचे लग्न असून मंगळ स्वगृही मेषेत आहे. तो येथे वृश्चिक राशीची किंवा लग्नाचीच फले देतो. लग्नातील बुध, शनि, रवि, शुक्र ही चतुर्ग्रही अत्यंत महत्त्वाची असून तीच चंद्राच्या तृतियातही येते. हे सर्व


ग्रह उत्तम दर्जाच्या कादम्बरीकारासाठी आवश्यक कलागुण देतात, व त्यामुळे मनाच्या विविध पातळ्यांना स्पष्ट-पणे चित्रित करण्याचे सामर्थ्य असते. चंद्र कन्या राशीचा आहे. ही राशी बुधाची असून बुद्धिमत्तेची द्योतक आहे. शिवाय बुध लग्नीच वक्री असल्यामुळे वर्तमानपत्राशी संबंध दाखवतो. वाचकांनी हे लक्ष्यात असो द्यावे की रा. पाध्ये यांची स्वतंत्र व विशेष मान्यता पावलेली गद्यशैली व तिच्यातील स्पष्टता, साधेपणा, नीटसपणा हे गुण रा. पाध्ये यांचा वृत्तपत्रसृष्टीशी संबंध असल्यामुळेच दिसतात. लेखनाचे दृष्टीने अजून महत्त्वाचा योग म्हणजे चंद्राच्या पंचमातील गुरु लग्नाचा पंचमेश होऊन तृतियात किंवा पराक्रमस्थानात बसलेला आहे व लग्नाच्या पंचमातील वक्री हर्षल, वक्री बुध व शनि–रवि–शुक्राशी नवपंचम योग करीत आहे. पंचमातील हर्षलाने धक्का-दायक साहित्यनिर्मिती करविली आहे. हाच चंद्राशी प्रतियोग करीत असून मन:कारक चंद्रावर पूर्ण दृष्टी टाकीत आहे. यावरून पाध्ये यांचे विचारही स्फोटक पण महत्त्वाचे झाले. शिवाय द्वितीयाचा स्वामी गुरु तृतीयात लेखनावरून पैसा देता झाला. वृश्चिकेच्या म्हणजे मंगळाच्या घरातील शुक्रामुळे 'वासूनाका' व 'चांदी' (अप्रकाशित) या कादंबऱ्या लिहून झाल्या. वरील सर्व योगांवरून रा. पाध्ये यांचे साहित्यातील वेगळेपण व मोठेपण सिद्ध होते. आमच्या मते १९७५ त रा. पाध्ये यांचे हातून एक महत्त्वाचे, दर्जेदार व खळबळजनक पुस्तक लिहून होईल. हेच वर्षी त्यांना मानसन्मानही मिळावा.

(२) कुंडली २ री : **रा. अरूण कोलटकर**; जन्म १९३३, समकालीन नव्या कवितेचे एक जनक, उच्च दर्जाचे कर्मशिअल आर्टिस्ट. तूळ लग्न, धनू राशी.




लग्नातील रवि नीच राशीला जाऊनही अतिशय शुभ फले देता झाला व भाग्येश बुध लग्नात रविबरोबर वसून एक स्वतंत्र योग करता झाला. लग्नावर हर्षल पूर्ण दृष्टी टाकीत असल्याने व तोच चंद्राच्या पंचमात असल्याने विलक्षण प्रक्षोभक, सूक्ष्म व अत्यंत विलक्षण अनुभूतीचे कंगोरे विशद करणाऱ्या व मराठीत पूर्वी कधीच न लिहिल्या गेलेल्या अश्या वेगळ्याच कविता लिहिल्या. लग्नाच्या तृतीयात चंद्र व चंद्राच्या तृतीयात राहू हा उत्कृष्ट योग झाला असून चंद्र–हर्षल–नेपच्यूनचा व राहू–रवि, बुधाचा नवपंचम योग हाही साहित्य निर्मितीच्या दृष्टीने बलवान योग झाला आहे. शिवाय पंचमेश चतुर्थात मकरराशीला स्वगृही असल्याने व तोच तूळ लग्नाचा राजयोग-कारक ग्रह असल्याने त्याने एक पंचमाची शुभ फळे दिली व शिवाय दीर्घ काल टिकणारे साहित्य व महत्त्वपूर्ण साहित्य निर्माण केले. बुधाने लग्नातील रविबरोबर स्थानपरत्वे युतियोग केल्याने प्रखर बुद्धिमत्ता, मनोविश्लेषणाची शक्ती, भाषेवरील प्रभुत्त्व व कवितेतील भाषेवाबत महत्त्वपूर्ण व यशस्वी प्रयोग करावयास लावले. हर्षलाच्या दृष्टीमुळे अनुभवांकडे बघण्याच्या तऱ्हांत विलक्षण वेगळेपणा व मराठी कवितेला पूर्वी अपरिचित अश्या अनुभवांचे कलात्मक आविष्करण आले. पंचमेश शनीचे केंद्रात बसणे हा आमचे मते, यावनी म्लेच्छवगैरे अभारतीय भाषांमध्ये नैपुण्य देणारा योग आहे. रा. कोलटकर यांच्या आंग्ल–कविता व मराठी कवितांची त्यांनी केलेली आंग्ल भाषान्तरे (विशेषत: तुकारामाच्या अभंगांची भाषान्तरे व त्यांच्या स्वत:च्या मूळ मराठी कवितांची भाषांतरे) ही याची पुरेपूर साक्ष पटवून देतात. आमचे मते रा. कोलटकर यांना १९७४ हे वर्ष (सदरहू पत्रिका तंतोतंत बरोवर असल्यास) व्यवसाय नोकरीचे दृष्टीने लेखन–प्रकाशनाचे दृष्टीने, मान मरातब किर्तीचे व एकंदरीतच अतिशय चांगले जाईल. एखादे अवॉर्ड मिळण्याचीही बरीच शक्यता आहे.

(३) कुंडली ३ री : **रा. मनोहर ओक,** जन्म १९३४, कवि, (अप्रकाशित) कादंबऱ्यांचे कर्ते. मीन लग्न, मिथुन राशी.



गुरूचे लग्न असून सदरहू लग्न अत्यंत हालअपेष्टांमधून आयुष्य कंठावयास लावणारे म्हणून पौर्वात्य ज्योतिष्यकारांमधे प्रसिद्ध आहे. लग्नातील एकटा हर्षल सामान्यत: विक्षिप्त वाटावी पण जी तर्काधिष्ठित असावी अशी प्रस्फोटक विचारसरणी देतो. पत्रिकेत लग्नाच्या तृतियात वृषभ राशीला रवि बुध शुक्र असून चंद्राच्या तृतीयात गुरू–मंगळ–केतू–नेपच्यूनसारखे ग्रह जीवनाच्या वेगवेगळया पैलूंच्या अनुभवविश्वावर व अध्यात्मापासून ते 'स्लम्स'च्या वास्तवचित्रणापर्यंत साहित्यनिर्मिती करावयास लावणारे आहेत. या ग्रहांमुळेच ते 'चरसी'सारखी (अप्रकाशित) कादम्बरी लिहू शकले व 'आयत्या कविता'तील महत्त्वपूर्ण कवितांना जन्म देते झाले. चंद्राच्या तृतीयातील सर्व ग्रह लग्नाच्या षष्ठात गेल्यामुळे व त्यातील मंगळाने दूषित झालेला गुरु दशमाचा अधिपती असल्याने व्यावहारिक पातळीवरील अपयश व अनासक्तीचे निदर्शक असले तरी याच ग्रहामुळे गूढ, अमूर्त, अबोधाचे आकर्षणही विलक्षण असते. या सर्व योगांमुळे एकीकडे नग्न वास्तवाचे यथार्थ चित्रण करीत असतानाच दुसरीकडे गूढ शक्तींच्या मूलस्रोताकडे आकर्षित होत असल्याची प्रचीती येते. तृतीयातील स्वगृहीच्या शुक्रामुळे व रविबुधामुळे भाषेची विलक्षण जाण, लयीवरील पकड व कवितेतील लयीबाबतचे प्रयोग शक्य झाले. मात्र पंचमेश केंद्रात जाऊन व बौद्धिक राशीत बसून राजयोग करीत असूनही रविबुधशुक्राचा एकीकडून राहूशी व दुसरीकडून गुरु मंगळ केतू नेपच्यूनशी केंद्रयोग होत असल्यामुळे व चंद्रहर्षलाचाही केंद्रयोग होत असल्यामुळे साहित्य क्षेत्रात उपेक्षितपणा अनुभवावयास मिळतो. शनि स्वगृहीचा असूनही आमचे मते तो या पत्रिकेत कुंभेची म्हणजे व्ययस्थानची फले देतो. शनीने व्ययाची फले देणे व राहू व्ययात असणे या दोन्ही गोष्टी मरणोत्तर कीर्तीच्या निदर्शक आहेत.

(४) कुंडली ४ थी : **रा. अशोक शहाणे.** जन्म १९३६, कवी, अनुवादक, समीक्षक, मराठीतील लघुनियतकालिकांच्या चळवळीचे एक सूत्रधार; सिंह लग्न, मीन राशी.




लग्नातील नेपच्यून व त्याचा भाग्यातील मेषेच्या हर्षलाशी होणारा नवपंचम योग महत्त्वाचा झाला आहे. भाग्यातील हर्षल तृतीयस्थ मंगळावर पूर्ण दृष्टी टाकीत असल्याने व तृतीय स्थानात मंगळ असल्याने नवे, प्रक्षोभक व विद्रोही विचार दर्शवितो. शिवाय लग्नावर शुक्र शनि बुधाची पूर्ण दृष्टी आहे. शुक्र कलांचं आकलन, बुध सूक्ष्म बुद्धिमत्ता (बौद्धिक राशीत स्थित) व शनि स्वगृही असून लग्नाला बघत असल्याने व बुधाशी अंशात्मक युति करीत असल्यामुळे संतुलन देतो. व्ययेश चंद्र अष्टमात जाऊन योगकारक झाला आहे. त्याच्यावर गुरूची पूर्ण दृष्टी असल्याने

खालील विषयांवरील महत्त्वाच्या टिपणांचा 'युगवाणी' आस्थेने स्वीकार करील.

१. प्रक्षुब्ध मराठी निबंध-राजवाडे ते नेमाडे
२. रसव्यवस्थेची परिभाषा
३. डॉ. झिवॅगो (बोलपट) मधील बर्फाची प्रतीकशक्ती
४. कोकणातील आरमारी पोवाडे
५. माधवी मुखर्जी
६. प्रचारकाव्यांची समाजविमुखता
७. विभावरी शिरूरकर
८. श्रीकृष्ण पोवळे
९. 'एक चादर मैलीसी'
१०. ट्रॅजिक टेन्शन
११. विठोबाअण्णा दप्तरदार
१२. सत्यदेव दुबे
१३. बोगनव्हिला
१४. स्व. कुंदनलाल सैगल
१५. बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्या
१६. शुद्ध वाङ्मयीन नियतकालिके
१७. मर्ढेकरांच्या इंग्रजी कविता
१८. माणूस (प्रभातचित्र)
१९. मिश्र कलाप्रकार
२०. माहिंमभटाची आत्मनिष्ठा
(श्रीप्रभुदास्यावेगळे...वाखाणिन)
२१. ॲक्शन पेन्टिंग
२२. रामदासी कल्याण (राग)
२३. इन्डो-ॲंग्लीयन कादंबरी
२४. चाँद उस्मानी
२५. स्ट्रक्चरॅलिझम
२६. मराठी कादंबऱ्यांचे इंग्रजी अनुवाद
२७. मन्नू भंडारी
२८. बरकतअलीच्या गजला
२९. व्हॅनगॉफ्‌ची पत्रे
३०. काश्मीरी 'शैव-दर्शन'
३१. 'गीतेविणेंही रंगूं दावी। तो लोभाचा प्रबंधु ओवी'
३२. नागपूरकर भोसल्यांचे पोवाडे
३३. प्राचीन मराठी कूट-काव्ये
३४. 'कॅन्सर वार्ड'
३५. 'धानाइसासि कवडा खेळु।'
३६. ग्रंथालयाचे प्रकार
३७. 'अ लेटर फ्रॉम ॲन अन्‌नोन वुमन'
३८. ॲटोमॅटिक रायटिंग
३९. 'रॅयॉन्स डॉटर'
४०. वाङ्मयीन पारितोषिकांचे नकार
४१. 'प्रस्तावनां'चे कार्य व प्रयोजन
४२. मराठी मासिकांची धोरणे
४३. कन्याकुमारीचा सूर्यास्त
४४. व्ही. शांताराम आणि सत्यजित रे
४५. निर्मितीपूर्व व्यक्तित्वाचे कलाकृतीतील स्थान
४६. जगन्नाथाचा रथोत्सव (कविता)
४७. कलावंतांच्या आत्महत्या
४८. उत्खननातील इतिहासतत्व
४९. ऋतूबदलते पक्षी
५०. विश्वनाथाचे 'महावाक्य'
५१. ॲटलास श्रग्ड् (ॲन रॅण्ड)
५२. फेमिनाइन पोएट्री
५३. कलाकृतीतील सांस्कृतिक नात्यांचे विसर्जन
५४. टागोरांची पाऊसगीते
५५. क्रांतिकाव्य आणि काव्यभूल भाषा
५६. सूर्यास्ताची शिल्पे
५७. रेकॉर्ड लायब्ररीज
५८. यहुदी मेनुहिन
५९. दिग्दर्शनांतील प्रतीकनाट्य : रूपकाभास (अनुष्ठान?)
६०. जेम्स मॅसनचा आवाज (नट)
६१. किरणमयीचा विनाश (चरित्रहीन)
६२. कथेतील गोष्ट
६३. सांप्रदायिक समीक्षा
६४. संवेदनानिष्ठ कलांची मर्यादा
६५. 'लिटररी पोर्ट्रेट्स' (मॅक्झिम गॉर्की).
६६. मराठी कवींची 'आई'
६७. प्रतीकनाट्याचे दिग्दर्शन : (एक ओसाड गाव/द लॉंग डेज जर्नी इन टू नाईट/ब्लड वेडिंग/-द थ्री सिस्टर्स/द मॅन वुइथ द हार्ट इन द हायलॅण्ड्स/यातनाघर/उपाशी खलाशी.)

शुभ अशीच फले अनुभवास येतात. आतां शुक्र शनीने दूषित असे म्हणावे तर पूर्वीची संस्कृत वचने असे सांगतात की सिंह लग्नासाठी शुक्र जेवढा दूषित असेल व निर्बल असेल तितक्या प्रमाणात त्याची शुभ फले अनुभवास येतील. षष्ठातील राहू स्थानबली होतो पण लग्नेश रवीशी फारसा चांगला योग करीत नाही. व्यय–चतुर्थ–अष्टमातून होणारा केतु–गुरु–चंद्राचा नवपंचम योग, रवीचे लग्न, हर्षल–नेपच्यूनचा नवपंचम, मीनेचा चंद्र, पंचमेश गुरु केंद्रातील चतुर्थात जाणे, स्वगृहीच्या शनीचे लग्नास पाहणे इत्यादी गोष्टी व राहूचे षष्ठात स्थित होणे जातकास उत्तरायुष्यात पूर्ण आध्यात्मिक अवस्थेला नेतात असा आमचा होरा आहे. शिवाय साहित्याचे दृष्टीने पंचमेश गुरु चतुर्थात, नेपच्यून लग्नी व मंगळाचा शुक्र–बुध–शनीशी नवपंचम हे योग विपुल साहित्यनिर्मिती करवितात. कुंभेचा बुध भाषेवरील प्रभुत्वास छान आहे. खुद्द सिंह लग्न चळवळीच्या नेतृत्वास उपकारक आहे. आमचे मते रा. शहाणे १९७५ त गूढशास्त्रावरील वा अध्यात्मावरील पुस्तक लिहिण्याची दाट शक्यता संभवते. हल्लीचे वर्षी राहूवरून गुरूचे भ्रमण व्यवसायात उत्कर्षदायी आहे.

(५) कुंडली ५ वी : **रा. भालचंद्र नेमाडे :** जन्म १९३८. कवि, कादंवरीकार, समीक्षक व मराठीतील लघुनियतकालिकांच्या चळवळीशी प्रथमपासून संबद्ध, 'वाचा प्रकाशना'चे एक प्रवर्तक. मेष लग्न, मेष राशी.



मेष लग्न मंगळाचे असून लग्नात बुध, चंद्र, हर्षल आहेत. बुध तीव्र बुद्धिमत्ता, चिकित्सक वृत्ती, सूक्ष्म अवलोकन, भाषाप्रभुत्व दर्शवितो. हेच गुण मंगळाच्या राशीतील चंद्र–हर्षलामुळेही येतात. (जाणकार वाचकांना हे माहित असेलच की श्रीज्ञानेश्वराच्या पत्रिकेतही मेष लग्न, मेष राशी व लग्नात चंद्रहर्षल स्थित आहेत.) या सर्व ग्रहांचा पंचमातील नेपच्यूनशी होणारा नवपंचम योग हा लेखनासाठी आवश्यक अंतस्फूर्ती देतो व जातकास गूढ व अध्यात्मशास्त्राकडे वळवतो. या योगामुळेच जातकास जीवनाकडे आध्यात्मिक व तात्विक दृष्टिकोणातून बघावयास उद्युक्त करतो व कर्म आणि अध्यात्माची संतुलित सांगड घालावयास लावतो. याच योगामुळे जातक अनुभवाकडे एकदम भिन्न पद्धतींनी बघावयास लागतो व त्याला कलेतून आविष्करण देतो. भावचलित कुंडलीत धनस्थानातील अखेरच्या अंशावरील मंगळ तृतीय किंवा पराक्रमात सरकतो व नवीनतम आणि प्रक्षोभक पण बौद्धिक राशीत तो भावचलितात मंगळाशी स्थानपरत्वे सुयोग करवितो, तर पंचमावर पूर्ण दृष्टी टाकतो, व ते पंचमस्थान पुनीत करतो. गुरु–शनीचा अन्योन्य योग असून म्हणजे एकमेकांच्या राशीतून एकराश्यान्तर योग–शनि व्ययात असल्यामुळे आमचे मते सदरहू योग प्रचंड प्रसिद्धी देण्यास कारणीभूत आहे. मात्र पंचमेश रवि धनात गेल्यामुळे व त्याचा नेपच्यून व गुरूशी केंद्रयोग झाल्याने कित्येकदा लेखनपरावृत्तीची क्षणिक अवस्था येण्याची भीती असते. आमचे मते पुढील वर्षी कुंभेतून होणारे गुरूचे भ्रमण एखाद्या 'क्लासिकल' स्वरूपाच्या ग्रंथनिर्मितीस कारणीभूत ठरावे.


(६) कुंडली ६ वी **रा. दिलीप पुरुषोत्तम चित्रे:** जन्म १९३८; कवी, कथाकार, कादम्बरीकार, समीक्षक, अनुवादक, 'असो' अगोदरच्या लघुनियतकालिकांचे एक प्रवर्तक. कर्क लग्न, मिथुन राशी. (सदरहू जन्मपत्रिका 'शिवाराणीच्या शोधात' या त्यांच्या पुस्तकावरून.)

चंद्राचे लग्न असून लग्नेश व्ययात पडला आहे, तरीही तो गुरूच्या पूर्ण दृष्टीत आहे. चंद्र–शुक्र, राहू–गुरूचा नवपंचम योग महत्वपूर्ण झाला आहे. चंद्र बौद्धिक राशीत असून लग्नाच्या तृतीयात म्हणजे पराक्रमात. बुधाच्या राशीतील रवि तीव्र बुद्धिमत्ता, विश्लेषणशक्ती, भाषेवरील प्रभुत्व व एकाहून अधिक भाषांत पारंगतता



देतो. पराक्रमातील रवि विलक्षण महत्त्वाकांक्षीही करतो, लग्नाचा पंचमेश मंगळ धनस्थानात अग्निराशीस असून राजयोगकारकही आहे. तो बुध व नेपच्यूनशी स्थानपरत्वे युति करतो. काही पाश्चात्त्य विद्वानांच्या मते धनातील बुध–नेपच्यून विलक्षण कल्पनाशक्ती, अंतस्फूर्ती देतात व साहित्यासाठी पोषक ठरतात. येथे बुधाने मंगळाची शक्ती घेतली असून रवि–बुधाचा अन्योन्ययोग फारच उत्कृष्ट झाला आहे. शिवाय बुध–नेपच्यून– मंगळ हे ग्रह चंद्राच्या तृतीयात आल्याने पुन्हा विचारांचा नवेपणा, विद्रोह व वेगळेपणा साहित्यनिर्मितीसाठी उपकारक ठरतात. चंद्राच्या पंचमातील स्वगृहीचा शुक्र व राहू ऐंद्रीय संवेदनांची कलात्मक परिणती करतात व संवेदनांच्या विविध स्तरांतून अनुभव व्यक्त करताना विश्वातील गूढ शक्तींचा शोध घेण्याच्या प्रवृत्तीचे निदर्शक ठरतात. येथेही रा. नेमाडे यांच्या पत्रिकेप्रमाणेच गुरु–शनिचा अन्योन्य योग व भाग्यातील शनि विलक्षण प्रसिद्धीचे कारक आहेत. दशमातील हर्षल हा नविन्याचा व स्फोटक विचारांचा कारक होतो. शिवाय त्याचा धनातील मंगळ–बुध–नेपच्यूनशी नवपंचम योग होतो आहे. आमचे मते ह्या योगात आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन वा साहित्यनिर्मितीची क्षमता असते. मात्र हाच योग याच स्थानातून पण कन्या–मकर–वृषभ या उत्पात राशीतून होत असेल तर (जसे प्रस्तुत टिपणकर्त्याचे कुंडलीत) तो मात्र वाया जातो व निष्फल होतो. वाचकांनी हे लक्ष्यात घ्यावे की तृतीयातील रविचा चंद्राशी होणारा केंद्रयोग हा एकमेव शुभफलदायी असा केंद्रयोग. असल्यामुळे तोही प्रस्तुत पत्रिकेत चांगला झाला. उलट याच पत्रिकेतील चंद्र–शनीचा केंद्रयोग मात्र तितकासा बरा नसून तो मानसिक व्यग्रतेचा निदर्शक ठरतो. आमचे मते पुढील वर्ष व्यवसाय–नोकरी, आर्थिक दृष्टचा व स्थावरजंगम करणेचे व लेखनकार्याचे दृष्टीने अत्यंत शुभ व चांगली फले देईल.

(७) कुंडली ७ वी : रा. **(चंद्रहास) सत्यव्रत जोशी.** जन्म १९३९. कवि, कथाकार, समीक्षक, 'असो'शी संबद्ध होते. मकर लग्न, कुंभ राशी.



सदरहू पत्रिकेत मंगळ चतुर्थेश – लाभेश होऊन लग्नात उच्चीला गेला आहे. गुरु स्वगृही आहे, शुक्र उच्चीला, रवि उच्चीला गेला आहे. शनि नीच राशीत असूनही त्याचा स्वामी मंगळ केंद्रात उच्चीला गेल्याने नीचभंग योग झाला व तोही लग्नेश चतुर्थात जाऊन. म्हणून शुभ फले देणाराच झाला. या व्यतिरिक्त शनि–मंगळ अन्योन्य योग करतात व पूर्णपणे एकमेकास पाहतात. मंगळ हा स्फोटक व प्रक्षोभक विचारांचा कारक व प्रखर बुद्धिमत्तेचा कारक होतो. मंगळाच्या तृतीयातून स्वगृहीचा गुरू व मीनेचा शुक्र विलक्षण आध्यात्मिक अनुष्ठान देतात व लिखाणास अत्यंत उत्तम होतात. शिवाय लग्नाचा पंचमेश शुक्र हाही तृतीयात उच्चीस गेला आहे. चंद्र हा बौद्धिक राशीत असून त्याचा राहूशी उत्कृष्ट योग होत आहे. चंद्राच्या तृतीयात उच्चस्थित रवि, नीचभंग झालेला शनि, बुध, केतू व या सर्वांचे जोडीस हर्षलासारखा प्रक्षोभक व महत्त्वपूर्ण ग्रह बसल्याने विचार व बुद्धीचे दृष्टीने फारच अप्रतिम योग झाला आहे. मात्र एक भीती अशी की रवि व त्यासोबतच्या इतर ग्रहांशी होणारा मंगळाचा केंद्रयोग मात्र लेखनात अडथळे आणतो व साहित्यनिर्मितीबाबत सर्व

प्रसिद्ध झाली

विचारविलसिते

ललित लेखन रु. १५.००

वि० द० घाटे

रेणू

कादंबरी रु. ६.००

पुरुषोत्तम शिवराम रेगे

कॉग्ज

कथासंग्रह रु. १२.५०

शरच्चंद्र वासुदेव चिरमुले

इतर नवी प्रकाशने

नाट्याचार्य कृ० प्र० खाडिलकर : चरित्र : **न० र० फाटक** : रु. १२.५०
माधवराव पटवर्धन : वाङ्मयदर्शन : सु० रा० चुनेकर : २१ रुपये
अवध्य : नाटक : दुसरी आवृत्ती : **चिं० त्र्यं० खानोलकर** : ५ रुपये

छापत आहेत


मुखवटे कथासंग्रह **आनंद विनायक जातेगावकर**
सौंदर्यमीमांसा : समीक्षा : **रा० भा० पाटणकर**
प्राचीन काव्यशास्त्र समीक्षा : **माधव आचवल**
जास्वंद : समीक्षा **माधव आचवल**
रंग माझा वेगळा : कवितासंग्रह : **सुरेश भट**

सविस्तर सूचीसाठी कार्ड टाका :

मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई-४०० ००४.

आवश्यक बाबी असूनही मधूनमधून उदासीनता आणू शकतो. शिवाय सर्व ग्रह अनुदित भागात असले कारणाने पूर्वार्धात व मध्यात परदेशात भाग्योदय होईल व उत्तरार्धात स्वदेशात भाग्योदय व साहित्यनिर्मिती होईल.


(८) कुंडली ८ वी : **रा. सतीश काळसेकर;** जन्म १९४३, कवि, समीक्षक, लघुनियतकालिकांचे एक आधारस्तंभ व बऱ्याचश्या लघुनियतकालिकांचे प्रकाशक व संपादक. धनुलग्न, मेष राशी.



लग्नात अग्निराशीतील मंगळ विचारांचा स्फोटकपणा, विद्रोह, धडाडी इत्यादी देतो. शिवाय तोच पंचमाधिपति होऊन लग्नात बसल्याने विशेष योगकारक झाला. पंचमात अग्निराशीत चंद्र व तसाच सिंहेला राहू असल्याने व त्यांचा लग्न–पंचम–नवमातून नवपंचम योग होत असल्याने हा योग लेखनास उत्कृष्ट, प्रसिद्धीसही उत्कट व नेतृत्वास अप्रतिमच झाला आहे. लग्नेशाची लग्नावर पूर्ण दृष्टी असून लग्नाच्या तृतीयातील शुक्र केतूवर पूर्ण दृष्टी आहे. लग्नाच्या तृतीयात शुक्र असल्याने व त्याचा भाग्यातील राहूशी प्रतियोग असल्यामुळे 'इंद्रियोपनिषद' लिहून झाले. चंद्राच्या पंचमात बौद्धिक राशीचा गुरू आहे, तर चंद्राच्या पंचमात सिंहेचा राहू आहे. हा योग वयाचे ३० नंतर व ४२ नंतर लेखनात फारच महत्त्वाच्या दर्जाला नेईल असे आम्हास वाटते. शनि–शुक्राचा केंद्रयोग असूनही अन्योन्ययोगामुळे त्याचे दुष्परिणाम अर्ध्याहून अधिक प्रमाणात कमी अनुभवावयास मिळतील. वाचकांनी याची नोंद घ्यावी की रविबुधशनिहर्षल–नेपच्यून यांचा नवपंचम योग होत असूनही तो वृषभादी उत्पात राशीतील ग्रहांत झाल्यामुळे निष्फल झाला व वाया गेला. आमचे मते उत्तरायुष्यात नेतृत्वाबाबत आंतरराष्ट्रीय ख्याती मिळेल. येत्या वर्षी गुरू (गोचरीचा) व मूळ राहूचा प्रतियोग नोकरी, व्यवसाय–लेखनादी बाबतीत उत्कृष्ट फले देईल.

आता अखेरीस, सूज्ञ व जाणकार वाचकांचे सोयीखातर आम्ही आमची जन्मपत्रिका देत आहोत. त्यावरून वाचकांनीच ठरवावे. आम्ही आता एथेच लेखनमर्यादा ओढून घेतो.

(९) कुंडली ९ वी : **चंद्रकान्त पाटील,** जन्म १९४१; सिंह लग्न, मिथुन राशी, प्रस्तुत टिपणाचे लेखक.



वरील सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होईल की साहित्यनिर्मितीसाठी लग्नाच्या वा चंद्राच्या तृतीयात व पंचमात व खुद्द लग्नातही ग्रह असणे महत्त्वाचे आहे. अर्थात् विचारहीन्, ढोबळ व ठरीव साच्याचे लिखाणाच्या निर्मितीस तृतीयात व लग्नात ग्रह असणे आवश्यक नसून केवळ पंचमात ग्रह व त्याचे इतराशी शुभयोग असले की पुरेसे आहे. वर उल्लेखिलेल्या बऱ्हंशी पत्रिकांत त्या स्थानात ग्रह असून मंगळ, हर्षल व राहू किंवा त्यांपैकी एखादा ग्रह आहेच. व म्हणूनच त्या बहुतेकांना लघुनियतकालिकांच्या चळवळीत महत्त्वाचे कार्य करावे लागले–किंवा त्यांचे हातून ते झाले. आमचे विवेचन हे अत्यंत त्रोटक असून ते मुख्यत: लेखनाच्या दृष्टिकोणातून तपासलेले आहे व केवळ साहित्यापुरतेच मर्यादित आहे हे वाचकांनी लक्ष्यात असो द्यावे. तेव्हा तूर्त तरी एवढेच.

॥ लेखन–सीमा ॥ □ □

आचार्य भागवत

सिंधु जोशी

८ जानेवारी १९७३ त्या दिवशी मी पुण्यात असण्याचे काहीच कारण नव्हते. वास्तविक डिसेंबरमध्येच मला पुण्याला जायला हवे होते. पुण्यात असलेल्या माझ्या काकांना हार्ट अटॅक आला होता. पण योगायोगाने मी ७ जानेवारीला पुण्याला पोचले. तो सबंध दिवस काकांशी बोलण्यात आणि रत्नागिरीहून पुण्याला आलेल्या वहिणीशी गप्पा मारण्यात घालविला. आठ तारखेला संध्याकाळी बहिणीला तिच्या मुक्कामावर पोहचवून माझ्या मैत्रिणीकडे गेले असताना आचार्यांना भेटण्याच्या इच्छेने गांधी भवन नेमके कुठे आहे याची त्यांच्याजवळ चौकशी केली. त्या मला आपल्या कारमधून गांधी भवनात घेवून गेल्या. रात्रीचे ८–३० तरी वाजले असावेत! गांधी भवनात शुकशुकाट होता. तिथल्या पहारेकऱ्याला विचारले, 'आचार्य भागवत कुठे आहेत?' तो म्हणाला, 'आचार्य भागवत गेले.' तरीही मला काही उलगडा झाला नाही. मी विचारले, 'कुठे गेलेत?' तो म्हणाला, 'देवाकडे गेले!' मग मात्र राहवेना. हे केव्हा झाले असे मी त्याला विचारले, तेव्हा त्याच दिवशी दुपारी १–३० वाजता आचार्यांचे त्यांच्या पुतण्याकडे अरुणकडे, अरुणच्या घरी निधन झाले अशी माहिती मिळाली. लीलाबाई मला अरुणच्या घरी घेऊन जाण्यासही तयार होत्या पण मलाच त्यांना अधिक त्रास देणे प्रशस्त वाटले नाही. कारण तिथे जावूनही मला फार तर त्यांच्या मृतदेहाचे दर्शन घडले असते. पण मी रात्री ८॥ वाजता गांधी भवनासारख्या दूर ठिकाणी जाऊन त्यांना भेटण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला होता हे आचार्यांना आता कधीच समजले नसते. त्यांची तेजस्वी मूर्ती मनात इतकी ठसली आहे की, डोळे मिटले की तें समोर उभे राहतात; त्यामुळे त्यांच्या अचेतन देहाचे केवळ शेवटचे दर्शन घ्यावे असे मात्र मला वाटले नाही.

१९४१ ते १९७०. उणापुरा २९ वर्षांचा आचार्यांच्या सहवास परिचयाचा काळ. या काळात आचार्य भागवत मला कसे दिसले? प्रथम आठवतात त्यांचो रवीन्द्रनाथांच्या–वरची व्याख्याने! अतिशय विद्वान, रसिक, मर्मज्ञ आणि उत्तम वक्ते! या वक्तृत्वानेच लोभावून मी त्यांच्या जवळ बंगाली शिकू लागले. त्यावेळीच कळून आले की ते परक्यांना जितक्या मृदू, हळूवारपणे आणि प्रेमाने जवळ करीत तितकेच स्वतःच्या कुटुंबीयांच्या बाबतीत कडक होते. आपल्या माणसांनी निर्दोष असले पाहिजे ही कदाचित त्या मागची भावना असेल. त्याचवेळी जाणवलेली आणखी एक त्यांची शक्ती, ते आपण होऊन परक्या माणसांच्या ओळखी करून घेत. माझ्या सर्व नातेवाईकांच्या त्यांनी आपण होऊन-ओळखी करून घेतल्या. प्रथम हुबळीला, धारवाडला, गदगला व मग पुण्याला माझ्या सर्व मंडळींची त्यांनी आपण होऊन ओळख करून घेतली आणि ती शेवटपर्यंत टिकवली. माझे काका पुण्याला आजारी असताना हॉस्पिटलमध्ये भागवत त्यांना भेटायला गेले होते. ही त्यांची लोकसंग्रह करण्याची शक्ती फार मोठी होती. त्यांच्या बुद्धीचा त्यांना योग्य तो अभिमान होता. सामान्य लोकांबद्दल ते नेहमी 'क्षुद्र' या शब्दाने आपली चीड व्यक्त करीत असत. दुसऱ्याचे स्वभाव–विश्लेषण ते अतिशय बारकाईने करीत असत. पण त्यांच्या पश्चात त्यांचे स्वभाव-विश्लेषण करणे आपल्यासारख्याला योग्य दिसेल का? असेही मनात येते.

त्यांच्या व्यक्तित्वाविषयी माझ्या मनात काही शंका आहेत. त्यांनी अलिकडे ममत्व सोडण्याचा प्रयत्न चालविला होता. त्यांना सर्वसामान्यपणेच माणसांविषयी प्रेम होते पण त्यांना त्यांचा पुतण्या अरुण याच्याविषयी फार ममत्व होते. आणि त्यातून ते खरोखरीच बाहेर पडले होते असे मला तरी वाटत नाही. अरुणच्या सुदैवाने त्यांना त्याच्याच घरी मरण आले ही नियतीने साधलेली अतिशय चांगली गोष्ट आहे.

गेल्या २९ वर्षांत जेव्हा जेव्हा आम्ही भेटलो तेव्हा तेव्हा एखादा तरी प्रसंग येई की ज्यावेळी भागवत भडकून उठत. प्रत्येक वेळी माझ्या मनात येई की अरे या एवढ्या थोर माणसाला आपला राग आवरता येऊ नये ? कुटुंबात राहून चारचौघासारखे सामान्य जीवन घालविणाऱ्या माणसाला जर आपल्या रागावर ताबा मिळविता येतो तर ह्यांना ही गोष्ट का जमत नाही ? राजकारण, साहित्य, कला, तत्त्वज्ञान या सगळ्या गोष्टीत त्यांनी अमाप सिद्धी मिळविली होती, पण माणसाच्या षड्‌रिपूमधील ह्यांना किती जिंकता आले होते ? कदाचित आमच्या पाहण्यात आणि समजण्यांत हा दोष असेल. आम्ही त्यांना सिद्ध पुरुष म्हणून पाहत असू. ते अजून साधकच होते. संसारात राहून कुठल्याही तऱ्हेचे नियम वगैरे न मानता व पाळता जवळजवळ स्थितप्रज्ञाच्या अवस्थेला पोहचलेली माणसे आपल्याला खूप वेळा भेटतात, दिसतात. त्याविषयी ती conciousही नसतात. मग ह्यांच्याच बाबतीत असे का व्हावे ?

१९६७ सालापर्यंत तरी त्यांना आपला राग जिंकता आला नव्हता. त्यानंतरचे मला माहीत नाही.

स्त्री–जातीचा कैवार हे आचार्यांचे आवडते ध्येय होते. आपल्या बायकोला झालेल्या अन्यायाचे आपण परिमार्जन करीत आहोत असे ते नेहमी सांगत. स्त्रीला स्वयंपाकघरात डांबून ठेवले आहे, तिला घरकामाची गुलामगिरी करावी लागते, यातून तिची सुटका झालीच पाहिजे वगैरे गोष्टी ते नेहमी आग्रहाने सांगत. पण यातही त्यांचा अतिरेक होत असे असे, मला वाटते. Routine काम कितीही कंटाळवाणे असले आणि एकंदरीत घरकाम ही drudgeryच आहे, हे जरी मान्य केले तरी आपल्या माणसांना चांगला पदार्थ करून खाऊ घालण्यात बायकांना फार आनंद होतो, ही साधी गोष्ट त्यांना कधी समजलीच नाही. अशावेळी जर ते बायकांना तुम्ही किती त्रास देता, किती खाता वगैरे बोलू लागले तर त्यांचीच अवस्था हास्यास्पद होई. तरुण मुलांच्या या बाबतीत अतिशय Strong Reactions होत्या. आणि वेळप्रसंगी त्यांची टिंगलही झालेली आम्ही पाहिली आहे.

हा त्यांचा कैवार सोडला तर रविंद्रनाथांची स्त्रीची–कल्याणिनीची–image ही त्यांना फार प्रिय होती. ही कल्याणिनीची image सध्याच्या Womenshipच्या दिवसात Romanticच म्हटलीपाहिजे.

त्यांनी आपल्या भोवती जमलेल्या माणसांविषयी फार मोठ्या अपेक्षा - बाळगल्या. त्यातील किती माणसे त्यांच्या कसोटीला उतरली कोण जाणे ? पण आमच्या सारखी निराशा करणारीच जास्त असण्याचा संभव अधिक. त्यांच्या भोवतालच्या माणसांनीही त्यांच्याविषयी काही कल्पना केल्या होत्या. त्याच्या उलट जर ते वागले तर प्रथम प्रथम त्याचे कौतुक होई पण पुढे लोकांनाही आश्चर्याचे नव्हे तर निराशेचे shoks बसत. एकंदरीत काय तर हा परस्पर failureचाच प्रकार म्हणायचा ! आमच्या विषयीची त्यांची निराशा त्यांनी बोलूनच दाखविली होती, पण आमच्या reactions त्यांना कधी कळणारच नाहीत.

त्यांना असामान्य बुद्धिमत्ता लाभली होती. शेवटपर्यंत त्यांनी ज्ञानाची उपासना केली. त्यांचे वाचन up-to-date होते. पुस्तकांवर त्यांचे प्राणापलिकडेही प्रेम होते. पण काही गोष्टी संसारी माणसांना सहजसाध्य होतात, त्याविषयी त्यांना Consciousness नसतो, अशा काही गोष्टी भागवतांना जमल्या नाहीत. ते एकटे राहिले, एकांडे राहिले, म्हणूनही त्यांना हे साध्य झाले नसेल. त्यांच्या आश्रमीय पोषाखाची, आश्रमीय जीवनाची लोकांवर छाप पडली होती म्हणूनही कदाचित असेल; की व्यवहारी माणसांच्या जगात ते काही वेळा विचित्र आणि अव्यवहारी वाटले. कदाचित् ही प्रतिक्रिया आम्ही केलेल्या आचार्यांच्या आदर्शीकरणाचा व आमच्या मनातल्या आचार्यत्वाच्या संकल्पनांचा, त्यांच्यावरील आरोपणाचा परिणाम असावा. ते महान होते पण मानवीच होते. आम्ही इष्टचिंतनामुळे त्यांना ' महामानव '– ' विश्वमानव ' कल्पिले व मग स्वतःच कष्टी झालो.

८ जानेवारी १९५२ साली आजोबांचे छत्र नाहीसे झाले होते. ८ जानेवारी १९७३ साली पित्यासमान आचार्य भागवतांचा चिरवियोग झाला. त्यांना मरण मात्र चांगले आले. तेही त्यांच्या आवडत्या पुतण्याच्या घरी ! ' अनायासेन मरणं ! ' असे एक वाक्य ते नेहमी बोलून दाखवीत. ईश्वराने त्यांना तसे मरण दिले. यातच सर्व आले.

त्यांच्या तेजस्वी व स्नेहशील स्मृतिमूर्तीला मनोमन प्रणाम. □ □

पुस्तके

रेणू

कुंदा पारसनीस

पु. शि. रेगे यांची 'रेणू' ही तिसरी, लहान, १०५ पानांची, 'सावित्री' व 'अवलोकिता' या पहिल्या दोन कादंबऱ्यांचीच वाटचाल करणारी कादंबरी रेग्यांच्या मताप्रमाणे 'सावित्री'चा संचार सर्वस्पर्शी, 'अवलोकिते'चा आतून पुन्हा आत; तर 'रेणू'चे स्वरूप ह्यांहून वेगळे. कादंबरीच्या आरंभी दिलेल्या श्लोकामधील नृत्यशालास्थितो दीपाप्रमाणे ते आहे असे रेगे यांना म्हणायचे आहे काय ? माझ्या मते स्पेसमधील, विविध पातळ्यांवरील एकाद्या (कोन) ॲंगलसारखे तिचे रूप आहे. An angle is the union of two non-collinear rays with a commn endpoint) ह्या कादंबरीत वावरणारी विविध पात्रे त्यांच्या विविध जीवनात, विविध अनुभवांत एकमेकांना भितात.

रेणू नोकरी शोधायला दिल्लीला येणार हा आरंभ, व ती लोरेंझोबरोबर कंबोडियाला जाणार हा शेवट 'सावित्री' मधील आरंभ (लच्छीच्या मोराची गोष्ट) व शेवट (मयूरनृत्य) यांच्याप्रमाणेच साधला आहे, त्यांची आठवण करून देणारा आहे. 'गेल्या आठ महिन्यात ती (= रेणू) कुठून कुठे येऊन पोचली होती' ह्याच्यावर ही कादंबरी आधारलेली आहे. (कालखंड १९६५–६६) पण ही एकट्या रेणूची कहाणी नाही. ती चौधरींचीही आहे. पोटाची विवंचना नसलेल्या, नव्या दिल्लीतील उच्चभ्रू समाजात ही कादंबरी फिरते. पार्ट्या, भजन, 'क्राऊड' चर्चा, प्रदर्शन, नाटक, सांस्कृतिक जीवन यामध्ये ही कादंबरी घडते. 'रेणू'तली जवळ जवळ प्रत्येक व्यक्ती निष्ठेने, जिद्दीने काहीतरी करीत असते. रंगवीथीचा अबू हसन, जर्नालिस्ट जानकी रंगनायन, कवी अनित्यजी, परदेशी दूतावासातील गॅब्रिएल लोरेंझो, स्वत: रेणू, मंत्रालयातील चौधरी, सर्वजणांची धडपड चाललेली दिसते– स्वत:ला समजण्याची, स्पर्शणाऱ्या जीवनाला समजून घेण्याची, भोवतालच्या जगाची संगती लावण्याची. चौधरींची आजारी पत्नी प्रमिला आणि पूर्णिमा मुखर्जी या दोघी तेवढ्या कोलाहलात शांत, मुक्त, जीवनाची जाण असलेल्या दाखविल्या आहेत. प्रसंगाच्या, अनुभूतींच्या, संवेदनांच्या, मनोगतांच्या छोट्या छोट्या तुकड्यांनी कादंबरीची बांधणी केली आहे. यामधून व्यक्ती उभ्या राहतात; यामधून कथानक पुढे सरकते. पु. शि. रेगे यांच्या कादंबऱ्यांचे वेगळेपण 'रेणू'मध्येही आढळते. रेग्यांचे लेखन नेहमीप्रमाणेच वेधक, काव्यात्म, अर्थगर्भ कातीव शब्दांची रेखीव मांडणी–हस्तिदंती कोरीव कलाकुसर व मिनिएचर पोर्टेट पेंटिंग यांची आठवण करून देणारी. त्यामुळे 'रेणू' हे छोटेखानी पुस्तक असले तरी पानापानांवर दाद मागणारे आहे. रेग्यांनी व्यक्तींच्या मनोगतांद्वारा जीवनविषयक चिंतन केलेले आहे. (यातील व्यक्ती थोड्याबहुत फरकाने सारख्या धाटणीच्या, सारख्या मुशीतल्या वाटतात) ...माणसामाणसात आपण फरक करीत राहिलो की शेवटी आपणच तेवढे बाकी उरतो...संपर्क कधीच पूर्ण नसतो, कारण प्रत्येकजण थोडाबहुत या जाळ्याच्या पलीकडे असतो...

अलिप्तता आणि क्षणिक स्वार्थ यांच्यांत एकेकदा फारसा फरक उरत नाही...शरीर सर्वस्वी आपले

नसते...सर्वांच्याही पलीकडे एक आपलेपण असते ...एकाद्याचा आत्मबिंदु असतो कठीण वज्रासारखा, प्रखर प्रकाशाचा. तो प्रकाश देतो आणि तरीही उरतो केवळ प्रकाशच, मुक्त आणि तरीही अजय्य, केंद्रित. पूर्णिमा कदाचित् याचीच एक साक्ष असावी. [ही लय गेएटेच्या फाउस्टचे विंदा करंदीकरांनी केलेल्या अनुवादाची आठवण करून देते.]

अठरा व एकोणीस ही लोरेंझोच्या पूर्वायुष्यातील घटना सांगणारी प्रकरणे. थोड्या निवडक शब्दांत सहजपणे चित्रण हा रेग्यांचा विशेष कादंबरीभर दृग्गोचर होत असताना (उदा. जानकीविषयी) इथेच तपशील देण्याचा मोह रेग्यांना का व्हावा? मला दोन कारणे सुचतात. (१) हल्लीच्या साहित्यातील प्रवाह. (२) रेग्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानामध्ये तरुण शरीर, कामजीवन, रतिक्रीडा आणि प्रेम यांना एक विशिष्ट महत्त्व आहे. त्यांच्या कथा, कविता, कादंबऱ्या याची साक्ष आहेत. थोड्या फार फरकाने त्यांच्या लेखनातून शरीरवाद, अस्तित्ववाद, गूढवाद (व मधुराभक्ती) यांचे मिश्रण येते. मात्र या ठिकाणी (स्पॅनिश कविता दिल्यामुळे आणखीनच) याला फीटिशचे (fetish) स्वरूप येते असे मला वाटते.

कादंबरीच्या शेवटी प्रत्येकजण नव्या स्तरावर गेलेला दिसतो. अबू हसन व कांता रांदेरिया लग्न करतात, प्रमिलेचा मृत्यू होतो, चौधरींना पूर्णिमा 'समजते' व मग जानकी जीवनात येणार असते, अनित्यजींना संदीप सापडतो, गर्भवती रेणू लोरेंझोबरोबर कंबोडियाला जाणार असते...' प्रत्येकाचे एकेक वेगळे विश्व होते. त्याच्या कक्षा क्वचित् एकमेकांना छेद देऊन जात आहेत, क्वचित् एकमेकांना समांतर आहेत असे भासण्याइतपत त्यांच्यात एकसूत्रता होती इतकेच. सर्वांचीच स्वतःचे अस्तित्व टिकविण्याची एक धडपड होती. आणि ती होती म्हणूनच या सगळ्याला एक काही आकार येत होता.' रेणू कादंबरी अशी सर्वांच्या धडपडीची, प्रवासाची कादंबरी आहे.

रेगे लिहितात, 'एकादे भव्य, अनाकलनीय असे नाट्य असते. त्यातील वावरणारी पात्रे, धुमसणारे प्रसंग—त्या त्या वेळेपुरता आपला ठसा उमटवून जात असतात. पण खरी पात्रे दोनच असतात. एक मागचा पडदा 'आणि एक पुढचा पडदा.' मागचा सगळ्यांना उठाव देतो पुढचा सामावून उरतो, निर्विकार. 'रेणू' अशी चिंतनपर, काव्यात्म, अर्थपूर्ण, जीवनावर भाष्य करणारी कादंबरी. मृदु, मुलायम कादंबरी. यामध्ये क्षोभ नाही. प्रमिलेचा अपघाती मृत्यू, जानकीचा आत्मघाताचा प्रयत्न यासारख्या प्रसंगांनाही लेखकाने गुळगुळीत बनवून टाकले आहे. रेगे कथा—कादंबरीकार नाहीत, कवी आहेत. कादंबरीमध्ये व्यक्ती व प्रसंग उमलून येत नाहीत तर कवी रेगेच उमलताना दिसतात.

रेणू ही त्रोटक कादंबरी कवितेप्रमाणे पुन्हा वाचली की शब्द, ओळी, प्रतिमा, अनुभव, चिंतन, अनुभूती प्रसरण पावतात, नवनवीन जाणीवा प्रकट होतात—हे वाचकांच्या क्षमतेवर, संवेदनांवर, अनुभवांवर, मनाच्या कक्षांवर अवलंबून राहाते.

रेग्यांच्या कादंबरीची ही मर्यादा आणि हे वेगळेपण आहे.

['रेणू'—पु. शि. रेगे;—मौज प्रकाशन, किंमत सहा रुपये. पृष्ठे : १०५.]

□ □

अमेयची तीन प्रकाशने

तेंडुलकर–भणगे–गोवईकर

'अमेय प्रकाशन' हे वैदर्भी वृत्तीच्या प्रकाशकांचे कर्तृत्व आहे असे जर म्हटले तर ते खोटे वाटेल. कारण विदर्भाचा स्वतःचा असा एक पिंड असतो. वैदर्भी रीती-प्रमाणेच वैदर्भी वृत्तीही आहे. वैंथामचे तत्त्वज्ञान या वृत्तीने पूर्णतः पचवून टाकले आहे. जोंधळयाची आणि कापसाची खेती व दलाली करून विदर्भाची परंपरा जेवढी समृद्ध तेवढीच गलथान झालेली आहे. म्हणूनच राजकारणापासून तो प्रकाशनापर्यंतचे सारेच प्रश्न या मातीत भद्दपणा धारण करतात. कलात्मकता, सौंद-र्यात्मकता इत्यादी व्यर्थ विशेषांकडे तिने लक्षच दिलेले नसते. विदर्भातील प्रकाशने उपयोगितावादी दृष्टीने लोकाभिमुख होतात. अर्थात याला अपवाद असणारच. त्या अपवादातच 'अमेय प्रकाशना'ची गणती करावी लागणार आहे. कारण अत्यंत कलात्मक, आकर्षक वाह्य सजावटीने आणि निर्दोष मुद्रणाद्वारा 'अमेयने' चांगल्या लेखकाचे 'बरेवाईट' साहित्य प्रकाशात आणले आहे. येथे अमेयचे उत्तरदायित्व संपते. प्रकाशन क्षेत्रात यशदायक अशी प्रतिभा अमेयांच्या अध्वर्यूंच्या ठायी आहे हे निश्चित. पण भपकेबाज दुकानातील वस्त्रे निवडून घेताना, ती विरविरीत आणि फाटकी नसावीत याकडे लक्ष द्यावे. महाराष्ट्रातील गाजलेल्या नावा-मागे कर्तृत्वापेक्षा दलाली अधिक असते. जाहिरातीची किमया असते एवढे लक्षात असू द्यावे. नावारूपास आलेल्या प्रकाशकांच्या बैठकीतही उठून दिसावे असेच अमेय प्रकाशन आहे.

श्री. गोवईकरांचे फसलेले नाटक

अमेयने प्रकाशित केलेल्या साहित्यापैकी तीन नाटके वाचण्याचा योग आला. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' हे पद्माकर गोवईकरांनी गोवलेले नाटक. नाटकाचे स्वरूप तसे नवे आहे. पण रामदासाच्या कवितेबद्दल विनोदाने म्हटले जाते की त्यांनी मनाचे श्लोक तर रचलेतच पण आपल्या कवितेवर समीक्षकांनी भलते-सलते आरोप केल्यास समीक्षकांची टाळकी फोडण्या-साठी आखाडेही स्थापन केलेत. म्हणूनच रामदासांच्या कवितेवर समीक्षक तोलून मापूनच बोलतात. श्री. गोवई-करांनी नाटक तर रचलेच पण आपल्या नाटकावर ज्या टीका अथवा अनुकूल प्रतिकूल समीक्षण होणार आहे त्या समीक्षांना संवादाचे रूप देऊन एक नवा अंक प्रत्येक अंकात घुसडला आहे. नाटकाच्या संहितेला 'अपेंडिक्स' जोडण्याचे नवे तंत्र गोवईकरांनी हाताळ-लेले आहे.

साधना मडगावकर नावाच्या गोवेकरीण नटीच्या लफड्याभोवती हे नाटक गुंफले आहे. नाटचवस्तूतील अनुभवाशी लेखकाने तादात्म्य साधावयाचे असते असे म्हणतात. पण गोवईकरांनी हा सारा अनुभव त्रय-स्थाच्या भूमिकेतून रंगविलेला आहे. श्री. गोवईकरांवर भाषा आणि शैली ह्या नाटकांत तरी प्रसन्न झालेली नाहीत. म्हणून नाटकातील अर्धे नाटक मनाची पकड घेणार नाही. नाटकातील प्रत्येक अंकात कांगारूच्या पिलाप्रमाणे एक भिडु अंक प्रत्येक अंकातील पोटात आहे. आमच्या विदर्भात त्याला 'पित्तू' असे म्हणतात. या पित्तू अंकात नाटचवस्तूवरं होणाऱ्या प्रतिक्रियांचे नाटच उतरविले आहे. श्री. गोवईकरांची ही कल्पना नाविन्यपूर्ण असली तरी मुळात साधना नावाच्या नटीचे लफडे इतके अपुरे, पोकळ, ठिसूळ रंगविले गेले आहे की ते प्रकरण मनाची पकड घेत नाही. कारण संवाद पडेल आहेत. या पार्श्वभूमीवर नाटचानुभवावर उमट-लेल्या नाटकांतर्गत ज्या प्रतिक्रिया आहेत त्या सर्वस्वी विसंगत आहेत. श्री. गोवईकरांच्या आत्मरतीला स्वतःच शिव्या आणि ओव्यांची बिरुदे मिरविण्याची हौस असली तरी नाटचवस्तूतील अनुभवांचा गच्चपणा आणि नाटचवस्तूवरील प्रतिक्रियांचा अफाट पसारा

यांचा परस्पराशी मेळ बसत नाही हे जाणवते. गोवईकरांनी एक फालतू लफडे शिथिल संहितेद्वारे प्रस्तुत केले आणि महाकाव्याच्या निकषाने तिचे मूल्यमापन केले किंवा अधिकच स्पष्ट सांगायचे म्हणजे मेथीची वाळली भाजी सोने तोलण्याच्या तराजूतून मोजून दाखविली. नाटकात संघावर, भालजीवर थोडी ओझरती टीका वगैरे आहे. पण ती अण्णांना खूष करण्याचा प्रयत्न असावा. अण्णा म्हणजे गांधीवादी वाल्मिकी. साला वगैरे शिवीचा अनेक ठिकाणी वापर करून गोवईकरांनी आपले नाटक अद्यावत पसंतीला उतरावे अशी योजना केली आहे. तेंडुलकर किंवा एलकुंचवार यांच्या नाटकांतही शिव्या असतात. पण त्यामागे सामाजिक मूल्यातील विसंगतीविरोधी विद्रोहाचा इतिहास असतो हे गोवईकरांनी लक्षात घ्यावे. महाविद्यालयीन पोरासोरांच्या शब्दकोषात सांप्रत ज्या शिवीगाळीची भर पडली आहे तीत 'साला', 'च्यायला' वगैरे आता शिव्या उरलेल्या नाहीत. तात्पर्य एक 'फसलेले नाटक' अशी प्रतिक्रिया या नाटकासंबंधी केली जाऊ शकते. त्याला फारशी प्रायोगिक मूल्ये नाहीत. गोंधळाला आणि बेबंदशाहीला आमंत्रित करणाऱ्या अनेक जागा संहितेत आहेत.

[**व्यक्ती तितक्या प्रकृती** लेखक : पद्माकर गोवईकर; पृष्ठसंख्या ८४; किंमत नऊ रुपये; अमेय प्रकाशन, नागपूर २]

दंबद्वीपचा मुकाबला : विजय तेंडुलकर

'दंबद्वीपचा मुकाबला' हे श्री. विजय तेंडुलकरांचे ऐतिहासिक नाटक. ऐतिहासिक या अर्थाने की नाटकाच्या संहितेत अप्रत्यक्षपणे रंगविलेले प्रकरण प्रत्यक्षात भारतीय राजकारणात घडलेले होते. आता ते इतिहासात दाखल झालेले आहे. प्रस्थापित आदर्शातील विसंगतीचा उपहास हेच तेंडुलकरांच्या मनाचे दुखणे असते. ते येथेही प्रकट झालेचं आहे. या उपहासासाठी त्यांनी माणसाच्या रंगाचा, रूपाचा, शाब्दिक कोटयांचा, व्यसनांचा किंवा दारूच्या कैफातील वरळ अभिव्यक्तीचा कधीच आश्रय घेतला नसतो. रंगरूपांवर माणसाचे स्वतःचे नियंत्रण नसते त्यामुळे त्या दोषांचा उपहास करण्यात मानवी प्राण्यावर विनाकारण अन्याय होतो. कै. गडकऱ्यांनी भावबंधनात हे केलेले आहे. व्यसनाधीन वरळ ही लेखकाच्या कल्पकतेचा अभाव सुचवीत असते. तेंडुलकरांनी उचलून घेतलेली सारी माणसे अव्यंग आहेत. पण त्यांच्या संस्कृतीतील विसंगतीचा भरपूर उपहास त्यांनी वेळोवेळी प्रदर्शित केला आहे. हेच श्री. तेंडुलकरांचे फार मोठे यश आहे.

'दंबद्वीपचा मुकाबला' या नाटकात जे मंत्री आहेत त्यांपैकी 'मलय'केतु आणि भगदंत तर ओळखू येतात. ही संहिता वाचताना सारखे मनाला वाटायचे की व्रात्यस्तोम, कर्कशीर्ष, पिष्टकेशी या नावांप्रमाणे मानवी इंद्रियांचे नाव धारण न करता मलयकेतु हे वेगळेच नाव एका मंत्र्याने का धारण करावे ? आणि मलयाचा कुठे सह्याद्रीशी संबंध येतो काय असे वाटून गेले. घाशीराम कोतवाल या नाटकात पुण्याचे ब्राह्मण झुमतात आणि नाना कीर्तन गातात. येथे तीच भूमिका लेखणीक वठवितात. हे लेखणीधारी भारतीय वर्तमानपत्रे होत. त्यांची भाटगिरी श्री. तेंडुलकरांनी गद्यकाव्यातून रंगविलेली आहे तशीच त्यांची लांगुलचालनी वृत्तीही त्यांनी दाखवून दिलेली आहे.

पहिल्या अंकात विचित्रवीर्यांचा मृत्यू आणि राजकन्या विजया हिचे सत्ताग्रहण. किंवा 'विजया ही सत्ता आणि मंत्री हे धारी.' दुसऱ्या अंकात मंत्रिमंडळाच्या धोरणाचा उपहास. कदंबजमातीचे प्रकरण संघर्ष स्थळ. मंत्र्यांवर विजया जे ताशेरे मारते त्यातून विनोदाची भरपूर पेरणी. तिसऱ्या अंकात विजयाराजे विरुद्ध मंत्री – प्रजा राजसत्तेच्या पाठीशी. संघर्षाची उत्कटता. मंत्र्यांना बुरखे घालून पळावे लागते. मलयकेतू काहीसा खलनायक वाटतो. पण सारेच मंत्री खलनायक रंगविलेले आहेत. भगदंत मात्र राजसत्तेच्या पाठीशी किंवा स्थितप्रज्ञ. मंत्री–नामोहरण आणि विजयाराजे एकतंत्री. हा नाटकाचा शेवट.

संहितेत–तेंडुलकरांची राजकारणावरची भाष्ये छान उतरली आहेत. ती जेवढी उपहासगर्भ, विनोदगर्भ आहेत तेवढीच अर्थगर्भ आहेत. ऐतिहासिक नाटकात उपकथानक असते. लेखणीधारी हे उपकथानक सादर करतात. अनलंकृत गच्च भाषाशैली आणि अनुभवाशी तादात्म्य, हे तेंडुलकरांचे वेगळे वैशिष्टच या नाटकातही समर्थपणे उतरले आहे.

[**दंबद्वीपचा मुकाबला** : लेखक–विजय तेंडुलकर, पृष्ठे–९४, किंमत–८ रु. ५० पैसे. अमेय प्रकाशन, नागपूर.]

श्रीनिवास भणगे ह्यांचे 'असंच आणि इतकंच'

एखाद्या गूढ प्रमेयाभोवती कथावस्तू गुंफण्याच्या यशासाठी श्री. जी. ए. कुळकर्णी जसे परिचित आहेत तसेच एखाद्या गूढतेभोवती नाट्यवस्तू ही यशस्वीपणे उभारली जाणे शक्य आहे याची प्रचीती घडवून देणारे हे नाटक आहे. नाट्यप्रयोगाला तांत्रिक बाबतीत अत्यंत परवडणारे हे नाटक असूनही भावदर्शनासाठी मात्र ते तेवढेच अवघड आहे.

मृत्यूनंतर देहाचा वास आत्म्याभोवती रेंगाळतो. देहाचे भावास्रव मृत्यूनंतर एकदम सुटत नसते. बंध ते निर्जरा (मोक्ष) यातील 'अवकाशात मांसपिंडादि आवरणे गळून पडल्यानंतर उरलेल्या क्षणात अज्ञानाचे शेवटचे वस्त्र सोडून शून्यात प्रविष्ट होऊ पाहणाऱ्या आत्म्यांचा हा संघर्ष आहे. मृत्यूनंतर व्यक्तीमागची संस्कृती खोळीसारखी मागे राहते आणि माणसांची नग्न शिल्पे वियत् स्वरूपात ढगांप्रमाणे भिडत असतात. भांडत असतात. महात्म्याचे हे शिल्प पोकळ असेल. रोगट असेल. कारण त्याच्या कपाळावरचा शेंदूर मिटला असतो आणि तो दगड झालेला असतो. आत्महत्या करणाऱ्या माणसाचेही एक अबोध दुःख असते.' देह संपल्यानंतर केवळ दुःखाचा भाव उरला असतो. मृत्यूनंतरची ही अवस्था काही क्षणापुरती असू शकेल. तेच क्षण श्री. भणग्यांनी टिपलेत आणि रंगभूमीवर साकार केलेत. प्रेक्षकांना नाट्यानुभवात सहभागी करून घेण्याचे जे तंत्र भणग्यांनी वापरले ते आता जुनाट झाले आहे. सहस्रबुद्धे हे प्रेक्षकाचे पात्र आणि क्ष ही कळसूत्री नियती यांचे संवाद वाचताना पु. ल. देशपांडे ह्यांच्या 'सदू वा दादू'ची अनाहूत आठवण कां होत असे ते नीट कळत नाही. बहुधा इतक्या संहितेपुरता पु. लं. चा प्रभाव असावाही. पण पुढे मात्र तो प्रभाव मिटतो आणि णग्यांच्या भअस्सल प्रतिभेने कोणाचीच उसनवारी केली नसते. अनलंकृत गच्च भाषा वापरण्याची शैली तेंडुलकरांचीच अशी आतापर्यंत आमची समजूत होती. पण भणग्यांनी येथे श्री. तेंडुलकरांवरही मात केली आहे. कै. गडकरी स्वगताधीश म्हणून मराठी साहित्यात प्रसिद्ध आहेत. गडकऱ्यांमध्ये अस्सल किती आणि फ्रेंच सरदारांप्रमाणे अलंकारांची वसने किती ह्याचा जर तौलनिक शोध घेतला तर गडकरी हे केवळ शब्दप्रभु होते आणि शब्दप्रभुत्वाने नाट्यानुभावाला दुय्यम स्थान दिले हे गडकऱ्यांचे माझ्या मते फार मोठे अपयश होते. 'एकच प्याला'तील सारेच सामाजिक प्रश्न वाङ्मयीन अभिव्यक्तीच्या कैफात विसरले जातात. भणग्यांची स्वगते अधिक सकस आहेत. विमलचे दुःख, सतीशच्या संतापाचे कढ, कल्पनेची असहायता, जनूच्या आत्महत्येमागचा दारुण अनुभव ज्यावेळी स्वगतांची संहिता घेऊन प्रगट होतात त्यावेळी शून्याच्या आधीचे हे नाटक अत्यंत गाढ आणि उत्कट संघर्ष पेरत जाते. प्रेक्षक स्वतःचे अस्तित्व विसरतो. अंक संपता संपता ही अस्वस्थता वाढत जाते. सहस्रबुद्धे हे प्रेक्षक पात्र या अस्वस्थतेचें खरे प्रतिनिधित्व करीत असते. दोन अंकांनंतर मात्र तिसऱ्या अंकाचे आरंभीच ह्या नाटकातील सारी उत्कंठा संपल्यासारखी वाटते. नाटकाचा अंत कुठे आहे ते कळत जाते. काही वेळ रंगमंदिरात बसून राहाणे आवश्यकच असते. कारण असे वाटते की वेगळी गती नाट्यवस्तूला शेवटच्या क्षणीही मिळेल. पण नाटक संपते तेव्हा समाधानाचा भागाकार निःशेष का सुटला नाही असा प्रश्न सूज्ञ प्रेक्षक भणग्यांना विचारतील. येथे कदाचित भणग्यांचे अपयश असावे.

[**असंच आणि इतकंच**.–लेखक–श्रीनिवास भणगे–पृष्ठसंख्या ६९, मूल्य–पाच रुपये, अमेय प्रकाशन नागपूर.] □ □

लेखकांना विनंती

साहित्य कागदाच्या एका बाजूला, सुवाच्य अक्षरात
मराठी साहित्य महामंडळाच्या शुद्धलेखनाच्या नियमांनुसार असावे.
नापसंत साहित्य परत पाहिजे असल्यास
सोबत पुरेसे टपालहशील असणे आवश्यक आहे.

वारा वाजे रुणझुणा

शकुंतला जोग

'वारा वाजे रुणझुणा' हा श्री. चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या वृत्तपत्रीय स्फुट ललित लेखांचा तीनशे बारा पानी संग्रह. लेखकाच्या प्रतिभेचा सहज, ताजा उन्मेष किंवा आविष्कार काव्य, कथा, कादंबरी, नाटक या त्यानं हाताळलेल्या ललितवाङ्मयात होतो. म्हणजेच प्रतिभेच्या खऱ्याखुऱ्या कळा आणि त्यातून जन्मलेल्या नवजात, लुसलुशीत अर्भकाचं प्रतिबिंब त्यात आपल्याला दिसतं. पण वृत्तपत्रीय ललित लेखनाचं स्वरूप त्यामानानं अगदी वांझोटंच नाही, तरी दुय्यम दर्जाचं वाटतं. विशेषत: ठराविक काळात रोज रोज येणाऱ्या ललित साहित्याबद्दल मला हे विधान करावसं वाटतं. त्याला प्रतिभेपेक्षा किंचितसा व्यवहाराचा वास असतो. या लिखाणाला स्थलकालाच्याही बऱ्याच मर्यादा पडतात. त्या ठराविक काळात पडलेल्या महत्त्वाच्या घटनांवर लालित्याचा हात फिरवून, नटवून, सजवून वाचकांच्या समोर उभी केलेली वृत्तपत्रीय बातमी हे त्यांचं स्वरूप असतं. स्टेनलेस असलं तरी स्टीलच, सिल्व्हर नाही. असंच काहीसं. पण सुदैवानं खानोलकरांनी हे रूक्ष स्वरूप अगदी कोरडं ठणठणीत ठेवलं नाहीय्. त्यात ओलावा, खुमारी आणण्याचा प्रयत्न केलाय्.

यामध्ये एका लेखाचा दुसऱ्याशी संबंध नाही. म्हणजे असणं शक्यच नाही. एकाच हारात चाफा वकुळीपासून जास्वंदी घाणेरीपर्यंत सर्वच फुलं ओवलेली असावीत तसं वाटतं. त्यामुळे पुस्तक वाचून झाल्यावर मनावर जो परिणाम होतो तो अपरिहार्यपणे विस्कळीत असतो. तशा लक्ष वेधून घेण्यासारख्या घटना रोजच किती आणि कशा घडणार ? रोज रोज काही बालगंधर्व बेशुद्ध पडणार नाहीत. परमेश्वर त्यांचं गाणं ऐकत थांबणार नाही किंवा ते गाण्याचा प्राजक्त देऊन स्वर्गात जाणार नाहीत. रोजच विजया मेहेतांना, म्हणजेच नाट्याने झपाटलेल्या झाडाला साहित्य संघात निरोप समारंभ होणार नाही. किंवा दामूअण्णा मालवणकरांचा अमृत महोत्सवी सत्कारही होणार नाही. तेव्हा मग प्रतिभावंत फेरीवाला, डगमगती चाळ, टीकाकारांची स्तुती करणारा रसज्ञ पोपट, सोनटक्क्यांच्या वायकोला व्हायोलेट बनवणारी चिमणी, मुलाखत घेणारा मुलगा, मूर्तिकार, वहिरा बॉस, टॉप ग वाईसारखं काही तरी शोधून काढावं लागतं. त्यातही रोचकता, खुसखुशीतपणा अर्थातच आहे. चहाबरोबर एखादाच खुसखुशीत पदार्थ खावा तसं रोज सकाळी चहाच्या बरोबर ताज्या पेपरमधील यातलं एकच येणारं स्फुट जितकं खुमासदार वाटतं तितकी मजा संकलित पुस्तकाला येत नाही. त्यातही 'टॉप ग वाई' सारखा सामान्य मजकूर वृत्तपत्रीय स्फुटासाठी का होईना पण लिहिण्याचा मोह खानोलकरांसारख्यांना व्हावा याचा खेद होतो.

गाणारे पुस्तक 'लता' मधील 'माझ्या समोर एक पुस्तक गात उभे आहे, असे वाटते आहे की यातल्या अक्षरा अक्षरावरून एक सोनेरी गाणे वहाते आहे.' हे वाचताना अक्षरश: आपल्या कानांना लताचे मुलायम सूर स्पर्श करून जातात. ग. प्र. प्रधानांचे 'हाजीपीर' किंवा 'वाजे पाऊल आपुले', 'ययाती', 'श्रीशिल्लक', 'विशुद्धरेखा' या सारखी स्फुटं आपल्याला काहीतरी देऊन जातात.

या पुस्तकात पहिलं जे चित्र दाखवलंय् तेच फार बोलकं आहे. तेथील जागा उजाड वाटते आहे. वारा रुणझुणा वाजत असला तरी वृक्ष निष्पर्ण असावा की काय अशी शंका येते आहे. त्यामुळे उन्हाचा रूक्ष ताप सोसत वाहाणारा वारा रुणझुणेल की कण्हेल ? हा प्रश्न पडतोय्. मुलगा कुठल्यातरी अटळतेला टाळण्यासाठी म्हणजेच •स्वत:ची फसवणूक करून घेत तबकडीच्या आभासावर फिरतोय्. वाऱ्याभोवती चिमुकली धूळ गिरकी घेते, सुरांभोवती मुलगा, नियतीभोवती माणूस,

हे या रेखाचित्राचं सूत्र असावं आणि मला तरी वाटतं की खरे खानोलकर आपल्याला इथेच सापडतात. 'वारा वाजे रुणझुणा' या पहिल्याच लेखात अलंकारिक भाषेच्या झिम्म्यात ते हरवून जाताहेत की काय असं वाटतं.

'चाफा बोलेना' मधील अटळाची जाणीव. 'अश्रू मोतिबिंदूहून फार मोठा रोग आहे, माणसाला देवाज्ञा होत नसते. खांदा द्यायलासुद्धा येत नाही तो देव आज्ञा कोण करणार ?' असं विचारणारा खरेपणानं जगणारा लेखकाचा मित्र, चंद्रावरही मातीच आहे. म्हणजे तो आपलाच आहे. माती हे एकमेव सत्य. त्याप्रमाणे 'पाडव्या'च्या गोष्टीतील घराचं मातीच्या ढिगाऱ्यात झालेलं रूपांतर. प्रत्येक सजीव निर्जीव गोष्टीचा मातीतच होणारा अटळ शेवट. पण त्यानंतर मिळालेलं पाडव्याचं जेवण म्हणजेच काहीतरी एका चिरंतन सत्याचा शोध. त्या मातीपलीकडेही ते सत्य असते. अशा काही फार विचार करायला लावणाऱ्या व मनावर खोलवर परिणाम करणाऱ्या जागा दाखविता येतील.

वडिलांची आज्ञा सतत पाळत राहाणारा किंवा पाळावी लागणारा टपोऱ्या डोळ्यांचा दिलीप. त्याची नैसर्गिक वाढ गोठवणारे वडील. त्याचं पुठ्ठ्याचं घर आणि त्यात राहायला येणारी सोनेरी केसांची निळ्या डोळ्यांची परी. पण त्याचा बाप काही त्या परीला येऊ देणार नसतो; तसाच पारव्यांच्या गळ्यात गोऱ्या साहेबाला 'निघून जा' म्हणून आज्ञा केलेल्या चिठ्ठ्या अडकवून समुद्रावरून त्यांना आकाशात उडवणारा वेडा सदामामा; स्टेशनवरची सदैव हिरवी असणारी झाडं, या सर्वांमध्येच वाचकाला गुंतवून ठेवण्याची शक्ती आहे.

यशवंत चौधरींच्या चित्रकाव्यात हाजारातलाच हाजारांनी म्हणणाऱ्या आदिवासींचा जीवनक्रम फाटलेला, गंजलेला, रंजलेला असला तरी आक्रोश करीत नाही. निःशब्द आहे. भूमातेच्या अंगाखांद्यावर खेळता वागडताना तो, हा फाटलेपणा विसरून निःशब्द झालाय्. नागरी संस्कृतीपासून दूर असलेल्या जीवनातली ही प्राणापर्यंत पोहोचलेली बेभान लय आपल्याला भोवंड आणते. असमाधान, हेवेदावे, स्पर्धा, आणि कृत्रिम यांत्रिक गती

या सगळ्यांनी विटविटलेल्या, घामेजलेल्या आपल्या मनावर फुंकर घालते. जीवनातलं खरं सत्य नजरेसमोर उभं करते आणि इथे पुन्हा खरेखुरे खानोलकर आपल्याला सापडतात.

अशी या पुस्तकात अठ्ठ्याण्णव स्फुटे आहेत. अनेकात मानवी स्वभावाचे आगळे नमुने, त्यावर अचूक ठेवलेलं बोट; अर्थात हे मानव मध्यमवर्गीय हे सांगायला नकोच. बाकी चिल्लर.

खानोलकरांच्या भाषेचा विलास चानी, राखी पाखरू सारख्या पुस्तकात आस्वादायला मिळतो तो इथे गैरहजर असणं अपरिहार्य आहे.

'अमेय' प्रकाशनाने पुस्तकाची सगळी अंगं आकर्षकपणे सादर केली आहेत. त्यांनीच चित्रात दाखविलेल्या फोनोच्या कर्ण्यातून उडणाऱ्या स्वरांच्या पाखरांसारखं खानोलकरांचं जास्त आकर्षक आणि त्यांच्याच शब्दात म्हणजे 'छापील अक्षरातून चैतन्याने उभारी घेतलेले' एखादे पुस्तक, एखादी कलाकृती 'अमेय' प्रकाशनाला प्रकाशित करण्याची संधी त्यांनी द्यावी. हीच इच्छा.

सुभाष अवचटांनी रंगांच्या विळख्यात वाऱ्याला असा रुणझुण वाजत, वहात ठेवलाय् की तो दृष्टीला फसवत रहातो. आणि वाटतं, ही उत्खननात सापडलेली तर लिपी नाही? पण तरीही ती फसवणूक आणि ते रंग–सगळंच वेधक आहे.

[**वारा वाजे रुणझुणा :** लेखक–चिं. त्र्यं. खानोलकर. प्रकाशक–मनोहर पिंपळापुरे, अमेय प्रकाशन, रुईकर मार्ग–नागपूर २. पृष्ठसंख्या–तीनशे बारा.]

उत्तर रात्र

शकुंतला जोग

१९५० साली आम्ही धारवाडला होतो. त्यावेळी मुंबई विद्यापीठाचे मराठीचे बक्षीस कर्नाटक कॉलेज मधील बी. ए. च्या विद्यार्थ्याने मिळवले होते. श्री. जोग कर्नाटक कॉलेजमध्ये प्राध्यापक असल्यामुळे आम्हाला अर्थातच त्या विद्यार्थ्याचे कौतुक वाटले होते. आणि भविष्यात तो एक चांगला साहित्यिक होईल असे भाकीत करून त्याला तसा आशीर्वादही दिला होता. आज तो आशीर्वाद खरा ठरलेला दिसत आहे. कारण 'उत्तररात्र' या कथासंग्रहावरून श्री. ना. व्यं देशपांडे, यशस्वी लेखक झालेले दिसतात.

'उत्तर रात्र' हा कथासंग्रह म्हणून प्रसिद्ध झालाय्. पण देशपांड्यांची जात ललित निबंधकाराची आहे. त्यातल्या बऱ्याच कथा, म्हणजे ललितनिबंधच वाटतात. मग यात एखादा विठ्ठल घोंडो आणि सुनीता प्रधान किंवा विमानतळावर मित्राला देण्यासाठी बुके घेऊन जाणारा, धुक्यामध्ये दिसणाऱ्या कावळ्यांला, मरतुकड्या कुत्र्यालाही सुंदर समजणारा गंधवेडा अथवा मरणाचं भय वाटणारा चिमुकला नानू, अशी पात्रं घातल्यामुळे त्याचं रूपांतर कथांमध्ये झालं आहे.

देशपांड्यांची कथा एकाच साच्याची नाही. किंवा एकाच काळाला बांधलेलीही नाही. 'व्यवहार' सारखी मासिक मनोरंजनाच्या काळातली खानदानी कथाही यात आहे, 'उत्तररात्र', 'चंद्र', 'ही रात सवत बाई' सारख्या नव्या अंतर्मनाचे पापुद्रे सोलणाऱ्या कथा आहेत, 'कागविष्ठेचे झाले पिंपळ' सारखी पूर्णांशानं सत्यकथेच्या छायेत वावरणारी कथाही यात आहे. 'फॅक्ट'सारखी निवर सत्य पेलत चालणारी कथा आहे तर 'सावली'सारखी रिटायरमेंट नंतर एकाकी झालेल्या शिस्तप्रिय वृद्धाची स्टीरियोटाईप कथा आहे. या वैचित्र्यामुळे या कथा वाचताना नीरसपणा जाणवत नाही. ही यातील निश्चितच जमेची बाजू.

'व्यवहार' ही यातली अबालवृद्धांना आवडेल अशी खानदानी भावमधुर कथा. ही मासिक मनोरंजनाच्या हसऱ्या, रेशमी, घरंदाज, एका विशिष्ट स्तरात वावरणारी भावरम्य कथा. यात जुन्या कथांप्रमाणेच तपशील भरपूर आहे. असायलाच हवा. तरीही लालीच्या मरणाचं दुःख उर्मिलाबाईंनी शेजारणींजवळ उजाळल्याचा उल्लेख एकदाच आला असता तर वाचकांच्या मनाचा

तळ जास्त आवेगानं ढवळला असता. त्याला दिवाकर कृष्णांच्या कथेची उंची लाभली असते. आता जी ती भायरम्यतेकडून मालतीबाई दांडेकर टाईप भावुकतेकडे झुकते आहे की काय असे वाटते तसे झाले नसते. वात्सल्याचं अजीर्ण झालं नसतं. तरीही उर्मिलाबाईच्या सावध झालेल्या सुसंस्कृतपणाने आणि वात्सल्य आणि सुसंस्कृतपणा यातला संघर्ष दाखवून देशपांड्यांनी कथेचा तोल फार सहज सुंदरतेनं साधला आहे. इथेच ते जिंकून जातात. पण शेवटी सुसंस्कृतपणा आणि वात्सल्य यातला संघर्ष संपला असं वाटतं. पण उर्मिलाबाई सरोजमध्ये लालीला बघतात. ती गेल्यावर लाली सासरी गेली असं समजून लालीचा फोटो उराशी कवटाळून धायी धायी रडतात. म्हणजेच सरोज या स्वतंत्र अस्तित्वाला त्या मुलगी मानत नव्हत्या. त्यामुळे संघर्ष संपलाय की नुस्ता आभास आहे ते कळत नाही. या उलट सरोजमध्ये कुठलाही सावधपणा नाही. तिच्या मनाची पाटी कोरी आहे आणि त्या कोऱ्या पाटीवर 'आई' म्हणून उर्मिलाबाईचं चित्र सहजपणे उमटतं. एकंदर कथाच चटका लावणारी आहे.

'मरण' मधील नानूला लहानपणीच कुठेतरी नश्वरतेची जाणीव आहे. प्रलय झाला तरी आपण त्यातून वाचणार आहोत असं नानूला वाटत असतं. म्हणजेच मरण या स्थितीतून आपण निसटून आहे तसेच रहाणार आहोत ही जी स्थितिशील जाणीव, अशी जी मनाची फसवणूक प्रत्येक माणूस करून घेत असतो, त्यावर देशपांड्यांनी अचूक बोट ठेवलय्. प्रेत पाहिल्यावर येणाऱ्या वैफल्यातून नानू आईचा आधार शोधतो. मोठी माणसं ज्योतिषी, साधूंचा आधार शोधतात एवढाच फरक.

'छंद' तशी प्रातिनिधिक कथा आहे. पण बुद्धिमान माणूस लाचार असू शकत नाही हे त्यातून प्रकर्षानं जाणवतं.

'सावली' मधील कर्तबगार अप्पासाहेब वृद्धापकाळी एकाकी पडतात. कथेच्या शेवटी ते एकटेच गच्चीवर हिंडतात फक्त. त्यांना साथ देते ती त्यांची सावली. पण सावलीही सूर्याच्या धाकानं साथ देते हे देशपांडे विसरले का ?

'धुकं' ही कथा लघुनिबंधात्मक आहे. त्यात फुलांचे गुच्छ कोवळिकेने जपतां जपतां ती खिन्नचन विक्रेती जे जपायचं ते चुकून उघडं टाकते किंवा टाकलं जातं. गुच्छ जपते. छातीवरचे कळे जपले जात नाहीत्. पण देशपांड्यांनी हे दाखविले आहे फार सूचकतेने आणि अबोल हळुवारपणाने.

'ही रात सवत बाई' मध्ये झाडूच्या जागेपासून प्रत्येक बारीक सारीक तपशील दाखविणं जरूरच होतं का ? गुदमरल्या गेलेल्या कलावंत मनाच्या आसपासचं वातावरण जास्त सूचक असायला हवं होतं. म्हणजे कथा पसरत गेल्यासारखी वाटते तशी वाटली नसती.

कडुनिंबाच्या कडवट औषधी गुणासारखी विरक्ती आणि गोड दरवळासारखी आसक्ती. तारुण्याच्या ढळत जाणाऱ्या मंजिऱ्या. त्यावेळी तिला होणारी भूतकाळातल्या मनोभंगाची आठवण. त्याला जाणवणारा तिचा अपुरेपणा. पण तरीही एकमेकांना समजून घेतल्यामुळे कडुनिंबाचा दाट झालेला पक्व मधुर दरवळ आणि त्यात भिजणारी उत्तररात्र, या सगळ्याचा त्रयोदशगुणी विडा छान रंगलाय्. अशा या प्रवाही कथा. आपलं विशिष्ट वळण शोधत आहेत. त्यामुळेच त्या जास्त रसरशीत, ताज्या वाटतात.

देशपांड्यांची भाषा काव्यात्म, भावनेच्या धारेत चिंब झालेली, सतत कसल्यातरी जाणीवांना स्पर्शत पुढे पुढे वहात जाणारी प्रवाही. 'गुच्छातील फुलांना उकडत असावे' 'हवेमध्ये एकप्रकारचं सुंदर कॉकटेल तयार झालं होतं,' 'काय चाल आहे रे तिची, अगदी खुडून घ्यावीशी वाटते.' अशी अनेक उदाहरणे देता येतील.

उत्तर रात्रीत, प्रौढवयात, पतिपत्नींच्या प्रेमामध्येही येणाऱ्या वत्सलतेच निदर्शन सुभाष अवचटांनी जाभळ्या रंगाच्या छटेने मुखपृष्ठावर केले आहे की काय ? जे काय आहे ते वाचकांचं लक्ष नक्कीच वेधून घेते आहे. प्रकाशकांची कामगिरी सुबक आहे.

[उत्तररात्र : ले—ना. व्यं. देशपांडे; प्रकाशक : अमेय प्रकाशन, नागपूर. पृष्ठे : १२५ किं. १० रु.]

□ □

बालकवींच्या अपूर्ण कवितेची मीमांसा

उषा मा. देशमुख

प्राचीन मराठी कवितेचा अभ्यास करताना एखादे काव्य अपूर्ण आहे असे आपण म्हणतो त्यावेळी ते काव्य कवीकडून अपूर्ण निर्मिती झाल्यामुळे अपुरे राहिले असते असे नाही. त्या काव्यातील अपुरेपणा उपलब्धतेच्या अपुरेपणामुळे निर्माण झालेला असतो. उदाहरणार्थ, महदंबेचे धवळे अपूर्ण आहेत, किंवा नरेंद्राचे रुक्मिणीस्वयंवर हे काव्य अपूर्ण आहे याचा अर्थ ते त्या कवीनेच अपूर्ण ठेवले असे नसून काळाच्या उदरात गडप झाल्यामुळे आज उपलब्ध नाही इतकेच! कदाचित एखाद्या संशोधकाला ते उपलब्ध होऊही शकेल. म्हणजे आज उपलब्ध असलेल्या प्राचीन मराठी कवितेच्या अपूर्णतेला ते ते कवी जबाबदार नसून त्या त्या काव्याची अनुपलब्धता जबाबदार आहे, असे आपण समजतो. त्यामुळे त्या काव्याच्या 'अपूर्णतेची' चिकित्सा करण्याचे काही कारण उरत नाही. ती कविता जे काय सांगायचे असेल ते 'संपूर्ण' सांगून 'अपूर्ण' राहिलेली असते. तिच्या परिशीलनात अशावेळी कोणताही अडथळा निर्माण होत नाही किंवा कवीच्या मूल्यमापनासाठीही हा अपुरेपणा कारणीभूत ठरत नाही. त्यातही तिच्या दीर्घत्वालाही, कुठे लघुत्व येत नाही, अशी ही ऐसपैस आणि विस्तारलेली कविता काही सुरवातीचे अध्याय किंवा शेवटचे अध्याय मिळत नसतात, सापडत नसतात म्हणून अपूर्ण राहिलेली असते. अशा या अपूर्णतेचे नाते कवीशी जोडता येत नाही. त्यावेळी संशोधकांची थोडी अडचण होत असेल पण रसिकाला, आस्वादकाला त्या अपूर्णतेमुळे कोणताही व्यत्यय येत नाही. त्या काव्याचा रसास्वाद तो सुखेनैव घेऊ शकतो.

अर्वाचीन मराठी कवितेच्या बाबत असे म्हणून चालणार नाही! रे. टिळक, गोविंदाग्रज, आणि बालकवी यांच्या काही कविता अपूर्ण आहेत. या अपूर्ण कवितेची मीमांसा करताना प्राचीन कवितेप्रमाणे अनुपलब्धी हे कारण धरता येत नाही. कारण त्या कविता काळाच्या उदरात गडप झाल्या म्हणून अपूर्ण राहिल्या अशी परिस्थिती नसते. तर निर्मिति-प्रक्रियेच्या वेळीच ही कविता अपूर्ण राहते! शब्द सुचत नाहीत, रचना तयार होत नाही, प्रतिभा मूक बनते अशी तिची कारणे दाखविली जातात. रे. टिळक, गोविंदाग्रज आणि बालकवी यांच्या मृत्यूमुळे ही कविता अपूर्ण राहिलेली असते असे रे. टिळकांचा अपवाद वगळता होत नाही. किंबहुना वरील कवींची एखादीच कविता अपूर्ण असण्यास अनवधानाने ती अपूर्ण राहिली असावी असे समजता येईल. पण वस्तुस्थिती तशी नसावी. गोविंदाग्रजांच्या, बालकवींच्या काही कविता अपूर्ण राहिल्या आहेत. या अपूर्ण कवितांची कारणमीमांसा करता येणे सहज शक्य आहे. त्या दृष्टीने बालकवींची 'अपूर्ण कविता' न्याहाळण्याचा प्रयत्न प्रस्तुत आहे.

'आनंदी–आनंद', 'संध्यारजनी', 'अरुण', 'निर्झरास', 'फुलराणी', 'तारकांचे गाणे' या आणि इतर काही एकापेक्षा एक काव्यमय असलेल्या कविता अपूर्ण राहिलेल्या नाहीत तर 'रणघोष', 'निःश्वास', 'मूढ माली' या आणि इतर कविता अपूर्ण राहिल्या आहेत. याचा अर्थ असा नव्हे की बालकवींच्या कलेच्या दृष्टीने श्रेष्ठ असलेल्या कविता पूर्ण झाल्या आहेत व अकलात्मक कविता अपूर्ण राहिल्या आहेत. असे वरवर दिसत असले तरी तसे आग्रहपूर्वक मांडता येत नाही. कारण 'हृदयाची गुंतागुंत', 'यडग्यातील रमणी' 'पारवा', 'शून्यमनाचा घुमट', 'अश्रुमाळ' अशाही कविता अपूर्ण राहिल्या आहेत. या सर्व कविता मिळून एकूण पस्तीस असून त्यातही मथळा न दिलेल्या पण अपूर्ण राहिलेल्या अशा एकूण चार कविता सापडतात.

म्हणजे 'समग्र बालकवी' (१९६६) मध्ये उपलब्ध असलेल्या एकशे त्रेसष्ट कवितांपैकी एकशे चोवीस कविता, सलग आशय प्रगट करणाऱ्या आहेत, तर एकोणचाळीस कविता अर्धवट राहिल्या आहेत, अपूर्ण राहिल्या आहेत.

त्या अपूर्ण कविता बारकाईने तपासल्या तर एक दोन गोष्टी स्पष्ट होतात. बालकवींनी अनुभवलेला निसर्ग काव्यातून अवतरत असता त्या कविता अपूर्ण राहिलेल्या नाहीत. निसर्गाचे आणि बालकवींचे नाते हे अतूट आहे. निसर्गातच त्यांनी आपल्या काव्यात्म्याला, हृदयीच्या अन्तर्हृदयाला बघितले व त्यातून त्यांची कविता गोचर झाली. उपदेशकाच्या, मार्गदर्शकाच्या भूमिकेतून निसर्गाला साक्षात करण्याची गरज बालकवींना वाटलेली नाही. निसर्ग हा त्यांना कधी प्रियकर, कधी सखा, कधी सुहृद या भूमिकेत भेटतो. तो बालकवींच्या जीवीचा जिवलग! आहे. निर्झराच्या खळखळाटात गाणाऱ्या पाखराच्या सुरेली लकेरीत, आणि तारकांच्या लुकलुकण्यात बालकवींनी आपली शब्दकळा मुरवली व त्यातून जी निर्मिती झाली ती म्हणजे शब्द, स्पर्श, रसरूप, गंधात्मक आणि पंचज्ञानेन्द्रियांचा विषय असलेल्या निसर्गाचा स्वयंभू, परिपूर्ण, सलग असा आविष्कार! सौंदर्याची आसक्ती, ओढ, महत्त्वपूर्ण जाणीव, या कविमनाने टिपली होती. संपूर्ण आयुष्यभर या निसर्गाशी एकनिष्ठ राहण्याचा वसा बालकवींच्या प्रतिभेने घेतला होता! निसर्गाला रंग, नाद, गंध आणि स्वर या जाणिवांसह एकत्रितपणे बालकवींनी आपल्या कवितेत पकडून ठेवला तो आजही ताजा, टवटवीत आणि रसरशीत असा भासतो. बालकवींना या जगातून निघून जाऊन आज पंचावन्न वर्षे होऊन गेली तरी त्यांची निसर्गकविता आजही अम्लान आहे, तिला मलूलपणा कसा तो ठाऊक नाही, याचे कारण बालकवींच्या प्रतिभेचे सारसर्वस्व त्या कवितेत एकवटलेले आहे. त्यामुळे बालकवींची ही निसर्गाला, आशयातून अभिव्यक्त करणारी कविता, अपूर्ण राहात नाही या गोष्टीला फार फार महत्त्व आहे. कारण तोच बालकवींच्या कवितेचा आत्मा आहे. वास्तविक बालकवींच्या काळात निसर्गाकडे दोन भूमिकांमधून मराठी लेखकांनी बघितले. १८८५ ते १९२० या कालखंडातील मराठी वाङ्मयावर वरवर नजर फिरविली तर असे दिसून येते की हा निसर्ग एकतर उपदेशक, मार्गदर्शक म्हणून वाङ्मयातून अवतरला आहे किंवा व्यक्तिजीवनदर्शनात निसर्गाची रमणीयता दाखविली पाहिजे असे समजून या निसर्गाची योजना मुक्तामाला, मंजुघोषा, वसंतकोकिला, विश्वासराव इत्यादी कादंबऱ्यांतून झाली, त्यावेळी या वाङ्मयातून विशेषतः कादंबरीतून जो निसर्ग अवतरला तो सर्व पानाफुलांसह आणि सर्व ऋतूंसह अवतरला. त्यामुळे व्यक्तिजीवनातील त्याची अपरिहार्यता, अनन्यता दुर्लक्षून एखाद्या पॅचवर्कसारखी त्याची योजना केली गेली. हा निसर्ग स्व-तंत्र, स्वयंभू आणि जिवंत आहे याची तितकीशी कदर न करता हवा तसा आणि मानवेल तितका त्याचा उपयोग करून घेतला गेला. तत्कालीन कवितेमधूनही निसर्गाचे दर्शनसुख अनुभवाला मिळाले नाही असे नाही. पण बालकवींनी अनुभवलेला निसर्ग आणि केशवसुत, गोविंदाग्रज, रेंदाळकर, लेंभे, रे. टिळक यांनी अनुसरलेला निसर्ग यांच्यात तफावत निर्माण होते. म्हणूनच बालकवींच्या निसर्गाचे इतके महत्त्व आज घटकेला वाटते कारण तो आपल्या सर्व संभारासह आणि चैतन्यासह जिवंत झाला आहे, साक्षात झाला आहे. एखादा अपवाद वगळता बालकवींची एकही निसर्गकविता अपूर्ण नाही व म्हणून या अपूर्ण कवितेच्या अभ्यासात त्यांच्या स्वयंपूर्ण व संपूर्ण निसर्ग कवितेला फार महत्त्व मिळते.

या निसर्गाच्या देखील विविध भावावृत्ती आहेत. कधी तो प्रणयातुर झालेला आहे, कधी शैशवातील उत्कट क्षण त्याने टिपले आहेत, तर कधी विषण्णतेमध्ये तो मग्न झाला आहे. मानवाच्या ठिकाणच्या या भाववृत्ती आणि निसर्गामधील भाववृत्ती यांचा संकर होऊन एक अलौकिक प्रतिसृष्टी बालकवींनी निर्माण केली आहे. त्या सृष्टीचे आणि लौकिक सृष्टीने बिलकुल नाते नाही असे नाही. त्यातील व्यक्ती, त्यांचे परस्परांचे भावसंबंध या कवितेच्या आशयातून गोचर होत असतात तरीही ती एक अपर सृष्टी असते. स्वयंभू सृष्टी असते. संपूर्ण असते आणि स्वयंपूर्ण असते. बालकवींनी अनुभवलेल्या निसर्गाचाही एक विशिष्ट अनुक्रम आहे, त्या विशिष्ट अनुक्रमानेच तो अवतरतो. उदा. फुलराणी, संध्यारजनी, अरुण या कविता डोळ्यासमोर आणल्या तर वरील विधानाची साक्ष पटते. या अर्थाने बालकवींचा निसर्ग 'अलौकिक' आहे. लौकिकाचा आभास तो निर्माण करतो तरीही त्यापेक्षा तो वेगळा असतो. आणि असा

हा निसर्ग चैतन्याचा साक्षात्कार घडविणाऱ्या कवितांमध्ये अवतरतो. अशा जिवंतपणाची साक्ष ज्या कवितांमध्ये येते त्या कविता प्रामुख्याने आनंदाच्या भाववृत्तीचा आविष्कार करतात. गतीला, वेगाला आपोआपच त्या ठिकाणी महत्त्व येते. उलटपक्षी उदासीनता टिपली जात असता या कवितांतील गती संथ होते. एखाद्या भोवऱ्यासारखी ती कविता एका विशिष्ट परिघात फिरत राहाते. अशा वेळी विशिष्ट निसर्गप्रतिमा आपोआप परिस्फुट होतात.

बालकवींच्या निखळ निसर्गकविता जशा अपूर्ण राहिलेल्या नाहीत तशाच शिशुविषयक असलेल्या कविताही अपूर्ण राहिलेल्या नाहीत. 'भरले घर ओकें ओकें', 'ओंवाळणि घाली भाई', 'अंगाई–गीतें', 'चांदोवा मजला देई'; 'रागो आला', 'चिव् चिव् ग चिमणू ताई,' 'घोडा घोडा,' 'माधा भाऊ' 'चिमणीचा घरटा चोरिस गेला', 'पाळणा', 'भिकारी' या सर्व कविता शिशुगीते म्हणून समजल्या जातात. त्यातही दोन प्रकार आहेत. एक म्हणजे शिशूंसाठी लिहिलेली कविता व दुसरा म्हणजे शैशवाची अनुभूती साक्षात करणाऱ्या कविता. बालकवींच्या सर्व निसर्ग कवितांतून साक्षात होणारे शैशव व या बाळगाण्यांतून साक्षात होणारे शैशव यांत आंतरिक सुसंगती दिसून येते. शब्दांचा लडिवाळपणा आणि नादात्मक संघटना हे दोन्ही विशेष कवितांमधून समान पातळीवरून अवतरले आहेत. आशयातील ध्वनिमाधुर्यही शैशवाला अनुकूल होईल असेच अवतरते. या सर्व कविता अपूर्ण राहिलेल्या नाहीत. यावरून काय दिसते! निसर्ग कविता अपूर्ण राहात नाहीत व शिशुगीतेही अपूर्ण राहात नाहीत! याचे कारण कोणते? व त्यामागील मनोवृत्ती कोणती? असा विचार केल्यास असे स्पष्ट जाणवते की बालकवींच्या प्रतिभेचा तो धर्म आहे. अशा काव्यप्रतीतीत ते रममाण होतात व त्यातून ही काव्यनिर्मिती अविरोध होत राहते. अपूर्णतेची बाधा या कवितेला लागत नाही.

'प्रतापसिंह', 'दौलतरावाची मंजुळा', 'मोहिनी' शाहीर', 'वीरमराठा', 'रणघोष', 'राष्ट्रसेवा', 'राष्ट्रगायत्री' 'आर्यांची अवनती', 'नीतिअनीती' या एका विशिष्ट जातीच्या, प्रकारच्या कविता अपूर्ण राहिल्या आहेत. आणखी एक अपूर्ण कवितेचा वर्ग म्हणजे 'भटकणे', 'निराशा', 'पारवा' 'कवीची इच्छा', निःश्वास', 'हृदयाची गुंतागुंत', 'रजनीस आवाहन', 'शून्यमनाचा घुमट' आणि 'संशय!' वास्तविक असे वर्गीकरण करणे कवीवर अन्याय करणारे होते याची जाणीव आहे. तरीही सारखाच मूड व्यक्त करणाऱ्या कविता एकत्रित तपासल्या तर काय दिसेल? या दृष्टीने त्यांना विवेचनाच्या सोयीसाठी एकत्र आणले आहे. त्यातही त्यांना विषय आणि आशय अभिव्यक्त करण्याची पद्धती यातही एक सूत्र आढळते म्हणून त्या एकत्र विचारार्थ घ्यावयाच्या आहेत. आणखी एक अपूर्ण कवितांचा वर्ग म्हणजे 'जादुगारीण', 'तू तर चाफेकळी' 'प्रीति व कर्तव्य' '...ला', 'मूढ मालती' 'थडग्यातील रमणी', 'गाण्याची चढली कमान', 'निःश्वास' आणि 'दवबिंदु' ह्या आहेत. अशा एकूण एकोणचाळीस कविता संपूर्ण बालकवींच्या कवितेत अपूर्ण सापडतात.

बालकवींचे मित्र व बालकवींच्या काव्याचे चाहाते गोविंदाग्रज यांच्या केवळ सतरा कविता अपूर्ण राहिल्या आहेत व त्या कवितांचे विषय आणि काळ लक्षात घेता गडकरी काव्यनिर्मितीकडून नाट्यनिर्मितीकडे वळले व त्यांची कविता मूक बनली व ती पुनः अवतरली ती नाटकाच्या संवादांतून. या दृष्टीने गोविंदाग्रजांच्या अपूर्ण कवितांचे नमुने मथळे जरी अभ्यासले तरी वरील प्रमाणे पडताळा येऊ शकतो. 'लोकमान्यांस भारतवर्षाचा आशीर्वाद', 'गेले गोपाळकृष्ण हा! हाय!!' 'दिवाळी', 'लक्ष्मीपूजन' वगैरे! यावरून असे दिसून येते की कवीचे एक चित्त जर त्याच्या निर्मितीकडे असेल त्या निर्मितीविषयी जराही किंतु किंवा अनास्था त्याच्या मनात नसेल तर ही निर्मिती कलात्मक होण्याचा संभव असतो; पण ज्यावेळी कवीचेच मन विचलित झालेले असेल, काव्यनिर्मिती करण्याकडेच दुर्लक्ष झाले असेल, अशा वेळी ललितवाङ्मयाच्या त्या प्रकारातील त्याची गती थांबली असावी असा निष्कर्ष काढता येणे सहज शक्य आहे. गोविंदाग्रजांच्या बाबत असे विधान करता येते. त्यांच्या अपूर्ण कवितांचे मथळे लक्षात घेतले तरी ही गोष्ट स्पष्ट होईल. बालकवींच्या बाबतीत असे म्हणता येईल का? याचा विचार आता करावयाचा आहे.

जीवनातील विषण्णता, उदासीनता, दुःखात्मकता वाढीला लागते आणि कविता अपूर्ण राहते का? या दृष्टीने बालकवींच्या अपूर्ण कवितेचा अभ्यास करता

येईल. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. कारण 'आनंदी आनंद', 'अरुण', 'निर्झरास', वालविहग', 'आवाहन', 'सृष्टीच्या गायकास' या कविता बालकवींच्या ठिकाणचा आनंदाचा, उल्हासाचा, स्वच्छंदी मूड व्यक्त करणाऱ्या अशा या कविता आहेत. निसर्गाकडे ते या कवितेतून बघतात ते प्रियकराच्या, स्नेह्याच्या, सुहृदाच्या भूमिकेतून! अशा एक विशिष्ट पातळीवर ही कविता असता बालकवी अचानक उदासीन झालेले आढळतात, आनंद आणि उदासीनता यांची तार्किक संगती लावता येणे आवश्यक आहे. त्यासाठी बालकवींच्या सर्व संपादकांनी आणि टीकाकारांनी बालकवींचे जीवन आणि काव्य यांची जोडी बांधून विवेचनाची सोय बघितली आहे. वास्तविक बालकवींची कविता ही सतत दोन पातळ्यांवरून प्रगट झालेली आहे. दोन भाववृत्तींचा सतत त्यांच्या मनावर पगडा बसलेला आहे. कधी एक भावना प्रबळ होते तर कधी दुसरी! कारण हे कविमन अत्यंत संवेदनाक्षम आणि तरल मनोवृत्तीचे आहे. त्यामुळे कधी ते सुखावते कधी ते खंतावते व त्यामुळे वरील कवितात काठोकाठ भरलेला आनंद दृष्टीस पडतो तर कवितेचा शेवट दुःखपूर्ण, उदास अशा अभिव्यक्तीत होतो. म्हणजे यावरून हे सिद्ध करता येईल की बालकवी अतिशयत्वाने जीवनात दुःखी झाले, विषण्ण झाले आणि त्यांची कविता अपूर्ण राहिली असे घडत नसून ही उदासीनतेची किनार त्यांच्या बहुतांश कवितेला जोडली गेलेली आहे. ती त्यांची कविवृत्तीच आहे.

बालकवींच्या अपूर्ण कवितेची मीमांसा आणखी एका पद्धतीनें करता येईल. ती म्हणजे बालकवींची काव्यनिर्मिती चालू आहे पण एखादी कविता अपूर्ण राहाते का? यासाठी केशवसुत आणि गोविंदाग्रज यांनी आपल्या कवितांखाली स्थळकाळाचा उल्लेख केलेला आहे तसा दुर्दैवाने बालकवींच्या कवितेखाली स्थळकाळ उल्लेख नाही. त्यामुळे त्याच्या आत्मघाताचा आणि काव्यातील उदासीनतेचा समान्तर प्रवास कदाचित दाखविता आला असता. परंतु तरीही 'निर्झरास,' 'फुलराणी,' 'बालविहग,' 'संध्यारजनी', 'अरुण', 'आनंदीआनंद' या कविता १९१४ पूर्वीच्या आहेत. त्यावरून असा अंदाज बांधता येतो की बालकवींनी आपल्या उत्तर आयुष्यात लिहिलेल्या कवितांतून त्यांची उदासीनता ही अधिक दाट, सघन वनत गेली असावी. याचा अर्थ ही उदासीनता सुरवातीपासूनच त्यांच्या मनात आहे, पण तिची चढती श्रेणी अधिकाधिक स्पष्ट होत गेली ती १९१४ नंतरच्या कवितेत. उदा० आनंदी–आनंद या कवितेत 'स्वार्थाच्या बाजारांत, किती पामरे रडतात, त्यांना मोद कसा मिळतो? सोडून स्वार्था तो जातो–!' स्वार्थमय जगातून मोद मिळवायाचा असेल तर स्वार्थाला सोडून द्या की तुम्हाला आनंदाची प्राप्ती होईल असे बालकवी म्हणतात. आणि अशी अवस्था आली की

> **द्वेष संपला. मत्सर गेला,**
> **आता उरला, इकडे, तिकडे चोहिकडे**
> **आनंदी–आनंद गडे!**

स्वार्थ, माणसाच्या ठिकाणचा संपला, चटकन द्वेष, मत्सर इत्यादी षड्‌रिपू नाहीसे होतात व मग उरते ती फक्त आनंदाची जाणीव, इतक्या मर्यादित अवस्थेत या आनंदजाणिवेचे गणित बालकवी मांडतात. उलटपक्षी 'निर्झरास' या कवितेत

> **परि न झरे माझ्या गानीं। दिव्यांची असली श्रेणी**
> **जडतेला खिळुनी राही। हृदयबंध उकलत नाही**

असे म्हणून

> **शिकवी रे, शिकवी मातें**
> **दिव्य तुझीं असलीं गीतें।**

अशी एक आशादायक मनाची अवस्था बालकवी व्यक्त करतात. या दुःखाने, उदासपणामुळे कवी पिचलेला नाही तर त्याच्या ठिकाणी दुर्दम्य आशावाद आहे. हृदयबंध उकलण्यासाठी तरी निदान निर्झराकडून काही शिकले पाहिजे हाच आशावादी दृष्टिकोण 'बाल–विहग' मध्ये दिसतो.

> **सुंदरतेच्या मोहनांत मन अमुचेंही नाचे**
> **बंधहि होती शिथिल हरवतें भानहि जवताचें,**
> **जीव ओढतो वरवर जाया चैतन्यापाठीं**
> **दिव्यानंदीं म्हणुनि उमाळा दुःखाचा दाटे**
> **सत्यही जो आनंद कल्पनामय केवळ वाटे**
> **अपूर्णताही यापरि मजला जरि बुडवी शोकी**
> **चित्र मनोहर खगबाला परि मी तव अवलोकी**
> **अपूर्ण अपुले ईप्सित झाले पूर्ण दिसे जेथें**
> **मनुजाचें मन सहज पावतें आकर्षण तेथें**
> **तुजला बघता भरभर उडतां कविता आठवली**
> **कशीबशी ती त्वत्प्रीतीस्तव या कवनीं लिहिली॥**

दिव्यानंदाकडे, पूर्णत्वाकडे कविमनाचा ओढा आहे. पण त्यासाठी जडत्वाची, अपूर्णत्वाची बंधने मोकळी व्हावयास हवी ती होत नाहीत. त्यासाठी उतारा म्हणून कवी म्हणतो 'अपूर्ण अपुले ईप्सित झाले पूर्ण दिसे जेथे, मनुजाचे मन सहज पावते आकर्षण तेथे' अपूर्ण ईप्सित ज्या कल्पनेच्या विश्वात पूर्ण झालेले दिसते त्याचेच आकर्षण मानवी मनाला वाटत असते. आपल्या दुःखावर या ठिकाणी स्वतः कवीच फुंकर घालतो आहे असे दिसते.' काही तरी तडजोडीची भूमिका स्वीकारतात.

'येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा' असा आशावाद बालकवी प्रगट करतात. या ठिकाणी या दुःखाकडे बघण्याची बालकवींची वृत्ती ही आशादायी आहे. 'आवाहन' कवितेत ते म्हणतात, स्वतःच्या काव्य-कर्तृत्वाची मर्यादा लक्षात आल्यावर आशावादी भूमिकेपेक्षा बालकवी तडजोडीची भूमिका स्वीकारतात.

'सौख्यही शिणले, दुःखही शिणले, शिणले तत्व-विचार !' अशी एक अवस्था कवीच्या ठिकाणी येऊन जाते. तिची तार्किक संगती Logical positivity लावता येणे सहज शक्य आहे. या उदासीनतेच्या भव-वृत्तीकडे 'जाइल हे तम वितळोनी' या पद्धतीने बालकवी बघतात. उदासीनता या कवितेत

मुक्या मनाचे मुके बोल हे
घरे पाडिती पण हृदयाला
तीव्र वेदना करिती, परि ती
दिव्य औषधी कसली त्याला !

या ठिकाणी बालकवी अशा दिव्य औषधीची अपेक्षा व्यक्त करतात की त्या औषधीमुळे ही उदासीनता नाहीशी होऊ शकेल ! कमी होऊ शकेल ! अशी आस्था वरील सर्व कवितांतून सतत व्यक्त झाली आहे. कवीच्या भावानुभूतीतून व्यक्त होणारी निराशा, मनाची विषण्णता व हुरहूर ही केव्हा तरी संपणार आहे. तिला एखादी औषधी मिळणार आहे व त्यामुळे ती संपणार आहे. अशा पद्धतीने बालकवी या उदासीनतेची कारणमीमांसा करतात. बालकवींच्या पूर्ण कवितांतून येणारी उदासीनता आणि अपूर्ण कवितांतून व्यक्त होणारी उदासीनता यातही एक सूक्ष्म फरक आहे. पूर्ण कवितेतील उदासीनतेत एका आशावादाच्या आढळ होतो. परंतु अपूर्ण कवितेतील उदासीनतेची जात वेगळी आहे.


सुंदर सगळें, मोहक सगळें,
खिन्नपणा परि मनिचा न गळे
नुसती हुरहुर होय जिवाला—कां न कळे कांहीं !
चंद्रबिंब धरि अभिनव कांती,
मेघ तयांनी धवलित होती,
परि हृदयीं नैराश्यकालिमा—मम खंडत नाहीं !
भोवऱ्यांत जणुं पडलों कोठें,
स्वप्न भयंकर दिसतें वाटे
जीवित केवळ करुणासंकुल—नैराश्यें होई !

—अपूर्ण

इतकीच 'निराशा' ही वरील कविता उपलब्ध आहे. सृष्टीची विलसिते सुंदर आहेत, मोहक आहेत. विश्वातील आनंद, चैतन्य तसाच आहे, पण कविमन मात्र 'नुसती हुरहूर होय जिवाला—का न कळे काही !' असे म्हणते. अभिनव अशी कांती चंद्रबिंबावर चढली आहे. त्याच्यामुळे मेघही धवल होत आहेत. आपला गुण चंद्राने त्यांना दिला आहे. पण तो गुण माझ्या ठिकाणी परावर्तित होत नाही ही खंत कवीला जाणवते आणि त्यामुळे दुःखकालिमा नैराश्यामुळे अधिकच करुणासंकुल बनतो. एक प्रकारची हताश मनोवस्था कवी गोचर करतो. आतापर्यंत या दुःखावर काही तरी उपाय दिसत होता, आता करुणासंकुलतेच्या व्यावर्तात ही उदासीनता कोंडली जाते आणि कविता अपूर्ण राहाते. 'हृदयाची गुंतागुंत' याही कवितेत जीव दडपला गेला आहे. काय करावे समजेनासे होते असे कवी म्हणतो. विश्वव्यवहार आणि निसर्गव्यवहारातील सातत्य, चैतन्य, नित्यनूतनत्व कवीला जाणवते, पण या विश्वाच्या आणि निसर्गाच्या संदर्भात याची खंत कविमनाला वाटते व त्यातून आपल्या भाववृत्ती मात्र अपुऱ्या पडतात, असे हताशपणाचे उद्गार बालकवी काढतात.

व्यामोह भयंकर दुस्तर भरला भारी,
की जीव दडपतो मन निद्रेमाझारी
मज व्यर्थ नको ती अमरपणाची गाणीं
कुणि उठवा असल्या गहनांतुनि हलवोनी.

अशी विकल अवस्था या अनुभूतीतून व्यक्त होते आपल्याच उदासीनतेच्या कोषात ही कविता अडकते. तीतून बाहेर पडण्याची ताकद, नसलेपणाची जाणीव, कवी या अपूर्ण कवितेतून व्यक्त करतो व त्यावरून असे सिद्ध करता येते की या उदासीनतेचे ओझे बालकवींना



नागपूरच्या केळीबाग रोडवरील भोसलेकालीन शिल्प —जयंत हरकरे

अनुक्रमणिका

पेलता येऊ शकलेले नाही. निसर्गातील चैतन्याला, उल्हासाला, आनंदाला, सातत्याला आणि नित्यनूतनतेला ते एका विशिष्ट मर्यादेपर्यंत सामोरे जाऊ शकले, पण त्या निसर्गाच्या संदर्भात स्वप्रतिभेचा अपुरेपणा कवीला जाणवला आणि म्हणूनच या कविता अपूर्ण राहिल्या. या कवितेतील दु:खजाणीव हीं विश्वात्मक पातळीवर जाऊच शकली नाही. मला अमरपणाची गाणी नकोत ! अशी नकारात्मक भाषा कवी वापरतो यावरून वरील विधान पटू शकेल. 'दिव्यरूपिणी सृष्टी' मात्र तशीच आहे की जी बालकवींच्या 'निर्झरास' 'बालविहग', 'फुलराणी', 'संध्यारजनी', 'तारकांचे गाणे', 'अरुण' या कवितांमध्ये भेटली होती. पण सुरवातीची ही सृष्टीची चैतन्यमयी अवस्था कवीला एका मर्यादित अवस्थेनंतर पेलवणे अशक्यच झाले म्हणून या कविता अपूर्ण राहिल्या. कवीच्या जीवनाचा आणि काव्याचा संदर्भ जोडण्याचा प्रयत्न आजही होत असतो. पण त्यापेक्षा एका मर्यादेपर्यंत स्फुरणशील अशी प्रतिभा कोमेजून जाऊ लागली व या कविता अपूर्ण राहिल्या. अपुरेपणाचा विचार करता येतो. असा तिच्या एका विशिष्ट दु:खाच्या आवर्तात, परिघात ही भाववृत्ती कोंडली गेली, बांधली गेली. या बंधनांना झुगारण्याची ताकद या आनंदी पक्ष्याच्या पंखात उरत नाही व त्यामुळे 'पाखरास' सारख्या सात कविता लिहिल्या जातात. स्वकाव्यनिर्मितिक्षमतेच्या अपूर्णत्वामुळे कोमेजून गेलेले हे 'मुक्या मनाचे बोल' आहेत. जोपर्यंत बालकवींची प्रतिभा ही आपल्या सर्व विलसितांसह निसर्गात विरून जात होती तोपर्यंत प्रतिकात्मकतेचा स्पर्श तिला झालेला नव्हता. पण बालकवींच्या काव्याच्या आलेखात असा एक टप्पा येतो की त्यावेळी बालकवींना आपल्या काव्य-निर्मितिक्षमतेच्या बाबत अपूर्णतेची जाणीव झाल्यावाचून राहिली नसावी व म्हणून अुदासीनता, विकलता, हताशपणा काव्यातून अधिक गडदपणे अवतरू लागतो. बालकवींचे स्नेही श्री. नथू पाटील यांनी आपल्या आठवणीत म्हटले आहे (समग्र बालकवी १९६६, पृष्ठ ३२७) "He felt he was missing something and he was always in search of it." आपल्या हातून काव्य होत नाही म्हणून ते तळमळत. यावरून जे हरवले आहे त्याचा शोध बालकवी घेण्याचा प्रयत्न करतात पण ते गवसत नाही, हातातून निसटून गेले आहे म्हणून सापडत नाही. पण, एके काळी ते आपल्या जवळ होते याची आठवण कवीला होते व तो त्यामुळे आपोआपच दु:खी बनतो. अर्थात हे दु:ख अत्यंत मर्यादित, स्वपुरते असे आहे. समाज स्तराशी त्याची तुलना करण्याची गरज नाही. तसाही प्रयत्न बालकवींवरील समीक्षेत झाला आहे. समाजदु:खाने पोळला गेलेला कवी समाजदु:खाची जाणीव आपल्या कवितेतून गोचर करतो. बालकवींची दु:खाची जाणीव त्याप्रकारची होती. असाही बालकवींच्या काव्याच्या समीक्षेत विचार झाला. पण वस्तुस्थिती तशी नाही. बालकवी आपल्या एका पत्रात म्हणतात—"माझी एकही कविता नाही. मी आता कवीच राहिलो नाही. असो ! काय उपाय ! तुमचे पत्र आले की कविता लिहावीसें वाटते; पण टाक हातात घेतला की भयंकर नैराश्याने लेखणी गळून पडते." हे बालकवींचे उद्‌गार अत्यंत बोलके आहेत.

'प्रतापसिंह', 'दौलतरावांची मंजुळा', 'मोहिनी,' 'शाहीर', 'वीर मराठा', 'रणघोष', 'राष्ट्रसेवा', 'राष्ट्रगायत्री', 'आर्यांची अपनति' आणि 'नीति व अनीति' या दहा कथात्मक दीर्घत्वाकडे झुकणाऱ्या पण एक विशिष्ट आशय प्रगट करणाऱ्या कविता अपूर्ण राहिल्या आहेत.

या कवितांचे आणि 'धर्मवीर' या कवितेचे फार जवळचे नाते आहे. समाजमनावर संस्कार निर्माण करणे व सकलजन शहाणे करून सोडणे हा जो तत्का. लीन वाङ्मयाचा युगधर्म होता त्याचेच आपण मुसाफिर आहोत याची स्पष्ट जाणीव करून देणाऱ्या अशा या कविता आहेत. 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावि काळ' गाणाऱ्या विनायक कवीचा सहवास कदाचित् या काव्यनिर्मितीसाठी प्रेरक झाला असावा. उदाहरणा-साठी 'दौलतरावांची मंजुळा' व 'मोहिनी' यांचे विनायकांची 'राणी दुर्गावती' 'संयोगिता', 'वीरमति' या कवितांशी नाते लावून दाखविता येईल. किंवहुना बालकवींच्या, वरील सर्व कविता म्हणजे त्यांच्या मनात एक दीर्घ कथाकाव्य लिहिण्याची जी योजना होती तिचेच भग्न अवशेष आहेत. या कथाकाव्याचा नायक हा पूर्वपरंपरेला अनुसरणारा शूर, वीर, मराठा गडी आहे. त्याने गाजविलेला प्रचंड पराक्रम, त्याचे तेजस्वी रूप आणि त्याच्या रूपावर भाळलेली कुणी मदनमंजिरी त्याला भेटते व कवीला कृतार्थता वाटते. ही आशयाची वीण बालकवी पूर्ण घालू शकत नाहीत. आणि त्यामुळे


दर्जेदार किर्लोस्कर इंजिनांना
भारतीय मानक संस्थेचे
प्रमाण पत्र
५ ते ८ हॉर्स पॉवर
IS 1601
ISI
ए व्ही १
५ हॉर्सपॉवर
टी व्ही १
७ हॉर्सपॉवर
एस व्ही १
८ हॉर्सपॉवर

अनुक्रमणिका

त्यांच्या वरील सर्व कविता अपूर्ण राहतात. किंबहुना हा त्यांच्या काव्यप्रकृतीचा धर्मच नव्हे! ते मोठ्या प्रयासाने ज्यावेळी अशी काव्यनिर्मिती करू लागतात त्यावेळी कविता अपूर्ण राहते. या कवितेत नादलुब्धता, संवेदनांची अचूकता आणि भाषेचा लडिवाळपणा नाहीसा होतो. आपोआपच एक नीरस, कोरडेपणा या कवितांना येतो. आणि मग अलंकारांच्या जाळ्यात कविता अडकते.

पायात रुप्याचा तोडा। ये थबकत थोडा थोडा
युवराज विजयसिंहाचा। झार्डीतुनि पिवळा घोडा
शिरपेच शिरावर साजे। पाठीवर लटके ढाल
रूदार झगा जरतार। अंगावर हिरवी शाल,
उतरून निलासी वीर। चुंबुनि ती मोहनमाला
जणुं रम्य हृदय रमणीचें। हळुवार धरी हृदयाला
उतरून वारूवरतून। सरदार शिपाई आले
हळुवार हृदय रमणींचे। हृदयाशीं संगत झालें

'येथे ही कविता संपते व अपूर्ण राहाते. वरील कविता वाचल्यावर काय दिसते ? एक तर वारूवरतून आलेल्या शिपायाचे हृदय आणि हळुवार हृदय असलेल्या रमणीचे हृदयाशी संगत झाले आहे. या प्रसंगातील प्रणयाची उत्कटता शब्दात पकडता न आल्याने ही कविता एकतर अत्यंत नीरस होते व भाबडेपणाने वर्णन करू लागते. आणि दुसरे म्हणजे कवितेतील अलंकार, प्रतिमा बघितल्या तर ही कविता बालकवींची कशी असू शकेल अशी शंका निर्माण होते, इतकी ती सामान्य पातळीवर येऊन पसरत जाते. या कवितेतील अनुप्रासांची दाटी काय दर्शविते ? बालकवींची नादमयता कुठे लोपली ? श्रुतिसुभगतेचे लेणे कसे कुणी हिरावून घेतले असे प्रश्न निर्माण होतात.

धीर धिंग रणसिंग बसले नरनायक त्यामधी
ऐटदार जरतार आपल्या भर पोषाखी सुधी ॥
(शाहीर कविता)

ही होनाजीबाळाची 'लावणी अहिल्येची' तर नव्हे ! असा संभ्रम पडावा अशी तिची रचना आणि चटकदार अनुप्रासावरून वाटते. हे लेखन बालकवी मनाच्या उमाळ्याने आणि प्रतिभेच्या सामर्थ्याने करीत आहेत असे दिसत नाही. कुठेतरी काहीतरी एकसारखी धडपड आहे. ही धडपडही आपली शब्दकळा हरवून बसलेली. त्यामुळे त्यामधून जाणवतो ती केविलवाणा आशय ! ज्या आशयाची अभिव्यक्ती करण्याचा कविधर्म नाही असा हा आशय ! त्यामुळे या आशयाची अभिव्यक्ती होते तीही शाब्दिक अशीच ! तिच्यात भावनांचा ओलावा आणि कल्पनेचा नितळपणा नाही. एक शाब्दिक कसरत या कवितांतून घडते. बालकवी वाचकाला पारखे होतात हीच या 'निःश्वासा'ची शोकांतिका ! या कवितांमधून कथाकाव्यही निर्माण होत नाही किंवा प्रणयकविताही निर्माण होत नाही. बालकवी आपल्या कवितेत कथात्मकता आणू शकतात पण संपूर्ण कथाकाव्य त्यांना निर्माण करता आलेले नाही. ही त्यांच्या प्रतिभेची मर्यादा आहे असे नव्हे तर तो त्या प्रतिभेचा धर्मच नाही. जी प्रतिभा निसर्गाची गाणी गातांना अत्यंत मोकळी, दिलखुलास, सळसळती अशी कवितेतून जाणवली ती प्रतिमा दीर्घ कथाकाव्य निर्मितीमध्ये जाळ्यात एखादे 'पाखरू' सापडावे व त्याने सुटण्यासाठी केविलवाणी धडपड करावी तशी होऊन जाते. जी गोष्ट अपूर्ण दीर्घ कथाकाव्याची तीच गोष्ट बालकवींच्या प्रणयगीतांची झाली आहे !

'जादुगारीण,' 'तू तर चाफेकळी,' 'प्रीति व कर्तव्य,' '...ला,' 'मूढमालती,' 'घडग्यातील रमणी,' 'गाण्याची चढती कमान' 'निःश्वास (?),' 'दवबिंदु' या नऊ प्रणयाचा मनोभाव व्यक्त करणाऱ्या कविता अपूर्ण राहिल्या आहेत. बालकवींच्या निसर्गकवितेतून व्यक्त झालेली प्रणयाची भावना आणि वरील कवितेतील प्रणयाची भावना यात फरक पडत गेला आहे. 'फुलराणी,' 'संध्यारजनी,' 'औदुंबर' या कवितांतून ही मुग्ध प्रणयाची जाणीव कवीने आपातत: वर्णन केली आहे. ती वर्णन करण्यासाठी तो सिद्ध झाला आहे असे नाही. ही प्रणयाची अनुभूतीही अत्यंत मर्यादित स्वरूपात अवतरली आहे.

अपूर्ण कवितेत, प्रणयाचे विभ्रम बालकवी वर्णन करतात, नाही असे नाही. पण त्यात कुठेच जिवंतपणा नसतो. उत्कटता नसते.

दे दे सोडुनि ही लाज गडे, चुंबुनि लाडेंकोडें
धर मज कवळोनी, करपाशीं, स्निग्ध तुझ्या हृदयाशी !
बंदा दास तुझा, हा असला, दगडाचा घडलेला
पुतळी जादूची, बनतांची, जीवकळा मय त्याची
सोडुनि मातीला, अवलीला, तुझ्या हृदयज्योतीला
पाहुनिया गिरक्या, घेइल ती, तुझ्याच भंवती भंवतीं

असे शाब्दिक विभ्रम बालकवी निर्माण करतात.

उलटपक्षी केशवसुतांच्या काव्याभिव्यक्तीतील ओबड-धोबडपणा लक्षात घेऊनही असे म्हणावेसे वाटते की तेथील प्रणयानुभव हा अधिक अस्सल व उत्कट झालेला आहे. उदाहरण

> **करा अपुल्या तूं पहा चांचपून**
> **करा आपुलिया पहा तपासून**
> **प्रकृति माझीही तिथें तुज कळेल**
> **विकृति माझी तुज तिथें आढळेल !**

या अनुभूतीची स्वाभाविकता बालकवींच्या वरील कवितेतील प्रणयानुभूतीत शोधूनही सापडत नाही. प्रेयसी आणि प्रियकर यांची परस्परामधील प्रणयाच्या उत्कटतेची जाणीव ही वरवरची, पसरट अशी राहाते ती हृदयाच्या अन्तरहृदयातून साक्षात झाली असावी याची पर्वाही बालकवी करत नाहीत. उदा.

> **क्रीडांगण जणु चंचल सुंदर भाल तुझें हें गडे,**
> **भुरुभुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळा उडे ॥**

असे हे वर्णन येते व म्हणून असे म्हणावेसे वाटते की या भावानुभवातील आर्तता, हळुवारपणा, सुकुमारपणा व्यक्त करण्याचा प्रयत्न बालकवी करतात; पण त्यात बेसूर अशी अवस्था होते. त्यामुळे होते काय की एकतर या कविता अपूर्ण राहतात आणि काव्यदृष्ट्याही नीरस अशा उतरतात.

बालकवींच्या कवितेचा आलेख काढला तर काय दिसते ? १९०९ ते १९१४ पर्यंत यांच्या काव्यनिर्मितीचा उत्कर्ष झालेला दिसतो व १९१४ पासून पुढे बालकवींची कविता उतरणीला लागते. ही उतरणीला लागलेली कविता आणि अपूर्ण कविता यांचाही निकटचा संबंध आहे. केशवसुतांच्या कवितेचा आलेख नेमका उलट प्रकारचा आहे. त्यांच्या प्रतिभेचा उत्कर्षकाळ म्हणून १९०० ते १९०५ असा अभ्यासकांना दिसला. प्रतिभा प्रौढ होत गेली व संस्कारक्षम अशी शेवटपर्यंत राहिली. बालकवींच्या बाबत विचार करतांना प्रवास उलटा झालेला दिसतो. १९०९ ते १९१४ या काळातील बालकवींच्या काव्याच्या विषय, आशय आणि अभिव्यक्ती ही निसर्गातून चैतन्य घेत होती. अनुभवांची अर्थपूर्ण गोफनिर्मिती होत असता कलावंताचा तटस्थपणा जाणवत होता. नित्यनूतनत्वाचा धर्म आत्मसात करीत होती अशावेळी एकच एक 'निसर्गविषया'ने या कवीला झपाटलेले होते. तोच त्याच्या काव्यनिर्मितीचा आणि काव्यवृत्तीचा धर्म होता. पण या काव्यनिर्मितीला जेव्हा वेगळ्या वाटा फुटू लागल्या त्यावेळी आपोआपच प्रतिभेच्या मर्यादित विश्वात ही कविता कोंडली गेली ती कायमचीच ! त्यामुळे एकतर विविध विषय हाताळून तिने जगण्याची धडपड तरी केली किंवा अपूर्ण तरी राहिली असे म्हणावे लागते. नको त्या भयंकर आत्मरत अशा आत्मनिष्ठेने या कवितेचा शेवट केला. ही उदासीनता, हे दुःख, ही विषण्णता या अत्यंत व्यक्तिगत पातळीवरून आकारास आल्या. त्यांचे generalization कसे ते झालेच नाही !

आपल्याच दुःखकोशात बालकवींची प्रतिभा अडकली गेली. दैनंदिन जीवनातील सुखदुःखाची जाणीव कवितेत वास्तवाची अनुभूती प्रगट करीत असता तीतील 'स्व' हा उपस्थित राहिल्यामुळे हे दुःख एका वरच्या पातळीवर पोहचू शकत नाही. त्यामुळे कलावंताची ही उपस्थिती काव्यदोषास कारणीभूत ठरते. एका वेगळ्याच अर्थाने बालकवी स्वतःमध्येच involved होतात व स्वतःभोवती दुःखाचा, उदासीनतेचा कोष विणत जातात. त्या कोषाची बंधने तोडून विश्वात्मक पातळीवर ही कविता अवतरू शकली नाही व अशा एक विशिष्ट अवस्थेतच बालकवींचा आणि त्यांच्या कवितेचाही पूर्णविराम वाङमयीन दृष्ट्या निर्माण झाला. कदाचित बालकवींना अधिक आयुष्य मिळाले असते तर या भोवऱ्यात सांपडलेली त्यांची कविता मुक्त होणे शक्य होते. तितके प्रौढत्व तिच्या ठिकाणी निश्चितच होते यात मात्र संशय नाही. आपल्या प्रतिभासामर्थ्याने बालकवींनी मराठी कवितेत चिरंतन भावकाव्याचे दालन समृद्ध केले आहे व निसर्गशिल्पाला जिवंत आणि चिरंतन करून ठेवले आहे. ही त्यांची खऱ्या अर्थाने मराठी कवितेला दिलेली देणगी होय. एका स्वसामर्थ्याच्या वेगळ्या जाणिवेने त्यांनी कविता लिहिली व आपले स्थान निश्चित केले ही गोष्ट मात्र निर्विवाद होय. □ □

[अमेयची तीन प्रकाशने या तीन पुस्तकांच्या परीक्षणांचे लेखक श्री. हरिहर चंद्रशेखर घोंगे आहेत. नजरचुकीने त्यांचे नाव टाकावयाचे राहिले याबद्दल क्षमस्व ! —संपादक]

॥ संघ वार्ता ॥

मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस

१. माननीयांची भेट व सत्कार

२० सप्टेंबर ७३ रोजी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालक श्री. कृ. द. पुराणिक यांनी संस्थेला भेट दिली. त्यांनी श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय पाहून मोलाचे मार्गदर्शन केले.

८ ऑक्टोबर ७३ रोजी बाबुराव बागूल यांनी भेट दिली.

१ नोव्हेंबर १९७३ रोजी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवियत्री सौ. पद्माताई गोळे यांनी संस्थेला भेट दिली. त्याप्रसंगी संस्थेने त्यांच्या काव्यगायनाचा कार्यक्रम आयोजित केला. कवियत्री सौ. गोळे यांच्या काव्यगायनाबरोबर वैदर्भीय कवी प्रा. शनवारे, श्री. सुरेश भट व सौ. उषा लिमये यांनीही काव्यगायनात भाग घेतला. अध्यक्षस्थानी रविकिरण मंडळाचे अध्वर्यू व कवी श्री. श्री. बा. रानडे हे होते.

९ डिसेंबर ७३ रोजी श्री. श्री. पु. भागवत व आमदार घोंगडे यांनी संस्थेला भेटी दिल्या.

१० डिसेंबर रोजी महाराष्ट्र बँकेचे जनरल मॅनेजर श्री नानासाहेब धारपुरे यांचा त्यांना पुष्पमाला अर्पण करून सन्मान करण्यात आला.

२. स्मृतिदिन

१७ नोव्हेंबर ७३ रोजी दिवंगत संघाध्यक्ष कै. दि. ब. उपाख्य भाऊसाहेब पंडित यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या छायाचित्राला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

२० नोव्हेंबर ७३ रोजी सुप्रसिद्ध संशोधक कै. डॉ. य. खु. देशपांडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

३. शताब्दिउत्सव

महाराष्ट्रातील एक श्रेष्ठ विचारवंत व श्रेष्ठ कवी कै. भा. रा. तांबे यांच्या जन्मशताब्दिच्या निमित्ताने त्यांना आदरांजली वाहण्यात आली. या प्रसंगी प्रा. भ. श्री. पंडित यांचे तांब्यांच्या काव्यावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी संघाध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते होते.

४. प्रकाशन समारंभ

२३ आक्टोबर ७३ रोजी सायंकाळी ४ वा सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. अनंत काणेकर यांच्या हस्ते संस्थेचे मुखपत्र असलेल्या ' युगवाणी ' ऑक्टोबर–नोव्हेंबर ७३ च्या दिवाळी अंकाचे प्रकाशन झाले.

५. श्रीगणेश व्याख्यानमाला

यंदा श्रीगणेश व्याख्यानमालेनिमित्त दि. २९ व ३० सप्टेंबर १९७३ रोजी मराठवाडा विद्यापीठातील, मराठी विभागाचे प्रमुख डॉ. यु. म. पठाण यांनी ' संतवाङ्मयावर ' दोन व्याख्याने दिली.

६. गांधी जयंती

२ ऑक्टोबर ७३ रोजी गांधी जयंतीनिमित्त म. गांधींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

अनुक्रमणिका

७. श्रद्धांजलि

दि. ६ डिसेंबर ७३ रोजी श्री. शंकर गणेश कानेटकर कवी 'गिरीश' यांच्या निधनानिमित्त दु:ख व्यक्त करण्याकरिता सभा भरली. संघाध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते यांनी भावपूर्ण शब्दात त्यांना श्रद्धांजलि वाहिली. सभेने दुखवटा व्यक्त केला.

दि. १८ डिसेंबर ७३ रोजी वऱ्हाडचे हरिभाऊ म्हणून परिचित असलेले सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. बाळकृष्ण संतुराम गडकरी यांना श्रद्धांजलि अर्पण करण्यात आली. डॉ. कोलते यांनी भावपूर्ण शब्दांत त्यांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन केले.

८. शालेय वक्तृत्व स्पर्धा

वि. सा. संघाच्या विद्यमाने कै. इंदिराबाई खरे (डॉ. सौ. कुसुमताई वानकर यांच्या मातोश्री) शालेय वक्तृत्व स्पर्धा दि. १६ डिसेंबर रोजी गडकरी सभागृहात आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत दहा शाळांनी भाग घेतला. विषय होता "शालेय शिक्षणात ग्रंथालयाचे स्थान" या स्पर्धेत भिडे गर्ल्स हायस्कूल मधील कु. मंजुषा दर्पे या विद्यार्थिनीने ५१ रु. चे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. द्वितीय क्रमांकाचे ३१ रु. चे पारितोषिक हडस हायस्कूल, नागपूर मधील कु. माधुरी पारसनीस व तिसऱ्या क्रमांकाचे २१ रु. चे पारितोषिक विनायकराव देशमुख हायस्कूल मधील श्याम शिखरे, इतवारी हायस्कूल मधील चारुदत्त डोळके व लोकांची शाळा मधील कु. छाया वलाकार या तिघांना विभागून मिळाले. स्पर्धेचे परीक्षक सर्वश्री दि. वा. साबळे, चंद्रकांत कुळकर्णी व सौ. शांता देऊस्कर होते.

नाटयसमिती

प्रा. पुष्पा भावे यांची व्याख्यानमाला

३० ऑक्टोबर व ३१ ऑक्टोबर ७३ रोजी मुंबईच्या प्रख्यात नाटयसमीक्षक प्रा. सौ. पुष्पा भावे यांनी 'आजची मराठी व्यावसायिक रंगभूमी' व 'उद्याची मराठी प्रायोगिक रंगभूमी' या दोन विषयांवर व्याख्यानमाला गुंफली.

प्रा. माधव मनोहर यांची व्याख्यानमाला

दि. ३, ४ व ५ नोव्हेंबर ७३ रोजी मुंबईचे सुविख्यात नाटय-टीकाकार प्रा. माधव मनोहर यांनी तीन दिवस 'मराठी नाटक' या विषयांवर व्याख्यानमाला गुंफली.

रंगभूमी दिन

दि. ५ नोव्हेंबर ७३ रोजी रंगभूमी दिन साजरा झाला. या प्रसंगी आद्यनाटककार विष्णुदास भावे यांच्या प्रतिमेला प्रा. माधव मनोहर यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आली. या प्रसंगी प्रा. माधव मनोहर यांनी आपल्या व्याख्यानमालेचे शेवटचे पुष्प गुंफले.

नाटयसंस्थांचा मेळावा

दि. ४ नोव्हेंबर १९७३ रोजी स्थानिक नाटयसंस्थांचा मेळावा प्रा. माधव मनोहर यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. अशाप्रकारे नाटयसंस्थांच्या प्रतिनिधींना एकत्रित आणण्याचा विदर्भातील हा पहिलाच स्तुत्य प्रयत्न होता. या मेळाव्याचे संचालन आमंत्रक श्री. मनोहर म्हैसाळकर व सह आमंत्रक श्री. श्रीपाद जोशी यांनी केले.

दि. २३ डिसेंबर १९७३ रोजी मुंबईच्या विख्यात सामाजिक कार्यकर्त्या व विचारवंत लेखिका श्रीमती गोदावरी परुळेकर यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी संघाध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते होते.

आजीव सदस्य

श्री. मनोहर आत्माराम पिंपळापुरे, श्री. वसंत आत्माराम पिंपळापुरे व श्री. श्रीपाद वामनराव पिंपळापुरे, नागपूर यांनी संस्थेला प्रत्येकी रुपये एकशे एक देऊन आजीव सदस्य झाल्याबद्दल विदर्भ साहित्य संघ त्यांचा आभारी आहे. □ □

शाखा प्रतिवृत्त

गोंडवण शाखेची नवी कार्यकारिणी

विदर्भ साहित्य संघाच्या गोंडवण शाखेची सर्व साधारण सभा ३० ऑगस्ट रोजी सरदार पटेल महाविद्यालयात झाली. विदर्भ सहित्य संघाचे चिटणीस प्रा. मदन धनकर यांनी सभा बोलाविली होती. सभेच्या अध्यक्षस्थानी वि. सा. संघाचे आजीव सदस्य व माजी आमदार बाबूरावजी पोटदुखे होते.

प्रा. धनकर यांचे प्रास्ताविक झाल्यावर नवीन वर्षाची कार्यकारिणी निवडण्यात आली. सर्वानुमते अध्यक्षपदी श्री. ज. गो. संत, उपाध्यक्ष डॉ. तु. वि. पत्तीवार, सरचिटणीस प्रा. शा. वा. स्वान, कोषाध्यक्ष भगवंत ठाकरे, सदस्य सर्वश्री म. ना. टोंगे, डॉ. आबासाहेब सपाटे, छगनलालजी खजानची, डॉ. ना. बा. कंचर्लावार, वा. वि. टिकले आणि पदसिद्ध सदस्य म्हणून श्री. शांताराम पोटदुखे व प्रा. मदन धनकर आहेत.

नवनिर्वाचित कार्यकारिणीची सभा त्यानंतर डॉ. तु. वि. पत्तीवार यांचे निवासस्थानी झाली. वर्षभरात करावयाच्या कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यात आला. डेप्युटी इंजिनियर श्री. वसंत साखरकर यांनी आपल्या काही कविता म्हणून दाखविल्या.

आचार्य अत्रे यांची ७५ वी जयंती

आचार्य अत्रे वाङमय मंडळ व विदर्भ साहित्य संघाच्या गोंडवण शाखेच्या वतीने आचार्य अत्रे यांची ७५ वी जयंती सरदार पटेल महाविद्यालयात साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी गोंडवण शाखेचे अध्यक्ष श्री. ज. गो. संत होते.

सभेत साहित्यभूषण तु. ना. काटकर व प्रा. शा. वा. स्वान यांची भाषणे झालीत. श्री. काटकर यांनी १९५६ साली श्री. अत्रे चंद्रपूरला आले असता गोंडवण शाखेत झालेल्या त्यांच्या भाषणाची व स्वागताची आठवण सांगितली. त्यातून साहित्यसंस्थांसंबंधीची आचार्य अत्रे यांची आवड व आस्था त्यांनी सांगितली. प्रा. स्वान यांनी त्यांच्या वाङमयीन कर्तृत्वाचा आढावा घेतला. विडंबनकार नाटककार, विनोदी लेखक या संदर्भात अत्र्यांचे योगदान त्यांनी स्पष्ट केले.

श्री. संत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात औदासिन्य घालविणारे व्यक्तिमत्व असे अत्र्यांचे वर्णन करून राजकारण, रंगभूमी, साहित्य, चित्रपट, शिक्षण, भाषिक राज्य चळवळ यात त्यांनी आपल्या अस्तित्वाने नवे चैतन्य, नवा उत्साह निर्माण केला. सूर्याचे प्रखर तेज आपल्या प्रतिभेने आळवणारा साहित्यिक सूर्यास्ताचे मनोहारी रंग व तेज टिपू शकतो हे अत्र्यांनी पं. नेहरूंच्या संबंधात वेळोवेळी केलेला गौरव व टीका यादृष्टीने त्यांनी स्पष्ट केले.

आचार्य अत्रे वाङमय मंडळाचे सचिव प्रा. म. ना. टोंगे यांनी प्रास्ताविक भाषण केले व आभार मानले. चहापानानंतर कार्यक्रम संपला.

"कै. न्या. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा."

यंदाच्या कै. न्या. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा चन्द्रपूर येथे नेताजी नगरभवनांत, विदर्भ साहित्य संघाच्या गोंडवण शाखेचे वतीने दि. २१ व २२ सप्टेंबर ७३ ला घेण्यात आली. स्पर्धेचा शुभारंभ दि. २१–९–७३ ला सकाळी नऊ वाजता श्री. वामनराव गड्डमवार, अध्यक्ष, जिल्हा परिषद, चन्द्रपूर यांचे हस्ते करण्यात आला. स्पर्धेचा समारोप आणि बक्षीस वितरण समारंभ म्हणून श्री. मा. गो. वैद्य, संपादक 'तरुण भारत' नागपूर ह्यांच्या हस्ते झाला.

स्पर्धेतील फिरती रौप्य ढाल यंदा 'कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, अमरावती' यांनी पटकावली. प्रथम क्रमांकाचे रोख रु. १०० /– चे पारितोषिक श्री. प्रियदर्शन माडखोलकर, गो. से. अर्थ–वाणिज्य महाविद्यालय, नागपूर यांना तर श्री. एस्. एल्. देशमुख, कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, अमरावती यांनी द्वितीय क्रमांकाचा रोख पुरस्कार रु. ७५ /– प्राप्त केला. निरनिराळ्या महाविद्यालयातील एकूण वीस स्पर्धकांना शेकडा साठ व त्याहून अधिक गुण मिळविल्याबद्दल प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.

परीक्षक म्हणून श्री. य. वा. टोकेकर, अ‍ॅडव्होकेट प्रशांतकुमार खजानची आणि सौ. कलावती कुलकर्णी यांनी सहकार्य दिले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री. ज. गो. संत होते. कार्यक्रमाचे संचलन व आभारप्रदर्शन प्रा. शा. वा. स्वान यांनी केले.

वणी शाखा

अध्यक्ष–श्री. ना. मा. सरपटवार, **उपाध्यक्ष**–श्री. ना. रा. भागवत, श्री. माधव सरपवार, **सरचिटणीस**–श्री. वा. वि. ठाकरे, **चिटणीस**–श्री. क. के. सिडाम, प्रा. म. ना. साधनकर,

सदस्य–१. प्राचार्य रा. वा. शेवाळकर, २. प्रा. शां. सी. कवडे, ३. श्री. म. ता. राजूरकर. ४. श्री. के. ना. काटपाताळ, ५. श्री. भय्याजी ढुमे, ६. श्री. र. वि. दामले, ७. सौ. नंदाताई दामले, ८. श्री. अ. स. ढुमणे, ९. श्री. वा. झा. कांवळे, १०. श्री. म. के. खानझोडे, ११. प्रा. ह. रं. गलगलीकर १२, प्रा. र. वा. देशपांडे,

७३–७४ करिता वरील कार्यकारिणी दि. १५–११–७३ च्या आम सभेत सर्वानुमते निवडून आली.

□ □

संलग्न–संस्थावृत्त

रंजन कला मंदिर

दि. ७ ऑक्टोबर ७३ रोजी श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या उपस्यितीत संस्थेचा २३ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. गतवर्षीच्या सरकारी स्पर्धेतील नागपुरातील भिन्न संस्थांच्या पारितोषिक विजेत्या कलाकारांचे अभिनंदन, श्री. शरद सुतवणे यांचे गायन, कु. विद्या मोकादम यांचे नृत्य आदि कार्यक्रमांचा यात समावेश होता. कार्यक्रमाच्या शेवटी वि. सा. संघाच्या, नाटय समितीचे आमंत्रक म्हणून निवड झाल्याबद्दल श्री. मनोहर म्हैसाळकर यांचे अभिनंदन करण्यात आले.

दि. २३ आक्टोबर ७३ रोजी सर्वश्री अनंत काणेकर, पु. भा. भावे आणि बापुराव नाईक यांनी संस्था–कार्यालयास भेट दिली.

दि. १ नोव्हें. ७३ ला रात्री ९ वाजता प्रा. सौ. पुष्पा भावे यांच्या हस्ते श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर लिखित 'वेदनेचा वेद झाला' ह्या नाटकाचा मुहूर्त करण्यात आला. ह्या कार्यक्रमास प्रा. अनंत भावे उपस्थित होते.

'मराठी रंगभूमी दिना' निमित्त दि. ५ नोव्हेंबर, ७३ रोजी श्री. माधव मनोहर यांच्या अध्यक्षतेखाली वि. सा. संघ, नाटयसमितीने आयोजित केलेल्या नागपुरातील भिन्न संस्थांच्या मेळाव्यात संस्थेच्या वतीने सहकार्यवाह श्री. रमेश अंभईकर यांनी भाग घेतला. त्याच दिवशी रात्री ८।। वा. श्री. माधव मनोहर यांनी संस्थेस भेट दिली. याप्रसंगी सर्वश्री पुरूषोत्तम दारव्हेकर, मा. नी. गलगलीकर, प्रभाकर उर्ध्वरेषे आणि अनेक संस्था–सभासद उपस्थित होते.

यंदा 'नेहरू शिष्यवृत्ती' चे मानकरी ठरलेले श्री. विजय तेंडुलकर यांचा दि. ७।११।७३ रोजी संस्थेतर्फे पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

दि. २१ डिसेंबर, ७३ रोजी तेराव्या महाराष्ट्र राज्य नाटय महोत्सवात संस्थेतर्फे श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर लिखित आणि श्री. रमेश अंभईकर दिग्दर्शित 'वेदनेचा वेद झाला' हा नाटय प्रयोग सादर करण्यात आला. प्रयोगात सर्वश्री अजित दिवाडकर, विजय बेनाडीकर, बाळ बक्षी, सौ. अनुराधा जोशी आणि सौ. आशा तांवे यांनी कामे केलीत. राज्य नाटय स्पर्धेत दिग्दर्शन करण्याचा श्री. रमेश अंभईकर यांचा हा पहिलाच प्रयत्न होता. प्रयोगाचे संगीत दिग्दर्शन श्री. शरद सुतवणे यांनी केले होते. या नाटकाची मुंबईला ता. १ जानेवारी १९७४ ला सुरू होणाऱ्या अंतिम स्पर्धेकरिता निवड करण्यात आली.

याशिवाय या स्पर्धेत अन्य संस्थांनी सादर केलेल्या विविध नाटयप्रयोगातून संस्थेच्या खालील सभासदांनी भूमिका केल्या.

कु. हेमा पुराणिक–'रजनी कृष्ण सजनी' रंगरेखा, कु. छाया दुपल्लीवार–'राजरक्त' बंगाली असोसिएशन, सौ. शोभा उबगडे आणि श्री. अविनाश किन्हीकर 'डीप फ्रीज' सुरुचि निकेतन, श्री. गणेश नायडू (दिग्दर्शन आणि भूमिका) –'वाजे पाऊल आपुले'– ए. जी. रिक्रिएशन क्लब, श्री. रामदास शेंडे (दिग्दर्शन) 'कणसा कणसा दाणा दे' महाराष्ट्र समाज, उज्जैन.

□ □

सूचना

विदर्भ साहित्य संघाचे सभासद, 'युगवाणी'चे वर्गणीदार होऊ इच्छिणारे, तद्वत्च संस्थेला आर्थिक सहकार्य देणाऱ्यांनी रक्कम क्रॉस्ड चेक, ड्राफ्ट अथवा क्रॉस्ड इंडियन पोस्टल ऑर्डरनेच A/c Payee द्वारा पाठवावी. ती खालील प्रमाणे ज्या समितीशी संबंधित असेल त्याच नावे पाठवावी, ही विनंती.

नाव		बँकेतील खाते
(१) विदर्भ साहित्य संघ	—	विदर्भ साहित्य संघ
(२) युगवाणी	—	युगवाणी
(३) परीक्षा समिती	—	संचालक, परीक्षा समिती
(४) श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय	—	श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय

वरील नावानेच रक्कम पाठवून चेकसोबत वटणावळ म्हणून रु. १ (एक) अधिक पाठवावा.

मा. नी. गलगलीकर

दि. ३१ डिसेंबर १९७३ — सरचिटणीस विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

W

॥ प्रकाशित ॥

कथासंग्रह

उत्तररात्र
ना. व्यं. देशपांडे

वारा वाजे रुण झुणा
चिं. त्र्यं. खानोलकर

पोपट-पंची
पद्माकर गोवईकर

नाटके

दंवद्वीपचा मुकाबला
विजय तेंडूलकर

व्यक्ति तितक्या प्रकृती
पद्माकर गोवईकर

ऐक, जनमेजया
आद्य रंगाचार्य
पद्माकर गोवईकर

असंच आणि इतकंच
श्रीनिवास भगणे

चरित्र

The Rashtrasant
P. S. Kane

अमेय प्रकाशन

॥ अमेय कथा ॥

॥ कविता अमेय ॥

॥ अमेय कादंबरी ॥

॥ निबंध अमेय ॥

॥ अमेय चरित्रे ॥

॥ प्रकाशने अमेय ॥

॥ अमेय ॥

॥ अप्रकाशित ॥

कथासंग्रह

रसमुग्धा
आनंद साधले

परि हरि हा ब्रह्मचारी
आनंद साधले

अशी ही माणसेच
ना. व्यं. देशपांडे

+ सिनिकथा
सिनिक

नाटके

भल्या काका
विजय तेंडूलकर

झाला अनंत हनुमंत
विजय तेंडूलकर

आम्ही आपले खुळोबा खुळोबा
चिं. त्र्यं. खानोलकर

फोटो फिनिश
पद्माकर गोवईकर

रूद्रवर्षा
महेश एलकुंचवार

कविता

राजपुत्र आणि डार्लिंग
ग्रेस

कादंबरी

होमसिक ब्रिगेड
भाऊ पाध्ये

रुईकर मार्ग
नागपूर २

अनुक्रमणिका